श्रीशंकर

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

[ श्रीव्यासप्रणीत ब्रह्मसूत्राचा ओवीबद्ध भावार्थ ]


अनंत दामोदर आठवले
[ स्वामी वरदानंदभारती ]



तृतीयावृत्ती

श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे

प्रकाशक ः
**अध्यक्ष, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान,**
'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ,
मेहुणपुरा, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी ः ०२०-२४४९२४९७
website : http:\radhadamodar.org

*

**तृतीयावृत्ती ः**
श्रीगुरुपौर्णिमा
आषाढ शु. १५ शके १९४०
दिनांक २७ जुलै २०१८

*

चित्रकार ः
**कै.श्री.कल्याण शेटे,**
सांगली.

*

© सर्वाधिकर सुरक्षित

*

मुद्रक ः
**बालोद्यान प्रेस,**
१३५८-अ शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

*

**मूल्य ः रु. ७००/-**

ॐ श्री 卐

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञस्वराट् ।
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोमृषा ।
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ।।

तवैव वस्तु गोविन्द तुभ्यमेव समर्प्यते ।

## ।। श्रीवरदनारायणप्रार्थना ।।

पद्मासनाय मणिकुण्डलशोभिताय । भास्वज्जटामुकुटमण्डितमस्तकाय ।।
लक्ष्मीवराय जनपालनतत्पराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१।।
ध्यानस्थिताय सरसीरुहलोचनाय । विद्युत्प्रभायुतपयोधरसन्निभाय ।।
मन्दस्मितेन्दुवदनाय चतुर्भुजाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।२।।
सर्वाय तापशमनाय नतप्रियाय । भव्याय भूतजनकाय सुरोत्तमाय ।।
शर्वाय सर्वदमनाय मनोहराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।३।।
व्यासोद्धवादिवरदाय दयामयाय । ब्रह्मात्मजप्रमुखसन्मुनिसंस्तुताय ।।
श्रीशंकरेण पुनराहितविग्रहाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।४।।
लक्ष्मीसुपर्णधनदार्जुनसेविताय । सूर्यार्चिताय मरुदात्मजवन्दिताय ।।
भक्तार्चिपे नरसखाय सुखप्रदाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।५।।
नन्दप्रियाय कपिलाय सनातनाय । दक्षाय नैकसुखदाय गदाग्रजाय ।।
श्रीविट्ठलाय हिमशैलवरे स्थिताय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।६।।
गोविन्द-माधव-मुकुन्द-नितान्तकान्त- । नामप्रियाय सुलभाय कृपाघनाय ।।
सत्याय भक्तहितबोधपरायणाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।७।।
नित्याय सर्वगतये जगदीश्वराय । मूर्ताय यज्ञपतये निरुपाधिकाय ।।
देवाय वेदमतयेऽमितविक्रमाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।८।।
गोपाय वीरविजयाय धराधराय । बीजाय सुव्रतकराय महाधनाय ।।
ईज्याय लोकगुरवे गरुडध्वजाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।९।।
कौमोदकी-दर-सुदर्शन-नन्दकादि- । दिव्यायुधप्रहरणाय महाक्रमाय ।।
त्रैलोक्यमङ्गलकराय रमेश्वराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१०।।
रामाय सत्यतरधर्मविदुत्तमाय । प्राणाय बुद्धिकरणाय शुभेक्षणाय ।।
शुद्धात्मने करणकार्यकृतेऽव्ययाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।११।।
प्रेम्णा स्वभक्तजन-वाञ्छितपूरणाय । संदर्शितात्मवपुषे नतवत्सलाय ।।
स्निग्धप्रसन्नहसिताय हितोत्तमाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१२।।
स्पर्शेन दिव्यमृदुना करनीरजस्य । संवर्धकाय चरणानतभाग्यराशेः ।।
संजीवकाय जनकाय च पालकाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१३।।
तेजोमयाय करुणामृतसागराय । निष्कारणाय वरदाय च निस्तुलाय ।।
कल्पद्रुमाय सुखदाय निरामयाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१४।।
भोः पाहि पाहि भगवन् शरणागतं मां। बुद्धिं स्थिरां कुरु सदैव मनः प्रसन्नम्।।
नित्यं मदीयरसनाग्ररसाङ्गणेऽस्मिन् । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१५।।

# ब्रह्मसूत्रार्थदर्शिनी :

## द्वितीयावृत्तीचे प्रकाशकीय :

श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनीच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन करताना श्रीराधादामोदर प्रतिष्ठानला अतिशय समाधान वाटते आहे. तसे तर अठरा वर्षापूर्वी हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. गेली काही वर्षे सातत्याने या ग्रंथाची मागणी होत होतीच; शिवाय मधल्या काळात ग्रंथलेखकांना काही शंका विचारणारी, वाचकांना वाटलेल्या संदिग्ध स्थानासंबंधी विचारणा करणारी पत्रे आली होती. काही मुद्दे अधिक स्पष्ट व्हावेत असेही जाणती मंडळी म्हणत असत. एखाद-दुसऱ्या आक्षेपालाही समर्पक उत्तर देण्याविषयी बोलले जाई. विचक्षणांच्या भेटी-गाठीमध्ये हे सारे होत असे. अशा या सर्वच विषयांचा साकल्याने विचार करून मूळ ग्रंथाचे परिष्करण व संवर्धन करण्याची विनंती आम्ही स्वामीजींना केली व त्यांनी ती मान्य केली.

स्पष्टीकरणे वाढली की टीपा-आधारवचने यांचाही विस्तार अपरिहार्य ठरतो आणि हे सारे नोंदवण्याचे काम कोण करणार असा प्रश्न होता. पण रोह्याचे श्री. विष्णुपंत किंजवडेकर यांनी तो लीलया सोडविला. भर पडलेल्या ओव्या, टीपा, आधारवचने यांची जेथल्यातेथे नोंद करणे, नव्याने आलेले संदर्भ लिहिणे, सुधारित ओवी-संख्या, पृष्ठांकादि बिनचूकपणे लिहिणे असे हे जिकिरीचे काम त्यांनी दोन अडीच महिने उत्तरकाशीला श्रीस्वामींजवळ राहून तत्परतेने नि कुशलतेने पूर्ण केले. खरं तर त्यांनी परिष्कृत द्वितीयावृत्तीची ही मुद्रणप्रतच तयार केली. त्यांच्या या अमोल सहकार्यामुळेच हा ग्रंथ रेघारूपाला आला. म्हणून 'प्रतिष्ठान' त्यांचे आभारी आहे, ऋणी आहे.

मुळातच हा ग्रंथ निर्माण होण्यामागची प्रेरणा लक्षणीय आहे. 'दर्शिनी'कारांच्या प्रसिद्धी-पराङ्मुखतेमुळे ती व्यक्त झालेली नव्हती. या द्वितीयावृत्तीच्या निमित्ताने ती आता प्रकट करणे प्रतिष्ठानला उचित वाटले, म्हणून ती व्यक्त करीत आहो.

स्वामीजींचे सद्गुरु श्रीदासगणू महाराज ( ती. दादा ) यांना ब्रह्मसूत्रांवर ओवीबद्ध विवरण करावे, अर्थ विशद करावा अशी इच्छा होती. त्यांनी ईशावास्यादि उपनिषदांवरही ओवीबद्ध भावार्थ लेखन केलेले होते. पण आवश्यक तेवढी मेहनत घेणे त्यांना उतारवयात शक्य नव्हते. श्रीमहाराजांचे एकनिष्ठ भक्त व पू. अप्पांचे ( स्वामीजींचे ) ज्येष्ठ सुहृद कै. श्री. नारायणराव गर्दे आणि कै. श्री. गाडगीळ ( तारमास्तर ) यांनी श्रीमहाराजांना या लेखनासंबंधी जिव्हाळ्याने विचारले. तेव्हा श्रीमहाराज म्हणाले की, 'माझे हे काम आता अनंताच करील!' श्री. अनंतरावांनीही हे ऐकले होते.

पुढे श्रीमहाराज कालवश झाले तथापि निराश न होता श्री. गर्दे यांनी प्रसंगा-प्रसंगानी ती. दादांचा हा विचार पू. अप्पांच्या कानावर तीन-चार वेळा घातला आणि मग मात्र **'तद्बुद्धयस्तदात्मानं तन्निष्ठास्तत्परायणः'** या नात्याने ४-४॥ महिन्यात पू. अप्पांनी हा ग्रंथ लिहून पूर्ण केला, भाद्र. शु. ९ शके १८९९. यावेळी कु. गार्गी देशपांडे, श्री. छगनराव बारटक्के, श्री. मनोहर कुलकर्णी यांनी परिश्रमपूर्वक लेखन-कामाठी पूर्ण केली. विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारे प्रकाशन-समारंभाचे आयोजन न करिता अल्पावधीत तो वैशाख शु. ५ शके १९०० मध्ये प्रकाशित केला.

बदरिकाश्रमी प्रारंभ झालेल्या या ग्रंथाची पंढरीत पूर्णता झाली. आपल्या सद्‌गुरूंची जनहिताची अपूर्ण राहिलेली ही सात्विक इच्छा या गुरुनिष्ठ, निस्पृह शिष्योत्तमाने अशा प्रकारे उत्कटतेने पूर्ण केली.

ब्रह्मसूत्रांचे प्रतिपाद्य **' ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव ना पर: '** हेच आहे. यालाच उपनिषदांनी पराविद्या म्हटले आहे. हीच अपौरुषेय विद्या होय. आजच्या विज्ञानवादी जगात हिचा काहीसा उपहास केला जातो ही वस्तुस्थिती! पण ते योग्य मात्र नाही. प्रश्न असा आहे की आजच्या प्रगत विज्ञानाने मानवजातीला शांति-समाधान दिले की प्रदूषणांसारख्या भयंकर समस्या ? आतंकवाद ही प्रगत विज्ञानाचीच देणगी आहे की नाही ? मानवी जीवनातले अध्यात्म-विद्येचे यथार्थ स्थान मनुष्य विसरून गेल्यामुळेच त्याला असंख्य आपत्तींना तोंड द्यावे लागते आहे. " अध्यात्माचे खरे स्वरूप ते विसरुन गेल्यावरी। आपत्ती चालुन येते घरी! " ( श्रीदासगणू ) हे संतांचे वचन सत्य आहे. म्हणूनच उदरभरणासाठी आवश्यक असलेल्या अन्नोदक सेवनाइतकेच मानवी जीवनात अध्यात्माचेही महत्त्व आहे!

ब्रह्म हेच अंतिम सत्य ( Absolute truth ) असल्याने अध्यात्मामध्ये पारमार्थिक सत्ता, व्यावहारिक सत्ता आणि प्रातिभासिक सत्ता अशा तीन पातळ्यांवर त्याचे विवरण केले जाते आणि तदनुकूल आचरणाने मनुष्याचे कल्याण साधले जाते. त्याचे नेमके ज्ञान ज्याला होते त्याचा व्यवहारही उत्तम होतो आणि परमार्थही! असा मनुष्य जीवनात यशस्वी होतो आणि खरी शांती व समाधानही त्यालाच प्राप्त होते. सर्व संतांनी हाच उपदेश केला आहे. हेच जीवनरहस्य शिकविणारा हा ग्रंथ असून आपल्या ऋतंभरा प्रज्ञेने स्वामीजींनी तो परोपदी उजळून टाकला आहे. प्रासादिक भाषा, व्यवहारातले उद्‌बोधक दृष्टान्त व तर्कशुद्ध युक्तिवाद ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाच्या सुलभीकरणाचा आदर्श वस्तुपाठ ठरावा असा हा ग्रंथ आहे.

स्वामीजींचा हा ग्रंथ समन्वयाचा संदेश देणारा आहे. द्वैतवादी मध्वाचार्यांपासून केवलाद्वैतवादी शंकराचार्यांपर्यंत सर्वच आचार्यांनी आपली मते आग्रहपूर्वक मांडली आहेत. स्वामीजी हे शंकराचार्यांचेच अनुयायी असले तरी भागवतधर्माचे मर्मज्ञ चिंतक आहेत. त्यामुळे ' दर्शिनी 'मध्ये ते सर्व आचार्यांच्या विचारांना समन्वयात्मक भक्तीचे अधिष्ठान देतात. विशेषत: ' साधनाध्यायं ' विशद करताना भागवतधर्म--विचाराचा प्रभाव त्यावर पडलेला आहे असे लक्षात येते.

ग्रंथ प्रकाशित करताना ' दर्शिनीकारांनी ' या दुसऱ्या आवृत्तीला आपले मनोगत लिहून आपली भूमिका अधिक स्पष्ट केली असल्याने जिज्ञासूंच्या काही शंका प्रारंभीच दूर होतील. तसेच ग्रंथाचा समग्र विषय सर्वांना सुलभपणे आकलन व्हावा म्हणून पुणे विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे व्यासंगी प्राध्यापक डॉ. शं. रा. तळघट्टी यांचा या ग्रंथावरील रसग्रहणात्मक लेख ' ही अनंतसंपदा ' या ग्रंथातून घेतला आहे. डॉ. तळघट्टी यांचे त्यासाठी कृतज्ञतापूर्वक आभार मानणे उचितच होईल.

आयुर्विद्या मुद्रणालयाचे श्री. गुर्जरबंधू आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रमपूर्वक आणि न कंटाळता या विशालकाय ग्रंथाची सुंदर छपाई करून दिली म्हणून प्रतिष्ठान त्यांचे आभारी आहे. तसेच या ग्रंथातील चित्रांची सुबक छपाई करून देणारे श्री. उत्तमराव सहस्रबुद्धे ( बालोद्यान प्रेस ) यांचेही प्रतिष्ठान आभारी आहे.

प्रथमावृत्तीच्या निर्मितीमध्ये सहकार्य केलेल्या कु. गार्गी देशपांडे, श्री. छ. मा. बारटक्के, आणि मनोहर कुलकर्णी यांचाही साभार उल्लेख करणे अगत्याचे आहे. मोलाचे सहकार्य करूनही ज्यांनी आपला नामनिर्देश टाळला आहे, त्यांचेही प्रतिष्ठान आभारी आहे.

एक-दोन खुलासेही उपयुक्त होतील. प्रत्येक सूत्राखाली जे आकडे आहेत ते क्रमाने अध्याय, किरण ( पाद ), सूत्रक्रमसंख्या व अधिकरण अशा पद्धतीने दिले आहेत. जुन्या पिढीतल्या अभ्यासकांना हा खुलासा विशेषत: अधिकरणांचा उल्लेख उपयुक्त ठरेल. अधिकरणासंबंधीचे अधिक स्पष्टीकरण 'मनोगत'मध्ये झालेले आहेच. या आवृत्तीत मूळ ग्रंथातील ओव्यांना तारकचिन्ह दिले आहे. पण क्वचित चिन्ह नसतानाही त्या ओवीला आधार आहे. अगदी क्वचित् अनवधानाने उलटेही झाले आहे. विचक्षणांनी कृपया समजून घ्यावे ही विनंती.

'इतरेजनांना ही ओळखी घडविण्याचे' हे कार्य अशाप्रकारे पूर्ण झाले. 'सत्याचे दर्शन झाले तर जीवन कृतार्थ होतेच पण त्यातून ओसंडून वाहाणारे समाधान इतरांनाही सुखविते,' ( उपसंहार ओवी ४०९ ) हे आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. कारण तसा तो आदर्श आपल्या सर्वांच्या समोर आहे. पू. स्वामींच्या शब्दात एवढेच म्हणू या -

**'अन्य नाही मागणे।**
**उजेडावे ज्ञानाने।**
**हृदय भरावे भक्तीने। अहंकार जावो दुरी।।'**

अध्यक्ष
**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान**

## तृतीयावृत्तीचे प्रकाशकीय

**श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनीच्या** तृतीय आवृत्तीचे प्रकाशन करताना श्रीराधादामोदर प्रतिष्ठानला अत्यंत आनंद होत आहे.

**'श्रीब्रह्मसूत्र'** हे सामान्य मनुष्याला समजण्यास अवघडच आहे कारण यात निखळ तत्त्वज्ञानाची तर्कनिष्ठ चर्चा केलेली आहे. आद्य श्रीशंकराचार्यांपासून श्रीमध्वाचार्यांपर्यंत सर्व आचार्यांची भाष्ये ही प्रक्रियांच्या वेदान्तामुळे दुर्बोध राहिली आहेत. त्यांना समाजाभिमुखता लाभावी या तळमळीने पू. स्वामी वरदानंदभारतींनी ब्रह्मसूत्रावर अत्यंत सोपे, सरळ, रसाळ व रोचक ओवीबद्ध भाष्य रचले आहे. ब्रह्मसूत्र ग्रंथाच्या तृतीयावृत्तीच्या छपाईचा मंगलयोग यावा हे, महाराष्ट्रात तत्त्वज्ञानाची जिज्ञासा आजही जागृत असल्याचे द्योतक आहे. उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी सर्वांगीण सहाय्याची अपेक्षा असते. प्रत्येकाने आपली बाजू समर्थपणे पेलल्यामुळे हा ग्रंथ सुंदर झाला आहे. प्रतिष्ठानला याचे श्रेय श्री. प्रकाश मेहेंदळे आणि बालोद्यान प्रेसचे श्री. उत्तमराव सहस्रबुद्धे यांना द्यावेसे वाटते. सर्व सहाय्यकांचे मनःपूर्वक आभार.

**अध्यक्ष**
**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान**

॥ श्रीशंकर ॥

# मनोगत

ब्रह्मसूत्रार्थदर्शिनी ही ब्रह्मसूत्रावरील ओवीबद्ध टीका लिहिताना स्वीकारलेली भूमिका चौथ्या अध्यायातील चौथ्या किरणात ४७९ ओवीपासून ५१८ ओवीपर्यंत स्पष्ट केली आहे; पण ते प्रकरण अगदी शेवटी आहे आणि संक्षिप्तही आहे. स्वीकारलेले धोरण अधिक स्पष्ट व्हावे म्हणून हे मनोगत.

ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीकार श्रीमत् शंकराचार्यांच्या मताचा विनम्र अनुयायी आहे. श्रीमत् शंकराचार्यांनी मायावादावर आधारित असा जो केवल-अद्वैत सिद्धान्त प्रतिपादिला आहे तोच सिद्धान्त ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीकाराला सर्वतोपरी मान्य आहे. पण ब्रह्मसूत्रावरील टीका ही जगद्गुरु भगवान भाष्यकार यांच्या शारीरक भाष्याचा अनुवाद नाही. ब्रह्मसूत्रावर अद्वैत मतानुसारीच पण अगदी स्वतंत्रपणे लिहिलेली अशी ती ओवीबद्ध टीका आहे. अर्थात स्पष्टीकरण करताना आवश्यक म्हणून अनेक ठिकाणी भगवान् भाष्यकारानाच वाट पुसली आहे.

५५५ सूत्रांपैकी २०-२५ सूत्रेच, ब्रह्मसूत्रांचा म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी जो अर्थ केला आहे त्यापेक्षा, वेगळ्यारीतीने लावली आहेत. त्याचे थोडे स्पष्टीकरणही तिसऱ्या अध्यायाच्या नमनात ओवी क्रमांक ४२ पासून ४८ पर्यंतच्या ओव्यात केलेले आहे. अद्वैत सिद्धान्तालाच बाधा येईल असे विवेचन कोठेही होणार नाही याची दक्षता घेतली आहे. ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीकार हा संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज, श्रीतुकोबाराय, श्रीरामदास स्वामी या जगत् कल्याणासाठीच अवतरलेल्या महात्म्यांचा दासानुदास आहे; आणि तो सद्गुरु दासगणु महाराजांच्या कृपाछत्राखाली बालपणापासून वाढलेला आहे. या चारही वंदनीय विभूती मायावादी अद्वैती आहेत. तरी त्या सर्वांची दृष्टी साधकांच्या व्यवहाराच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल अशी समन्वयाची आहे. तेच अधिष्ठान ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीतही स्वीकारले आहे

श्रीब्रह्मसूत्रावर श्रीमत् शंकराचार्यांप्रमाणेच श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य व श्रीवल्लभाचार्य यांचीही भाष्ये आहेत. त्यांनी आपापल्या मताप्रमाणे ब्रह्मसूत्रांचे अर्थ लावले आहेत. तसेच त्यांचे इतरही काही विशेष आहेत.

१. सूत्र संख्या, अधिक सूत्रे घेतल्याने वा दोन सूत्रे मिळून एक सूत्र मानल्याने, प्रत्येकाची वेगवेगळी आहे.
२. सूत्रातील अनेक शब्दांचे अर्थ त्या त्या आचार्यांनी वेगवेगळे केलेले आहेत.
३. अधिकरणेही सूत्रांच्या उण्या अधिक संख्यांनी मागे पुढे होतात.
४. सूत्रे पूर्णपणे भिन्नरीतीने आणि वेगळ्या अर्थांनी त्यानी लावली आहेत.
५. काही ठिकाणी सामान्यत: भाव एकच असला तरी अर्थांची शब्दरचना वेगवेगळी आहे.
६. काही ठिकाणी सूत्रांना आधारभूत असलेल्या श्रुति आणि स्मृति वेगवेगळ्या स्वीकारल्या आहेत.

यावरून स्वतंत्रपणे भाष्य करणारा वा सूत्रांचा अर्थ लावणारा किती स्वतंत्रता घेतो ते लक्षात येऊ शकेल. सूत्रे ही मुळात अति संक्षिप्त असल्याने अर्थ करताना मधे मधे अनेक शब्द गृहीत धरावे लागतात. सूत्रांचा गद्य अर्थ मराठीमध्ये उतरविताना म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी कंसामध्ये असे गृहीत शब्द बहुसंख्य सूत्रात घातले आहेत. यांची संख्या मूळ सूत्रातील शब्दांपेक्षा कित्येकदा बरीच अधिक प्रमाणात आढळते.

ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीमध्ये सूत्रांचे अर्थ लावताना म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचाच अर्थ बहुतेक ठिकाणी स्वीकारला आहे. पण सोईच्या दृष्टीने सर्व ठिकाणचे कंस मात्र काढून टाकले आहेत. तसेच अर्थाला अधिक सोपेपणा यावा म्हणून भाष्य वा इतर टीकाकार यांच्या आधारे स्पष्टीकरणात्मक अधिक शब्दही स्वीकारले आहेत.

भाष्य लिहिताना सामान्यत: सूत्रे ही निरनिराळ्या अधिकरणात विभागून विवेचिली जातात. दर्शिनीने मात्र अधिकरणश: विभागणी स्वीकारलेली नाही. कारण अधिकरण म्हटले की त्यात विषय, संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, उपपत्ती अशा अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. अनेक अधिकरणे केवळ एका सूत्राची आहेत. अशावेळी

त्यांच्यामध्ये अधिकरणासाठी आवश्यक असलेल्या वरील विषय-संशयादि गोष्टींचा ऊहापोह कशाच्या आधारे करणार? भाष्यकारानीही प्रत्येक ठिकाणी विषय-संशयादींचा उल्लेख केलाच आहे असे म्हणता येत नाही. अधिकरणांचा विचार न करता सूत्रे क्रमाने वाचत गेले तरी अर्थ लक्षात घेताना काही अडचण वाटत नाही. म्हणून अधिकरणांची विभागणी येथे केलेली नाही.

५५५ सूत्रे अध्याय, किरण (पाद) या पद्धतीने श्रीमत् शंकराचार्यांच्या अनुक्रमानेच स्वीकारली आहेत. सूत्रांची रचना, विषय व अनुक्रम लक्षात घेऊन, नव्याने करायचा मोह (मोहच तो!) आवर्जून टाळला आहे.

भाष्य करताना स्वातंत्र्य कसे घेतले जाते याचे उदाहरण श्रीमत् शंकराचार्यांच्या पहिल्या अध्यायातील सूत्र १२ पासून १९ पर्यंतच्या सूत्रावरील भाष्यात आढळते. त्यांनी प्रथम काही विशिष्ट हेतूने आनंदमयादि सूत्रांचा एक अर्थ लावला. आणि उपनिषदातील 'ब्रह्मपुच्छं प्रतिष्ठा' या वचनावर विशेष लक्ष देऊन सर्व सूत्रांचा अर्थ पुन: नव्याने वेगळ्या रीतीने लावला आहे. आणि १९ व्या सूत्राच्या भाष्याच्या शेवटी म्हटले आहे की, **'अपराण्यपि सूत्राणि यथा संभवं पुच्छवाक्य निर्दिष्टस्य एव ब्रह्मणः उपपादकानि द्रष्टव्यानि।'** एका माननीय पंडितानी या भाष्याला 'उत्सूत्र भाष्य' (सूत्रापेक्षा वेगळ्या अर्थाचे) म्हणून उल्लेखिले आहे. इतरत्रही काही ठिकाणी भगवान भाष्यकारांनी एकाच सूत्राचे दोन वेगवेगळे अर्थ केले आहेत. घेतलेल्या स्वातंत्र्याचे स्वरूप काय असते ते लक्षात घेतले जावे म्हणून हा उल्लेख केला आहे. पायरीला पाय लावण्याचे उदिष्ट या उल्लेखाचे नाही, हे लक्षात घ्यावे.

सूत्रात वा शांकरभाष्यात जेथे यज्ञ वा यज्ञकर्मातील प्रक्रिया यांचा उल्लेख आलेला आहे तेथे पंचायतनादि देवतांची भक्ति आणि तत्संबंधीचे पूजोपचार यांचा आधार घेतला आहे. कारण आजच्या जिज्ञासूच्या दृष्टीने यज्ञ वा तत्संबंधीचा क्रियाकलाप पूर्णपणे अज्ञात आहे. म्हणून सूत्रातील भावांचा व हेतूंचा बोध स्पष्टरीतीने होण्यासाठी आजही पुष्कळ प्रमाणात रुढ असलेल्या पूजोपचारादींची उदाहरणे अधिक उपयोगी पडतील असे वाटल्याने तदनुसार विवेचन केले आहे.

सूत्राना आधारभूत असलेली श्रुतिवचने काही कथांच्या माध्यमातून आली आहेत. अशा बहुतेक स्थानी उपनिषदातील त्या त्या कथा काहीशा विस्ताराने दर्शिनीमध्ये ओवीबद्ध केलेल्या आहेत.

ब्रह्मसूत्रावर ओवीबद्ध मराठी भाष्य लिहिणेच योग्य नाही असे ज्यांचे प्रामाणिक मत आहे, त्यांचे समाधान कसे करणार? पण ब्रह्मसूत्राचा भक्तिसाठी वा भक्तासाठी काय उपयोग? असे काही बुद्धिवादी विचारतात. त्यांना सांगण्यासाठी श्रीएकनाथ महाराजांची एक ओवी उद्धृत करणे पुरेसे होईल. ती ओवी अशी, **'जो ब्रह्मज्ञान दे माझिया भक्ता। तयाहून अधिक परता। मज आन नाही या पढियंता। जाण तत्वता उद्धवा॥'** ब्रह्मसूत्रे ही ब्रह्माचे ज्ञान देण्याकरीताच अवतरलेली आहेत. ते ज्ञान सामान्य भाविक जिज्ञासूपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करण्याचा प्रयत्न ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीने यथाशक्ति केला आहे.

ब्रह्मसूत्रार्थदर्शिनी ही गीतेवरील श्रीज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी, भाष्यकाराना वाट पुसून लिहिलेली असली तरी, जशी स्वतंत्र टीका आहे, तशीच स्वतंत्र आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्वातंत्र्य घेतले आहे तसेच दर्शिनीतही घेतले आहे, हे - **'नृत्यति पिनाकपाणौ नृत्यंत्यन्येपि भूतवेताला:'** तसे झाले आहे असे कोणी म्हणू शकेल. पण श्रीज्ञानेश्वर महाराजांनीच म्हटल्याप्रमाणे **'राजहंसाचे चालणें। भूतळीं जालिया शाहाणे। आणिक काय कोणें। चालावेंचि ना।'** या आधारावर दर्शिनीतही बालसुलभ अवखळपणा स्वीकारला आहे. पण जे काही केले आहे ते प्रामाणिक निष्ठेने आणि सद्हेतूनेच केलेले आहे. **'संत:परीक्ष्यान्तरयद् भजन्ते।'** वा **'न्यून ते पुरते। अधिक ते सरते।'** या न्यायाने सूज्ञ वाचकांनी उदार मनाने दर्शिनीकडे पहावे अशी अपेक्षा आहे.

**- वरदानंदभारती**

# ‘ विषय व्हावा मननाचा ! ’

**डॉ. शं. रा. तळघट्टी**

“ज्ञानान्मोक्षः” हा सिद्धान्त स्वीकारून परम पुरुषार्थ असलेल्या मोक्षाच्या प्राप्तीसाठी ‘अध्यात्मविद्या’ या स्वरूपात भारतीय तत्त्वज्ञान मांडले गेले आहे. या तत्त्वज्ञानाचा मूलस्रोत म्हणजे उपनिषदे. वेद वाङ्मयाचा अंतिम भाग म्हणून उपनिषदांना ‘वेदान्त’ ही संज्ञा आहे. वैदिक तत्त्वज्ञानाचे सर्वोच्च - अंतिम शिखर त्यात गाठलेले आहे अशा अर्थानेही ‘वेदान्त’ शब्द उपनिषदांना उद्देशून यथार्थपणे वापरला जातो. उप+नि+सद् असा उपनिषद शब्द बनतो. जवळ नम्रपणे (चरणाशी) बसणे या मूळ अर्थावरून गुरूला शरण जाऊन त्याच्या कडून घेतलेली गुरूपदिष्ट - रहस्यमय विद्या असा त्याचा अर्थ विस्तारला. त्यात जीव-जगताचे रहस्य उलगडून दाखविलेले असते. तात्पर्य, उपनिषद म्हणजे ब्रह्मविद्या किंवा मोक्षदायी अध्यात्मविद्या. वेदवाङ्मयाच्या ज्या भागात ही विद्या प्रतिपादिली आहे त्यालाही उपनिषद् (वेदान्त) म्हटले जाते. अशी प्रमुख प्राचीन उपनिषदे दहा असल्याचे मानले जाते कारण केवळ या दशोपनिषदांवरच पूज्यपाद शंकराचार्यांचे भाष्य आहे. ती उपनिषदे म्हणजे - ईश, केन, कठ, प्रश्न, मांडुक्य, मुंडक, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य व बृहदारण्यक. या व्यतिरिक्त श्वेताश्वतर, कौषीतकि व जाबाल ही उपनिषदेही प्राचीन म्हणून स्वीकारली जातात.

उपनिषदातील तत्त्वचिंतन हे मुक्त स्वरूपाचे आहे. शिवाय विविध उपनिषदांतील विधाने काही ठिकाणी परस्पर विरोधी वाटतात. त्यामुळे वेदान्त दर्शनाची सुसंबद्ध, न्यायसम्मत व सुरचित अशी मांडणी करणे आवश्यक होते. हे अत्यंत कठिण काम भगवान बादरायण व्यासांनी ब्रह्मसूत्रांच्या द्वारा केले आहे. म्हणून वेदान्त दर्शनाच्या तीन प्रस्थानापैकी उपनिषदे ही मूळ श्रुतिप्रस्थान आहे, तर ब्रह्मसूत्रे ही न्याय-प्रस्थान होत. तसेच औपनिषद तत्त्वज्ञानाची सामान्य जनासही समजेल अशी मांडणी सारांशरूपाने करून व त्याचा जीवनाशी असलेला संबंध विशद करून श्रीमद्भगवद्गीतेने जगावर उपकार केला आहे. म्हणूनच भगवद्गीता ही वेदान्ताचे तिसरे स्मृतिप्रस्थान मानले जाते. पैकी वेदान्तदर्शनात ब्रह्मसूत्रांचे विशेष महत्त्वपूर्ण स्थान आहे. सूत्रांवरील भाष्ये, भाष्यटीका, सूत्रवृत्ति इत्यादी प्रकारच्या दार्शनिक ग्रंथातून वेदान्तदर्शन हे अंतर्गत मतमतांतरांसहित न्यायघटित भाषेत सविस्तर मांडलेले आहे. दार्शनिक परिभाषा व न्यायघटित मांडणी (काहीजण तिला तर्ककर्कश म्हणतात) यामुळे हे सर्वच ग्रंथ समजायला कठीण आहेत. तज्ज्ञाकडून ते समजून घ्यावे लागतात.

या तीनही प्रस्थानांवर भाष्य लिहून औपनिषद् तत्त्वज्ञानाचा अन्वयार्थ विशद करणाऱ्या श्रेष्ठ दार्शनिकाला ‘आचार्य’ ही पदवी दिलेली आहे. शंकराचार्य रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व निंबार्काचार्य हे असे आचार्य होऊन गेले व त्यांनी प्रस्थानत्रयीवरील आपल्या भाष्यांमधून आपापले वेदान्त-दर्शन मांडले आहे; त्यांना अनुक्रमे केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत व द्वैताद्वैत अशी नावे आहेत. सामान्यपणे ब्रह्मसूत्राचे अभ्यासक हे या वेदान्त-दर्शनांपैकी

कोणत्या ना कोणत्या दर्शनाचे अनुयायी असतात. सूत्रांमध्ये ग्रथित केलेली विधाने वा अनुमाने ही बऱ्याच गोष्टी गृहीत धरून अत्यंत संक्षिप्तपणे व साररूपाने केलेली असल्याने संप्रदाय परंपरेने त्यांचा अर्थ समजावून दिला-घेतला जातो. सूत्राची लक्षणे सांगणारा श्लोक प्रसिद्ध आहे–

> "अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम्।
> अस्तोभमनवद्यंच सूत्रं सूत्रविदो विदु:॥"

यापैकी अल्पाक्षरावर अधिक भर दिल्याने सूत्र दुर्ज्ञेय बनते आणि मतभेदाला विशेष अवकाश लाभतो. ब्रह्मसूत्रांचे काहीसे असेच झाले आहे. परंतु त्यांच्यावरील भाष्याची एक निश्चित पद्धत असल्याने अर्थनिर्धारण शास्त्रशुद्ध होते.

## ब्रह्मसूत्रांचे स्वरूप :

ब्रह्मसूत्रांचे चार अध्याय आहेत. अनुक्रमे त्यांची नावे अशी - पहिला समन्वयाध्याय, दुसरा अविरोधाध्याय, तिसरा साधनाध्याय आणि चवथा फलाध्याय. त्यामधून सिद्धान्तभूत महत्त्वाची उपनिषद्वाक्ये विचाराकरिता घेऊन त्यांचे निर्णय लावले आहेत. प्रत्येक अध्याय चार पादात विभागलेला आहे, आणि प्रत्येक पादात एकेका विषयाकरिता एकेक अधिकरण - अशी अनेक अधिकरणे आहेत. तसेच प्रत्येक अधिकरणात विषयानुसार एक किंवा अनेक सूत्रे असतात. अशी एकूण १९१ अधिकरणे असून ब्रह्मसूत्रांची एकत्रित संख्या ५५५ आहे. मी जी भाष्याची पद्धत म्हणतो त्यानुसार प्रत्येक अधिकरणाचे पाच अवयव मानले आहेत; ते म्हणजे - विषय, संशय, संगति, पूर्वपक्ष आणि सिद्धान्त. काहीजण प्रयोजन हा सहावा अवयव मानतात. त्यांच्या साहाय्याने सूत्राचा प्रतिपाद्य विषय भाष्य द्वारा स्पष्ट केला जातो. ही पारंपरिक भाष्य-पद्धती आहे. आधीच विषय गहन-रहस्यमय; तो सूत्रारूपाने ग्रथित केलेला. त्यातून पुन: न्यायाच्या तार्किक, क्लिष्ट, शास्त्रीय परिभाषेत मांडलेला. तो समजण्यास किती कठीण असणार याची त्यावरून सहज कल्पना करता येईल. या कारणाने सामान्य माणूस त्याच्या-वेदान्ताच्या-अभ्यासाकडे न वळला तर त्यात मुळीच आश्चर्य वाटायला नको! असे असले तरी वेदान्त हा जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारे जीवन-दर्शन असल्याने तो मानवमात्राच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याचे ज्ञान प्रत्येकाला होणे प्रत्येकाच्या पुरुषार्थ-सिद्धीसाठी आवश्यक आहे. त्याकरिताच, मला वाटते, भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला निमित्त करून उपनिषदांचे सार भगवद्गीतेच्या रूपाने मानवजातीच्या स्वाधीन केले. परंतु गीतेवरील भाष्यांतूनही दिसून येणारे तात्त्विक मतभेद आणि संस्कृत भाषेची गहनता या कारणांनी मानवजातीचा फार मोठा वर्ग या आनंदमीमांसेला वंचितच राहिला. म्हणून ज्ञानेश्वरादी संतांनी भागवतधर्माच्या रूपाने हे 'विश्वचि ब्रह्म' करणारे 'गुह्य' प्रकट केले आणि मानवजातीला कायमचे ऋणी करून ठेविले.

या सर्व पार्श्वभूमीवर जेव्हा आपण परमादरणीय प्राचार्य अ. दा. आठवले तथा पू. अप्पा यांनी लिहिलेल्या **'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी'** या प्रौढ पण रसाळ ग्रंथाचे वाचन करतो तेव्हा त्याचे वैशिष्ट्य आणि महत्त्व दोन्ही आपल्या सहजपणे नजरेत भरतात. अप्पांचे हे ब्रह्मसूत्रांवरील भाष्य आहे, अर्थात भाष्य ग्रंथाचा विस्तृतपणा त्यात आहे. ते संपूर्ण ग्रंथावरील भाष्य आहे,

केवळ चतु:सूत्री वा एखादा पाद वा अध्यायावरील नव्हे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मराठी मायबोलीतून केलेले भाष्य आहे. संस्कृत जाणत नसल्यामुळे जी मराठी भाषिक मंडळी सूत्रप्रणाली-गंगेत अवगाहन करू शकत नव्हती त्यांच्यासाठी या ग्रंथाने मराठीच्या पात्रातून या गंगेला प्रवाहित करून गंगास्नानाची सोय करून ठेवली आहे. 'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी' हा अप्पांचा भाष्यग्रंथ आहे. याचा अर्थ (एक) तो त्यांचा स्वतंत्र ग्रंथ आहे, आणि (दुसरा) त्यात अप्पा हे केवळ सूत्रांमधील पदांचा अर्थ भाषांतरित करीत नाहीत, तर आपल्या खास शैलीने सूत्रांतील विचार विशद करून सांगतात. अप्पांनी मनात आणले असते तर पांडित्य प्रदर्शनासाठी ते ब्रह्मसूत्रांवर संस्कृतमधून भाष्य सहज लिहू शकले असते एवढे त्यांचे संस्कृतवर प्रभुत्व आहे. ग्रंथारंभीच्या त्यांच्या संस्कृत श्लोकबद्ध रचना पाहिल्या म्हणजे या विषयी खात्री पटते. श्रीवरदनारायण प्रार्थना, श्रीव्यासवंदना, श्रीशंकराचार्याष्टकम् या त्या रचना होत. सहज सुंदर आणि प्रसन्न-मधुर असे हे काव्य भक्तिभावनेने ओथंबलेले आहे. त्यावरून त्यांच्या श्रद्धास्थानांचीही कल्पना येते. परंतु त्यांनी संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाचा उपयोग वेदान्त दर्शनावर प्रभुत्व मिळविण्यासाठी करून, ते 'दर्शन' सर्वांना सुलभ व्हावे म्हणून, **'सेवितो हा रस वाटितो आणिकां'** या भूमिकेतून, त्यांनी मातृभाषेतून ज्ञानोबा-तुकारामांच्या मराठीतून - ब्रह्मसूत्रार्थ विवरिला आहे. त्यासाठी त्यांनी ज्ञानेश्वरांच्या 'ओवी'चाच माध्यम म्हणून आश्रय घेतला आहे. शंकराचार्यांप्रमाणेच ज्ञानेश्वर हे अप्पांचे दैवत आहे. ज्ञानेश्वरांची वाणी अप्पांच्या शब्दांतून ओव्यांमधून प्रवाहित झालेली दिसते. स्वत:च्या तपस्येने, सद्गुरूकृपापात्र झाल्याने त्यांच्या अन्य ओवीबद्ध, ग्रंथांप्रमाणेच हाही भाष्य ग्रंथ 'प्रासादिक' असल्याची प्रतीती ग्रंथ वाचताना 'पदोपदी' येते. अप्पांना काव्य करावं लागत नाही; त्यांचे विचार, वर्णने, दृष्टांत, स्पष्टीकरणे इत्यादी प्रकट होतात तेच काव्यरूप घेऊन! माझ्या सारख्याला गद्यातून विचार व्यक्त करताना सुद्धा दहा वेळा विचार करून प्रयत्नपूर्वक शब्द-योजना करावी लागते. पण ब्रह्मसूत्रार्थदर्शिनीमधील भाष्यरूप विचार-काव्य-प्रवाह गंगौघाप्रमाणे सहज व अप्रतिहतपणे वाहत असल्याचा प्रत्यय येतो. पहिलीच ओवी पहा - **''ॐ आद्या अनंता अद्वया। अखंडानंदा अक्षया। अखिलमूला अव्यया। आनंदघना नारायणा।।''** नमनाच्या ज्या २८४ ओव्या आहेत त्या सर्वच महत्त्वाच्या आहेत. त्यात नमनाबरोबर अप्पांनी अन्य प्रास्ताविक विषयांचाही उल्लेख केला आहे. स्वत:कडे नम्रपणा घेताना ते म्हणतात - **''मी न पंडित विद्वान्। कवि वा प्रतिभासंपन्न। तर्क मीमांसा व्याकरण। माझ्या नसती ओळखीची।।''** (२४/२५२)* केवळ एका रुपायाच्या भरोशावर भंडारा घालू जावे अशी आपली परिस्थिती असल्याचे ते सांगतात. हा ग्रंथ लिहिण्यामागील प्रेरणेविषयी ते सांगतात - **''कारण विद्वज्जनांसाठी। माझी नसे ही खटपटी। मी या करितो गुजगोष्टी। परिचय होण्या सामान्यां।।''** (२५/२६०). साधुत्वाला साजेशीच ही प्रेरणा आहे. हा हेतू शेवटास निश्चित जाईल या विश्वासाचे एक कारण म्हणजे जेथे राहून ग्रंथाचा काही भाग लिहिला, त्या बदरिकाश्रमभूमीचे माहात्म्य असे ते म्हणतात. येथेच स्वत: महर्षि व्यासांनी ब्रह्मसूत्रांची रचना केली आणि जगद्गुरू शंकराचार्यांनी आपली भाष्ये लिहिली. अप्पांनी सर्व पूर्वाचार्यांना सादर साष्टांग वंदन केले आहे. शंकराचार्यांना नमन करताना ते प्रार्थितात - **''महाराज आपल्या भाष्यावर। माझा अवघा आहे भार। आपुल्या वाणीचा आधार।**

लाभो माझ्या बुद्धीसी॥" (१५/१५९) त्यांनी केलेला ज्ञानेश्वर-गौरव तर अत्यंत मार्मिक आहे. उच्चकोटीचे तत्त्वज्ञान साध्या सोप्या भाषेत ज्ञानेश्वरांनी अशा रसाळपणे मांडले की अमृतानेही लाळ घोटावी! पुढे ज्ञानेश्वरांच्याच दृष्टांताचा उपयोग करून ते सांगतात - **"मार्तंड व्हावा तापहीन। प्रभा तैशीच राहून। तैसें अद्वैताचे ज्ञान। कोमल केले भक्तिभावे॥"** (१६/१७०) ज्ञान भक्तिभावें कोमल केले, हे विधानही अपुरे आहे. कारण - **"कर्म, भक्ती, ज्ञान योग। यांचा साधिला संयोग। समन्वयाचा ऐसा भाग। जमला नव्हता पूर्वी कुणा॥"** (१७/१७२). शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर यांच्या तात्त्विक भूमिकांसंबंधी अभ्यासकात वाद आहे. त्या दृष्टीने अप्पांनी केलेले एक विधान खूप बोलके आहे. ज्ञानेश्वरांविषयी ते सांगतात - **"अद्वैताची मांडणी। केली अशा कौशल्यानी। कीं आचार्य जगद्गुरूंनी। नावीन्य बघून डोलावें॥"** (१६/१६७)

आजच्या विज्ञान युगातही पुरुषार्थ चतुष्टयाच्या सिद्धीचे भारतीय जीवनदर्शन किती महत्त्वाचे आहे हे या प्रास्ताविकात स्पष्ट केले आहे. विज्ञानांत विलक्षण प्रगती होऊनही मानवीजीवन स्वार्थ, द्वेष, कलह इत्यादींनी त्रस्त होऊन अशांतच आहे. याचे कारण म्हणजे आपण ऋषि-मुनिप्रणीत जीवनाच्या तत्त्वज्ञानाची, मोक्षशास्त्राची, केलेली उपेक्षा हे आहे. अप्पा सांगतात - **"दृष्टी ठेवून मोक्षावरी। वागावे सर्व व्यवहारी। तेणें सर्वही प्रकारी। जीवनाचे सुख लाभे॥"** (२२/२३४) त्यासाठीच जीव, जगत, ईश्वर आणि त्यांच्यातील परस्पर संबंध यांच्या स्वरूपाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञानाची विशेषत: वेदान्त-दर्शनाची प्रवृत्ती आहे. उपनिषदांतून विखुरलेल्या मुक्त तत्त्वचिंतनाला एका सूत्रात गोवण्यासाठीच ब्रह्मसूत्रांची रचना झाली. त्यामधून वेदान्त-दर्शनांची सुसंवद्ध व प्रणालित मांडणी व्यास महर्षींनी केली आहे. अप्पा सांगतात की, **"त्या श्रीब्रह्मसूत्राप्रत। साध्या सरळ मराठीत। विवरण्याचा धरूनि हेत। उद्युक्त झालो लेखनासी॥"** (२४/२५१) आता ब्रह्मसूत्रांच्या कर्त्या संबंधी अप्पांचे मत जाणून घेऊन आपण प्रत्यक्ष सूत्र विवेचनाकडे वळू.

## 'दर्शनी'चे अंतरंग :

ब्रह्मसूत्राची रचना भगवान बादरायणाचार्यांनी केली हे प्रसिद्ध आहे. त्यांना बादरायण व्यास असे म्हटले जाते. हे व्यास आणि महाभारताची गीतेसह रचना करणारे वेदव्यास हे एकच होत असे काही अभ्यासक मानतात, तर काहींच्या मते ते भिन्न होत. अप्पांच्या मते श्री वेदव्यास हेच ब्रह्मसूत्रांचे व महाभारताचे कर्ते होत. कृष्णद्वैपायन वेदव्यासांनाच बादरायण म्हणतात असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. (१२/११७ ते १२८)

आता आपण श्रीब्रह्मसूत्रार्थ दर्शिनीच्या अंतरंगाचा स्थूलमानाने वेध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या भाष्याचा विस्तृत परामर्श घेणे हे या लेखाच्या व लेखकाच्याही अवाक्यावाहेरचे काम आहे. अप्पांनी संपूर्ण ब्रह्मसूत्र ग्रंथावर म्हणजे सर्व ५५५ सूत्रांवर भाष्य लिहिले आहे आणि प्रत्येक सूत्रावरील भाष्य हे पुरेसे विस्तृत आहे. प्रत्येक सूत्र हे कोणत्या ना कोणत्या महत्त्वाच्या उपनिषद वाक्यात व्यक्त झालेला विचार संग्रहित करते, आणि मी पूर्वी उल्लेखिल्या प्रमाणे, एक वा अनेक सूत्रे मिळून एक विषय, अर्थात त्या संबंधीचा विचार, पूर्णपणे मांडला

जातो; अशा सूत्रसमूहाला अधिकरण असे म्हणतात. अप्पांनी हे भान पूर्णपणे ठेऊन आपल्या भाष्यात केवळ सूत्राचा अर्थ न सांगता, केवळ प्रतिपद भाष्य न देता, सूत्राचा विषय समजावून दिला आहे; ही गोष्ट जितकी कठीण तितकीच महत्त्वाची आहे. त्यासाठी त्यांनी आपली अप्रतीम निरूपण-शैली समर्थपणे वापरली आहे. त्यांच्या विषय समजावून देण्याच्या विलक्षण हातोटीचा उत्कृष्ट नमूना पाहायचा असेल तर **'तत्तु समन्वयात्''** या सूत्रावरील भाष्य वाचावे. खरं तर त्यांचे सारे विवेचनच त्या पद्धतीचे आहे. पण हे सूत्र केंद्रवर्ती महत्त्वाचे असल्याने भाष्यकार त्याचा विशेष विस्ताराने परामर्श घेतात. ''तत्तु समन्वयात्'' चा अर्थ - **''वेदांच्या विविध वचनांचा समन्वयाची दृष्टी ठेवून नीट विचार केला म्हणजे एक ब्रह्मच सत्य आहे हे समजते,''** असा आहे. हा गद्य अर्थच पुरेसा स्पष्ट आहे. परंतु त्याविषयी जी महत्त्वाची शंका निर्माण होते, तिचे समाधान करणे आवश्यक आहे. वेदांमध्ये केवळ ब्रह्माचीच चर्चा नाही तर अन्य विविध विषय महत्त्वाचे म्हणून चर्चिले आहेत. यज्ञ-याग, स्वर्ग, कर्माचे प्रकार हे विषय मीमांसकांनी महत्त्वाचे मानले आहेत. **''अम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्य-मतदर्थानाम्।''** या मीमांसकांच्या मताचा उल्लेख अप्पांनी - **ज्यांत कर्माची प्रेरणा। नाही, ऐशा वचनांना। महत्त्व मुळीं उरते ना। ऐसें म्हणती सूज्ञ काहीं॥''** (३५-३६२) असा केला आहे. असे असल्याने 'केवळ ब्रह्मच सत्य आहे' हे सर्व वेदांचे तात्पर्य आहे असे कसे मानता येईल? या शंकेचे निरसन अप्पांनी नानापरींनी केले आहे. ते सांगतात -

> **''विषय इतर ब्रह्माविणें। जरी वर्णिले वेदाने।**
> **तरी त्यांची प्रयोजनें। सामान्यांना वळविणें हीं॥**
> **अन्य विषयांचा विस्तार। तरी ब्रह्म हेंचि सार॥''** (३५-३६९, ३७०)

श्रुतिमाऊलीने धर्म-पुरुषार्थाची विस्ताराने मांडणी केलेली असली, तरी त्याचे प्रयोजन ब्रह्मसाक्षात्काराचा अधिकार प्राप्त व्हावा, हेच आहे. आई आपल्या लहानमुलासाठी सर्वाधिक वेळ देत असली तरी ते मूल मोठे होऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे हाच तिचा उद्देश असतो. चित्तशुद्धी शिवाय आत्मज्ञान नाही, आणि निष्काम व ईश्वरार्पण बुद्धीने केलेल्या स्वधर्मानुष्ठानाशिवाय चित्तशुद्धी नाही. मनाचा पालट व्हावा म्हणून वेदात कर्मकांडाचा बोभाट! दुसरा एक आपल्या वैद्यक शास्त्रातील मार्मिक दृष्टांत देऊन ते सांगतात की अन्नात जरी विविधता असली तरी त्याची सार्थकता पचन होऊन शरीराशी एकरूप होण्यामध्ये जशी असते, तद्वत् वेदांतील विविध शिकवणुकींची सार्थकता ब्रह्मप्राप्तीत आहे.

**''अन्न पोटांत जेव्हा जाते। तेव्हा विविधता टाकिते। शेवटीं पचतां होऊन जाते। एकरूप तें शरिरासीं॥''** (३९-४०८) यावरून, श्रुतींचे तात्पर्य शोधण्याची दृष्टी कोणती असावी हे दिसून येईल - **''अन्नाचे प्रकार द्वैत। पचणें हे आहे अद्वैत। तात्पर्य शोधिता श्रुतींत। हीच दृष्टी ठेवावी॥''** (३९-४११)

अप्पा हे विसाव्या शतकातील भाष्यकार आहेत हे भाष्य वाचताना जाणवत राहते. आजच्या परिस्थितीचा संदर्भ ते सतत देत राहतात. हे विज्ञानयुग असले तरी माणसाच्या समाधानात मात्र सतत घटच होत आहे याची ते आपणास जाणीव करून देतात. वर्तमानाशी त्यांच्या विवेचनाचे जे नाते आहे त्याची प्रतीती विशेष ठळकपणे येते ती त्यांनी दिलेल्या दृष्टान्तामधून,

उदाहरणांमधून. ही उदाहरणे आधुनिक आहेत आणि म्हणूनच ती आधुनिक कालातील लोकांना विषय समजण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. उदाहरणार्थ, विविधतेमधील एकता सांगण्यासाठी दिलेला दृष्टांत असा - **''जैसे आयाम कंपनामुळे । भासे तांबडे निळे पिवळे । खरे बघता रंग कुठले । नसती प्रकाश किरणासी ॥''** (३/१७) किंवा - **''व्यवहारें बुरें भलें। परिवारासी पोशिले। नांव खोदूनि ठेविलें। द्रव्य देऊन संस्थांना॥''** (२७/२८८) तसेच तंत्रज्ञाचा उल्लेख (३१-३२१); परिस्थितीची जाणीव. (पृ. ६१०/२१० ते २११) इत्यादी.

गहन असा दार्शनिक पद्धतीने मांडलेला विषय सामान्य माणसाच्या आवाक्यात आणून सोडणे हे अप्पांच्या या भाष्याचे वैशिष्ठ्य आहे. उदाहरणादाखल आपण पहिलेच सूत्र घेऊ - **''अथातो ब्रह्मजिज्ञासा;''** याचा अर्थ - ''आता म्हणून ब्रह्माची जिज्ञासा.'' येथील 'अथ' आणि 'अत:' या शब्दांवरील पारंपरिक भाष्ये पाहता अप्पांनी या पदांचा स्वतंत्र उल्लेख न करता त्यांचा जो आशय विशद केला आहे तो किती सुलभ-सहज आहे हे आपल्या ध्यानात येईल. 'अथ' शब्दाने 'प्रारंभ' अभिप्रेत नसून 'नंतरता' - 'आनंतर्य' - अभिप्रेत आहे असे सांगून शंकराचार्यांनी साधन-चतुष्टयाची कल्पना मांडली आहे. कशानंतर ब्रह्म जिज्ञासा करावी, तर साधन-चतुष्टयसंपन्न झाल्यानंतर. विवेक, वैराग्य, शमदमादिसाधनसंपत् आणि मुमुक्षुत्व हे ते साधनचतुष्टय होय. तसेच 'अत:' शब्द हेतुबोधक असून ब्रह्मजिज्ञासेला साधन-चतुष्टय कारणीभूत आहेत असे तो सुचवितो. अप्पांनी आपल्या विवेचनात ब्रह्म जाणून घेण्याची इच्छा माणसाला का होते ते सोप्या पद्धतीने सांगितले आहे.

उपभोगाची साधन-साम्रगी वाढली म्हणजे माणसाला समाधान होते असा अनुभव नाही. त्याचप्रमाणे विद्वत्ता, ईश्वरपूजेचे अवडंबर, समाजकार्य तात्त्विक चर्चा इत्यादींनीही शांती लाभत नाही. मग माणूस अंतर्मुख होऊन विचार करू लागतो की मी कोण? जीवनाची सार्थकता कशात आहे? सुख-दु:खाच्या फेऱ्यात आपण का अडकतो? या जगाचे स्वरूप काय? अप्पा सांगतात -

> ''मनुष्य जो जो सुसंस्कृत। विचारी नी प्रज्ञावंत।
> जो वाढला संगतीत। सात्त्विक, धार्मिक लोकांच्या॥
> त्याच्या चित्तीं वारंवार। ऐसे उठताती विचार।
> मग तो होतसे अधीर। उत्तर त्यांचे शोधावया॥''

(पृ. २८, २९/३००, ३०१)

या सर्वांची उत्तरे ब्रह्मज्ञानाने मिळतात असे समजल्यावर माणसाच्या मनात समाधान प्राप्तीसाठी ब्रह्मजिज्ञासा निर्माण होते. विषय मांडण्याच्या अप्पांच्या शैलीची यावरून कल्पना येऊ शकेल.

**स्वतंत्र प्रज्ञेची मीमांसा :**

श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनीमधून दिसून येणारा अप्पांचा एक विशेष म्हणजे त्यांची सर्व थोर पूर्वाचार्यांविषयीची पूज्य बुद्धी. वास्तविक अप्पा हे शंकराचार्यांचे अनुयायी व केवलाद्वैती

तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते आहेत. 'श्रीशंकराचार्याष्टकम्' हे स्तोत्र याच ग्रंथात आहे. तथापि ब्रह्मसूत्रावर ज्या ज्या आचार्यांनी भाष्य लिहिले आहे त्या सर्वांना त्यांनी साष्टांग वंदन केले आहे. रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, निंवार्काचार्य, श्रीकंठाचार्य, यांनी आपल्या भाष्यांमधून परमत-खंडन-पूर्वक स्वमताची स्थापना केली. त्यांना वेदान्त-दर्शने म्हणतात. रामानुजांचे विशिष्टाद्वैत, मध्वाचार्यांचे द्वैत, वल्लभांचे शुद्धाद्वैत, निंवार्कांचे द्वैताद्वैत, आणि श्रीकंठांचे शैवविशिष्टाद्वैत प्रसिद्ध आहेत. विज्ञानभिक्षु व अचिंत्य भेदाभेदाचे पुरस्कर्ते वलदेव यांचाही उल्लेख करून अप्पा म्हणतात - "**या सर्व भाष्यकारांसी। वंदितो मी साष्टांगेसी॥**" वास्तविक या आचार्यांमधील तीव्र मतभेद सर्वज्ञात आहेत. त्यांच्या विवेचनातून काही प्रमाणात कटु शब्द-प्रयोगही आढळतात. पण ही कटुता विशेषेकरून त्यांच्या अनुयायांच्या अभिनिवेशपूर्ण लिखाणातून मोठ्या प्रमाणात दिसून येते. अप्पांची या मतभिन्नतेकडे पाहण्याची दृष्टी किती निकोप व गुणग्राहक आहे ते पहा. अनुदारता व स्वमताचा हट्टाग्रह वाळगणाऱ्या अनुयायांविषयी ते लिहितात - "**नाना रचून तर्कटे। दोष लाविती खोटे नाटे। आणि विनाशाचिया वाटें। नेती साधारणांप्रति॥**" (१४/१४१) मूळ भाष्यकार आचार्यांमध्ये मात्र द्वेषबुद्धीचे नावही नाही. त्यांना लौकिकाची चाड नव्हती; केवळ जनहिताच्या तळमळीने त्यांनी आपल्या बुद्धिसामर्थ्याने वेदान्तरूपी हिऱ्याला पैलू पाडले. अप्पांची ही 'पैलूं'ची कल्पना रम्य तर आहेच, पण तात्त्विक दृष्ट्या सर्वसंग्राहक आहे. त्यांनी या विविध मतांतरांचे दिलेले स्पष्टीकरण तर फारच मार्मिक आहे. सर्व लोक काही सारख्या बुद्धीचे वा सारख्या रुचीचे नसतात. 'भिन्नरुचिर्हि लोक:' हे वचन प्रसिद्ध आहे. मग त्या सर्वांपर्यंत जीवनाधार वेदान्त पोहोचविण्यासाठी, रुचिभेदाने त्यांची अडचण न होता सोय व्हावी म्हणून थोर भाष्यकारांनी विविधमतांची मांडणी केली आहे. - "**सर्वांचीच सोय व्हावी। सर्व मनें संतोषावीं। प्रामाणिकासि नुरावी। अडचण कोठे रुचिभेदें॥ हाच हेतू असे साचा। या थोर भाष्यकारांचा॥**" (१४/१३८, १३९) या ओवीतील 'रुचिभेदे' या शब्दाने शिवमहिम्न स्तोत्रामधील -

"रुचीनां वैचित्र्याद्ऋजु कुटिल नानापथजुषां।
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव॥"

या सुप्रसिद्ध विधानाचे अपरिहार्यपणे स्मरण होते. कारण अप्पांनीही असाच उदार दृष्टिकोण विविध वेदान्ताचार्यांसंबंधी स्वीकारला आहे. जरी आचार्य शंकर हे त्यांचे परात्पर गुरू असले तरी त्यांचा हा दृष्टिकोण केवळ वेदान्त दर्शनापुरता मर्यादित नाही. नास्तिक वा अवैदिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या जैन आणि बौद्ध दर्शनांच्या आद्य पुरुषांच्या बावतही अप्पांनी असाच दृष्टीकोण स्वीकारला आहे. वास्तविक मूळ ब्रह्मसूत्रांनीच या दोन्ही मतांचे स्पष्टपणे खंडण केले आहे. दुसऱ्या अध्यायाचा दुसरा पाद (किंवा किरण) तर्कपाद म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात सांख्यादि अन्य मतांचे खंडन केले आहे. त्यावरील शांकरभाष्य प्रसिद्धच आहे. आप्पांनीही उत्कृष्टपणे या खंडणाचे स्वरूप आपल्या भाषेत सुस्पष्ट केले आहे. तरीही ते भगवान बुद्ध व महावीर यांच्याविषयी आदर बाळगून म्हणतात की या दर्शनात तात्त्विक दृष्ट्या जी तर्कदुष्टता आली आहे, चोखपणा जाऊन हिणकसपणा आला आहे तो अनुयायांच्यामुळे. ते म्हणतात - **आद्य पुरुषांचिया ठायीं। दोष नसावा अंशानेंहि। अनुयायी दुराग्रही। असावी ही त्यांची**

कृती॥'' पुढे ते म्हणतात - **परिस्थितीसी पाहून। लोकोद्धाराचे साधन। सोप्या शब्दांत मांडून। ठेविलें आद्य महात्म्यांनी॥''** (पृ. ३११/३५३, ३५४) येथे त्यांच्या धर्माचार्य या नात्याने असलेल्या माहात्म्याची जाणीव प्रकट झाली आहे. भारतीय संस्कृती ही ज्या आध्यात्मिक विचारासाठी प्रसिद्ध आहे, त्याची जोपासना करण्यात बौद्ध व जैन धर्मांचा मोठा वाटा आहे. खरे पहता, 'तत्त्व' एक असूनही त्याची दर्शने भिन्न होतात याचे कारण ज्ञानपद्धतीमधील उणीवा: त्यांचे परीक्षण करून, दोष काढून टाकून विचारांचे पुन: पुन: संशोधन करीत राहिले म्हणजे सत्य-दर्शनापर्यंत जाता येते. मात्र त्यासाठी बुद्धी शुद्ध असली पाहिजे, दुराग्रही असता कामा नये.- **''शुद्ध बुद्धी ठेवावी। वृत्ति आग्रही नसावी। प्रामाणिकता धरावी। म्हणजे सत्यज्ञान होतें॥''** (३१२/३६२) अप्पांचे आणखी एक विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात की वाद-विवाद होतो तो तात्त्विक सिद्धान्ताच्या बाबतीत, सदाचाराच्या वा नीतीच्या बाबत नाही - **''तेव्हां सदाचरणीं विशेष। वाव नाहीं मतभेदास। शोधूं जातां सिद्धान्तास। वादविवादां बळ येतें॥''** (३११/३५३) मात्र, **''सिद्धान्त असे असावे। ज्यानें सत्य जवळीं यावें॥** वाद सुद्धा त्यासाठीच करायचा. - **'वादे वादे जायते तत्त्वबोध:'** हे वचन प्रसिद्धच आहे. या सूत्रावरील (२-२-३६) भाष्यामध्येच अप्पानी जैन, बौद्ध मते आणि ब्रह्मसूत्रे यांच्या कालासंबंधीचा ऐतिहासिक प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तरही दिले आहे की, जैन-बुद्ध हे ब्रह्मसूत्रांच्या आधीचे नव्हते. त्यांची त्यानी केलेली कारण मीमांसा स्वतंत्र प्रज्ञेची द्योतक आहे.

**''सर्वथानुपपत्तेश्च''** (२-२-३२) या सूत्रामध्ये बौद्धांच्या शून्यवादाचे खंडन केले आहे. या संदर्भात अप्पांनी आणखी एका प्रश्नाचा निर्णय दिला आहे. शंकराचार्यांच्या मायावादावर शून्यवादाची दाट छाया असल्याने शंकराचार्य हे प्रच्छन्न बौद्ध आहेत असा एक आक्षेप काही अभ्यासक घेतात. तो पूर्णपणे चुकीचा, वदतोव्याघाताच्या स्वरूपाचा आहे असे अप्पा स्पष्टपणे सांगतात - **''मायावादाचा याशीं काहीं। मुळामध्यें संबंध नाहीं॥''** याचे कारण - **''मायावादी देतो मान। सच्चिदानंद तत्त्वासी॥''** (३०७-८/३१७, ३२२) शंकराचार्य हे परमतत्त्व म्हणून एकमेवाद्वितीय नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त-स्वभाव अशा ब्रह्माचा सर्वार्थाने स्वीकार करीत असल्याने 'सर्वं शून्यं' मानणाऱ्या शून्यवादी बौद्धमताचे ते प्रच्छन्नपणे का होईना अनुसरण करतात असे म्हणणे वदतोव्याघात आहे. आचार्यांनी उलट या मताचे निश्चयाने व स्पष्टपणे खंडणच केले आहे. - **''प्रच्छन्न बौद्ध तयांप्रत। म्हणणें वदतोव्याघात। फसावे कां बुद्धिमंत। थोड्या सारखेपणामुळें॥''** (३०८/३२५) या पुढे जाऊन ते सांगतात की शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान हेच नव्या रूपातील प्राचीन वैदिक तत्त्वज्ञान असल्याने अन्य मतांची उपेक्षा करून सर्वांनी त्याचा स्वीकार करावा - **''म्हणोनि तेंचि आदरावें। इतर मतांसी उपेक्षावे। जीवेंभावें जाणोनि घ्यावें। मर्म आहे श्रुतीचें जे॥''** (पृ. ३०८/३२७)

ब्रह्मसूत्रे हा वेदान्तदर्शनाचा मूलाधार असा ज्ञानप्रधान तात्त्विक ग्रंथ आहे. परंतु हे ब्रह्मज्ञान केवळ परोक्ष शब्दज्ञान न राहता ते जीवनात उतरले पाहिजे, साक्षात अनुभवात, अपरोक्ष अनुभूतीमध्ये त्याची परिणती झाली पाहिजे असा वेदान्ताचाच आग्रह आहे. याच कारणाने मोक्षशास्त्रात साधनविचार महत्त्वाचा आहे. 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे' असा जो गीतेचा लौकिक

आहे तो या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तिच्याच आधाराने ज्ञानेश्वरांनी व त्याना गुरुस्थानी मानून अन्य महाराष्ट्रीय संतांनी जे भक्तिदर्शन मांडलं ते साधकांची संजीवनीच मानावं लागेल. हे सांगण्याचं कारण म्हणजे 'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी'चे या संतमंडळींशी, विशेषत: ज्ञानेश्वरांशी व भक्तीशी असलेलं जिव्हाळ्याचं नातं. याचेही कारण आहे अप्पांची ज्ञानेश्वरभक्ती. शंकराचार्यांच्या गौरवातही त्यांनी 'भक्तप्रेमाची निर्झरिणी' असलेल्या स्तोत्रांचा उल्लेख केला आहे. ज्ञानेश्वरांनी तर भक्तिधर्माचा पायाच घातला आणि अद्वैतज्ञानाची प्रखरता भक्तिजलाने न्हावून, संसारताप निववणाऱ्या शरदाच्या चांदण्यात तिचे रुपांतर केले. अप्पांच्या शब्दात - "**शुष्कतेचें लांछन भलें। अद्वैता न लागू दिले। ज्ञानभक्तींचे फेडिलें। वेगळेपण ज्ञानदेवें।।**" (१७-१७१) याच ज्ञानभक्तीला 'ठाणदिवी' करून तिच्या प्रकाशात अप्पांनी आपल्याला समग्र ब्रह्मसूत्रार्थाचे दर्शन घडविले आहे.

ब्रह्माच्या स्वरूपाचे वर्णन श्रुतींनी जरी सगुण निर्गुण अशा दोन्ही प्रकारे केलेले असले तरी त्यांचे अंतिम तात्पर्य ब्रह्म हे निर्गुण, निर्विकारी आहे, हे दर्शविण्यातच आहे. हा सगुण-निर्गुण-विवेक "**न स्थानतोऽपि परस्योभयलिंगं सर्वत्रहि।।**" या (३-२-११) सूत्रापासून (३-२-२१) पर्यंतच्या उभयलिंगाधिकरणात केला आहे. या सूत्रावरील भाष्यात अप्पांनी संतांनी ज्या सगुणरूपात ब्रह्माला भक्ति-प्रेम-सुखासाठी आणले त्याचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, "**उपासकांची पाहून वृत्ति। विविध धरी वेषाकृति। शिव शक्ति वा गणपति। सूर्य विष्णु होतो हा।।**" (पृ. ४७५-१५०) अर्थात, "**अनादि अनंत अद्वय। निरुपाधिक अद्वितीय। निस्सीम अखंड अक्षय। देशकालातीत वस्तु।।**" (४७५/१५४) असे मूळ निर्गुण स्वरूप उपनिषदातून सांगितले आहेच. सगुण-निर्गुण विवेकाचे एक सूत्र अप्पा सांगतात; ते म्हणजे "**सगुण निर्गुण विचारांत। घेतल्या हें स्पष्ट होत। कीं कधी सगुण मूलभूत। निर्गुणाचें असतें ना।।**" (४७६/१६२) आता प्रश्न असा की जर ब्रह्माचे मूलभूत स्वरूप निर्गुण आहे तर सगुणाचे वर्णन कशासाठी? अप्पांचे उत्तर असे की ज्या सामान्य लोकांचा अहंभाव आणि तद्मूलक द्वैतबुद्धी मावळलेली नाही, "**सदोदित जे सन्मुख। श्रेया सोडून प्रेयाकडे।**" "**त्यांच्या साधण्या कल्याणा। सगुण ब्रह्म वर्णिलेसें।।**" पुढे ते सांगतात -

"**सगुणतेचा आधार। उपासनेसी लाभतो फार।**
**व्हावयाची सगुणाकार। संवय असते चित्तासी।।**
**तेणें सगुणाची उपासना। सुलभ ठरते मानवांना।**
**म्हणून ब्रह्माच्या वर्णना। केलें गुणांच्या अपेक्षेनें।।**" (पृ. ४७७/१७३-१७४)

हे वाचीत असता, "**सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निधरि।।**" या समर्थ रामदासांच्या सुवचनाचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. पुन्हा (३-२-१२) वरील भाष्यातही ते सांगतात -

"**उपासकांची प्रवृत्ति। साधकांची परिस्थिती। सामान्यांची पाहून शक्ती। सगुण वर्णिलें ब्रह्मासी।।**" (पृ. ४८०-२०१) भक्तिमार्गाला एवढे महत्त्व का, ते यावरून समजून येईल.

त्याला उद्देशून काढलेले तुकारामांचे उद्गार बोलके आहेत - "**मोडोनिया वाटा सूक्ष्म दुस्तर। केला राज्यभार चाले ऐसा॥** (पृ. ५१०/६९-७०) अर्थात मुक्तामाला निर्गुणाच्या गावी जायचे आहे याचे भान ठेवणे आवश्यक आहे. तुकारामांनी स्वत: 'त्रिकुट शिखरी शून्य सारून सुखे केलेल्या निद्रेचे-मुक्तामाचे-वर्णन' '**सहज मी आंधळा गा निज निराकार पंथें॥**' या अभंगात केले आहे. या दृष्टीने 'दर्शनाच्च' (३-२-२१) यावरील अप्पांचे अप्रतिम भाष्य मुळातून वाचावे.

संपूर्ण तिसरा अध्यायच साधनाध्याय म्हणविला जातो. त्यातून उपनिषदांत वर्णिलेल्या विविध उपासनांचा व विद्यांचा निर्णय केला आहे. साधकांच्या दृष्टीने तो महत्त्वाचा आहे हे उघड आहे. या उपासना व विद्या भिन्न वाटल्या तरी त्या एका ब्रह्मविद्येच्या अंगभूत स्वरूपात अंती ब्रह्मसाक्षात्कारात परिणत होतात. "**सर्ववेदान्तप्रत्ययं- चोदनाद्यविशेषात्।**" (३-३-१) या पहिल्याच सूत्रावरील भाष्यात अप्पांनी हिंदूंच्या 'साधनानाम् अनेकता' या टिळकप्रणीत लक्षणाचे उत्कृष्ट विवेचन केले आहे. या साधनांच्या अनेकतेमागे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे, ते 'अधिकारभेदाचे.'** सर्व माणसे सारख्या बुद्धीची वा रुचीची नसतात. तेव्हा त्यांना झेपेल असे साधन सांगणे आवश्यक ठरते. "अधिकार तैसा करू उपदेश" या तुकाराम वचनात सर्वच ऋषि मुनींना व उपदेशकांना, अभिप्रेत असलेले अधिकारभेदाचे मानसशास्त्रीय तत्त्व सुव्यक्त झाले आहे. साधनांच्या विविधतेमागे दुसरे तत्त्व आहे ते 'पायरी'चे, सोपानाचे. येथे निरनिराळ्या साधनांमध्ये क्रमिकता मानली जाते. अप्पा सांगतात - **अपेक्षेनें खाली वरी। असे प्रत्येक पायरी। क्रम सोडणें अयोग्य परी। उच्चनीच भावनेने॥**" (पृ. ५१७-४७) या संदर्भात समर्थ रामदास स्वामींच्या एका महत्त्वाच्या ओवीचे स्मरण करून देणे इष्ट ठरेल. ते सांगतात - "**आधीं ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना॥ उपासकां सांपडे ज्ञान। ज्ञाने मोक्षचि पावणें॥**" (मा. पं. ३-१) या विषयाचे स्पष्टीकरण करताना अप्पांनी ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्या मतांचा आवर्जून उल्लेख केला आहे. (पृ. ५१९) एकूण चर्चेचा निष्कर्ष असा - "**प्रवृत्ति नि परिस्थिती। यांत वैविध्य असे अति। सर्वांची सोय होण्याप्रति। झटे माउली शास्त्ररूपी॥**" (५२१-८१)

साधनेच्या संबंधात अप्पांनी साधकांना केलेल्या काही महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचनांचा उल्लेख उपयुक्त होईल. "**तत्त्वतां साऱ्या उपासना। मुळात धरती एकपणा। कारण काही भिन्नता ना। अंती उपास्याठायींहि॥**" (५२३/१०६) हे खरे असले तरी साधकाने जी उपासना स्वीकारली असेल तिचे विधिवत् पालन करणे आवश्यक आहे. भक्तीच्या भाषेत यासच अनन्य वा एकनिष्ठ भक्ती म्हणतात. गणपतीला दूर्वा, शिवाला बिल्वपत्र व पांडुरंगाला तुळसच अर्पावी. मंत्रोच्चार शास्त्रशुद्ध हवेत. "**आपुले दैवत भक्ताप्रती। वाटतसे सर्वशक्ती। भरून राहे सर्वांभूती। सर्व इच्छा पुरवी तें॥**" (५२४/१११) अशा रीतीने सर्व इष्ट देवता तत्वत: एकरूप असल्या तरी "**सर्व एक म्हणून। करू नये मिश्रण। सारे नियम सांभाळून। अधिकारभेदे वर्तावें॥**" (५२४/११९) याला दृष्टांत देतात, "**जिलबी करावी जिलबीपरी। भाजावे ना शिऱ्यापरी॥**" (५२४/१२०) उपासना या सोपाधिक असल्याने, सर्वाधिक असल्याने जोवर उपाधी आहेत तोवर त्यांची विशेषता सांभाळली पाहिजे. शेवटी

मात्र - "उपाधीचा निरास। होता, संपतो विशेष। मग विधि वा निषेधास। पाहण्याचें काम नुरे।" (५२५/१३०) सारी वेदवचने एका ब्रह्माचेच वर्णन करतात हे सांगणाऱ्या "दर्शयति च" या सूत्रावरील भाष्यात आप्पा श्रुतींबरोबर संतवाङ्मयाचाही उल्लेख करतात - "थोर संत साक्षात्कारी। यांच्या बहुमोल विचारी। दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी। एकवाक्यता दिसोनि ये।।" (५२६/१३९) यावरून संतांविषयी असलेली त्यांची परमादराची भावना समजून येते. दुसरी सूचना अशी की "केवळ शब्द येता भिन्न। अर्थ वेगळा करावा न।" (५२७/१४६) नांवे जरी सहस्र असली तरी ईश्वर एकच आहे. तीच गोष्ट ज्ञान आणि भक्तीची. ईश्वर प्राप्तीचे प्रमुख मार्ग म्हणून अप्पांनी कर्म, भक्ती, ज्ञान आणि योग या चार योगांचा उल्लेख केला आहे. (पृ. ५२७/१४१) परंतु या चारी निष्ठा निदानी एकवटतात. विशेषत: ज्ञान आणि भक्ती यांचे मूलभूत ऐक्य ध्यानात घेणे आवश्यक आहे. ते सांगतात "प्राप्त होतां अंतिम स्थिती। एकवटते ज्ञान-भक्ती। जिला म्हणती स्वसंविती। परम भक्ती तीच होते।।" (५२९/१६२)

साधकांसाठी आणखी एक सूचना अशी की परमेश्वराच्या प्रतीकाला परमेश्वर मानूं नये, नाहीतर ईश्वराशी एकरूप होण्याऐवजी प्रतीकाशी एकरूप होण्याचा प्रसंग ओढवेल! अधिकाराप्रमाणे उपासनाभेद आहे हे आपण पाहिले. सामान्य माणूस प्रतीकांच्या माध्यमातून निर्गुण निराकार ब्रह्माशी नाते जोडू शकतो. पण "दृढ धरून तत्त्वज्ञान। साधकानें संपूर्ण। राहिले पाहिजे सावधान। उपासितां प्रतीकासी।।" (६७९/९९) जोपर्यंत अद्वैताचे तत्त्व-ज्ञान यथार्थपणे मनीं ठसले नाही, जो पर्यंत ते साक्षात्कृत झाले नाही, तो पर्यंत उपास्य-उपासक भेदमूलक उपासना उपयुक्त ठरते. "म्हणून भक्तीच्या मार्गावरी। देवभक्त ऐसी परी। राखण्याचा परोपरी। यत्न केला संतांनी।।" (६८०/१०८) पुढे ते सांगतात की, "देवभक्त ही उपासना। ब्रह्मासी ही ज्ञान साधना। उपासना ही धरून सगुणा। बव्हंशानें राहते।।" (६८०/११०) याचा अर्थ काय, तर "करितां एकतेचा विचार। सगुणीं व्हावें सावध फार।।" तात्पर्य - "प्रतीका ठायीं आहे ब्रह्म। यांत नसावा संभ्रम। परि प्रतीक हेंच ब्रह्म। ऐसें मात्र म्हणूं नये।।" (६८०/११२) "न प्रतीके न हि स:।" (४-१-४) "सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावे।।" असे रामदास का म्हणतात, ते यावरून स्पष्ट होईल. याचीच दुसरी बाजू पुढील "ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्" (४-१-५) या सूत्रात सांगितली आहे. त्याचा अर्थ "निकृष्टावरी उत्कृष्टाची। भावना ती करणे साची। तेणे पायरी प्रगतीची। चढतां येते साधकासी।। (६८२/१३०) पुढील सूत्रांमधूनही साधकांना अत्यंत महत्त्वाचे असे साधनाविषयक मार्गदर्शन केले आहे. "अचलत्वं चापेक्ष्य" (४-१-९) या सूत्रावरील भाष्यात अप्पांनी नामस्मरणाच्या साधनेचे महत्त्व सांगितले आहे. - "नामाची ही साधना। श्रेष्ठ प्रतीची उपासना। सर्व संतांनीं आश्वासना। दिले आहे मार्गी या।।" (६८९/२००) नामधारकाने सदाचाराकडे मात्र कटाक्षाने लक्ष पुरविले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे साधकाने आपले साधन आमरण आचरिले पाहिजे. "सदाचाराचे वर्तन। नाम, भजन अथवा ध्यान। हें न सोडावें साधन। ज्ञात्यानेंहि अंतावरी।।" (६९७/२८८).

**ज्ञानभक्तीचे फेडिले वेगळेपण! :**

*ब्रह्मसूत्रांमध्ये अप्पा संतांच्या विचारांनाही कसे गोवतात याची कल्पना वरील विवेचनावरून येऊ शकेल असे वाटते. अप्पा हे सिद्धहस्त लेखक, प्रतिभावंत कवी, रसाळ कीर्तनकार व प्रज्ञावंत प्रवचनकार आहेत. या पैकी एकेक गोष्ट सुद्धा माणसाला लौकिक सन्मान प्राप्त करून द्यायला पुरेशी आहे. परंतु ज्या सर्वश्रेष्ठ अशा अध्यात्मविद्येसाठी - ब्रह्मविद्येसाठी भारतीय संस्कृती सुप्रसिद्ध आहे, तिचे रहस्य स्वत: जाणून घेऊन ते सामान्य लोकांना समजेल अशा रीतीने उलगडून दाखविण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी तीक्ष्ण बुद्धी आणि शब्दप्रभुत्व यांच्या जोडीला उच्च कोटीची साधना वा उपासना आवश्यक आहे. "***अध्यात्मशास्त्री इये। अंतरंगची अधिकारिये॥***" *असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात. मुंडक उपनिषद् स्वत: सांगते -*

***"नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन।***
***यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम्॥"*** *(३-२-३)*

*याचा भावार्थ असा की आत्मज्ञान हे केवळ बुद्धी, शास्त्रज्ञान आणि पांडित्यपूर्ण विवेचन - यांचे द्वारा होऊ शकत नाही. ज्याला स्वत:च्या स्वरूपाचे दर्शन द्यायचे त्याची निवड स्वत:, आत्माच करतो. यालाच आपण आत्मदेवाची कृपा म्हणू या. अशी कृपा होऊन, उपनिषदातील प्रतिपाद्य विषयाचे रहस्य कोणाच्या हृदयात प्रगट होते या विषयी श्वेताश्वतर उपनिषदाच्या अंतिम श्लोकात ऋषी सांगतात,*

***"यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ।***
***तस्यैते कथिता ह्यर्था: प्रकाशन्ते महात्मन:॥"***

*अर्थात् परमेश्वर आणि सद्गुरू यांच्या विषयीच्या परमभक्तीने ज्याचे हृदय व्याप्त आहे, त्याच्याच हृदयात 'उपनिषद्' प्रकाशित होते. हे सर्व सांगायचे कारण 'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी' वाचीत असता ती अशीच 'प्रकाशित' झाली आहे. बुद्धीने रचिली नाही, याची प्रतीती येते. प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी केलेल्या 'नमना'तून आणि ग्रंथाच्या 'उपसंहारा'तून तर अप्पांचा भक्तिभाव प्रकट झाला आहेच, पण सर्वच ग्रंथभर त्याचा सुवास दरवळत असल्याचे जाणवते. त्यांची एक प्रार्थना पाहा* "***आवरणें या मायेला। एक आहे शक्य तुला। भक्तापुढतीं दयाळा। आत्मरूपें प्रगट व्हावें॥***" *(पृ. ६६९/४) हे आत्माराम हृदयी प्रगटून जी ब्राह्मी स्थिती प्राप्त होते तिचे जे अत्यंत हृदयंगम वर्णन अप्पांनी आपल्या* "***अविभागो वचनात्॥***" *(४-२-१६) या सूत्रावरील भाष्यात केले आहे. ते वाचताना एकाच वेळी शंकराचार्य व ज्ञानेश्वर यांच्या तद्विषयक वर्णनाचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. एक ओवी अशी* "***मी आनंद मी प्रकाश। मी अनंत मी उदास। मी व्यापक मी चिद्विलास। निर्विकारी निर्गुण मी॥***" *(पृ. ७१६/९१) जगद्गुरु शंकराचार्य आणि ज्ञानभक्तीचे आचार्य ज्ञानेश्वर यांच्या केवलाद्वैती चिद्विलासाचा परिसस्पर्श अप्पांच्या साऱ्या विचार-भाव-विश्वाला झाला आहे. शंकराचार्यांचा तर त्यांनी उपसंहारात स्पष्टच उल्लेख केला आहे. 'ब्रह्मसूत्रे', त्यातून व्यक्त झालेले ब्रह्मज्ञान, भगवान सूत्रकार व्यास यांचे माहात्म्य त्यांनी विशद केले आहे. त्यातील 'ब्रह्मज्ञान-माहात्म्य' सांगणाऱ्या ओव्यांना मिळून*

'ब्रह्मज्ञान स्तोत्र' असे सुखाने म्हणता येईल. एक ओवी नमूना म्हणून पाहू - "**ब्रह्मज्ञान हा ज्ञानराजा। ब्रह्मज्ञान हीच पूजा। ब्रह्मज्ञान हेच समजा। साधन साऱ्या वैभवाचें॥**" (पृ. ७९३/४६७) अशा परम प्राप्तव्य ब्रह्मज्ञानाचा मूलग्रंथ ब्रह्मसूत्रे असल्याने तो मुळातून समजून घेणे आवश्यक आहे, असे अप्पांचे म्हणणे आहे. "**विचारांची परिपक्वता। भावनांची उत्तुंगता। विवेचनाची सखोलता। दिसून येते सूत्रीं या॥**" (७८६/३८८) परंतु भिन्न भिन्न पंथीयांनी संकुचित पंथाभिनिवेशाने रूढ केलेल्या मतांनी मूळ औपनिषद अद्वैत सिद्धान्त आवृत आणि विकृत झाला. म्हणून मतामतांचा गलबला दूर सारून मूळ ब्रह्मसूत्रांचा अभ्यास कर्तव्य ठरतो. "**तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी। ब्रह्मसूत्रें हीं निदानीं। व्यास महर्षि कैवल्यदानी। सोय करिती साधकांची॥**" म्हणून "**ब्रह्मसूत्रे हीं उज्वल। विषय व्हावा मननाचा॥**" (पृ. ७९६/४९५) परंतु ही सूत्रे अल्पाक्षर असल्याने त्यांचा रहस्यार्थ विशद करण्यासाठी भाष्याची आवश्यकता आहे आणि येथे शंकराचार्यांची व त्यांनी प्रतिपादिलेल्या केवलाद्वैती तत्त्वज्ञानाची थोरवी अप्पा स्पष्ट करतात. "**त्या भाष्याचा आधार। घेतला मी असे फार॥**" अशी प्रांजळ कबुली दिल्यानंतर - "**तसे भाष्याच्या आधारीं। वागलों मी स्वैरतेने॥**" (७९७/५०७, १२) असे भाष्य-स्वातंत्र्य घेतल्याचेही ते सांगतात. या स्वातंत्र्याचे स्वरूप पाहिल्यावर ते शंकराचार्यांच्या भूमिकेची पुष्टी करणारेच आहे असे दिसून येईल. मूलभूत सिद्धान्त केवलाद्वैत हाच आहे. त्यात अन्य योग्यताभिन्नतेमुळे निर्माण झालेल्या भिन्न दर्शनांचा समन्वय सत्तात्रयाच्या सिद्धान्ताने साधला आहे. अप्पा सांगतात - "**वाहणें संपतें सागरीं। चढाई थांबे शिखरावरीं। तसें, केवलाद्वैताभीतरीं। होतें सर्व विचारांचें॥**" (पृ. ७८९/४२२) या वेद-वेदान्तात पूर्वीच मांडलेल्या पुरातन सिद्धान्ताची जगद्गुरूंनी शास्त्रदृष्टीने व्यवस्थित मांडणी केली. अद्वैत सिद्ध करण्यासाठी आचार्य प्रतिपादित मायावादापेक्षा अधिक चांगली उपपत्ती दुसरी नाही. "**अद्वैत सिद्ध करावया। आचार्यांनी मानिली माया। त्याहून चांगल्या उपाया। शोधणें तें शक्य नाहीं॥**" (७९०/४२७) हे वाचीत असता आचार्यभक्त विनोबांच्या एका विधानाचे सहज स्मरण होते. ते सांगतात - "मायेच्या या उपपत्तीनें ज्या बुद्धीचें समाधान होणार नाही तिचे दुसऱ्या एखाद्या उपपत्तीने ते होईल असे मला वाटत नाही." (गुरूबोध - प्रस्तावना पृ. ६) परंतु पुढे आचार्यांच्या अनुयायांमधेच तपशीलावावत चिकित्सा सुरू होऊन पांडित्यमूलक मतभेद निर्माण झाले आणि आत्मज्ञान मागे पडून शब्दज्ञान वळावले. म्हणून अप्पा सांगतात की या शब्दजंजाळात न अडकता आपल्या अधिकारपरत्वे उपासना निश्चयाने करावी - "**ईश्वराची प्रेमभक्ती। साधकां या मार्गावरती। सांभाळून नेई पुढती। आईप्रमाणें वात्सल्यें॥**" (७९३/४५९) आणि येथेच अप्पांच्या स्वातंत्र्याचा प्रत्यय येतो. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम इत्यादी संतांच्या संगतीत भक्तिप्रेम सुखाच्या रसास्वादाने तुष्ट नि पुष्ट झालेली अप्पांची प्रज्ञा जर ब्रह्मसूत्रांचा अन्वयार्थ संतप्रणीत विशेषत: ज्ञानेश्वरप्रणीत भक्तिदर्शनाच्या प्रकाशात उजळून टाकायला प्रवृत्त न झाली तरच नवल! माझ्या समजुती प्रमाणे 'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनीचे' आगळे-वेगळेपण त्यातच सामावले आहे. ज्ञानेश्वरांचे वैशिष्ट्य सांगताना अप्पा म्हणतात - "**ज्ञानभक्तीचे फेडिले। वेगळेपण ज्ञानदेवें॥**" (१७-१७१) हेच अत्यंत कठिण काम अप्पांनी, 'स्वातंत्र्य' घेऊन आपल्या ब्रह्मसूत्रभाष्याच्या माध्यमातून केले आहे.

"वेदमार्गे मुनी गेले त्याचि मार्गे चालिलो" असे ज्ञानेश्वर, आणि "**वेदाचा तो अर्थ आम्हांसींच ठावा।**" असे तुकाराम का म्हणतात ते या भाष्याने सुस्पष्ट केले आहे. ज्ञान भक्तीच्या ऐक्याविषयीची अप्पांची ओवी - पुनश्च उद्धृत करतो "**प्राप्त होतां अंतिम स्थिति। एकवटते ज्ञानभक्ति। जिला म्हणती स्वसंविती। परम भक्ति तीच होते॥**" (पृ. ५२९/१६२) आता, ज्ञानेश्वरांचे शब्द पाहू - "**ज्ञानी इयेतें स्वसंविति। शैव म्हणती शक्ति। आम्ही परम भक्ति। आपुली म्हणों॥**" (ज्ञा. १८-११३३) या परमभक्तीला ज्ञानेश्वर स्वत: 'ज्ञानभक्ती' असंच नांव देऊन सांगतात - "**इया ज्ञानभक्ती सहज। भक्त एकवटला मज॥**" (१८-११३०) येथे ज्ञानाला जशी भक्तीची रसमयता लाभते तशी भक्तीला ज्ञानदृष्टी प्राप्त होते, आणि दोन्ही सच्चिदानंद स्वरूप परब्रह्माच्या अमृतानुभवात समरस होऊन जातात; अप्पांच्या शब्दांत - "**ब्रह्मज्ञानीं एकवटती। माधुर्याचे रस सारे॥**" थोडक्यात सांगायचे तर ब्रह्मसूत्रे व त्यातील पदे अनेक असली तरी त्या सर्वांचा अर्थ एकच आहे. व तो म्हणजे परमेश्वर - **परि वेदार्थाचे सार। एक आहे परमेश्वर॥**" आणि तो

"विश्वी आंतून बाहेरून। सर्वठायीं परिपूर्ण।
एक आहे सच्चिद्घन। पूर्णब्रह्म परमात्मा॥
म्हणून सोडोनि आसक्ति। मानवाने यथाशक्ती।
भावें भजावा वात्सल्यमूर्ति। सच्चिदानंद नारायण॥"

(पृ. ७८८/४०५ ते ७)

ब्रह्मसूत्रांतील तत्त्वज्ञान गहन म्हणून सामान्य माणूस त्याच्या वाटेला जात नाही. त्यांच्यावरील प्रमुख भाष्ये ही संस्कृत भाषेत व तीही न्यायघटित भाषेत लिहिलेली. त्यामुळे जणु ब्रह्मसूत्रार्थ जाणून घेण्याचा मार्गच कुंठित झाला! सामान्य जिज्ञासू साधकाची व अभ्यासकाची ही अडचण सहानुभूतीने जाणून अप्पांनी 'श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी' प्रकाशित केली. अप्पा स्वत: सांगतात - "**पंडितांनीं विद्वानांना। सुखें द्यावे समाधाना। मी आपुला इतरेजनां। घडवितो की ओळखी ही॥**" (७९८/५१८) अप्पांचे हे विनयाचे बोलणे आहे हे सांगणे नलगे. कारण, ब्रह्मसूत्रार्थाची ही ओळख करून देताना अप्पांची ज्ञानशक्ती ज्या तेजस्वीपणे प्रतिपाद्य विषयावर सर्वांगीण प्रकाश टाकते त्यापुढे पंडितांनीही नम्र व्हावे. साधकांच्या दृष्टीने तर हा ग्रंथ म्हणजे स्वरूप साक्षात्काराचा मार्ग उजळून टाकणारा ब्रह्मज्ञानाचा नंदादीपच आहे. तो प्रज्वलित करून अप्पांनी जिज्ञासू मुमुक्षूंना व अन्य अभ्यासकांनाही कायमचे ऋणी करून ठेविले आहे. आत्मज्ञानोत्तरही सद्गुरूंचे ऋण शेष राहातेच! मात्र ते फेडण्याचा एकमेव उपाय स्वत: ज्ञानेश्वरांनी सांगितला आहे; त्याचे स्मरणपूर्वक आचरण करून प्रस्तुत निबंधाला पूर्णविराम देतो.

"ते ऋणशेष वाचां इया। न फेडवेंचि मरोनिया।
तें पाया पडोनि मियां। सोडविलें॥" (अमृतानुभव ३-३२)

इति शम्। 卐

---

* संदर्भाचे आकडे : पहिला आकडा पृष्ठाचा व दुसरा ओवीचा.

** मूर्तिपूजेचे महत्त्व आणि मर्यादा या तत्त्वाच्या आधारे स्पष्ट करता येतात.

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी संख्यान

| अध्याय | किरण | सूत्रे | ओव्या |
|---|---|---|---|
| प्रथम | पहिला | ३१ | ८०८ |
| ,, | दुसरा | ३२ | ३८१ |
| ,, | तिसरा | ४३ | ४५२ |
| ,, | चवथा | २८ | ४०२ |
| | | १३४ | २०४३ |
| द्वितीय | पहिला | ३७ | ५६० |
| ,, | दुसरा | ४५ | ४७३ |
| ,, | तिसरा | ५३ | ५९५ |
| ,, | चवथा | २२ | २७९ |
| | | १५७ | १९०७ |
| तृतीय | पहिला | २७ | ३६७ |
| ,, | दुसरा | ४१ | ५११ |
| ,, | तिसरा | ६६ | ७५९ |
| ,, | चवथा | ५२ | ७०२ |
| | | १८६ | २३३९ |
| चतुर्थ | पहिला | १९ | ३४८ |
| ,, | दुसरा | २१ | १३५ |
| ,, | तिसरा | १६ | २०७ |
| ,, | चवथा | २२ | ५५० |
| | | ७८ | १२४० |
| | एकूण | ५५५ | ७५२९ |

# विषयानुक्रमणिका

## -: समन्वयाध्याय :-

### प्रथमाध्याय - किरण पहिला


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| | नमन | ३०७ | ब्रह्माचे लक्षण. |
| १ | परमेश्वराचे स्वरूप. | ३२४ | ब्रह्मज्ञानाविषयी शास्त्रच प्रमाण. |
| ५८ | मतांतराचे प्रयोजन. | ३५८ | ब्रह्मज्ञानासाठी समन्वयाची आवश्यकता. |
| ६८ | भिन्न भिन्न मते. | ४१७ | प्रकृति जगाचे कारण नाही. |
| ९८ | ईश्वराचे वात्सल्य. | ४९३ | वेदाने जगाचे कारण ब्रह्मच |
| १०८ | अधिकारी ऋषि. | | सांगितले आहे. |
| १२० | व्यासांची थोरवी. | ५२० | आनंदमय हे ब्रह्माचे स्वरूप. |
| १३१ | ब्रह्मसूत्राचे भाष्यकार. | ६०६ | ब्रह्म वस्तुतः आनंदरूप. |
| १४२ | भिन्नमतांचा अभ्यास आवश्यक. | ६५४ | सूर्य आणि नेत्र यात |
| १४९ | श्रीमत्‌शंकराचार्य. | | राहणारा पुरुष परमात्माच. |
| १६१ | श्रीज्ञानेश्वरांचे वैशिष्ट्य. | ६९३ | आकाश शब्द ब्रह्मबोधक. |
| १७५ | श्रीतुकारामादि संत. | ७०३ | प्राण शब्द ब्रह्मबोधक. |
| १८१ | श्रीमद्‌सद्‌गुरु. | ७१२ | ज्योति शब्द ब्रह्मबोधक. |
| १८८ | भौतिक प्रगतीची अपूर्णता. | ७३४ | छंद गायत्री ब्रह्मबोधक. |
| २११ | भारतीय संस्कृतीचे मोठेपण. | ७६० | प्राण शब्द ब्रह्मबोधक. |
| २१९ | पुरुषार्थाचे स्वरूप. | ७७२ | इंद्र-प्रतर्दन. |
| २३८ | जिज्ञासा. | ७७८ | इंद्राचे बोलणे वामदेवासारखे. |
| २५१ | विनवणी. | ७८४ | जीव-प्राण उपासना ब्रह्मप्राप्तीसाठी. |
| २८५ | ब्रह्माची जिज्ञासा. | | |

## प्रथमाध्याय - किरण दुसरा


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | ब्रह्म सर्वत्र प्रसिद्ध. | ९८ | हृदय मर्यादित स्थान असले तरी ते उपासनेसाठी आहे. |
| ३१ | ब्रह्माठायीं विविध गुणांची कल्पना करतां येते. | ११७ | संसारवृक्षावरील दोन पक्षांचे रूपक |
| ५३ | जीव उपास्य नाहीं. | १२५ | ब्रह्मच चराचरांचे भक्षक. |
| १४२ | हृदयरूपीगुहेतील दोघे हे जीव आणि ईश्वर | २०८ | परमात्माच अंतर्यामी आहे. |
| १६४ | नेत्रस्थ जो पुरुष तो जीवात्मा नाही. | २४८ | परमात्माच भूतयोनि आहे. |
| १७१ | स्थाने सांगितली ती ध्यानासाठी | २९२ | वैश्वानर म्हणजे परमात्माच. |
| १७७ | ब्रह्म व्यापक आणि सुखरूप | ३५३ | परमात्म्याचे प्रादेशमात्र स्थान. |


## प्रथमाध्याय - किरण तिसरा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | ब्रह्म स्वर्ग-पृथ्वीचा आधार | ३४९ | ब्रह्माचे अंगठ्याएवढे माप ध्यानासाठी. |
| ३४ | भेद पाहणारास मृत्यूचे भय | ३६० | देवहि ब्रह्मविद्येचे अधिकारी. |
| ३६ | विद्युत्कणाप्रमाणे ब्रह्म सर्वांचे मूळ | ४०६ | शूद्रांना ब्रह्मविद्येचा अधिकार स्मृतीच्या आधारे. |
| ९६ | भूमा शब्द परमात्म्याचा वाचक | | |
| १३९ | अक्षर म्हणजे परमात्माच. | ४३३ | ब्रह्म हेच भीषण वज्र. |
| १८० | दहराकाश म्हणजे परमात्माच. | ४३८ | ज्योति-आकाश ब्रह्मवाचक. |
| २२५ | इंद्र-विरोचन-प्रजापति कथा. | ४४६ | जीवेश्वर भेद. |
| ३४२ | चंद्रसूर्यांना ब्रह्मामुळे प्रकाश. | | |


## प्रथमाध्याय - किरण चवथा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रकृतीला वेदप्रामाण्य नाही. | २२७ | याज्ञवल्क्य मैत्रेयी संवादात |
| ४१ | अव्यक्त शब्द सूक्ष्मशरीराचा वाचक | - | आत्मा म्हणजेच परमात्मा. |
| ४९ | प्रकृति ईश्वराधीन | २६१ | जीवच परमात्मा होतो. |
| ९८ | श्वेताश्वतरांतील अजा सांख्यप्रकृति नव्हे. | २६८ | जीव परमात्माच आहे. |
| १३४ | पंचपंचजन शब्दाने सांख्यतत्त्वे घेऊ नयेत | २८७ | ब्रह्म जगताचे उपादान कारण. |
| १५४ | ब्रह्म हेच आकाशाचे कारण | ३१६ | परिणाम आणि विवर्त. |
| १८२ | असत् शब्द ब्रह्मवाचक. | ३३७ | ब्रह्माव्यतिरिक्त कोणाला स्वतंत्र सत्ता नाही. |
| २१२ | जगाचा कर्ता ब्रह्म. | ३५६ | सत्यज्ञानासाठी श्रद्धा. |
| २१३ | अजातशत्रू-बालाकि संवादात ब्रह्मच अभिप्रेत | ३६६ | सत्य सापेक्ष मानू नये. |

# -: अविरोधाध्याय :-

## द्वितीयाध्याय - किरण पहिला



| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | नमन. | ५० | योगाचे तत्त्वज्ञान अमान्य. |
| १५ | सांख्य स्मृतीपेक्षा वेदानुसारी स्मृतीच मान्य | ५६ | योगतील यमनियमादि स्वीकार्य |
| | | ६६ | जगाचे उपादान ब्रह्म नव्हे प्रकृतीच. |
| २७ | मनुस्मृति हितकर | ८४ | ब्रह्मच उपादान. |
| १२४ | जगाचे गुणदोष ब्रह्मास लागत नाहीत. | ३३४ | ब्रह्मज्ञानाला श्रुतीचा आधार. |
| १४४ | तर्क अप्रतिष्ठ आहे. | ३५५ | ब्रह्मामुळेच कार्यातील विविधता. |
| २०२ | व्यवहारात भेद राहतोच. | ३९४ | जगन्निर्मिती ही ईश्वराचीच लीला. |
| २२१ | कार्य आणि कारण अभिन्न | ४३४ | ईश्वराला विषमता आणि निष्ठुरता हे दोष लागत नाहीत. |
| २६० | जीवाला सामर्थ्य नसतांना ब्रह्माशी ऐक्य कसे ? | ४५९ | विषमतेशिवाय खेळ होऊ शकत नाहीत. |
| २७३ | जीवब्रह्माचे ऐक्य. | ४९७ | जीव कर्मात स्वतंत्र. |
| ३०५ | ब्रह्माची सर्वसमर्थता | ५२३ | सृष्टीचे अनादित्व. |
| ३१८ | ब्रह्माप्रमाणे ब्रह्मज्ञानीहि समर्थ | ५४९ | ब्रह्मात सर्व धर्मांचे अस्तित्व. |



## द्वितीयाध्याय - किरण दुसरा



| | | | |
|---|---|---|---|
| १ | जगाची रचना चेतनाकडूनच. | ३२८ | जैनमत खंडन. |
| ३० | जगात आपोआपी नाही. | ३३६ | जीव शरीराएवढा संभवत नाही. |
| ४२ | प्रकृतीच्या ठिकाणी प्रवृत्ति संभवत नाही. | ३७६ | काही प्राचीनमतांचा जैन-बुद्धांकडून स्वीकार. |
| ८५ | सांख्यमत खंडन. | | |
| १११ | परमाणुकारणवादाचे खंडन. | ४०३ | ईश्वर केवळ निमित्त नाही. |
| १५७ | बौद्धमत खंडन. | ४३२ | भागवतांची साधनपद्धति योग्य. |
| २७६ | शून्यवाद खंडन. | ४४६ | वासुदेवादि व्यूहकल्पना अयोग्य. |



## द्वितीयाध्याय - किरण तिसरा



| | | | |
|---|---|---|---|
| १ | आकाशाच्या उत्पत्तीचा वाद | ३३८ | बुद्धि कर्ता नाही. |
| ७० | पंचभूतांची उत्पत्ति आत्म्यापासूनच | ३५१ | जीवाचे कर्तेपण ईश्वरी सत्तेमुळे. |
| १२५ | भूतांचा उलट क्रमाने लय. | ४१८ | ईश्वरी प्रेरणेला जीवाचे प्रयत्न अपेक्षित. |

| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १३० | बुद्धि, मन, इंद्रिये सूक्ष्म भूतात | ४४६ | जीव ईश्वराचा अंश आहे. |
| | लय पावतात | ४५० | भेदाभेदाची संगति. |
| १४५ | जन्ममरण शरीराचे. | ४८८ | जीवाचे अंशत्व सोपाधिक. |
| १६५ | जीव नित्य आहे. | ५०७ | विधिनिषेध देहसम्बन्धामुळे. |
| १७१ | जीव ज्ञानी आहे. | ५२२ | जीवेश्वर संबंध. |
| १८८ | जीव अणुपरिमाण आहे. | ५२९ | अद्वैतातील प्रक्रिया भेद. |
| २२३ | जीवाचे अणुपरिमाण उपाधीमुळे. | ५५४ | तीन प्रकारच्या सत्ता. |
| २४३ | जीवाचे सुखदुःख वा अपूर्णता उपाधीमुळे | ५७९ | आत्मे अनेक मानले तर व्यापक मानता |
| २८० | अहंकारामुळे जीवत्व. | - | येणार नाही. |
| २९३ | जीवाचे कर्तृत्व. | | |


## द्वितीयाध्याय - किरण चवथा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्राणालाहि उत्पत्ति आहे. | १६४ | जीवात्माच भोक्ता. |
| १६ | प्राणांची संख्या. | १७७ | देवांनी प्राणाच्या बळावर असुरांच्यावर |
| ५० | मुख्य प्राणाची उत्पत्ति. | | विजय मिळविल्याची कथा |
| ५१ | नासदीय सूक्त महति. | २०६ | मुख्य प्राण हितकर. |
| ६९ | मुख्य प्राण इंद्रियापेक्षा वेगळा | २१५ | नामरूपे ही ईश्वराची कृति. |
| ८८ | प्राणइंद्रियांच्या वादाची कथा. | २४२ | ईश्वराच्या अपेक्षेने जीव दुबळा. |
| १३० | मुख्यप्राणाचे पाच प्रकार | २६० | सृष्टीतील सर्व पदार्थ भूतसंयोगाने. |
| १५६ | इंद्रियांच्या देवता. | | |


# -: साधनाध्याय :-

## तृतीयाध्याय - किरण पहिला


| | | | |
|---|---|---|---|
| १ | नमन. | २४८ | सर्वच जीव चंद्रलोकात जात नाहीत. |
| ४९ | जीव सूक्ष्मभूतांना युक्त होऊन | २५० | पातक्यासाठी नरकलोक. |
| | पुनर्जन्म घेतो. | २५९ | ज्ञान आणि कर्म ही क्रमाने देवयान, |
| ५२ | पुनर्जन्माचे अस्तित्व. | | पितृयान मार्गास नेतात. |
| ६८ | उपनिषदातील जन्मान्तराचे विज्ञान. | २८१ | पातकी नीच योनीत जन्मास येतात. |
| १२४ | जीवाच्या गतीतील पांच अग्नि व आहुति. | २८३ | सजीवाच्या चार कोटी. |
| १७३ | परलोकातील कर्मभोगानंतर शेषकर्मासह | २९४ | मरणाचे प्रकार प्रारब्धाधीन. |
| | जीव पुन्हा जन्मास येतो | ३१८ | जीव धान्यरूपात राहतात. |

| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १७८ | धर्मकृत्ये खरी पुण्यकृत्ये का ठरत नाहीत ? | ३३० | शास्त्रोक्त कर्मे अशुद्ध ठरत नाहीत. |
| २०९ | धर्मकृत्यातील आचरणाचे महत्त्व. | ३४४ | जीव पुरुष शरीरातून स्त्रीदेहावाटे |
| २२९ | व्यक्ति आचारहीन असल्यास वेदहि त्यास उद्धरू शकत नाहीत. | - | जन्मास येतो. |


# तृतीयाध्याय - किरण दुसरा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | स्वप्नसृष्टि. | १२५ | मूर्च्छा. |
| १६ | स्वप्न मिथ्या आहे. | १३९ | परमात्म्याची दोन रूपे नाहीत. |
| २२ | स्वप्नाची सूचकता. | २३४ | ब्रह्माचे गुण सांगणाऱ्या श्रुति उपाधिसापेक्ष |
| ३८ | उपाधियुक्त जीव सत्यसंकल्प नाही. | २७९ | दृष्टांत एकांगीच असतो. |
| ६१ | सुषुप्ति. | २९५ | ब्रह्म आणि जीव-जगत् यासंबंधीचे दृष्टांत |
| १०१ | जो झोपतो तोच जागा होतो. | ३४७ | सत्-चित्-आनंदपदाची एकरूपता. |
| ३६५ | ब्रह्म निर्विशेष आहे; अभावरूप नाही | ४४५ | ब्रह्माला सेतू, परिमाण, चरण सांगितले |
| ३८३ | उपासनेने ब्रह्माचा साक्षात्कार होतो. | | तरी ते समजुतीसाठी. |
| ४०९ | भेद आणि अभेद अवस्थाविशेषाने. | ४७० | एक ब्रह्मच सत्य अन्य वस्तूचा निषेध आहे. |
| ४२७ | ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ तत्त्व आहे काय ? | ४८३ | कर्मफले ईश्वराधीन. |


# तृतीयाध्याय - किरण तिसरा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | सर्व वेदान्तवाक्ये शेवटी एकच ज्ञान सांगतात | ४५१ | भक्ताची भावना. |
| | | ४७७ | आधिकारिक संतांचे जीवन ईश्वराच्या इच्छेने. |
| ४४ | सांगण्याच्या पद्धतीतील भेद इंद्रियमनाच्या प्रवृत्तीमुळे | ५३५ | निषेधमुखाने केलेले ब्रह्मवर्णन एकत्र घ्यावे. |
| ९० | गौण गोष्टींच्या वेगळेपणामुळे उपासना भिन्न मानू नये | ५४७ | मुख्यता आणि गौणता विचारात घेतली म्हणजे ज्ञानाची एकरूपता समजते. |
| १४६ | वेगळ्या शब्दामुळे ध्येय भिन्न होत नाही. | ५८४ | सर्व श्रुतीवाक्यांचा आदर करावा व समन्वयाने अर्थ घ्यावा. |
| १९४ | उपास्याचे काही गुण सर्वत्र घेता येतात | | |
| २१२ | सापेक्ष गुण सर्वत्र घेऊ नयेत. | ५९१ | नैमित्तिक उपासनांचा संग्रह करू नये. |
| २२६ | जीवप्राणाची उपासना अंतिम नाही | ६१० | ज्ञान हेच मोक्षाचे साधन. |
| २५२ | ब्रह्मोपासना हीच अंतिम व सर्वश्रेष्ठ. | ६४६ | देहास आत्मा मानणे हा जडवाद. |

| ओवी क्रमांक | विषय |
|---|---|
| २९० | उपासनेतील विशिष्ट गोष्टी दोन्ही ठिकाणी घेऊ नयेत. |
| ३१० | छांदोग्य आणि तैत्तिरीय श्रुति यातील यज्ञरूपकाने सांगितलेल्या उपासना एकरूप नाहीत. |
| ३५२ | अभिचाराची कर्मे उपनिषदाशी संबद्ध नाहीत |
| ३६२ | मुक्त आणि त्याची पुण्यपापे. |
| ४२५ | मुक्त होण्यासंबंधी दोन प्रकार |
| ४३३ | क्रममुक्ति आणि सद्योमुक्ति |
| ४४२ | सगुण ब्रह्मलोकांचे वर्णन |
| ६६६ | देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. |
| ६९९ | उपासनेची काही अंगे अन्यत्रहि घेता येतात. |
| ७११ | एकांगाची उपासना करू नये. |
| ७२० | सर्व श्रेष्ठ उपासनांचे फल सारखेच असले तरी कोणती तरी एकच उपासना निष्ठेने स्वीकारावी. |
| ७४० | एकाहून अधिक काम्य उपासना स्वीकारता येतात. |
| ७४८ | उपासनेतील उपचार शास्त्रोक्तरीतीने करावे. |


## तृतीयाध्याय - किरण चवथा


| ओवी क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | वेदशास्त्राच्या मार्गदर्शनाने पुरुषार्थाची सिद्धी साधावी |
| ६० | जीवनाची शास्त्रशुद्ध रीती. |
| १११ | ज्ञान कर्माचे अंग नाही |
| १५४ | कर्माचा उपयोग चित्तशुद्धीसाठी |
| १६६ | ज्ञानाचे अधिकारी थोडे |
| १७८ | ज्ञानी विरक्त असतो. |
| १८२ | कर्माचा अधिकार द्वैतामुळे |
| १९३ | सर्व आश्रमांना विशेषत: गृहस्थेतर तीन आश्रमांनाहि ब्रह्मविद्येचा अधिकार. |
| १९७ | वेदाने गृहस्थेतर आश्रमांचा उल्लेख केला आहे काय ? |
| २०४ | वेदाने सर्व आश्रमांचे वर्णन करून विधि सांगितला आहे. |
| २२३ | विधि सांगण्याच्या पद्धति |
| २४० | ज्ञानासंबंधीच्या श्रुति स्तुतिरूप नाहीत |
| २८४ | कर्मे चित्तशुद्धिद्वारा आत्मज्ञानाची साधने |
| २९५ | ज्ञानासाठी शमदमादींचे महत्त्व. |
| ३९ | कर्म आणि ज्ञान यांचा संबंध - समुच्चय की समन्वय ? |
| ३०७ | आभ्यंतर साधने. |
| ३५२ | प्राणसंकटाच्या वेळी अन्नभक्षणात नियम नाही |
| ३६९ | वेदास स्वेच्छाचार मान्य नाही. |
| ३८५ | सर्वांनी आश्रमविहित कर्मे करावी. |
| ४०३ | नित्यनैमित्यिक प्रायश्चित्त कर्मे. |
| ४५१ | अनाश्रमी व्यक्तीस ज्ञानाधिकार. |
| ४७३ | विहित कर्माचा मोहाने त्याग करू नये. |
| ४८५ | आरूढपतित होऊ नये. |
| ५४० | कर्मफले यजमान आणि ऋत्विज. |
| ५६६ | ज्ञानाचे सहाय्यक बाल्य आणि पांडित्य. |
| ५८४ | गृहस्थाश्रमास महत्त्व कारण त्यात सर्वच साधते. |
| ६१७ | ब्रह्मज्ञानी पुरुषांनी प्रौढी मिरवू नये. |
| ६४२ | उत्कट साधनेने याच जन्मीहि ज्ञानफल. |
| ६७८ | मुक्तीची एकरूपता. |

# -: फलाध्याय :-

## चतुर्थाध्याय - किरण पहिला


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | नमन | २०८ | साधनाप्रकाराचा आग्रह नाही. एकाग्रता |
| १२ | श्रवणादींची पुन: पुन्हा आवृत्ति करावी | | प्रसन्नता साधेल ते करावे. |
| ४७ | आत्मा म्हणजे परमात्माच. | २६१ | साधना आमरण केली पाहिजे. |
| ९३ | जीव ब्रह्म असला तरी प्रतिक म्हणजेच | २८९ | ज्ञान्याला कर्माचा लेप नाही. |
| | मी असे म्हणू नये. | ३२७ | ब्रह्मवेत्त्याच्या सुकृतदुष्कृताचे भोक्ते |
| ११३ | प्रतीकाठिकाणी ब्रह्माची उच्च भावना | - | भक्त व निंदक |
| | करावी | ३३० | सत्कर्माचा ज्ञानप्राप्तीला उपयोग. |
| १४४ | उपासना बसून करणेच चांगले | ३४२ | प्रारब्धाचा भोगाने नाश. |
| १५९ | ध्यानासाठीच स्थिरासन. | | |


## चतुर्थाध्याय - किरण दुसरा


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | अंतकाळी वाणीमनादींच्या लयाचे वर्णन | ३८ | सगुणोपासकांना ब्रह्मलोकी |
| ३० | देहपातापर्यंतचा क्रम ज्ञानी आणि | - | सूक्ष्म देहाचा उपयोग. |
| | अज्ञानी यांचा एकच | ५४ | लिंगदेह. |
| ६० | ब्रह्मज्ञान्याच्या प्राणांचे उत्क्रमण नाही | ७६ | ब्रह्मवेत्ता आणि ब्रह्म यांची एकरूपता |
| ६९ | ब्रह्मज्ञान्याचे सूक्ष्म शरीरभाव ब्रह्मातच | १०० | सगुणब्रह्मोपासकाचे उत्क्रमण. |
| | विलीन होतात. | १११ | दक्षिणायनातहि उपासना फल सारखेच. |


## चतुर्थाध्याय - किरण तिसरा


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | सगुण ब्रह्मोपासकाला मिळणारा अर्चिरादि | | श्रेष्ठ कनिष्ठ असू शकते. ते सर्वश्रेष्ठ |
| | किंवा देवयान मार्ग | | असतेच असे नाही. |
| ४१ | देवयान मार्गाने मिळणारा ब्रह्मलोक हा | १०६ | जीव जगत् जगदीश्वर संबंध व |
| | सगुण ब्रह्मचाच | - | निरनिराळे वाद. |
| ६५ | माणसापुढचे ध्येय त्याच्या प्रकृतीभेदाने | १९० | सकाम उपासना देवयानमार्गे नेत नाही. |


## चतुर्थाध्याय - किरण चवथा


| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | जीवाची ब्रह्मरूपता | १८४ | जीवनमुक्त. |
| १५ | मायेने जीवभाव. | २२१ | जीवनमुक्ताला जगाच्या व्यापाराचे नियंत्रण |

| ओवी क्रमांक | विषय | ओवी क्रमांक | विषय |
|---|---|---|---|
| २२ | साधनेने उद्धार. | | करता येत नाही. साधारणसिद्धी |
| २६ | साक्षात्काराचे स्वरूप | | तेवढ्या मिळतात. |
| ३७ | मुक्ताची लक्षणे | २९४ | सद्योमुक्ताला वा क्रममुक्तालाहि पुनर्जन्म |
| ६७ | परंज्योति म्हणजे आत्माच | | नाही. |
| ७३ | मुक्त तत्त्वत: ब्रह्मापेक्षा वेगळा नाही | ३०० | सगुण ब्रह्मलोकाचे वर्णन |
| ८६ | ब्रह्मप्राप्तीविषयी जैमिनी-औडुलोमी | ३२१ | ब्रह्मसूत्रातील विषयक्रम |
| | यांची मते | ३८७ | उपसंहार. |
| १०० | अवस्थाभेदाने व्यासांनी | ४३२ | प्रक्रियांचे मर्यादित महत्त्व |
| | दोन्ही मते स्वीकारली | ४५५ | एका साधनेचा निष्ठेने स्वीकार. |
| १०७ | ब्रह्मवेत्त्यांना संकल्पानेच कार्यामध्ये सफलता | ४६४ | ब्रह्मज्ञानाचे महत्त्व. |
| १२८ | ज्ञान्याला दुसरा शासक नाही | ४९८ | ब्रह्मसूत्रांचे दुर्बोधत्व |
| १४६ | मुक्ताचे देहधारण | ५०७ | ग्रंथकर्त्याची भूमिका |
| १७३ | सगुणोपासकाचे भक्तिसुखासाठी देहधारण | ५२० | समर्पण |


**परिशिष्टे -**


वचनाधार

अर्थबोधक टीपा

सूत्रांची वर्णानुक्रम सूचि


★ ★ ★

# मंगलम्

ॐ नमो ब्रह्मादिभ्यो ब्रह्मविद्यासंप्रदायकर्तृभ्यो ।
वंशऋषिभ्यो महद्भ्यो नमो गुरुभ्यः ।

सर्वोपप्लवरहितः प्रज्ञानघनः प्रत्यगर्थो ब्रह्मैवाहमस्मि ।

नारायणं पद्मभवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च ।
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविन्दयोगीन्द्रमथास्य शिष्यम् ॥

श्रीशंकराचार्यमथास्य पद्मपादं च हस्तामलकं च शिष्यम् ।
तं तोटकं वार्तिककारमन्यानस्मद्गुरून्संततमानतोऽस्मि ॥

श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् ।
नमामि भगवत्पादं शंकरं लोकशंकरम् ॥

शंकरं शंकराचार्यं केशवं बादरायणम् ।
सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥

ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेदविभागिने।
व्योमवद् व्याप्तदेहाय दक्षिणामूर्तये नमः ॥

कविश्रेष्ठाय गुरवे श्रीगोदातीरवासिने ।
विठ्ठलाङ्घ्रिविलीनाय गणुदासाय ते नमः ॥

# श्रीव्यासवन्दना

व्यासाय विष्णुरूपाय व्यासरूपाय विष्णवे ।
नमो वै ब्रह्मविधये वासिष्ठाय नमो नमः ॥

अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरिः ।
अभाललोचनः शम्भुः भगवान् बादरायणः ॥

व्यासं वसिष्ठनप्तारं शक्तेः पौत्रमकल्मषम् ।
पराशरात्मजं वन्दे शुकतातं तपोनिधिम् ॥

ज्ञानदेवसमर्थादि-श्रेष्ठानां आदिपूरुषम् ।
व्यासं कारुणिकं वन्दे तत्त्वज्ञानप्रभाकरम् ॥

ब्रह्मसूत्रप्रणेतारं वेदव्यासं महामतिम् ।
गीतासम्पादकं वन्दे तत्कृपालब्धये गुरुम् ॥

॥ श्रीशंकर ॥

## निवेदन

वेडे वाकुडे गाईन ॥ परी तुझा म्हणवीन ॥
संत विनयाने बोलती । ही तो माझी वस्तुस्थिति ॥
नाही कसलीही योग्यता । भक्ति-ज्ञानाची पात्रता ॥
तरी उपेक्षा करणे ना । दयाळू तूं नारायणा ॥
काय बोलूं वाचा थिटी । अनंत दे पाया मिठी ॥

ॐ तत्सत् ।

# श्रीशंकराचार्याष्टकम्

विश्वस्य यः सकलमंगलधारणाय । पूर्णातटे विधृतवान् मनुजावतारम् ।।
तं पादनम्रजनतापनगेन्द्रवज्रं । श्रीशङ्करं यतिवरं शिरसा नमामि ।।१।।

यस्यास विश्वमिव नन्दकुमारवक्त्रे । शास्त्राकरः किमपि बालविशालबुद्धौ ।।
प्रज्ञाप्रभास्तिमितपण्डितमण्डलं तं । श्रीशङ्करं शिवगुरोस्तनयं नमामि ।।२।।

संचर्य येन पवनेन यथार्यभूमौ । वेदेषु दुष्टैरचिताऽपहृता च धूलिः ।।
तं तार्किकादिमदमत्तगजेन्द्रसिंहम् । श्रीशङ्करं शिवकरं सततं नमामि ।।३।।

भाष्यत्रयं मतिमलापहरं विरच्य । कैवल्यमार्ग इव यो निदधौ प्रदीपान् ।।
तं सर्वशास्त्रनिगमागमहृद्गतज्ञं । श्रीशङ्करं भयहरं सदयं नमामि ।।४।।

येन स्वकीययशसा परमोज्ज्वलेन । दिग्वारणाः समभिषिच्य कृताः सुशुभ्राः ।।
पाखण्डदुष्टमतखण्डनलब्धकीर्तिम् । श्रीशङ्करं सकललोकहितं नमामि ।।५।।

अद्वैततत्त्वममलं श्रुतिसम्मतं च । येनोपदिष्टमिह जीवशिवैक्यकारि ।।
संसारदुस्तरसमुद्रमहातरिं तं । श्रीशङ्करं विनतकल्पतरुं नमामि ।।६।।

काश्मीरदेशगतपीठमनन्यभुक्तं । श्रीशारदाख्यमधिरुह्य च यो दिदेश ।।
अद्वैततत्त्वमहतीं पुनरेकदा तं । श्रीशङ्करं निरुपमेयकृतिं नमामि ।।७।।

संस्थाप्य धर्ममपहृत्य परामविद्यां । सत्यं प्रकाश्य जनतोपकृतास्ति येन ।।
ध्येयार्थमेव कृतभूरिचमत्कृतिं तं । श्रीशङ्करं प्रवरयोगिवरं नमामि ।।८।।

पापोऽस्मि मन्दमतिरस्मि तथानधीतः । सत्यं परं त्वमसि शंकर दीनबन्धुः ।।
आलोकयायि शिव वत्सलवीक्षितैर्मा- । मित्येव दासगणुशिष्यलवस्य कामः ।।९।।

श्रीशंकर

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

## [ श्रीमदब्रह्मसूत्रटीका ]

ॐ श्रीः स्वस्ति

## प्रथमाध्याय

### कि र ण प हि ला

।। श्रीगणेशाय नमः ।।

ॐ आद्या अनंता अद्वया । अखंडानंदा अक्षया ।
अखिलमूला अव्यया । आनंदघना नारायणा ।।१।।
पूर्णब्रह्मा परात्परा । सर्वाधारा करुणाकरा ।
सर्वशक्ते अपारा । करुणाघना नमो तुशी ।।२।।
या सर्वही विश्वाठायी । जे जे असे भासे पाही ।
त्यात सर्व अंतर्बही । ओतप्रोत अससी तूं ।।३।।
हे वरदा नारायणा । श्रीकांता कमललोचना ।
श्रीविठ्ठला दयाघना । कल्पद्रुमा पांडुरंगा ।।४।।
देवा तुझ्या सत्तेविण । मूर्त काहीच नव्हे जाण ।
जेवी अवकाशावाचुन । आकाशासी रूप नसे ।।५।।

तूच अनादि अनंत । निराकार तू मूर्तिमंत ।
निराधार सर्वातीत । भक्तवत्सला नारायणा ।।६।।
आकाशाची व्यापकता । तुझ्या सत्ते ये कल्पिता ।
सवित्याची तेजस्विता । दीप्तपणे वाहसी तू ।।७।।
उष्णता तू अग्नीतील । पृथ्वी तुजमुळे क्षमाशील ।
जल रसमय शीतल । झाले तव प्रभावाने ।।८।।
ग्रहनक्षत्रे निज गति । तव सत्तेते न सोडिती ।
तुझ्यामुळे अपरिमिती । वेग लाभे प्रकाशासी ।।९।।
नादमय होतो ध्वनी । अर्थ भरे अक्षरातुनी ।
बल लाभे आकर्षणी । चुंबकास तुझ्यामुळे ।।१०।।
विद्युल्लता जी तळपते । ती तो केवळ तुझ्या सत्ते ।
चंद्रिकेसी लाभते । तुझ्यामुळेचि प्रसन्नता ।।११।।
सागर तुजमुळे गंभीर । उत्तुंग तुझेनि शैलशिखर ।
प्राणदायी सर्व दूर । वायू वाहे सत्ते तुझ्या ।।१२।।
तुझ्यामुळे डुलती वने । फुले हासती सुगंधाने ।
पिके बहरती औदार्याने । धान्य पेरिता थोडेसे ।।१३।।
तूच शेतीची सुपीकता । तूंच मातेची वत्सलता ।
संरक्षिता भूतजाता । तूच विठ्ठला नारायणा ।।१४।।
सौंदर्य, माधुर्य, आकर्षण । जेथे, जेथ रमते मन ।
ते ते सर्व असती कण । तुझ्या सत्तोदधीतले ।।१५।।
अस्तित्वाची तू एकता । सत्तेची तू केवलता ।
नानापरीची विविधता । तूच नामरूपातली ।।१६।।

जैसे आयाम-कंपनामुळे । भासे तांबडे निळे पिवळे ।
खरे बघता रंग कुठले । नसती प्रकाश किरणासी ॥१७॥
द्रव्यजात विश्वातले । घडे विद्युत्कणामुळे ।
त्या कणांचेही सगळे । नारायणा, तू मूलतत्व ॥१८॥
ब्रह्म-परब्रह्म-ईश्वर । हिरण्यगर्भ परात्पर ।
विधाता, विष्णु, शंकर । तूच देवता शक्तिरूप ॥१९॥
लक्ष्मी, पार्वती, सरस्वती । तूच असशी कृपामूर्ति ।
कोणी तुला सूर्य म्हणती । आत्मा स्थावर जंगमाचा ॥२०॥
तुलाच म्हणती कित्येक । विघ्नहर्ता विनायक ।
एकदंत जो गजमुख । गणेश दाता विद्यांचा ॥२१॥
भजकांना तूच भज्य । पूजनांचे तूच पूज्य ।
हे घ्यावे हे असे त्याज्य । असे न काही तुज ठायी ॥२२॥
निर्मितीचे रूप सगळे । संस्कार जे ते तुझ्यामुळे ।
तूच विभो धारण केले । विसंगतीचे वैचित्र्य ॥२३॥
बुद्धीची तू विवेकशक्ति । तूच हृदयामध्ये भक्ति ।
उन्मेषशालिनी वा स्फूर्ति । तूच प्रतिभावंताची ॥२४॥
तूच मत्स्य होऊन । केले वेदांचे रक्षण ।
मंदराचलाचे धारण । कूर्म होऊन केले तू ॥२५॥
हिरण्याक्षे रसातळी । बलात्कारे पृथ्वी नेली ।
तेव्हा तिला उद्धरिली । वराहरूपे नारायणा ॥२६॥
निजभक्ताच्या संरक्षणा । थोर करुनि गर्जना ।
स्तंभ फोडोनि नारायणा । नृसिंह तू प्रगटलासी ॥२७॥

तूच वामन परशुराम । अमरांचे साधिसी काम ।
उग्रपणे होऊनि यम । दुष्ट मत्त निर्दाळिले ॥२८॥
अजन्मा तू सूर्यवंशी । जन्मून देवा संरक्षिसी ।
जना दाविले आदर्शासी । पुत्र-बंधु-नृपाळाच्या ॥२९॥
यशोदानंदवर्धन । तूच देवकीनंदन ।
भक्तिप्रेमाचे उपवन । फुलविले तू गोकुळासी ॥३०॥
सर्व संगति-विसंगति । स्वैरता अथवा सन्नीति ।
कृष्णावतारी श्रीपति । तुझी झाली साधने ॥३१॥
सर्व मर्यादा भक्तांसाठी । तुवा सोडिल्या जगजेठी ।
राजकारणे उठाउठी । केली धर्म संस्थापिण्या ॥३२॥
जे जे काही बोलावे । ते ते तुजसी शोभावे ।
असे कर्तृत्व नवे नवे । कृष्ण होऊन दाविले तू ॥३३॥
पशुपति शंकर भगवान् । ज्यांनी स्वये जाळिला मदन ।
त्यांनीच केले नर्तन । मोहिनीसी भुलूनिया ॥३४॥
तेवी तव चरित्रांतहि । कौतुक दिसते शेषशायी ।
आकळाया कठिण होई । अर्थ येथे लीलांचा ॥३५॥
विसंगति वा विरोध । वंचकता वा भाव शुद्ध ।
कर्माची रूपे नानाविध । पावन असती हेतूने ॥३६॥
कृष्णावतारी हे सगळे । तुवा प्रभो प्रगट केले ।
व्यासांचेही मुके झाले । शब्द तुजसी वानावया ॥३७॥
सूक्ष्माहून सूक्ष्मतर । तूच विठ्ठला निरंतर ।
असती थोराहून थोर । ब्रह्मांडे ज्या रोमरंध्री ॥३८॥

तुझे गावया पवाडे । वेदांचे सामर्थ्य तोकडे ।
देवा तुझ्या तेजापुढे । काजवे लक्ष सूर्याचे ॥३९॥
वरदा नाना मतांतरी । वर्णने तव असती खरी ।
जो तो स्तवितो परोपरी । आपुल्या बुद्धिप्रमाणे ॥४०॥
तत्त्वज्ञानी साक्षात्कारी । एकच पाहती अंतरी ।
देवा तुजविणे कोण दुसरी । दर्शना योग्य वस्तु असे ॥४१॥
अंतिम स्थितीसी पोहोचलेले । जे जे संतमहात्मे भले ।
त्यांचे अनुभव कोंदले । असती तुझ्या पूर्णसत्ते ॥४२॥
स्वगत किंवा सजातीय । अथवा तो विजातीय ।
या भेदमात्रासी ठाय । लवही नसे तुजमध्ये ॥४३॥
अखंड अभंग निष्कल । निरवयवी पूर्ण निस्तुल ।
सकल केवल निर्मल । सर्वव्यापक सर्वशक्ति ॥४४॥
निर्गुण निस्सीम निरंजन । अचिंत्य अव्यक्त सनातन ।
अगोचर जे परिपूर्ण । इंद्रिय मन बुद्धीसही ॥४५॥
असणे, नसणे, भासणे । प्रगटणे, लय पावणे ।
पालटणे वा वाढणे । काहीच नसे तवठायी ॥४६॥
तिन्ही काल, तिन्ही दशा । तुज न स्पर्शती सर्वेशा ।
तुजपुढे होते निराशा । शैशवादि अवस्थांची ॥४७॥
जड किंवा चेतन । स्थिर अथवा गतिमान ।
आतबाहेरा नसे स्थान । जवळ दूर या शब्दांसी ॥४८॥
ऐसी असता तुझी स्थिती । का शिणवावे वाणीप्रती ।
परी मानवाची अवस्था ती । फार आहे विचित्र ॥४९॥

भव्य दिव्य काही तरी । त्यास जाणवे अभ्यंतरी ।
ज्या जाणिवेच्या पुढारी । शब्द संपत्ती थिटी पडे ।।५०।।
प्रसंग काही अनुभवितो । तेणे सुखावे, संतोषतो ।
संसारीही प्रसन्न होतो । काही काळ कशामुळे ।।५१।।
परंतु एकही यातला । भाव न सापडे शब्दाला ।
परी बोलल्याविण त्याला । स्वस्थ काही राहवेना ।।५२।।
मग सांगता येत नाही । असेच तो सांगे पाही ।
त्याच न्याये शेषशायी । वर्णने तुझी होताती ।।५३।।
जे मुळीच सर्वातीत । ते का सापडे शब्दात ।
कुणीही असो प्रज्ञावंत । महर्षी व्यासासारिखा ।।५४।।
नम्रपणे नेति नेति । जेथ स्वये म्हणे श्रुति ।
त्या सर्वज्ञ वेदापुढती । कोण अधिक वक्ता उरे ।।५५।।
म्हणून काही सांगू जाता । तेथे उरेच अपूर्णता ।
त्या आधारे अन्य मता । वाव राही मंडणासी ।।५६।।
निराकार निर्मिकल्प । शुद्ध ब्रह्माचे जे स्वरूप ।
ज्यास लागत नसे लेप । सच्चित्सुखपदाचाही ।।५७।।
ऐसे असे हे म्हणोनि । मौन धरून बसता कोणी ।
स्थिति होईल केविलवाणी । साधकांची जगामध्ये ।।५८।।
साधकांची परिस्थिती । वेगवेगळी निश्चिती ।
प्रवृत्ति वा प्रकृति । सर्वाठायी भिन्न भिन्न ।।५९।।
जे एकासी प्राप्त होते । रुचते किंवा मानवते ।
तेच मुळी न भावते । अन्य प्रमाणिकासही ।।६०।।

म्हणून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ । हे चांगले हे वाईट ।
यांची खरी लागे वाट । एक हिताच्या कसोटीने ॥६१॥
आणि प्रत्येकाचे जे हित । तेच तुझे रूप मूर्त ।
म्हणून त्याच्या विविधतेत । भेद अंती उरतो ना ॥६२॥
परी ही अंतिम स्थिति । सारेच ना जाणू शकती ।
झाकोळलेली राहे मति । रज-तमाच्या प्रभावाने ॥६३॥
बालसुलभ अहंकार । जो प्रकृतीचाच विकार ।
घडती सर्व व्यवहार । बळामुळे जयाचिया ॥६४॥
या अज्ञानी अहंतेमुळे । जे जे मी करितो भले ।
तेच सर्वात चांगले । म्हणावे वाटे इतरांनी ॥६५॥
जो न असे म्हणतो कुणी । तो बरळे मूर्खपणी ।
प्रेरणा याच विचारांनी । लाभते बालबुद्धीसी ॥६६॥
अवस्थेच्याप्रमाणे हित । राही भिन्न भिन्न गोष्टीत ।
म्हणून प्रत्येक कर्तव्याप्रत । श्रेष्ठ म्हणती महात्मे ते ॥६७॥
कोणी पुरस्कारिती कर्म । कोणी भक्तिच म्हणती मर्म ।
कोणी यमनियमादि धर्म । श्रेष्ठ सांगती योगाचे ॥६८॥
कोणी यात्रा व्रते याग । कोणा भजनाचा अनुराग ।
कोणी म्हणती सवेग । अवलंबावे ध्यानासी ॥६९॥
सदाचारी वा पूजनात । कोणी परोपकारी रत ।
कोणी सोवळ्या ओवळ्यात । गुंतून राहती सर्वदा ॥७०॥
नामस्मरण चिंतनापुढे । इतर साधन बापुडे ।
सद्गुरु सेवा आवडे । कोणा सर्व प्रकारांनी ॥७१॥

ज्ञानमार्गा श्रेष्ठ कोणी । मानितातीं आग्रहानी ।
विधिनिषेधावाचुनी । वागणे कुणा मान्य होते ॥७२॥
आशय तत्त्वज्ञानाचा । असे कुणाच्या आवडीचा ।
पारिभाषिक प्रक्रियांचा । थोरपणा वाटे कुणा ॥७३॥
तत्त्वज्ञानाचेही स्वरूप । मतांतरी ना एकरूप ।
विरोध विविधता अमूप । धारण केली सांप्रदाये ॥७४॥
सर्वथैव रुचे द्वैत । कोणा निज विचारांत ।
कोणा विशिष्टाद्वैत मत । हेच योग्य वाटतसे ॥७५॥
ईश्वर जीव प्रकृती । हे त्रैत कोणी मानिती ।
जीव एक कोणी म्हणती । कोणी मानी वेगळाले ॥७६॥
अचिंत्य भेदाभेदांना । कोणी महत्त्व देती जाणा ।
शुद्धाद्वैत भावे कुणा । कुणी केवल अद्वैती ॥७७॥
मतभेदांचे बारकावे । प्रत्येकात असती बरवे ।
वेगळेपण नवे नवे । बुद्धिबळाने शोधिताती ॥७८॥
भिन्न मतांचा समुच्चय । करणे वाटे कुणा प्रिय ।
कोणी त्यांचा समन्वय । श्रेयस्कर मानीतसे ॥७९॥
मुळामध्ये असोन एक । भासते दिसते अनेक ।
पसारा वाढतो अलौकिक । आकार-वर्ण-गुणभेदे ॥८०॥
हे का वा कसे झाले । याचे उत्तर शोधू गेले ।
प्रज्ञावंत, त्यांना दिले । आधार काही वेदे स्वये ॥८१॥
त्यांना मिळालेली उत्तरे । त्यांनी मांडिली तर्काधारे ।
तेच ग्रंथ झाले झरे । नाना प्रकारी वादांचे ॥८२॥

माया अविद्या प्रकृती । विश्वासी कारण मानिती ।
कोणी म्हणती चिच्छक्ति । तीच कारण सर्वा या ॥८३॥
अजातवाद, विवर्तवाद । हाच म्हणती मायावाद ।
कोणा परिणामाचा छंद । चिद्विलास रुचे कोणा ॥८४॥
कुणी अन्यध्यस्तविवर्तवादी । कोणी अविकृतपरिणामवादी ।
कुणाची उत्तरे फार साधी । आपोआपी योगायोग ॥८५॥
साधकांच्या भिन्नतेमुळे । हे सर्वही इष्ट झाले ।
कारण तूंच धारण केले । विविधतेसी साऱ्या या ॥८६॥
इंद्रियांचे भिन्न विषय । परि सुख एकचि होय ।
सागरीच होतो लय । सर्व दिशांच्या प्रवाहांचा ॥८७॥
अन्नाचे ते प्रकार नाना । स्वाद आकृति भिन्न भिन्ना ।
परी देहाच्या पोषणा- । कारणे होती एकरूप ॥८८॥
काठ पदर रंग पोत । वस्त्रावस्त्राचा भिन्न होत ।
त्यामुळेचि ग्राहकात । आवडी वाढे संग्रहाची ॥८९॥
परी एक तंतूविण । वस्त्रास नाही वस्त्रपण ।
तेवीच तुझ्यावाचुन । भिन्नतेसी स्थल नाही ॥९०॥
अनंतरूपे अनंतशक्ति । तू नटलासी विश्वमूर्ति ।
शुद्धभाव असता चित्ती । सर्व काही स्वीकारिसी ॥९१॥
मुळात केवळ अद्वैत । व्यवहार सारे द्वैतात ।
या दोन्ही अवस्थात । अंतर राही फार मोठे ॥९२॥
ते क्रमाने चालून जावे । शुद्धरूपी एक व्हावे ।
यास्तव संभार नवे नवे । निर्मिले तू साधनांचे ॥९३॥

जो का जीव तोची शिव । आरंभी हा धरिता भाव ।
प्रयत्नासी नुरतो वाव । शब्द तेवढे उरताती ।।९४।।
बोलणे जे अनुभवाविण । तो केवळ असे शीण ।
हाती न लागता अल्प कण । दंभ मात्र बळावतो ।।९५।।
म्हणून हे दयाघना । साधकांच्या संरक्षणा ।
नानापरीच्या उपासना । संतमुखाने कथिल्या तू ।।९६।।
वात्सल्य तुझे अपरंपार । पुरे न तुलनेसी सागर ।
हीनदीनहि जनावर । कृपावर्षाव करितोसी ।।९७।।
औदार्य तुझे वत्सल । फार आहे मेघनील ।
येता कुणी पायाजवळ । त्याची उपेक्षा करिसी ना ।।९८।।
या विश्वासे तुझ्या पायी । ठेविली मी असे डोई ।
नारायणा माझे आई । दूर मजसी धरू नको ।।९९।।
सर्वभावाने तुझ्या पाया । शरण आलो पंढरीराया ।
मजवरती करण्या दया । आता नाही म्हणू नको ।।१००।।
माझी पात्रता केवढी । दुर्बलता ती असे उघडी ।
तरीहि घेण्या उंच उडी । धजावलो मी ये ठायी ।।१०१।।
घेऊन सद्गुरूंचा आधार । तुझ्या कृपेच्या बळावर ।
मी यातून पडेन पार । ऐसा विश्वास चित्ती असे ।।१०२।।
हे वरदा नारायणा । पांडुरंगा दयाघना ।
पंढरीशा सच्चिद्घना । पाव माते बदरीपते ।।१०३।।
गारगोट्याही चमकती । उन्हे पडता तयावरती ।
तुझ्या बळे मी मंदमती । योग्यतेसी मिळवीन ।।१०४।।

असो तुला वारंवार । देवा माझा नमस्कार ।
असावा तुझा वरदकर । मस्तकी माझ्या सर्वदा ॥१०५॥
भाविकांचा उद्धार व्हाया । मार्गदर्शन लाभो तया ।
म्हणून तूच देवराया । येसी संतरूपाने ॥१०६॥
भिन्न काल भिन्न देश । भिन्न मते भिन्न वेष ।
नानाप्रकारे उपदेश । एकरूप करिती ते ॥१०७॥
त्यांची नावे घेऊ किती । वसिष्ठ, वामदेव, अगस्ति ।
गौतम, अत्रि विमलकीर्ति । कपिल, भार्गव, शांडिल्य ॥१०८॥
परमात्म्याची निश्वसिते । श्रुतिमंत्र जे गुप्त होते ।
यांनीच प्रगट केले ते । कृपाळूपणे जनासाठी ॥१०९॥
उपनिषद् ग्रंथातून । प्रगट केले तत्त्वज्ञान ।
लक्ष सर्वही ठेवून । केवळ एका ब्रह्मावरी ॥११०॥
श्वेतकेतु आश्वलायन । नचिकेत कात्यायन ।
उषस्ति तो चाक्रायण । नृपाळ वा जानश्रुति ॥१११॥
सत्यकाम श्रीजाबाल । कैकय राजा, उपकोसल ।
ज्यांची कीर्ति उज्ज्वल । ज्ञानघन ते याज्ञवल्क्य ॥११२॥
यांनी जनांचिया हितार्थ । पाहिला वेदमंत्राचा अर्थ ।
ज्या ब्रह्मज्ञानाने कृतार्थ । साधक झाले आजवरी ॥११३॥
कृपाळूपणे या ऋषींनी । नाना शब्द-प्रतीकांनी ।
प्रश्ने वादविवादांनी । एक ब्रह्म प्रतिपादिले ॥११४॥
नाना रीती अवलंबिल्या । वाक्यरचना भिन्न केल्या ।
त्याच असती आधार झाल्या । मतामतांच्या भेदांसी ॥११५॥

असो सारेच क्रांतदर्शी । हे महात्मे द्रष्टे ऋषी ।
त्यांच्या पवित्र चरणासी । वंदने मी समर्पितो ॥११६॥
उपनिषदातील वचने ती । वरिवरी भिन्न भासती ।
म्हणोनी व्यास महामति । सूत्रे रचिती तयावरी ॥११७॥
महर्षी श्रीव्यासापरी । कदाचित त्या अगोदरी ।
उपनिषदांच्या आधारी । निर्माण झाली भिक्षुसूत्रे ॥११८॥
आश्मरथ्य, काशकृत्स्न । इत्यादींनी थोर यत्न ।
करून वेदान्ताचे रत्न । दिधले हाती लोकांच्या ॥११९॥
परी ब्रह्मसूत्रे व्यासकृत । प्रसिद्ध होता जगतात ।
इतर सहज विस्मृत । झाली व्यासप्रज्ञेने ॥१२०॥
व्यासे जनांच्या हितासाठी । प्रचंड केल्या खटपटी ।
नानापरीची मोठमोठी । निर्माण केली पुराणे ॥१२१॥
महाभारताच्या सारिखा । लिहिलासे इतिहास देखा ।
जो की प्रदीप झाला निका । पुरुषार्थाच्या मार्गावरी ॥१२२॥
सन्नीति वा तत्त्वज्ञान । सदाचार राजकारण ।
संस्कृतीचे परिपूर्ण । स्वरूप जेथे व्यक्त झाले ॥१२३॥
ज्यापुढती नवीन काही । आता निर्माण होणे नाही ।
ऐसी विचार-संपदा ही । वाटिली मुक्त हस्ताने ॥१२४॥
मानवाचे कल्याण । दृष्टिपुढे ठेवून ।
ब्रह्मसूत्रे निर्माण । केली वेदव्यासांनी ॥१२५॥
मनुष्यमात्रांचे जीवन । शून्य तत्त्वज्ञानाविण ।
म्हणोनि व्यास दयाघन । रचिती ही ब्रह्मसूत्रे ॥१२६॥

नारायणाश्रमा निकटी । सरस्वतीच्या दिव्य तटी ।
राहून व्यास जगजेठी । सूत्रे रचिती शांतमने ॥१२७॥
राहिले बदरीकाश्रमात । म्हणून द्वैपायनाप्रत ।
बादरायणही म्हणतात । लक्षून या थोर कार्या ॥१२८॥
त्या श्रीवेदव्यासचरणा । पुनः पुनः करितो वंदना ।
महाराज मम उणीवांना । कृपाकटाक्षे दूरी करा ॥१२९॥
या श्रीब्रह्मसूत्रावरी । अनेकांनी आजवरी ।
भाष्ये लिहिली नानापरी । जनकल्याण साधावया ॥१३०॥
बोधायन श्रीभास्कर । यादव प्रकाश साधुवर ।
रामानुजाचार्य थोर । मध्वाचार्य भक्ताग्रणी ॥१३१॥
आचार्य श्रीनिंबार्क । द्वैताद्वैत संस्थापक ।
श्रीकंठ पंडित अलौकिक । शैव-विशिष्टाद्वैती जे ॥१३२॥
विद्वद्वर्य श्रीपती । वल्लभाचार्य सन्मति ।
ज्यांनी भक्तिमार्गाप्रती । प्रेमभावे पुष्ट केले ॥१३३॥
विज्ञान-भिक्षु शुकदेव । नंतर जाहले बलदेव ।
ज्यांची प्रणाली अभिनव । अचिंत्य भेदाभेदवादी ॥१३४॥
कोणी प्रकांड पंडित । कोणी साक्षात्कारी संत ।
कोणाठायी एकीभूत । साधुत्व आणि विद्वत्ता ॥१३५॥
नामे, कृतीही कित्येकांची । आठवणीत नुरली साची ।
तयांनाही लौकिकाची । चाड नव्हती थोडकीही ॥१३६॥
परी सर्वांनाही तळमळ । जनहिताची केवळ ।
पणा लावूनि बुद्धिबळ । पैलू पाडिले वेदान्ता ॥१३७॥

सर्वांचीच सोय व्हावी । सर्व मने संतोषावी ।
प्रामाणिकासी नुरावी । अडचण कोठे रुचिभेदे ॥१३८॥
हाच हेतू असे साचा । या थोर भाष्यकारांचा ।
म्हणूनिया विविधतेचा । अवलंब त्यांनी केलासे ॥१३९॥
परी पुढती अनुयायी । स्वमतनिष्ठेच्या हट्टापायी ।
परस्परांच्या सांप्रदायी । हीनत्व मानिती द्वेषाने ॥१४०॥
नाना रचून तर्कटे । दोष लाविती खोटेनाटे ।
आणि विनाशाचिया वाटे । नेती साधारणाप्रति ॥१४१॥
परी भाष्यकारांठायी । मुळात हा हट्ट नाही ।
द्वेषबुद्धीचे नावही । शिवले न त्यांच्या चित्तासी ॥१४२॥
जननीचिया वात्सल्याने । त्यांनी मांडिली तत्त्वज्ञाने ।
एका गव्हाची पक्वान्ने । रुचिभेदे भिन्न होती ॥१४३॥
एका मोठ्या कुटुंबात । जिव्हाळा असल्या लाभत ।
वाढणाऱ्या पोराप्रत । प्रेम नाना प्रकारचे ॥१४४॥
जन्मदात्याचिया परी । काका मामा प्रेम करी ।
लक्ष ठेवीत आदरी । मेहुणा दूरच्या नात्यांचा ॥१४५॥
तैसे नाना मतांचे । उपकारही होती साचे ।
क्षेत्र वाढते जिज्ञासेचे । सूक्ष्मता येते बुद्धिसी ॥१४६॥
विचारा ये नेमकेपणा । भोळेपणाहि उरतो ना ।
सहज येते कल्पना । व्यापकतेची तत्त्वाच्या ॥१४७॥
या सर्व भाष्यकारासी । वंदितो मी साष्टांगेसी ।
माझिया विवेकशक्तीसी । वाढवा तुम्ही कृपेने ॥१४८॥

आता सद्गुरु परात्पर । वंदितो आचार्य शंकर ।
प्रज्ञानभीचा भास्कर । उदय पावें कालटीसी ॥१४९॥
ज्यांच्या कृपेची उदारता । अपार येत न मोजिता ।
हरून जीवाची दीनता । शिवपदी त्या बैसविले ॥१५०॥
ज्यांच्या भाषेचा प्रसाद । वाल्मीकीस दे प्रतिसाद ।
शब्दामधला लय वा नाद । डोलवितो शारदेसी ॥१५१॥
मधुर मधुर स्तोत्रांतुनी । भक्तिप्रेमाची निर्झरिणी ।
वाहवितसे ज्यांची वाणी । युक्त कोमल भावाने ॥१५२॥
उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, गीता । प्रस्थानत्रयी ही तत्त्वता ।
ज्यांची भाष्ये प्रकाशता । सुबोध झाली जगतासी ॥१५३॥
मांडणी तर्ककर्कश । असून भाष्यातली विशेष ।
कुटिलतेचा लवलेश । नाही कोठे भाषेमध्ये ॥१५४॥
शब्द मोजके अर्थवाही । भाषा सारी नादमयी ।
तेथ असून प्रसन्नताही । गांभीर्यासी उणीव ना ॥१५५॥
इतर मते आवर्जून । आचार्य करिती खंडन ।
परी त्या मतालागून । मांडिती आधी जसे तसे ॥१५६॥
ते सौजन्याचे महामेरु । शंकराचार्य जगद्गुरु ।
पदनतांचे कल्पतरु । वंदितो मी परमादरे ॥१५७॥
ज्यांच्या कृपेच्या वर्षावे । वाळल्या काष्ठेही फुलावे ।
ज्यांच्या कृपे लंघून जावे । पांगळ्याने पर्वतासी ॥१५८॥
महाराज आपल्या भाष्यावर । माझा अवघा आहे भार ।
आपुल्या वाणीचा आधार । लाभो माझ्या बुद्धीसी ॥१५९॥

आपुले दिव्य पदकमल । मस्तकी धरितो सर्वकाल ।
त्या पुण्याने दोष सकल । जातील माझ्या बुद्धीचे ॥१६०॥
तत्त्वज्ञानांची मांडणी । जगद्‌गुरूंनी संस्कृतातुनी ।
केली जरी रसाळपणी । तरी भाषा दुरावली ॥१६१॥
पारखे झाले संस्कृत । कालाचिया प्रवाहात ।
पंडितेही केली मात । फार अवघड करून त्या ॥१६२॥
परिभाषेने केले खडे । प्रक्रियांचे दुर्ग, कडे ।
वाट ज्यातून ना सापडे । ज्ञान लाभण्या लोकांना ॥१६३॥
ते बापुडे तहानलेले । तैसेच बसून राहिले ।
शुष्क वाळवंटी भले । घटपटांच्या चर्चेच्या ॥१६४॥
त्यांची येऊन फार कीव । अवतरला रमाधव ।
ज्यास म्हणती ज्ञानदेव । मूर्ति वात्सल्य भावाची ॥१६५॥
साध्या भाषेत तत्त्वज्ञान । उच्च कोटीचे मांडिले जाण ।
ज्याचे बघुनी रसाळपण । लाळ घोटावी अमृताने ॥१६६॥
अद्वैताची मांडणी । केली अशा कौशल्यानी ।
की आचार्य जगद्‌गुरूंनी । नावीन्य बघून डोलावे ॥१६७॥
शब्द रसाळ कोमल । जणू गुंफिले कमलदल ।
काव्य ज्यातील उज्वल । कालिदासा लाजवी जे ॥१६८॥
अद्वैत ज्ञानाची प्रखरता । भक्तिजलाने न्हाणिता ।
येई तया आह्लादकता । शरदृतूच्या चांदण्याची ॥१६९॥
मार्तंड व्हावा तापहीन । प्रभा तैशीच राहून ।
तैसे अद्वैताचे ज्ञान । कोमल केले भक्तिभावे ॥१७०॥

शुष्कतेचे लांछन भले । अद्वैता न लागू दिले ।
ज्ञानभक्तीचे फेडिले । वेगळेपण ज्ञानदेवे ॥१७१॥
कर्म, भक्ति, ज्ञान, योग । यांचा साधिला संयोग ।
समन्वयाचा ऐसा भाग । जमला नव्हता पूर्वी कुणा ॥१७२॥
म्हणून भाविकांनी माउली । श्रीज्ञानेश्वरा मानिली ।
मातापित्यांनी काया दिली । दुःख हरती ज्ञानदेव ॥१७३॥
त्या श्रीज्ञानेशांच्या चरणी । मी येतसे लोटांगणी ।
महाराज घ्या सांभाळुनी । पदोपदी या दीनासी ॥१७४॥
संतश्रेष्ठ श्रीतुकाराम । भाविकांचे विश्रामधाम ।
ज्यांचे उच्चारिता नाम । तप्त मने शांत होती ॥१७५॥
भक्तीचिया मंदिरावर । जे जाहले कळस थोर ।
ज्या बघता राहून दूर । देवदर्शन फल लाभे ॥१७६॥
श्रीतुकाराम चरणांवर । ठेवितो मी नम्र शिर ।
ज्यांनी करिता नामगजर । नाचू लागे पांडुरंग ॥१७७॥
समर्थ रामदासस्वामी । त्यांच्या चरणा वंदितो मी ।
ज्यांनी राष्ट्र होता श्रमी । संरक्षिले निज बोधे ॥१७८॥
नामदेवादि संतांसी । वंदितो मी साष्टांगेसी ।
महाराज या लेकरासी । सांभाळा हो सर्वथेव ॥१७९॥
साई सद्गुरु वामन । यांच्या पदा असो नमन ।
दास मी तुमचा दीन । कृपा करावी माझेवरी ॥१८०॥
माझे श्रीमत् सद्गुरु । भवनदीत होती तारू ।
ज्यांनी लाविला कल्पतरू । संतकथेचा मराठीत ॥१८१॥

ज्यांनी सर्व संकटातुनी । मातेच्या वात्सल्यभावांनी ।
रक्षियले क्षणोक्षणी । मज अनाथा कारणे ॥१८२॥
माझे दोष ना पाहिले । परोपरी लाड केले ।
त्यांच्या स्तवना नाही उरले । शब्द काही मजपाशी ॥१८३॥
ज्यांच्या कृपाछत्राखाली । राजसुखे मी भोगिली ।
कल्पवृक्ष ही न उरली । कविकल्पना मजसाठी ॥१८४॥
जे जे मी चित्ती धरिले । ते ते सर्व पूर्ण झाले ।
भय न कशाचे वाटले । ज्यांच्या बळे मज कोठे ॥१८५॥
मग आताच अविश्वास । धरून मागू काय त्यास ।
त्यांनीच दिधले प्रेरणेस । मग मी का चिंता करू ॥१८६॥
सद्गुरूचा कृपाकर । मस्तकी आहे निरंतर ।
मी लडिवाळ भावे शिर । मांडीवरी ठेविलेसे ॥१८७॥
सद्गुरूविण मानवाला । तरणोपाय नसे उरला ।
तरी तो मानी आपणाला । सर्व प्राण्यात बुद्धिमंत ॥१८८॥
विज्ञानामध्ये प्रगति । मानवाने केली अति ।
विमाने उंच झेपावती । आकाशी तीव्र वेगाने ॥१८९॥
माणूस चंद्रावरी पोहोचला । मंगळाकडे झेपावला ।
दूरवाणी संदेशाला । वाटेल तेथे नेत आहे ॥१९०॥
पृथ्वीचे अंतरंग शोधिले । समुद्र उपसून पाहिले ।
ग्रह-ताऱ्यांचे मोजिले । वेग, भार, स्वरूपही ॥१९१॥
शस्त्रे निर्माण केली नाना । ज्यांच्या विध्वंसा सीमा ना ।
परमाणूची सूक्ष्म रचना । जणू पाहिली डोकावुनी ॥१९२॥

कृत्रिम रंजक वस्तूंनी । गुजरी गेल्या उफाळुनी ।
इंद्रियभोगांच्या साधनी । सज्ज केली उपकरणे ॥१९३॥

शब्द दूरचे ऐकू येती । दूरच्या घटना दिसताती ।
दुरून यंत्राच्या होताती । हालचाली नियंत्रित ॥१९४॥

खनिजे, वारा, वीज, पाणी । यांना स्वाधीन ठेवुनी ।
कारखाने ठिकठिकाणी । नानाप्रकारे धडाडती ॥१९५॥

ऐशी नाना प्रकारची । निर्मिती कला-साहित्याची ।
गमके होती निश्चित साची । बुद्धिमत्तेची मानवांच्या ॥१९६॥

विज्ञानशास्त्र वाढविले । वाङ्मयाचे ढीग रचिले ।
परोपरीने निर्माण केले । ग्रंथ नाना विषयांचे ॥१९७॥

आधी शिक्षण मार्गदर्शन । नंतर थोडे संशोधन ।
त्याचे पुन्हा अध्यापन । विज्ञान वाढे क्रमाने या ॥१९८॥

म्हणजे येथही गुरूची । आवश्यकता ती उरतेचि ।
मग प्राचीन विचारांची । टवाळी व्यर्थ करावी का ॥१९९॥

विज्ञान उदंड वाढले । सुखसोयीचे उणे फिटले ।
वातावरण अशुद्ध केले । प्रदूषणाने सर्वत्र ॥२००॥

चोरी मारी बलात्कार । हत्या पीडा अति क्रूर ।
यांचे प्रमाण उत्तरोत्तर । वाढे प्रगत देशातही ॥२०१॥

मानवतेच्या समतेच्या । पताका फडकती जयांच्या ।
तेही भिन्न विचारांच्या । लोका गोळ्याच घालती ॥२०२॥

पोलादी पडदे उभारिले । स्वकीयांचे शिरकाण केले ।
लक्षावधींना डांबले । हाल करून तुरुंगात ॥२०३॥

गोठ्यातील गायी म्हशी । तसे वागविती जनांसी ।
या निष्ठुर दास्यासी । काय संस्कृति म्हणता ये ।।२०४।।
मरण प्रमाण उणावले । तरी आरोग्य नष्ट झाले ।
कार्यक्षमतेचे दिवाळे । वाजलेसे शरीराच्या ।।२०५।।
सर्वत्र झाली बजबज । जो तो स्वार्थी रमे निज ।
द्वेष संघर्षाचे बीज । सगळीकडे फोफावले ।।२०६।।
दरिद्री वा श्रीमंतही । सुख स्वास्थ्य कुणा नाही ।
धावपळीत जीवन जाई । शांतता झाली दुर्मिळ ।।२०७।।
समाधान कुणा नसे । सोशिकपणा वाटे पिसे ।
संयमाचे झाले हासे । संताप होई उतावळा ।।२०८।।
जीवने उद्ध्वस्त करून । दंभ करी राजकारण ।
विद्वत्ता वा पुढारीपण । भरंवशाचे उरले ना ।।२०९।।
हे असे जे घडून आले । त्याचे कारण हेच भले ।
की आपण उपेक्षिले । तत्त्वज्ञान जीवनाचे ।।२१०।।
एक उपनिषदातील राजा । वर्णितसे आपुली प्रजा ।
कशी होती, तेच समजा । ध्येय साऱ्या समाजाचे ।।२११।।
तो म्हणे मम राज्यात । चोरी नसे यत्किंचित ।
कोणी न मद्याने झिंगत । कृपण करंटा कोणी नसे ।।२१२।।
सारे रत धर्माचरणी । अशिक्षित नसे कोणी ।
पुरुष ना स्वैर वर्तनी । स्वैरिणी स्त्री होय केवी ।।२१३।।
हे आदर्श ज्यांचे भले । त्या का म्हणावे मागासले ।
जीवन जाते उंचावले । काय केवळ साधनांनी ।।२१४।।

साधनाच्या पडून भरी । आपण सुखे केली दुरी ।
खुंट्यासाठी जैशापरी । पाय कापावे गायीचे ॥२१५॥
संयमशील सदाचारा । कधी नसे पर्याय दुसरा ।
त्याच्या उपेक्षे बोजवारा । होईल साऱ्या सभ्यतेचा ॥२१६॥
अलीकडे सर्व विचारांचे । अर्थ काम हे मूळ साचे ।
याच ध्येये संघर्षाचे । प्रमाण दिसे वाढताना ॥२१७॥
भारत-संस्कृतीने जाणिले । अर्थकामांचे महत्त्व भले ।
म्हणून त्यांना स्थान दिले । सन्मानाने पुरुषार्थी ॥२१८॥
अर्थ-कामाचिया ठायी । उद्दंडपणा स्वये राही ।
त्यांची स्वैरता कारण होई । दुःखदैन्या समाजाच्या ॥२१९॥
म्हणून त्यासी अधिष्ठान । धर्माचे दिले लावून ।
पुढे ठेविलेसे मांडून । ध्येय सर्वथा मोक्षाचे ॥२२०॥
बंधने त्याची जाचती । ज्यास ध्येये काही नसती ।
आरोग्याची व्हाया प्राप्ती । पथ्ये पाळती मुकाट्याने ॥२२१॥
जी जी शक्ति नियंत्रित । तीच तेवढी कामा येत ।
स्वैर होताच किंचित । वाया जाई, नाश करी ॥२२२॥
अर्थ काम ही असे शक्ति । तेथे जीवने विकासती ।
मोक्षाकडे होते प्रगती । नियंत्रणाने धर्माच्या ॥२२३॥
मोक्ष ध्येय नसता पुढे । धर्माचे वाटते वावडे ।
म्हणोनी न कधी परवडे । उपेक्षा मोक्षशास्त्रांची ॥२२४॥
कष्ट उणीवा आपत्ती । ध्येयापुढे फिक्या होती ।
संकटाची कधी भीती । ध्येयनिष्ठा वाटते ना ॥२२५॥

देशभक्तांनी कारागार । आपुले म्हटले घरदार ।
फाशीचाही दुष्ट दोर । मानिती ते वरमाला ॥२२६॥
गिर्यारोहक चढता कडे । मृत्यूसही मानी थोडे ।
संशोधकांनीही बापुडे - । केले साऱ्या त्रासा छळा ॥२२७॥
विकास, प्रगति, उन्नति । यांची व्हावयासी प्राप्ती ।
सर्वप्रकारे भाग होती । नियंत्रणे अर्थकामाची ॥२२८॥
हेच करिते शासन । नाना निर्बंध निर्मून ।
खरे खोटे प्रलोभन । ठेवून पुढे समाजाच्या ॥२२९॥
परी तेथे दोन्ही ठायी । प्रामाणिकता उरत नाही ।
छळवाद मात्र होई । निर्बंधाने सज्जनांचा ॥२३०॥
जेथे प्रामाणिकता नुरे । तेथे न काही पडे पुरे ।
जो जो कराया जावे बरे । तो तो ये ते अंगासी ॥२३१॥
विचारे शोधू पहाता । मोक्ष हीच प्रामाणिकता ।
कारण तेची तत्त्वता । सत्यतेचे स्वरूप असे ॥२३२॥
म्हणून भारतीय ऋषींनी । शुद्ध बुद्धीने शोधुनी ।
मोक्ष ध्येय आवर्जुनी । ठेविले पुढे व्यक्तीच्या ॥२३३॥
दृष्टी ठेवून मोक्षावरी । वागावे सर्व व्यवहारी ।
तेणे सर्वही प्रकारी । जीवनाचे सुख लाभे ॥२३४॥
ध्रुवावरी ठेवून दृष्टि । नाविक सागरी नाव लोटी ।
तेव्हाच त्यासी शेवटी । योग्य स्थळी जाता ये ॥२३५॥
आरोग्याचे समाधान । नित्य हवे असल्या जाण ।
आपोआप ये बंधन । खाण्या पिण्या वागण्यासी ॥२३६॥

म्हणून मनुष्ये मनुष्यपण । राखावयाचे असल्या पूर्ण ।
आपुली दृष्टि मोक्षावरून । कधीही ना ढळू द्यावी ॥२३७॥
मोक्ष म्हणजे कोणती स्थिती । तेथे होते कसली प्राप्ती ।
काय येते अनुभवाप्रती । मोक्ष मिळाला म्हणताची ॥२३८॥
ज्याच्या लाभे मोक्ष पूर्ण । त्याचे काय असे लक्षण ।
त्या वस्तूचे निवासस्थान । कोठे आहे, कसे असे ॥२३९॥
काय साधने मोक्षालागी । ती कशी बाणती अंगी ।
'मी' मिळवावा मोक्ष वेगी । तो 'मी' आहे कोण कसा ॥२४०॥
विविधतेने नटलेले । मज भोवती पसरलेले ।
ते हे जग कोठून आले । जीवन घडे जेथ माझे ॥२४१॥
जे मिळतसे मोक्षाठायी । त्यांचा माझा संबंध कायी ।
तैसेच या जगतासीही । काय नाते त्याचे असे ॥२४२॥
माझे जगाशी जडले नाते । तयाचे स्वरूप कोणते ।
माझ्या इच्छेस वा कृतीते । कोण शक्ति प्रेरणा दे ॥२४३॥
जगी नाना घडामोडी । कोण त्यांचा मांड मांडी ।
या प्रश्नांची उत्तरे उघडी । मोक्ष ध्येय म्हणता हवी ॥२४४॥
हीच उत्तरे वेदाने । दिधली नाना प्रकाराने ।
प्रार्थना-सूक्तांच्या मिषाने । संहितेत कुठे कुठे ॥२४५॥
हेच उपनिषदातुनी । साक्षात्कारी महर्षींनी ।
कथा-वादांच्या प्रकारांनी । विषय आहेत चर्चिले ॥२४६॥
ब्रह्मसूत्राची ती रचना । याचसाठी झाली जाणा ।
उपनिषदातील तत्त्वांना । एका सूत्री गोविलेसे ॥२४७॥

गंगोत्री तत्त्वज्ञानाची । ब्रह्मसूत्रे असती साची ।
येथे स्थिती उपनिषदांची । मेघवर्षावापरी असे ।।२४८।।
कथा-वाद-चर्चातुनी । एकेक पैलू कळे झणी ।
तत्त्वज्ञानाची मांडणी । सलगपणे तेथे नसे ।।२४९।।
महर्षी वेदव्यास म्हणून । रूपा आणण्या तत्त्वज्ञान ।
ब्रह्मसूत्रासी निर्माण । करिते झाले लोकास्तव ।।२५०।।
त्या श्रीब्रह्मसूत्राप्रत । साध्या सरळ मराठीत ।
विवरण्याचा धरून हेत । उद्युक्त झालो लेखनासी ।।२५१।।
मी न पंडित विद्वान । कवि वा प्रतिभासंपन्न ।
तर्क मीमांसा व्याकरण । माझ्या नसती ओळखीची ।।२५२।।
बसून पंडितांच्या जवळी । शास्त्रे कधी न अभ्यासिली ।
टीकाग्रंथांची तो सगळी । नावेही ना ज्ञात मला ।।२५३।।
असून अभ्यासी वावडे । ग्रंथांचे वाचन आवडे ।
अस्ताव्यस्तपणे घडे । तेणे ओळख विषयांची ।।२५४।।
चिंतन कधी थोडे झाले । जरी अनुभवा नाही आले ।
तरी विषयाचे रूप कळे । भाषणाच्या निमित्ताने ।।२५५।।
आणि तेवढ्या बळावर । मी ही धरिली उभार ।
भातुकलीनेच संसार । मांडावा जेवी बालिकेने ।।२५६।।
गवत काटक्या धरून हाती । जावे युद्धभूमीवरती ।
एक रुपया होता प्राप्ती । घालू जावे भंडारा ।।२५७।।
जिने चढता धाप लागे । गिर्यारोहणा निघे वेगे ।
समुद्र म्हणे तरेन अंगे । कूपात येता पोहावया ।।२५८।।

तैसे माझे हे साहस । परी पाहून तयास ।
करावा न की उपहास । विनंती ही जाणत्यांना ॥२५९॥
कारण विद्वत्‌जनांसाठी । माझी नसे ही खटपटी ।
मी या करितो गुजगोष्टी । परिचय होण्या सामान्या ॥२६०॥
ब्रह्मसूत्र हे प्रकरण । काय आहे पुसती जन ।
त्यांचे थोडे समाधान । करावया हा यत्न असे ॥२६१॥
आणि त्यात मशी यश । येईल असे हा विश्वास ।
कारण असे आधारास । लेखन थोर पंडितांचे ॥२६२॥
ग्रंथ हिंदी मराठीत । भाष्यावरती आहेत ।
थोडे समजते संस्कृत । त्या बळाने चालेन मी ॥२६३॥
कुणी उचलून घेता कडे । बालकाहि यात्रा घडे ।
तैसे माझे वाडे कोडे । हट्ट का ना पुरे व्हावे ॥२६४॥
पुरल्या विक्रम सिंहासनी । गुराखी बसे जाऊन वनी ।
तेव्हा तो बोलला वाणी । उच्च न्यायाधीशापरी ॥२६५॥
तैसे माझेहि होईल । ब्रह्मसूत्र विवरता येईल ।
आश्रयासी लाभेल बळ । बदरिकाश्रम भूमीचे ॥२६६॥
पंढरीत उभे राहून । श्रमलेला नारायण ।
येथे घालून पद्मासन । स्वस्थ-चित्ते विराजतो ॥२६७॥
वरदहस्त उभारून । देई कृपे आश्वासन ।
'भक्तांचे जे इच्छी मन । ते ते पुरे होईल' हे ॥२६८॥
बसून याच पवित्र स्थली । ब्रह्मसूत्राची रचना केली ।
महर्षी व्यासे पूर्वकाली । ऐसे सांगे इतिहास ॥२६९॥

श्रीजगद्गुरूंनी आपुली । येथे बसून भाष्ये लिहिली ।
या भूमीची पावन धूली । साह्य माते करील की ॥२७०॥
त्यातून सद्गुरूंची कृपा । करील माझा मार्ग सोपा ।
चांदण्यात बसता, तापा । दूर व्हावे लागतेचि ॥२७१॥
कल्पवृक्षाच्या सावलीत । कामधेनूचे अमृत ।
चिंतामणीच्या पात्रात । भरून प्याया लाभे जरी ॥२७२॥
तरी तया पामराहि । उणीव का उरेल काही ।
देवेंद्रांचे ऐश्वर्यहि । हात जोडील त्याचे पुढे ॥२७३॥
सोडून भीड वा संकोच । मी ही रत्ना जोडितो काच ।
राजहंसाची घेऊन चोच । वाचावे हे सज्जनांनी ॥२७४॥
क्षमाशील त्यांची मने । दोष न पाहती उदारपणे ।
त्याच एक भरवशाने । साहस माते करवे हे ॥२७५॥
नीलकंठ कर्पूरगौर । स्मरारि भगवान् शंकर ।
भाललोचन गिरिजावर । पिनाकपाणि परमात्मा ॥२७६॥
अनाद्यनंत नारायण । बदरीपति सच्चिद्घन ।
नरहरि रुक्मिणीजीवन । सर्वव्यापक पांडुरंग ॥२७७॥
ब्रह्मदेव जगत्कारण । हिरण्यगर्भ चतुरानन ।
विधाता, वेद ज्यालागुन । सर्वारंभी प्राप्त झाले ॥२७८॥
गणेश गिरिजाकुमार । विघ्नहर्ता परशुधर ।
जगदात्मा श्रीभास्कर । प्रेरणा दे बुद्धीस जो ॥२७९॥
सर्वाधारा आद्यशक्ती । लक्ष्मी, दुर्गा पार्वती ।
विद्योदवी सरस्वती । कविवरांची देवता जी ॥२८०॥

प्रतिभेचे दिव्य भास्कर । अगाध पांडित्याचे सागर ।
महाभारत-रचनाकार । व्यास प्रणेते ब्रह्मसूत्रा ॥२८१॥
जगद्‌गुरु आचार्य शंकर । करुणावत्सल ज्ञानेश्वर ।
संत महात्मे थोर थोर । सर्वस्व माझे सद्‌गुरु ॥२८२॥
जगत्-कल्याणा ब्रह्म स्वये । यांच्या रूपे मूर्त होये ।
ज्यांची कृपा लाभता जाये । अंधार सारा विलयाला ॥२८३॥
भक्तिभावे यांच्या चरणी । मस्तक पुनः पुन्हा ठेवूनी ।
ब्रह्मसूत्रार्थदर्शिनी । लिहावयासी आरंभितो ॥२८४॥

अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥

[१]-१-१-(१)

आता म्हणून ब्रह्माची जिज्ञासा.

उपभोगाच्या साधनांनी । मन न होते समाधानी ।
आप्तजनांची स्वार्थी करणी । चूड लाविते सौख्यासी ॥२८५॥
केल्या नाना खटपटी । प्रपंचाच्या सुखासाठी ।
उभारिली कार्ये मोठी । निज लौकिक वाढवावया ॥२८६॥
दाने दिली, व्रते केली । तीर्थयात्रे काया शिणली ।
विद्वत्तेची मिळविली । पदवी विद्या संपादून ॥२८७॥
व्यवहारे बुरे भले । परिवारासी पोशिले ।
नाव खोदून ठेविले । द्रव्य देऊन संस्थांना ॥२८८॥
पोथ्या वाचिल्या वारंवार । पुष्कळ केले पाठांतर ।
धूप दीप मूर्तीसमोर । खंडोगणती उजाळले ॥२८९॥

मतमतांतरे चर्चिली । रोज नवी कृत्ये केली ।
तरी न केंव्हा लाभली । प्रसन्नता ती वृत्तींना ॥२९०॥
हेच जेंव्हा सर्वाठायी । अनुभवास येत राही ।
तेंव्हा बुद्धि जागृत होई । विचारी ऐसे घडते का ॥२९१॥
कोसळती सर्व कल्पना । फळ न येते प्रयत्नांना ।
हृदयी लाभण्या समाधाना । उपाय काय शोधावा ॥२९२॥
मी कोण, का जन्मा आलो । सुखदुःखी का सापडलो ।
कर्ता भोक्ता कसा झालो । या 'मी' चे ते रूप काय ॥२९३॥
नाम, रूप, क्रिया, गुण । जेथ अगदी भिन्न भिन्न ।
ऐशा विविधतेने संपूर्ण । स्थावर जंगम दिसते जे ॥२९४॥
त्याचे धर्म क्षणोक्षणी । सहज जाती पालटोनी ।
मग कोणत्या लक्षणांनी । सत्य शोधावे तयातले ॥२९५॥
हा 'तू'हि न होतो ज्ञात । 'मी'हि न कळतो समस्त ।
तरी व्यवहार चालतात । मी माझे या भावनेने ॥२९६॥
पशुपक्ष्यादि जीवजात । अज्ञानी ज्ञानी पंडित ।
सर्वांचीहि हीच रीत । दिसोन येते वागतांना ॥२९७॥
शास्त्रे विधिनिषेध सांगती । तत्त्व कोणते धरून चित्ती ।
प्रगति किंवा परागति । कोणत्या मापे मोजावी ॥२९८॥
ऐसे विचारतरंग । व्याकुळविती अंतरंग ।
उत्कटता या येता, भंग । होतो संसारी वासनेचा ॥२९९॥
मनुष्य जो जो सुसंस्कृत । विचारी नी प्रज्ञावंत ।
जो वाढला संगतीत । सात्त्विक, धार्मिक, लोकांच्या ॥३००॥

त्याच्या चित्ती वारंवार । ऐसे उठताती विचार ।
मग तो होतसे अधीर । उत्तर त्याचे शोधावया ।।३०१।।
स्वार्थ त्याचे उणावती । भोगाकडे ना प्रवृत्ति ।
नवसातली धार्मिक वृत्ति । आकर्षक वाटे न त्या ।।३०२।।
खरे काय आहे सगळे । समाधान कसे मिळे ।
काय प्राप्त झाल्यामुळे । संत महात्मे आनंदती ।।३०३।।
हे जाणून घ्यावयाची । तळमळ वाढे तयाची ।
संधि कुठे ये ऐकण्याची । भाग्ययोगे तयाप्रति ।।३०४।।
की उत्तरे सर्वांप्रति । ब्रह्मज्ञान होता मिळती ।
तेव्हा तो चमकून चित्ती । आतुरतेने विचारतो ।।३०५।।
ब्रह्म काय कळो वेगी । म्हणून आता मजलागी ।
जेणे माझ्या अंतरंगी । समाधान लाभेल ।।३०६।।

जन्माद्यस्य यतः ।

[१]-१-२-(२)

या जगताचे जन्म-स्थिति-लय ज्याच्यापासून होतात
त्यास ब्रह्म असे जाणावे.

अहंकार बुद्धि मन । इंद्रिये विषये संपन्न ।
शरीर हे ज्यालागुन । स्वतः मानिती सामान्यतः ।।३०७।।
ग्रहनक्षत्रे तारांगणे । भूगोल हा पूर्णपणे ।
जो भरला विविधतेने । डोंगर नद्या-अरण्यांनी ।।३०८।।
तळे विहिरी सागर । जलचरांचे नाना प्रकार ।
नाना धातु रत्ने अपार । शंख शिंपले कृमिकीट ।।३०९।।

नाना झुडपे वृक्ष वेली । बहरे पान फुले फळी ।
भूमी सारी व्यापिलेली । पशु पक्षी मानवांनी ॥३१०॥
डोळे पोचती जेथवरी । बुद्धि ज्याची कल्पना करी ।
असे दृष्टीचिया बाहेरी । विश्व म्हणती या सर्वा ॥३११॥
ज्यांनी आणिले जन्माप्रति । या सर्वही विश्वाप्रति ।
जो याची राखितो स्थिति । अवस्था भेदे दक्षतेने ॥३१२॥
आणि शेवटी ज्याच्या ठायी । विश्व सारे विलया जायी ।
त्याच तत्त्वा म्हणती पाही । ब्रह्म असे वेदवेत्ते ॥३१३॥
स्थिति त्याची दिसोनि येते। ज्याची उत्पत्ती पूर्वी असते।
आणि उत्पन्न जे जे होते । ते ते काले नाश पावे ॥३१४॥
म्हणून प्रत्येक वस्तूप्रति । ज्या ज्या दिसती भासती ।
या असती तिन्ही स्थिती । यात शंका मुळी नसे ॥३१५॥
आपुल्या मापे सर्वांचा । जन्म लय ना दिसावयाचा ।
तरीहि या तिघांचा । भोग घडे सर्वांप्रति ॥३१६॥
एका मानवी तासात । कृमींच्या पिढ्या होतात ।
मानवी पिढ्या उलटतात । पुढे एका पर्वताच्या ॥३१७॥
या क्रमे सारे विश्वहि । पुनः पुनः लया जाई ।
हे घडते ज्याच्या ठायी । त्यासी ब्रह्म म्हणताती ॥३१८॥
जे जे काही निर्माण होई । त्यात कर्ता असे पाही ।
रक्षकाविण कुणाचीही । स्थिति टिकणे शक्य नसे ॥३१९॥
आणि विलय जेव्हा होतो । तोही कारणे घडून येतो ।
कारणाविना कधी नसतो । जन्म कोणत्या कार्याचा ॥३२०॥

घड्याळ आपोआप चाले । ऐसे म्हणतील भोळेभाळे ।
परी तंत्रज्ञे ते घडविले । चालण्याच्या रचनेसह ॥३२१॥
चक्रे घड्याळाची फिरती । त्यास तंत्रज्ञ लागती ।
तैसीच विश्वाची या गति । ब्रह्मामुळे होत आहे ॥३२२॥
विश्व उपजे, राहे, लोपते । हे ब्रह्माच्यामुळे होते ।
ब्रह्म हेच कारण त्याते । सर्वप्रकारे सर्वदा ॥३२३॥

शास्त्रयोनित्वात् ।

[१]-१-३-(३)

ब्रह्माची थोरवी शास्त्रामुळे कळते. वेदशास्त्राची उत्पत्तीहि ब्रह्मापासून झाली आहे.

कार्यास कारण लागते । हे कुणाच्याहि लक्षात येते ।
मानवाच्या बुद्धीचे ते । वैशिष्ट्य आहे स्वाभाविक ॥३२४॥
ईश्वराने याच हेती । केली मानवाची निर्मिती ।
की त्याने आपुल्या मती । कारण सदा शोधावे ॥३२५॥
मानवहि आपुल्यापरी । सर्वदा हा शोध करी ।
तेणेच जाहली उभारी । विज्ञानांची अत्यंत ॥३२६॥
उपजत कळते मानवा । की कार्यासी कर्ता हवा ।
याच बुद्धीतून बरवा । पूजाविधि जन्मा ये ॥३२७॥
कर्ता संतुष्ट असे जरी । कृत्ये अनुकूल घडती तरी ।
कर्ता तुष्टतो अंतरी । पूजा त्याची केल्यामुळे ॥३२८॥
नमस्कार, स्तुति, प्रार्थना । फुले, फळे अर्पिणे नाना ।
बळी देणे, घालणे स्नाना । ऐसे प्रकार पूजेचे ॥३२९॥

ऐशा पूजा-प्रकारात । कामना धरून मनात ।
रंगले दिसती शिक्षित । मग काय अडाण्याचे ॥३३०॥
कर्ता कुणा तरी मानिती । कशी तरी पूजा करिती ।
दिसून येते ही रीति । वन्य अडाणी समाजीही ॥३३१॥
झाड, दगड, भूत-प्रेत । यांना रानटी समाजात ।
कर्ता देव मानितात । आणि पूजिती त्यालागी ॥३३२॥
कोती कृत्याची धारणा । कर्त्या आणी कोतेपणा ।
शास्त्रशुद्ध दृष्टिविना । खरे कारण कळत नाही ॥३३३॥
सामान्य भाषेत वाटे भिन्न । जरी कर्ता आणि कारण ।
तरी दोन्ही एकचि जाण । असती शास्त्रदृष्टीने ॥३३४॥
घट घेता विचारात । आपण आपल्या भाषेत ।
कारण म्हणतो मातीप्रत । कर्ता मानितो कुंभारा ॥३३५॥
परी तर्कशास्त्र त्या दोघांना । म्हणतसे कारण माना ।
कुंभाराशी निमित्त म्हणा । समवायी ते मातीसी ॥३३६॥
कुणी समवायीच्या स्थली । माती उपादान मानिली ।
एवं कारणे दोन झाली । उपादान नि निमित्त ॥३३७॥
जेथे उपादान असे जड । तेथ चेतन निमित्त हे उघड ।
सोन्याची घेऊन लगड । सोनार घडवी दागिने ॥३३८॥
विणकर सुताने वस्त्र विणी । सुतार लाकडा करी फणी ।
चेतनाच्या सहाय्यावाचुनी । जडाचे काही बनते ना ॥३३९॥
परी चैतन्याच्या ठायी । आवश्यक हे नसे काही ।
नट जेव्हा भूमिका घेई । तेव्हा दोन्ही तोच होतो ॥३४०॥

नट आपल्या भूमिकेचे । उपादान, निमित्त साचे ।
तैसेच अखिल विश्वाचे । कारण आहे ब्रह्म एक ॥३४१॥
मानवी बुद्धीप्रति पटते । कर्ता असावा विश्वाते ।
शास्त्र गर्जून सांगते । कर्तृत्व सारे ब्रह्माचे ॥३४२॥
खरा कर्ता कळल्याविण । मानवा न लाभे कल्याण ।
वात्सल्यभावाने म्हणून । वेद सांगे ब्रह्म कर्ता ॥३४३॥
साध्या साध्या कार्याकरिता । लागे कौशल्य बुद्धिमत्ता ।
मग या सर्व विश्वा जनिता । असावा केवढा योग्यतेचा ॥३४४॥
थेट ब्रह्मदेवापुनी । कृमिकीटकापर्यंत जाणी ।
ज्याने निर्मिल्या भूतयोनि । केवढे त्याचे सामर्थ्य ॥३४५॥
चार माणसे एकत्र येती । तरी काय गोंधळ करिती ।
लक्षावधि नक्षत्रे ती । नभात फिरती नेमाने ॥३४६॥
प्रचंड त्यांचे आकार । वेग गतीस नाही पार ।
विचारात घेता अंतर । प्रकाशवर्ष थिटे पडे ॥३४७॥
तरी ते आपुल्या आकृति । वर्षानुवर्षे राखून धरिती ।
केवढी कौशल्याची कृति । निर्मात्याची म्हणावी ही ॥३४८॥
रचना कौशल्य अनुशासन । पाहून थक्क होते मन ।
यास्तव सर्वशक्तिमान । वेदशास्त्र म्हणे तया ॥३४९॥
थोर थोर महात्मे ज्ञाते । आदरे वंदिती वेदाते ।
कारण की राहते तेथे । बीजभावे ज्ञान सारे ॥३५०॥
ज्याच्या सहज निश्वासात । प्रकटले हे वेदजात ।
स्वाभाविक मग तयाप्रत । सर्वज्ञ म्हणावे लागते ॥३५१॥

ऐसे सर्वज्ञ सर्वशक्ति । ब्रह्म कारण जगाप्रति ।
कळोन येते निश्चिती । वेदशास्त्राच्या आदेशे ॥३५२॥
परी ब्रह्मासी म्हणणे कर्ता । हेही उपाधीने तत्त्वता ।
ब्रह्माची तो यथार्थता । सत्तामात्र निरुपाधिक ॥३५३॥
कोणत्याहि शब्दाने । त्याची न होती वर्णने ।
मनाने वा बुद्धीने । आकळाया येते न ते ॥३५४॥
अस्तित्व उपाधीविरहित । असे काही म्हणता येत ।
आणि हेहि होतसे ज्ञात । वेदशास्त्रे कथिल्यावरी ॥३५५॥
शास्त्र म्हणती त्या शब्दासी । जे प्रमाण असे सर्वांशी ।
अन्य कुणाहि वचनासी । श्रुतिइतुके प्रामाण्य ना ॥३५६॥
म्हणून वेदाचे सांगणे । दृढ धरावे मानवाने ।
निज कल्याणाकारणे । दूर ठेवावी नास्तिकता ॥३५७॥

तत्तु समन्वयात् ।

[१]-१-४-(४)

परंतु वेदांच्या विविध वचनांचा, समन्वयाची दृष्टि ठेवून नीट विचार केला म्हणजेच एक ब्रह्मच सत्य आहे हे वेदांचे तात्पर्य असल्याचे समजते.

वेद प्रमाण मानणे म्हणता । त्यात विषयाची विविधता ।
सांगे काम्य कर्माकरिता । नानापरी यज्ञयाग ॥३५८॥
नीचकर्म जे अभिचार । जो भानामतीचा प्रकार ।
त्यासही उघड आधार । आहे अथर्ववेदाचा ॥३५९॥
ऐहिक वा पारलौकिक । सुखांचे प्रकार अनेक ।
त्यांच्या प्राप्तीस्तव निःशंक । अनेक कृत्ये वेद सांगे ॥३६०॥

यज्ञयाग नानाविध । त्यांच्या क्रियांसी जे संबद्ध ।
ऐशा मंत्रांनीच वेद । सर्व आहे भरलेला ॥३६१॥
ज्यात कर्मांची प्रेरणा । नाही, ऐशा वचनांना ।
महत्त्व मुळी उरते ना । ऐसे म्हणती सूज्ञ काही ॥३६२॥
प्रत्यक्ष ब्रह्माचे वर्णन । संहिता ग्रंथांमधून ।
अगदीच अल्प ये दिसून । काही थोड्या ऋचांमध्ये ॥३६३॥
आणि उपनिषद ग्रंथांतहि । परिस्थिति ना वेगळी काही ।
अनेक वर्णने ठायी ठायी । असती ब्रह्माव्यतिरिक्त ॥३६४॥
ब्रह्म शब्दहि फार वेळा । उपनिषदांनी न योजियला ।
ऐशा स्थितीत वेदाला । मुख्य काय कळे न ते ॥३६५॥
थोडा विचार केला जरी । या शंकास नुरते उरी ।
असे वाटेल अंतरी । विवेकाने जाणत्यांच्या ॥३६६॥
तात्पर्य सर्वहि वेदांचे । विशेषतः उपनिषदांचे ।
एक ब्रह्म प्रतिपादनाचे । संशय थोडा येथ नको ॥३६७॥
वेद बोलला अनंत । परी अर्थ एकचि त्यात ।
विश्वासाने सांगती संत । समन्वयाने कळते ते ॥३६८॥
विषय इतर ब्रह्माविणे । जरी वर्णिले वेदाने ।
तरी त्यांची प्रयोजने । सामान्यांना वळविणे ही ॥३६९॥
अन्य विषयांचा विस्तार । तरी ब्रह्म हेचि सार ।
परी प्रकृतीचा विचार । सर्वांच्याच करणे पडे ॥३७०॥
एका आईची चार मुले । एक मांडीवरी खेळे ।
चालू बोलू लागले । दुसरे चांगल्या रीतीने ॥३७१॥

तिसरे शाळेमधे शिकते । चवथे आहे मिळवते ।
या सर्वांशी वागते । आई कैसे पाहिले कां ॥३७२॥
जे खेळे मांडीवरी । त्याच्यासाठी परोपरी ।
माता कष्टते दिवसभरी । बोले नाना प्रकाराने ॥३७३॥
परी सर्वात मोठ्यासाठी । प्रेम तेच असून पोटी ।
अगदी थोड्या करी गोष्टी । तसेच आहे येथेहि ॥३७४॥
शिशूसाठी पुष्कळ । आई देई आपुला वेळ ।
परी सर्वदा तसेच मूल । रहावे ऐसे म्हणते ना ॥३७५॥
प्रत्येक मूल मोठे व्हावे । चांगले शाहणे निघावे ।
स्वतंत्रपणे उभे रहावे । त्याने आपुल्या पायावरी ॥३७६॥
प्रेम सर्वात मोठ्यावरी । कामे सानुल्याची करी ।
छोट्यास भरवी आपुल्या करी । मोठ्यास दावी बोटाने ॥३७७॥
अध्यापनासाठी वेळ । शाळेत देती पुष्कळ ।
परी महाविद्यालयातील । प्रमाण त्याचे उणावते ॥३७८॥
आणि उच्च पदवीसाठी । तास थोडे महिन्याकाठी ।
ऐसी ही का परिपाटी । असे, शोधा विचाराने ॥३७९॥
स्थळ मोठ्या वाड्यातले । इतर कार्या वाटलेले ।
देवघर असे मांडिले । एकीकडे छोट्या स्थळी ॥३८०॥
अंगण, ओटी, स्वयंपाकघर । बैठक, कोठी, माजघर ।
न्हाणी, शयनाचे मंदिर । हेच व्यापिती वाड्याते ॥३८१॥
देवघर लहानसे । एकीकडे कोठे विलसे ।
परि तेचि देत असे । प्रसन्नता की सदनासी ॥३८२॥

प्रत्यक्ष ब्रह्माचे वर्णन । वेदात थोड्या मंत्रातून ।
का केले ते यावरून । ध्यानात येईल सूज्ञांच्या ।।३८३।।
खाण्याचिया धान्यासाठी । कोठारे लागती मोठी ।
परी सान घटापोटी । राखून ठेविती बीजांना ।।३८४।।
श्रुति माउली तसेच करी । वासना ज्यांच्या अंतरी ।
त्यांच्यासाठी बहुतापरी । सांगून ठेवी धर्मकृत्ये ।।३८५।।
माणसाचे असे मन । फार उतावीळ म्हणून ।
आधी नैवेद्य दाखवून । मग खा बाळा माता म्हणे ।।३८६।।
तेणे सर्व माझ्याकरिता । या वृत्तीस ये न्यूनता ।
येतसे संयमशीलता । हळू हळू मनाप्रति ।।३८७।।
माणूस संसारसुखासाठी । कृत्ये करी खोटी नाटी ।
म्हणून केली खटपटी । श्रुतीने यज्ञयागांची ।।३८८।।
संसाराच्या सुखाहून । परलोकांचे आकर्षण ।
त्यांच्या पुढती मांडून । निवृत्त केले इहसौख्या ।।३८९।।
करता यज्ञादि विधि । क्रमाने हो चित्तशुद्धि ।
उत्पन्न होते सात्त्विक बुद्धि । वळे उच्च सुखाकडे ।।३९०।।
मग अशा त्या अवस्थेत । म्हणती करा इष्टापूर्त ।
कामना न ठेविता चित्तात । ईश्वरार्पण भावनेने ।।३९१।।
ईश्वरार्पण होता वृत्ति । वासना साऱ्या मावळती ।
मग कोणतीही अयोग्य कृति । करावी त्या वाटते ना ।।३९२।।
द्वेष मत्सर मावळे । अहंकार सारा गळे ।
मग चित्त उतावळे । होते ईश्वर भेटीसी ।।३९३।।

सगुण साकाराचे ध्यान । अंतरी वसे रात्रंदिन ।
एक तया रूपावाचून । अन्य काही आवडेना ।।३९४।।
ही आवडी दृढावता । पूर्ण येते निर्विकल्पता ।
आत्मज्ञाने स्थितप्रज्ञता । लाभते त्या सहजतेने ।।३९५।।
उच्चस्थिति लाभण्याकरिता । असे हा क्रम तत्त्वता ।
एक जन्म होतो पुरता । कधी लागती जन्मशते ।।३९६।।
पूर्वजन्मीचे संचित । या जन्मीचे यत्न सतत ।
प्रामाणिक भाव चित्तात । सहाय्य होती उन्नतीसी ।।३९७।।
शुद्ध बुद्धि असल्याविना । अवस्थाक्रम ध्यानी येईना ।
मन विकसित नसतांना । व्यापकता ना सर्व कळे ।।३९८।।
माणसाचे आहे मन । विचित्र फार विलक्षण ।
तया दुसऱ्याचे पाहून । आपण तसे करू वाटे ।।३९९।।
इतरांपेक्षा वेगळेपण । केव्हा वाटे करावे जतन ।
त्या त्याच गोष्टी आवर्जून । कधी कराया कंटाळते ।।४००।।
अहंकारा बळी पडते । भलतेच करू धावते ।
अज्ञपणे ना लक्षात येते । करणे योग्य काय असे ।।४०१।।
कधी विकारा मोहून । उचितहि देई टाकून ।
असे नाठाळ हट्टी मन । बालकासम मानवाचे ।।४०२।।
माणसे वयाने वाढती । शिक्षणाचे संस्कार घेती ।
व्यवहारात मोठी होती । परी मन हे पालटेना ।।४०३।।
त्यास लावण्या वाटे नीट । वेद करिती खटपट ।
म्हणूनी जाहला बोभाट । कर्मकांडाचा वेदामध्ये ।।४०४।।

करणे सांगणे मानणे । संभवेना द्वैताविणे ।
विस्तारासी आवरणे । कठीण, द्वैता मानिताची ।।४०५।।
परी विस्तारलेले द्वैत । अद्वैती व्हावे परिणत ।
हाच एक आहे हेत । वेदमंत्रांचा साऱ्याहि ।।४०६।।
अन्नपदार्थ विविधरीती । ताटामध्ये शोभताती ।
खाता रुचकर लागती । वेगळेपण गोड वाटे ।।४०७।।
अन्न पोटात जेव्हा जाते । तेव्हा विविधता टाकिते ।
शेवटी पचता होऊन जाते । एकरूप ते शरिरासी ।।४०८।।
आणि असे ना झाले जरी । शल्यभूत होते तरी ।
उत्पन्न करी नानापरी । दुःखदायक विकारांना ।।४०९।।
म्हणजे अन्नाची विविधता । पचण्यासाठीच तत्त्वता ।
तुष्टता आणि पुष्टता । पचल्यावरी प्राप्त होते ।।४१०।।
अन्नाचे प्रकार द्वैत । पचणे हे आहे अद्वैत ।
तात्पर्य शोधिता श्रुतीत । हीच दृष्टि ठेवावी ।।४११।।
वचने नाना कथा नाना । यज्ञादींचे भेद नाना ।
सांभाळण्यासी सर्वांना । श्रुति माउली यत्नशील।।४१२।।
आवश्यक त्या गोष्टीवरती । टिकवावयासी निष्ठा ती ।
आग्रहाची वचने येती । निषेध करून अन्यांचा ।।४१३।।
'हेच श्रेष्ठ असे अति । म्हणून योग्य तुजप्रति ।
इतर अन्य काही करिती । त्या मूर्खांचा अधःपात' ।।४१४।।
नाना संदर्भे या रीती । वचने शास्त्रात येताती ।
त्या सर्वांचीहि संगती । असे कर्तव्यनिष्ठेमध्ये ।।४१५।।

समन्वयाची ही दृष्टि । द्वेषभावा लावी काटी ।
आणून पोहचवी शेवटी । जवळी परम साध्याच्या ॥४१६

ईक्षतेर्नाशब्दम् ।

[१]-१-५-(५)

ईक्षण सांगितले असल्यामुळे जड प्रकृति वा प्रधान जगताचे कारण मानता येत नाही आणि तसे मानण्यास वेदाचा आधारहि नाही.

वेदामध्ये जे जे ठायी । सृष्टिरचनेचा विषय येई ।
तेथे उपयोग असे पाही । ईक्षण ऐशा शब्दांचा ॥४१७॥
ईक्षण म्हणजे पाहणे । किंवा असे विचार करणे ।
दोन्ही गोष्टी संभवणे । शक्य केवळ चेतनात ॥४१८॥
ऐतरेय करी वार्ता । एकच आत्मा आधी होता ।
त्याच्याविणे ठाव नव्हता । तदा अन्य कशासीहि ॥४१९॥★
मग त्याने ईक्षण केले । आणि सर्व लोक निर्मिले ।
छांदोग्येहि सांगितले । हेच देवतानिर्मितीत ॥४२०॥★
यावरून एक गोष्ट । होतसे की अगदी स्पष्ट ।
जगताचे जे कारण श्रेष्ठ । चेतन तत्त्व ते आहे ॥४२१॥
सांख्य ते प्रकृतिप्रति । जगाचे कारण मानिती ।
परंतु ती असे भ्रांति । श्रुतिप्रामाण्य नाही तया ॥४२२॥
सांख्यांनी प्रकृति आपुली । जड आहे मानिलेली ।
कारणाची नाकारली । जडता वेदे ईक्षणत्वे ॥४२३॥
जगताचे मूलकारण । ब्रह्म हेच असे जाण ।
जे स्वभावता चेतन । सर्वज्ञ आणि सर्वशक्ति ॥४२४॥

मुंडक म्हणे जगत्कर्ता । आहे सर्वज्ञ सर्ववेत्ता ।
ज्याच्या तपाचे ज्ञानमयता । हेच स्वरूप आहे की ।।४२५।।★
सारांश, चेतन ब्रह्माविण । अन्य न जगाचे कारण ।
सर्वज्ञतादि लक्षण । प्रकृतीसी संभवते ना ।।४२६।।
प्रकृतीचा सत्त्वगुण । सत्त्वाचे लक्षण ज्ञान ।
म्हणोनिया सर्वज्ञपण । देता येई प्रकृतीसी ।।४२७।।
याच सत्त्वगुणाच्या बळे । योगी सर्वज्ञ जाहले ।
यास्तव नाकारणे नसे भले । सर्वज्ञपण प्रकृतीचे ।।४२८।।
परी न ऐसे म्हणावे । गुणप्रभाव मानू जावे ।
तरी लक्षात लागे घ्यावे । कार्य इतरहि गुणांचे ।।४२९।।
सत्त्वामुळे असते ज्ञान । हे मानिल्यासी प्रमाण ।
त्या ज्ञानासी चंचलपण । रजामुळे ये मानिता का ?।।४३०।।
अज्ञान येते तमामुळे । हेहि मग मानणे आले ।
आता कोठे असे उरले । सर्वज्ञपण प्रकृतीचे ।।४३१।।
ब्रह्माचे सर्वज्ञपण । गुणावरी ना अवलंबून ।
तो त्याचा स्वभाव जाण । ऐसे सांगितले वेदाने ।।४३२।।
आणि योगी जे सर्वज्ञ होती। तो आत्म्याचा प्रभाव निश्चिती।
प्रतिबंध घालविण्याप्रति । सत्त्ववृद्धि कामा ये ।।४३३।।

गौणश्चेन्नात्मशब्दात् ।

[१]-१-६-(५)

ईक्षण करणे हे प्रकृतीच्या ठिकाणी गौण रूपाने लाविता येते, असे म्हणता येणार नाही. कारण ईक्षणक्रियेशी आत्म्याचा संबंध उल्लेखिला आहे.

त्या तेजाचे ईक्षण केले । त्या जलाने ईक्षण केले ।
ऐसे आहे सांगितले । छांदोग्याने एके ठायी ॥४३४॥★
तेज आणि जल काही । ब्रह्मापरी चेतन नाही ।
तरी झाला त्याच्याठायी । प्रयोग ईक्षण शब्दाचा ॥४३५॥
मग प्रकृतीने पाहिले । अथवा विचारी घेतले ।
आणि जग निर्माण केले । ऐसे येईल म्हणावया ॥४३६॥
बोलण्याच्या सोयीप्रति । जडावरी आरोप करिती ।
चेतनाचा, आणि होती । भाषेचे ते व्यवहार ॥४३७॥
चांदणे आम्हा सुख देते । ही भिंत पडू पाहते ।
धन वाढू इच्छिते । गाव जवळ आले पहा ॥४३८॥
हे भाषेचे प्रकार । चेतनाचा जडावर ।
आरोप केल्यानंतर । अर्थवाही होताती ॥४३९॥
तैसेच येथेहि मानावे । गौण उपचारे लेखावे ।
ईक्षणादि कार्य बरवे । जगत्कारण प्रकृतीचे ॥४४०॥
परी विधाने ही ऐशी । करता न येती सर्वांशी ।
ज्याने ईक्षण केले त्यासी । आत्मा तेथेच म्हटलेसे ॥४४१॥
आत्मा पदाचे अर्थ अनेक । अंतर्यामी सर्व-व्यापक ।
नियंता ज्ञाता आदिक । सर्वशक्ति सर्वाधार ॥४४२॥
ही लक्षणे सर्वथैव । प्रगट करिती ब्रह्मभाव ।
ब्रह्म आणि आत्म्यात लव । भेद ना, दोन्ही एकचि ते ॥४४३॥
तोच सर्वाआधी होता । दुसरी कशाची नव्हती सत्ता ।
लोकासी निर्मिण्याकरिता । ईक्षण केले आत्मदेवे ॥४४४॥★

ऐसी वाक्ये स्पष्ट असता । ते प्रकृतीस न ये लाविता ।
जगत्कारण सर्वथा । ब्रह्म हेच सर्वथैव ॥४४५॥

तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात् ।

[१]-१-७-(५)

जे जगाचे कारण आहे त्याचेवर निष्ठा ठेवली असता मोक्ष मिळतो असे शास्त्राने सांगितले आहे. म्हणून प्रकृति ही जगत्कारण असू शकत नाही.

ब्रह्म जे जगत्कारण । त्यावर निष्ठा ठेवता पूर्ण ।
तया साधकालागून । मोक्ष मिळतो निश्चयाने ॥४४६॥
ऐसे वेदोपनिषदाभीतरी । सांगितलेसे परोपरी ।
म्हणून जगत्कारण-विचारी । प्रकृतीसी घेता न ये ॥४४७॥
उद्दालक नामे थोर ऋषि । आपल्या श्वेतकतू पुत्रासी ।
उपदेश करतांना ऐशी । गोष्ट सांगे छांदोग्यी ॥४४८॥★
जगत्कारण जे सूक्ष्म असे । ज्यास म्हणती आत्मा ऐसे ।
हे सर्वहि जे दिसतसे । सगळे ते जाहला तो ॥४४९॥
सूक्ष्म जगत्कारण आत्मा तो । तोच तू अससी श्वेतकेतो ।
तोच सत्य हे जो जाणतो । तो जाणता, त्यासी मिळे ॥४५०॥
रानात चुकल्या पथिकासी । सज्जन वाट दावी जैसी ।
अवलंबिता त्या मार्गासी । पथिक पोचे इष्ट स्थली ॥४५१॥
तसा या संसारकाननी । भ्रमता थकला जीव कोणी ।
म्हणे या तापत्रयातुनी । कोण आता मार्ग दावी ॥४५२॥
तो त्यासी अनुभवी ज्ञानी । सद्गुरु भेटला भाग्यांनी ।
तोहि तयांच्या चरणी । सर्व भावे शरण गेला ॥४५३॥

गुरूनी जी दाविली वाट । त्या मार्गे हा चालता नीट ।
मोक्षाप्रति पोचतो थेट । स्वये होतो ब्रह्मरूप ॥४५४॥
जगत्कारण नसता चेतन । त्याचा रस्ता दावील कोण ।
जडासी भेटता जाऊन । उद्धार तेथे होय केवी ॥४५५॥
कोणी आंधळा चुकता वाट । त्यास फसवी जसा दुष्ट ।
नाठाळ बैलाचे शेपूट । देऊन त्याच्या हातामध्ये ॥४५६॥
या स्थितीत आंधळा । काय पोचे इष्ट स्थळा ।
उलट त्या बापड्याला । पीडा लागेल भोगावी ॥४५७॥
तैसे न कधी करी श्रुति । जी जनकल्याणा वात्सल्यमूर्ति ।
माता आपुल्या पुत्राप्रति । आड वाटे न जाऊ दे ॥४५८॥
प्रकृतीलाच म्हणती माया । जी अत्यंत दुरत्यया ।
तिच्यातून तरावया । शरण जाणे ब्रह्मासी ॥४५९॥
मायेतुनी तरून जावे । शास्त्र सांगते उच्चरवे ।
याचकरिता असावे । यत्न सारे मानवाचे ॥४६०॥
व्रते यात्रादींचे श्रम । नीति सदाचार संयम ।
शास्त्राभ्यासी परिश्रम । करावयाचे यासाठी ॥४६१॥
गुरुसेवा, ईश्वरभक्ति । मायेतून तरण्याप्रति ।
निष्ठा त्याच मायेवरती । ठेविता का मोक्ष मिळे ॥४६२॥
म्हणोन जगाचे कारण । प्रकृति न निश्चये करून ।
ब्रह्म सर्वत्र चेतन । तेच कारण जगताचे ॥४६३॥

हेयत्वावचनाच्च ।

[१]-१-८-(५)

प्रकृति जर जगाचे कारण असती तर मोक्षलाभासाठी तिचा म्हणजे सत्याचा त्याग करावा असे सांगितले असते. पण तसे सांगितलेले नाही.

जगताचे जे कारण । त्यास सत्य हे अभिधान ।
आले असे श्रुतीतून । वारंवार ठायी ठायी ॥४६४॥
परी पसारा प्रकृतीचा । बंधक होतो जीवाचा ।
तो तोडिल्याविणे मोक्षाचा । लाभ होणे शक्य नाही ॥४६५॥
हे सत्य म्हणजे प्रकृति । जरि सांगणे वेदाप्रति ।
तरी व्हावया मोक्षप्राप्ति । त्याग सांगता सत्याचा ॥४६६॥
परी वेदे तसे न कथिले । उलट स्वीकारण्या सांगितले ।
आत्मकल्याणास्तव भले । जगत्कारण त्या सत्यासी ॥४६७॥
व्हावयासी मोक्षप्राप्ति । जगत्कारण सत्याप्रति ।
ज्या अर्थी न टाका म्हणती । त्या अर्थी ते प्रकृति नव्हे ॥४६८॥
म्हणोनी जगत्कारण जे सत् । ती प्रकृति नव्हे निश्चित ।
भाग आहे ब्रह्माप्रत । सत् म्हणून स्वीकारणे ॥४६९॥
हे जे सत् ते तूच अससी । ऐसे कथिले साधकासी ।
म्हणून येथे प्रकृतीसी । ठाव न द्यावा थोडाहि ॥४७०॥

स्वाप्ययात् ।

[१]-१-९-(५)

जीव गाढ झोपेमध्ये स्व-मध्ये लीन होतो म्हणून सत् शब्दाने आत्मा घेतला पाहिजे; प्रकृति घेता येत नाही.

जागृति स्वप्न सुषुप्ति । या अवस्था जीवाप्रति ।
भोगावयासी लागती । एके दिनी सामान्यतः ॥४७१॥
बुद्धीसी संबद्ध होऊन । बाह्य पदार्थ करी ग्रहण ।
धरून देहाचा अभिमान । तेव्हा जागृति म्हणती तिथे ॥४७२॥

संबंध ठेवून मनाशी । जेव्हा पाही वासनाशी ।
तेव्हा तया अवस्थेसी । स्वप्न ऐसे म्हणता ये ॥४७३॥
जेव्हा बुद्धि आणि मन । या उपाधींचे नसे भान ।
तेव्हा सुटून देहाभिमान । जीव आत्म्यात लय पावे ॥४७४॥
आणि या अवस्थेप्रति । शास्त्रात म्हणती सुषुप्ति ।
ही जो भोगी तयाप्रति । स्वपिति ऐसे शास्त्र सांगे ॥४७५॥
स्व म्हणजे आपुले रूप । जे असे आत्मस्वरूप ।
अपिति म्हणजे लोप । होणे, वा लय पावणे ॥४७६॥
आपल्या ठायी लुप्त होणे । म्हणजे आत्म्यात लय पावणे ।
हे होता जीवाकारणे । झोपला ऐसे म्हणताती ॥४७७॥
टिकावू ही नसे स्थिति । पुन्हा येते जागृति ।
कारण तेथ उपाधि पुरती । नसते नष्ट झालेली ॥४७८॥
तरी तेथ जीवाचा लय । काही काळ तरी होय ।
आणि या लीन होण्या ठाय । आत्म्याविण दुजा नसे ॥४७९॥
म्हणून जे म्हणती स्वपिति । जे उचित असे अति ।
परी काय प्रकृतिप्रति । 'स्व' शब्द इथला लागतो ॥४८०॥
जीव आहे चेतन । प्रकृति तो जड पूर्ण ।
त्या दोघात आपलेपण । खरे शोधिता येणे नसे ॥४८१॥
म्हणोनि जीवांचा जेथ लय । तो स्व म्हणजे आत्माच होय ।
असल्याने चेतन उभय । आपलेपण सिद्ध तेथे ॥४८२॥
छांदोग्यात म्हणे आरुणि । आपल्या पुत्रास उद्देशुनी ।
बाळा झोप घेता प्राणी । सतासवे युक्त होतो ॥४८३॥★

येथला सत् शब्द काही । प्रकृतीचा वाचक नाही ।
आत्माच अर्थ त्याचाहि । जो कारण जगताचे ॥४८४॥

गतिसामान्यात् ।

[१]-१-१०-(५)

उपनिषदामध्ये सर्व ठिकाणी एका आत्म्याचाच जगत्कारण म्हणून बोध होत असल्यामुळे प्रकृति जगाचे कारण मानता येत नाही.

जगाचे कारण ज्या रीती । काही विचारवंत मानिती ।
त्याच्यामुळे दिसोन येती । नाना भेद कारणांचे ॥४८५॥
सांख्य म्हणती प्रकृति । जगताचे कारण निश्चिती ।
परमाणूसी कणादमती । कारण म्हटले जगताचे ॥४८६॥
स्फोट कारण म्हणे कुणी । कुणी स्पंदालाच मानी ।
परी वेदान्त मतातुनी । भरकटणे असे नसे ॥४८७॥
तेथे जगत्कारण म्हणून । एक आत्म्याचेच वर्णन ।
केले असे आवर्जून । सद्रूप तो म्हणूनिया ॥४८८॥
म्हणतसे कौषीतक । प्राण देव आणि लोक ।
क्रमे स्वस्थला जाती एक । आत्म्यामध्ये जन्मोनि ॥४८९॥★
जैशा भडकल्या अग्नीतुनी । ठिणग्या उडती दशदिशांनी ।
आत्मा येथ आहे अग्नी । प्राणादि हे ठिणग्या जशा ॥४९०॥
आत्म्यापासून हे सर्व । ऐसा छांदोग्याचा भाव ।
'प्रश्न' म्हणतसे उद्भव । आत्म्यापासून प्राणाचा ॥४९१॥★
आत्मा कारण जगाप्रति । हीच उपनिषदांची गति ।
दिसोनि येई सर्वत्र ती । मानिले ना प्रकृतीसी ॥४९२॥

श्रुतत्वाच्च ।

[१]-१-११-(५)

वेदांनी स्पष्टपणे अनेक ठिकाणी ब्रह्म हेच जगाचे कारण
आहे असे सांगितले आहे.

ऐशा रीती उपनिषदात । एका सद्रूप अत्म्याप्रत ।
मानिले आहे निश्चित । जगत्कारण म्हणोनि ॥४९३॥
संहिता ग्रंथांमधूनहि । हेच तत्त्व दिसोनि येई ।
द्यावा-भूमीस जन्म देई । एक देव, ऋग्वेद म्हणे ॥४९४॥★
म्हटले नासदीय सूक्तात । की विश्वापूर्वीच्या काळात ।
काहीच नव्हते अस्तित्वात । एका शुद्ध तत्त्वाविण ॥४९५॥★
असणे नसे, नसणे नसे । मरणे नसे, जगणे नसे ।
आकाशाहि ठाव नसे । दिवस रात्र नव्हती की ॥४९६॥
परी अशा त्या अवस्थेत । एकच होते अस्त्वित्वात ।
जे होते स्फुरण पावत । स्वतःच्याच शक्तीमुळे ॥४९७॥
तेच आपुल्या तपामुळे । बहुत्वाने जन्मा आले ।
ऐसे हे वर्णन सगळे । सांगे कारणता आत्म्याची ॥४९८॥
स्वामी सकल भूतांचा । आधार पृथ्वी-द्यु-लोकांचा ।
एक देव असे साचा । यजुर्वेदे म्हटलेसे ॥४९९॥★
ऐशा रीती सर्व श्रुति । जगाचे कारण मानिती ।
एकमताने आत्म्याप्रति । म्हणोनि तत्त्व तेच एक ॥५००॥
जगताचे स्वरूप अद्भुत । जे नामरूपांनी झाले व्यक्त ।
जगामध्ये नांदतात । नानापरी कर्ते भोक्ते ॥५०१॥

कर्त्यास कर्माप्रमाणे । कर्म फलाचा भोग घेणे ।
विविधता कर्माकारणे । देई त्याची परिस्थिती ।।५०२।।
प्रकृती प्रवृत्ति देशकाल । परिस्थितीसी कारण सकळ ।
त्यातून निपजे कर्मफळ । कार्यकारण भावाने ।।५०३।।
म्हणजे कार्यासी कारण । लागते हे उघड जाण ।
याच नियमा अनुसरून । विचार करणे सृष्टीचा ।।५०४।।
ब्रह्मांडाची या रचना । कशी झाली ते कळेना ।
प्रतिभावंतांची कल्पना । दमोनी जाते, थिटी पडे ।।५०५।।
भूतमात्रांच्या नाना जाति । असंख्य विषय भोगाप्रति ।
गणितशास्त्रे कंटाळती । मोजता त्यांचे गुणधर्म ।।५०६।।
ऐसे हे विश्व पाहता । मनुष्याची ईश्वरदत्ता ।
थकोनि जाते बुद्धिमत्ता । चकित होई आश्चर्ये ।।५०७।।
मग ती बुद्धि नानापरी । स्वैरपणे कल्पना करी ।
कधी तर्काच्या बळावरी । कधी भोळ्या भावनेने ।।५०८।।
कसे असो परी ज्यांनी । कारण मानिले मूलस्थानी ।
त्यांची चालणी बोलणी । काही होती नियंत्रित ।।५०९।।
सर्वथैव परी ज्यांनी । कारण दिले झुगारुनी ।
तयांच्या स्वार्थी वर्तनी । उद्दाम नाचे स्वैरता ।।५१०।।
मूळ कारणासी कारण । नाही म्हणती म्हणून ।
तर्कटी जगालागून । कारण का पाहिजे म्हणे ।।५११।।
जग न घडे कारणाविना । म्हणून जगी सर्व घटना ।
अपेक्षिते कारणांना । ऐसेच येते दिसोनि ।।५१२।।

वर्षे मेघ, वाहती वारे । पिके शेती, यंत्र फिरे ।
वस्तु होती विविधाकारे । आपोआपी कोठे नसे ॥५१३॥
जडाठायी घडण्या घटना । लागे मुळासी कर्तेपणा ।
परंतु तसे चेतना । नको, कर्ता स्वयेच ते ॥५१४॥
जे आपणासी ना कळते । आपोआप म्हणावे ते ।
तर्कबुद्धीचे याहून कोते । स्वरूप नाही निश्चयाने ॥५१५॥
आपणासी कळत नाही । सूज्ञांचे ना ऐके काही ।
तरी तेणे हानि होई । स्वये मानवसमाजाची ॥५१६॥
विचार ते मानवाचे । आधार त्याच्या वर्तनाचे ।
मनुष्यासी कधी न रुचे । वागणे काही मताविणे ॥५१७॥
म्हणून शास्त्रे आग्रह धरिती । सद्विचार हवा म्हणती ।
तरीच लाभे सुस्थिति । समाजासी मानवाच्या ॥५१८॥
याचकारणे श्रुतीने । प्रतिपादिले आग्रहाने ।
की या जगताकारणे । ब्रह्म हेच हेतु असे ॥५१९॥

आनन्दमयोऽभ्यासात् ।

[१]-१-१२-(६)

आनंदमय म्हणजे आत्माच आहे. कारण आत्मा या अर्थी आनंद शब्दाचा प्रयोग अनेक वेळा आला आहे.

तैत्तिरीयात एके ठायी । पंचकोषांचे वर्णन येई ।
संबंध ज्यांचा नित्य राही । जीवाशी या जीवनात ॥५२०॥★
स्थूल शरीर जे स्पष्ट दिसे । अन्नमय तो कोश असे ।
त्याच्या अभ्यंतरी विलसे । कोश नामे प्राणमय ॥५२१॥

प्राणमयाच्या बळावर । इंद्रियांचे होती व्यापार ।
त्याच्या आत साचार । कोश मनोमय नावाचा ।।५२२।।
करी भावना कल्पना । प्रेरणा दे इंद्रियांना ।
ओळखाया ये या लक्षणा- । वरोनि कोश मनोमय ।।५२३।।
मनोमय कोशाच्या जो आत । त्यासी विज्ञानमय म्हणतात ।
जो असतसे मूलस्रोत । जाणीवांचा सगळ्याहि ।।५२४।।
आत विज्ञानमयाच्याहि । सूक्ष्मपणाने जो राही ।
तयाप्रति शास्त्राठायी । आनन्दमय संज्ञा असे ।।५२५।।
जीवनाचे सर्वस्व सार । हा आनन्दमय साचार ।
हाच होतसे आधार । सुख-मोद-प्रमोदासी ।।५२६।।
जरी कोशाच्या संदर्भात । आनन्दमयाचा उल्लेख होत ।
तरी आनन्दमयाप्रत । जीव ऐसे मानू नये ।।५२७।।
तो आत्माच असे स्वये । कारण त्याचा उल्लेख ये ।
आनन्द या शब्दे पाहे । वारंवार श्रुतीमध्ये ।।५२८।।
अन्नमयाची साखळी । जरी आहे गुंफिलेली ।
आनन्दमयावरी भली । तरी ते केवळ बोधार्थ ।।५२९।।
अन्नमयाच्यापासुनी । सूक्ष्म सूक्ष्म उपाधींनी ।
शरीरे वर्णन केली जाणी । विज्ञानमयापर्यंत ।।५३०।।
विज्ञानमयाच्या नंतरी । उपाधीस नसे उरी ।
म्हणोनि आनन्दमया निर्धारी । आत्माच म्हटले पाहिजे ।।५३१।।

विकारशब्दान्नेति चेन्न प्राचुर्यात् ।

[१]-१-१३-(६)

"मय" पद विकारवाचक आहे, म्हणून ते आत्म्यास लागणार नाही असे मानू नये. कारण 'मय' या प्रत्ययाचा वैपुल्य हाहि अर्थ आहे.

अन्नमयादीतील मय । हा जो असे प्रत्यय ।
तो विकारांचा वाचक होय । असे कथिले शास्त्रांतरी ॥५३२॥
घटास म्हणती मृत्तिकामय । दागिना हा सुवर्णमय ।
बाहुली ही काष्ठमय । असे प्रयोग होताती ॥५३३॥
लाकडाची करिती बाहुली । काष्ठमयी म्हणून म्हटली ।
ऐसी विचार-दशा शोभली । कधी काय ब्रह्माठायी ॥५३४॥
ब्रह्म ही वस्तु कधीहि । आनंदाचा विकार नाही ।
म्हणून परमात्मा केव्हाहि । आनंदमय म्हणता नये ॥५३५॥
या अशा शंकेवर । उत्तर देती शास्त्रकार ।
की मय शब्दाचा साचार । प्राचुर्य हाहि अर्थ असे ॥५३६॥
प्राचुर्य म्हणजे विपुलता । भरलेपणा, पुष्कळता ।
त्या अर्थे येईल घेता । मय प्रत्यय याठायी ॥५३७॥
आकाश प्रकाशमय असे । जीवन सुखमय झालेसे ।
अशा वाक्यांमध्ये दिसे । अर्थ मयाचा विपुलता ॥५३८॥
आनंद हा ब्रह्माठायी । अत्यंत विपुलतेने राही ।
बोधासाठी एके ठायी । तैत्तिरीय प्रमाण दे ॥५३९॥★
विद्वान्, तरुण, सज्जन । महात्त्वाकांक्षी शक्तिमान ।
धैर्यशील अशा पूर्ण । योग्यतेचा मनुष्य जो ॥५४०॥
ज्याच्या स्वाधीन जाहली । पृथ्वी सर्व ऐश्वर्यशाली ।
त्याच्या आनंदाची नव्हाळी । माप एक आनंदाचे ॥५४१॥

याच्या शंभर पटीने । गंधर्वादींचे क्रमाने ।
दहा वेळा गुणून होणे । आनंदाचे प्रमाण जे ॥५४२॥
प्रमाण जे अब्जाधिक । ब्रह्माचा आनंद एक ।
ऐसे असे अलौकिक । प्राचुर्य ब्रह्मानंदाचे ॥५४३॥
याच आधारे मयाचा । अर्थ विपुल करणे साचा ।
म्हणोनि आनंदमय शब्दाचा । ब्रह्म हाचि अर्थ असे ॥५४४॥

तद्धेतुव्यपदेशाच्च ।

[१]-१-१४-(६)

ब्रह्म हे त्या आनंदाचा हेतु आहे असे वेदाने सांगितले आहे.
यामुळेहि मय हा प्रत्यय वैपुल्यार्थक मानावा.

ब्रह्माची आनंदमयता । नसे केवळ ब्रह्माकरिता ।
कुणी ब्रह्माजवळ जाता । ब्रह्म त्यासी आनंद दे ॥५४५॥
ज्या अर्थी दुसऱ्यासी । ब्रह्म देते आनंदासी ।
त्या अर्थी ब्रह्मापाशी । आनंद पुष्कळ सत्य हे ॥५४६॥
या हेतूने आनंदमय । ब्रह्म-वाचक सिद्ध होय ।
सांगतसे तैत्तिरीय । आनंददायिता ब्रह्माची ॥५४७॥★

मान्त्रवर्णिकमेव च गीयते ।

[१]-१-१५-(६)

पूर्वीच्या मंत्रात सांगितलेले ब्रह्मच तपाने होणाऱ्या ज्ञानाच्या
क्रमात सांगितले असल्याने आनंदमय म्हणजे ब्रह्मच होय.

सर्व प्रयत्न वा साधने । आनंद मिळवावया कारणे ।
आनंदाहुनी अधिक गुणे । काहीच नसे कोठेहि ॥५४८॥

ब्रह्म सर्वांहुनी श्रेष्ठ । आनंमयताहि तन्निष्ठ ।
नानाप्रकारे ही गोष्ट । गायिली असे वेदांनी ॥५४९॥
आकाशाच्या जे अतीत । जे सत्य ज्ञान अनंत ।
ते ब्रह्म वसे सदोदित । हृदयरूपी गुहेमध्ये ॥५५०॥
या ब्रह्मास जो जाणतो । तो सर्व सुखे उपभोगितो ।
ब्रह्म-ब्रह्मवेत्त्यात नुरतो । आनंददृष्ट्या भेद थोडा ॥५५१॥
ब्रह्मज्ञानी ब्रह्मा मिळवी । जी आनंदा श्रेष्ठ पदवी ।
जिच्यापुढे आणखी नवी । उच्च अवस्था उरते ना ॥५५२॥
जे सूक्ष्म श्रेष्ठ क्रमाने । कथिले कोशाच्या रूपाने ।
तोच क्रमयोग तपाने । साधिलासे भृगूनेंहि ॥५५३॥★
पिता सांगे तयाप्रत । ब्रह्माचे लक्षण थोडक्यात ।
की ज्यापासून हे भूतजात । सर्वहि ये जन्मासी ॥५५४॥
आणि जे जन्म पावलेले । ज्याच्यामुळे असे जगले ।
तसेच शेवटी शिरते भले । लीन होऊन ज्याठायी ॥५५५॥
हे जे ऐसे असे काही । तेच ब्रह्म असे पाही ।
ते तू यत्ने जाणून घेई । तपस्येच्या बळावरी ॥५५६॥
आज्ञा ती मानून प्रमाण । भृगूने केले तपाचरण ।
तपाने घडते चिंतन । अन्न बह्म हे कळोन ये ॥५५७॥
आणि मनी आनंदला । जणो ठेवा लाभला ।
परी संशय नसे फिटला । पुन्हा गेला पित्याकडे ॥५५८॥★
पिता म्हणतसे हासून । अन्न ब्रह्म परी अपूर्ण ।
त्याचेहि शोध कारण । तपश्चर्या पुन्हा करी ॥५५९॥

तप हे ब्रह्म मानावे । प्रयत्ना ना आळसावे ।
चिंतनाने नवे नवे । पैलू कळती ज्ञानाचे ॥५६०॥
तेणेच लाभते पूर्णता । क्रमाने बा प्रिय सुता ।
म्हणून तू धैर्ये आता । दृढ धरावे मार्गा त्या ॥५६१॥
भृगूने आदरे मानिले । पुनः तपासी आचरिले ।
उत्साहाने ओलांडिले । पुढच्या पुढच्या अवस्थासी ॥५६२॥
प्राण, मन, आणि विज्ञान । यांचे क्रमाने झाले ज्ञान ।
परी न लाभे समाधान । पुन्हा बैसे तपासी तो ॥५६३॥
तेव्हा शेवटी कळोनि आले । आनंद हेच ब्रह्म भले ।
भूतांचे ते भाव सगळे । आनंदयोगे घडताती ॥५६४॥
हा ज्ञानलाभ जेव्हा झाला । तेव्हा समाधान पावला ।
मग न कोठे आला गेला । शांत तृप्त महर्षि तो ॥५६५॥
पंचकोशांचे वर्णन । आले ज्या क्रमे करून ।
तसेच येथेहि अंतिम स्थान । आनंदाचे वर्णिलेसे ॥५६६॥
आनंदमय शब्दे म्हणोनि । ब्रह्मचि घ्यावे जाणोनि ।
वेदमंत्राच्या या गायनी । भाव अन्य मुळी नसे ॥५६७॥

नेतरोऽनुपपत्तेः ।

[१]-१-१६-(६)

ईश्वराहून निराळा असा जीव आनंदमय शब्दाने घेता येत नाही.
कारण पुढे आलेले वर्णन जीवाशी जुळत नाही.

यास्तव आनंदमय शब्दांनी । परमात्म्याहून वेगळा कोणी ।
जीवात्मा जो तो या स्थानी । निश्चये ना मानिता ये ॥५६८॥

परमात्मा या अर्थाने । संगति लागे पूर्णपणे ।
जीव म्हणता आग्रहाने । लागे न त्याची उपपत्ति ॥५६९॥
जेथ तैत्तिरीयातून । ये ''आनंदमय'' विधान ।
त्याच्याच पुढती वर्णन । आले असे ऐशापरी ॥५७०॥★
विज्ञानमयाच्या आत । जो हा आनंदमय असत ।
त्याने आणिले मनात । की आपण बहु व्हावे ॥५७१॥
प्रजा निर्माण करावी । विविधता ती वाढवावी ।
हे घडाया आचरावी । शक्ति-लाभा तपश्चर्या ॥५७२॥
मग त्याने तप केले । आणि सर्वहि हे निर्मिले ।
सारे पदार्थ जे उत्पादिले । त्यात शिरून राहिला तो ॥५७३॥
हे सगळे वर्णन । जीवात्म्यासी न ये जुळून ।
सम्राटाचे सिंहासन । द्वारपाला साजते ना ॥५७४॥
शरीरावाचून कामना । जीवासी करिता ये ना ।
ब्रह्मांडाची सर्व रचना । जीव काय करू शके ॥५७५॥
आणि निर्मिलेल्या पदार्थासी । ऐक्य पावता न ये जीवासी ।
म्हणोनि परमात्माच सर्वांशी । आनंदमयाने मानावा ॥५७६॥

भेदव्यपदेशाच्च ।

[१]-१-१७-(६)

जीवाचा भिन्न स्वरूपात उल्लेख केला असल्यामुळे
आनंदमय हा जीव नव्हे.

ज्याच्यामुळे आनंद होतो । आणि आनंद ज्यासी लाभतो ।
त्या दोघांमध्ये राहतो । भेद हे की स्पष्ट असे ॥५७७॥

तैत्तिरीयात एके ठायी । याचे वर्णन असे पाही ।
की या सृष्टीच्या पूर्वीहि । अव्यक्त ऐसे काही असे ॥५७८॥★
त्यातून नामरूपात्मक । निर्माण झाले सर्व लोक ।
त्याने स्वतःशीच अनेक । घडवियले विश्वरूपे ॥५७९॥
या अद्भुत कृत्यामुळे । सुकृत हे नाव लाभले ।
सुकृताठायी एकवटले । आस्वाद्यतेचे भाव सारे ॥५८०॥
म्हणोनि या सुकृतास । म्हणती की हाच रस ।
हा रस लाभतो जयास । होतसे तो आनंदी ॥५८१॥★
परमात्म्याची होता प्राप्ति । आनंद लाभे जीवाप्रति ।
या भेदे होते निश्चिती । आनंदमय जे ते ब्रह्म ॥५८२॥
परी हा भेद मायिक । मुळीच नाही वास्तविक ।
मूळ अज्ञान कारण एक । जीवब्रह्माच्या भेदासी ॥५८३॥
सूत्र मागचे आणखी हे । भेद गृहीत धरून आहे ।
वस्तुतः तो खरा नोहे । भेद जीव ब्रह्मातला ॥५८४॥

कामाच्च नानुमानापेक्षा ।

[१]-१-१८-(६)

आनंदमयाने सृष्टिनिर्मितीची इच्छा केली असे सांगितले असल्याने आनंदमय शब्दाने जीवात्मा घ्यावा असे अनुमान करता येणार नाही.

कामना विश्वनिर्माणाची । जीवाठायी न व्हावयाची ।
जरी महत्त्वाकांक्षा तयाची । असे भारी बलवत्तर ॥५८५॥
अपार ऐश्वर्य लाभावे । श्रेष्ठ सत्तास्थान मिळावे ।
याच्या पलीकडे ना धावे । कधी जीवांची आकांक्षा ॥५८६॥

वाटले विश्वामित्रापोटी । निर्माण करावी प्रतिसृष्टि ।
परी ती त्रिशंकूच्यासाठी । स्वर्गापुरतीच होती की ॥५८७॥
सर्व ब्रह्मांड निर्मिण्याचा । विचार नव्हता गाधिजाचा ।
केला त्याहि प्रयत्नाचा । शीण सर्व व्यर्थ गेला ॥५८८॥
चित्रकार बाहुल्या करी । परी कधी ना इच्छा धरी ।
ब्रह्मदेवाची बरोबरी । करावयाची चित्तामध्ये ॥५८९॥
तैसे सृष्टीचे निर्माण । मी करीन हा अभिमान ।
जीवाठायी न संभवे जाण । ते सामर्थ्य ईश्वराचे ॥५९०॥
प्रत्यक्षपणे म्हणे श्रुति । बहु होण्याची कामना ती ।
ईश्वरे केली निश्चिती । तपस्येने झाला बहु ॥५९१॥★
असे स्पष्टपणाचे विधान । त्याची उपेक्षा करून ।
योग्य न करणे अनुमान । आनंदमयी जीवाचे ॥५९२॥
पुढचे एक मागची दोन । सूत्रे लक्षात घेऊन ।
अनुमान शब्दावरून । जीव अर्थ केला इथे ॥५९३॥
प्रकृती ही जीवा ठायी । अनुमान शब्दे घेता येई ।
विवेचन केले तैसेही । भाष्यी थोर महात्म्यानी ॥५९४॥
भगवंताने जीवाप्रती । म्हटले निज परा प्रकृती ।
म्हणोनि नसे विसंगती । घेतल्या दोनी अर्थामधे ॥५९५॥

अस्मिन्नस्य च तद्योगं शास्ति ।

[१]-१-१९-(६)

या बोध झालेल्या जीवाची आनंदमयाशी एकरूपता होते असे शास्त्र सांगते. यावरूनहि आनंदमय म्हणजे परमात्माच होय.

आनंदमयाचा बोध होता । जीव त्यासह पावे एकता ।
ऐशी ज्ञानाची महत्ता । वेदामध्ये कथिली असे ।।५९६।।★
आधी निष्काम भावनेने । करावी नाना साधने ।
तेव्हाच जीवा शक्य होणे । ज्ञान आनंदमयाचे की ।।५९७।।
थोडासा उरता अहंकार । खरे ज्ञान जाते दूर ।
ऐक्यात पडते अंतर । मग ना लाभे निर्भयता ।।५९८।।
जीवात्म्याचा परमात्म्याशी । योग जो कथिला विशेषी ।
त्यावरूनहि आनंदमयासी । परमात्माच म्हणता ये ।।५९९।।
आनंदमय हा शब्द पाही । जीवात्म्याचा वाचक नाही ।
एक परमात्माच होई । अर्थ की त्या शब्दाचा ।।६००।।
परी त्या आनंदमयाचे । पुढे वर्णन विस्ताराचे ।
रूपक करून पक्ष्याचे । केले आहे वेदाने ।।६०१।।★
श्रुति सांगे प्रिय हे शिर । त्या आनंदमयाचे साचार ।
मोद प्रमोद हे सुंदर । उजवे डावे दोन पंख ।।६०२।।
आनंद त्याचा आत्मा असे । ब्रह्म त्याचे पुच्छ विलसे ।
ज्याच्यामुळे लाभतसे । प्रतिष्ठा त्या विहंगासी ।।६०३।।
आनंदमयाचे आत्मपण । आनंद म्हटले आवर्जुन ।
त्याच्या प्रतिष्ठेचे कारण । ब्रह्म हे कथिले असे ।।६०४।।
यावरून येई दिसोन । की आनंदमयाहून ।
काही अंशी वेगळेपण । ब्रह्मशब्दी अभिप्रेत ।।६०५।।
वारंवार जो प्रयोग आला । तो आनंद शब्दाचा भला ।
क्वचित् कोठे उपयोग केला । असे आनंदमयाचा ।।६०६।।

मांडूक्य उपनिषदाभीतरी । ब्रह्म वर्णिले सर्वतोपरी ।
थोडक्यामध्ये त्याचे तरी । स्पष्टपण ते अलौकिक ॥६०७॥★
ब्रह्म आत्मा आणि ॐकार । पर्याय कथिले परस्पर ।
नंतर चढते प्रकार चार । बोधार्थ कथिले आत्म्याचे ॥६०८॥
मांडणीचा रोख बघता । कळोनि ये विचारवंता ।
की एकाहून एक वाढता । श्रेष्ठपणा त्याचा असे ॥६०९॥
यातील जो प्रकार पहिला । वैश्वानर म्हणती त्याला ।
आधार दे जागृतीला । बाह्य विषया जाणीतसे ॥६१०॥
विषय ज्याच्या उपभोगाचे । स्थूल भौतिक असती साचे ।
इंद्रियांच्या द्वारे त्यांचे । सेवन सदा करितो हा ॥६११॥
दुसरा स्वप्नात राहतो । अंतस्थ विषया जाणतो ।
तैजस जया म्हणतात तो । सूक्ष्माचे जो सेवन करी ॥६१२॥
गाढ झोपेचा जो साक्षी । काही न इच्छी, काही न लक्षी ।
आनंदमय जो आनंद भक्षी । प्राज्ञ जाणणे तिसरा तो ॥६१३॥
जाणीव लवहि नसून । यास म्हणती प्रज्ञानघन ।
विविधतेसी करून लीन । एकीभूत राहतो हा ॥६१४॥
हाच सर्वांचा ईश्वर । हा सर्वज्ञ खरोखर ।
सर्वांचे जे अंतर । तेथे वास करीत हा ॥६१५॥
सर्व भूतांची उत्पत्ति । हाच करी सर्वशक्ति ।
भूताकृतीचा लय अंती । याच्याच ठायी होतसे ॥६१६॥
याच्या पुढचा जो चतुर्थ । कठीण त्याचा समजणे अर्थ ।
कथिल्या शब्दा देई न साथ । चवथ्याची त्या वस्तुसत्ता ॥६१७॥

अंतर्ज्ञान बाह्यज्ञान । नाही न दोहींचेहि ज्ञान ।
प्रज्ञ न वा प्रज्ञानघन । अज्ञानीहि नसेच तो ॥६१८॥
त्यास पाहता येईना । त्यासी व्यवहार घडेना ।
घेता न ये इंद्रियांना । करवे न त्याचे लक्षण ॥६१९॥
घडे न त्याचे चिंतन । देता न ये दाखवून ।
ज्या ठिकाणी एकपण । पूर्ण जाते विरघळोनि ॥६२०॥
दिसे भासे देई घेई । वैचित्र्याने भरला राही ।
असा प्रपंचहि ज्याठायी । लीन होतो पूर्णपणे ॥६२१॥
त्या चवथ्याची ओळख । द्यावया न साधन एक ।
तोच आत्मा अलौकिक । जाणावया योग्य आहे ॥६२२॥
परी होऊन निरुपाय । वेदमाउली करुणामय ।
शांत शिव अद्वितीय । म्हणे त्यासी बोधास्तव ॥६२३॥
या प्रकारी जो तृतीय । त्यासी म्हटले आनंदमय ।
सत्य आत्मा जो तुरीय । त्याचे वर्णन वेगळेचि ॥६२४॥
प्रतिष्ठा आनंदमयाची । ब्रह्म म्हटले, कारणे याचि ।
लगेच ब्रह्माच्या ज्ञानाची । गायिली महती वेदाने ॥६२५॥
ब्रह्माची सत्ता नाकारितो । जो, तयाचा नाश होतो ।
ब्रह्म निश्चये मानितो । तोच संत हे जाणावे ॥६२६॥
जाणण्यासाठी उपासना । करावी लागते जीवांना ।
म्हणून ब्रह्माविषयी भावना । दोन प्रकारे वर्णी श्रुति ॥६२७॥
एक पूर्ण निरुपाधिक । जे सर्वथैव अलौकिक ।
ज्याच्याविषयी काही एक । बोलता ये ना कुणासहि ॥६२८॥

परी केवळ बोधासाठी । वेद काही करी गोष्टी ।
नेति नेति हीच मोठी । भाषा वेदापाशी उरे ॥६२९॥
निष्कल, निष्क्रिय, निरंजन । शांत, निरवद्य, निर्गुण ।
अद्वितीय जे परिपूर्ण । असे काही शब्द येती ॥६३०॥
येथे न कार्य नाही कर्ता । अवसर नाही भज्य भक्ता ।
नाही ज्ञेय नाही ज्ञाता । अमके तमके सर्व लोपे ॥६३१॥
करणे न करणे संपते । घेणे टाकणे मावळते ।
येथे एक पंगत होते । भक्ति आणि अभक्तीची ॥६३२॥
ही जी काही असे स्थिति । ती ज्ञानरूनपचि निश्चिती ।
परी ज्ञात्यांच्या सोयीप्रति । हीच अवस्था ज्ञेय होते ॥६३३॥
ज्ञान म्हणजेच वस्तुस्थिति । ती जाणण्याची इच्छा ती ।
उत्पन्न होते ज्याच्या चित्ती । ज्ञाता त्यासी म्हणतात ॥६३४॥
ज्ञाता गृहीत धरल्यावरी । ज्ञेय हवे त्या समोरी ।
म्हणोनि ज्ञेयाची पायरी । ज्ञाना लागे उतरावी ॥६३५॥
उसाठायीचा गोडपणा । साखरेमुळेच असे जाणा ।
म्हणून गोडी चाखताना । बाकुस येते टाकावया ॥६३६॥
साखरेचे तसे नाही । ती गोडीरूप सर्वहि ।
गोडी आणि साखरेठायी । भेद केवळ शब्दामध्ये ॥६३७॥
गोडी हीच वस्तुस्थिति । साखर भाषा निश्चिती ।
म्हणून चाखता साखरेप्रति । नुरे काही टाकावया ॥६३८॥
ब्रह्माचेहि तसेच आहे । ज्ञेय ज्ञान तेच पाहे ।
निरुपाधिक शुद्ध म्हणता ये । स्वरूप हेचि ब्रह्माचे ॥६३९॥

दुसरी भावना ब्रह्माठायी । श्रुति सांगे प्रेममयी ।
ज्याच्यामुळे जाहली सोयी । मुमुक्षूच्या प्रगतीची ।।६४०।।★
ब्रह्माची जी येथ स्थिति । ती वर्णी भावे श्रुति ।
गृहीत धरुनी उपाधीप्रती । सर्वाधार ब्रह्म म्हणे ।।६४१।।
ब्रह्म विश्वासी निर्मिते । ब्रह्म विश्व स्वये होते ।
शेवटी विश्व हे लोपते । ब्रह्माठायी भेदासवे ।।६४२।।
हाच आहे परमेश्वर । सर्व सद्गुणांचा सागर ।
भक्तजनासी अपार । वात्सल्याने पाहतो हा ।।६४३।।
उदार न्यायी दिव्य-कीर्ति । हाचि असे करुणामूर्ति ।
सर्वज्ञाता सर्वशक्ति । ऐश्वर्यशाली परमात्मा ।।६४४।।
सर्व सौंदर्याचा हा निधि । सर्व माधुर्याचा उदधि ।
प्राणिमात्रांची जी बुद्धि । तिला प्रेरणा देई हा ।।६४५।।
हा चंद्रसा संतापशमन । गंगेपरी पापहरण ।
सर्व सुखाचे साधन । वर्षतो हा मेघापरी ।।६४६।।
सुवर्णासम याची कांति । सूर्यमंडली याची वसति ।
केस सोनेरी शोभती । या देवाच्या मस्तकासी ।।६४७।।
उत्कर्षाचे हा साधन । समृद्धीचे हा विधान ।
भगवंत हा व्यापून । अंतर्बाह्य सर्वासी ।।६४८।।
भक्तांच्या भावनेपरी । नामरूपे धारण करी ।
शास्त्र ऐसे वर्णन करी । परब्रह्म स्वरूपाचे ।।६४९।।
मुमुक्षु, जिज्ञासु, साधक । आर्त, भक्त, वा भाविक ।
नाना वृत्तीचे उपासक । यांची सोय होत येणे ।।६५०।।

वेद वर्णित आनंदमय । ते ब्रह्म असे उपासनीय ।
करी मुलासाठी माय । साखरेची मिष्टान्ने ॥६५१॥
केळीचा गाभा सोलणे । तशीच ब्रह्माची वर्णने ।
परी याच्या चिंतनाने । कुशाग्रता ये बुद्धीसी ॥६५२॥
आचार्यभाष्यावरून । हेच येते दिसोन ।
तीक्ष्ण बुद्धीचे समाधान । तेणे लाभे अभ्यासका ॥६५३॥

अन्तस्तद्धर्मोपदेशात् ।

[१]-१-२०-(७)

सूर्य आणि नेत्र यांच्या आत असणारा जो पुरुष तो उपासनेसाठी
सांगितलेला परमात्माच आहे. कारण दोन्ही ठिकाणी
सांगितलेले धर्म परमात्म्याशीच जुळणारे आहेत.

परब्रह्माची होण्या प्राप्ति । सर्वभावे साधकाप्रति ।
स्वतःची पाहून प्रकृति । करावी लागे उपासना ॥६५४॥
उपासनेच्या विविध रीति । ध्यान, जप, होमादि राहती ।
तसेच लागे प्रतीक पुढती । उपासनेचा आधार जे ॥६५५॥
वेदाचे असे प्रयोजन । एक ब्रह्माचे प्रतिपादन ।
श्रुतीने उपास्य म्हणून । एक ब्रह्म सांगितले ॥६५६॥★
नावात आणि वर्णनात । कधी थोडा भेद होत ।
परी अंतिम उद्देशात । ब्रह्माविणे अन्य नसे ॥६५७॥
छांदोग्य उपनिषदातून । कथिल्या उपासना दोन ।
एक सूर्यस्थिता उद्देशून । दुजी नेत्रस्थ पुरुषाची ॥६५८॥★
सूर्यस्थिताची गायिली महती । ती मनोहर असे अति ।
वर्णन त्याचे करी श्रुति । जणू काव्यमय भाषेने ॥६५९॥

हा जो सूर्याच्या अंतरात । तेजस्वी पुरुष दिसो येत ।
जो आहे नखशिखान्त । जणू घडला सुवर्णाचा ॥६६०॥
श्मश्रू तयाची सोनेरी । सुवर्ण केस मस्तकावरी ।
आरक्त फुलल्या कमळापरी । विशाल सुंदर नेत्र त्याचे ॥६६१॥
इतकी त्याची उच्चस्थिति । की पापे त्या न स्पर्शती ।
सारी खालीच राहती । हा एकटा फार वर ॥६६२॥
आणि हे जो जाणतो । ध्यानबळे त्या मिळवितो ।
तोहि सहज मुक्त होतो । सर्वप्रकारे पापातुनी ॥६६३॥
हे ब्रह्माचे वर्णन । असे अधिदैवता उद्देशून ।
पुढे अध्यात्मा अनुलक्षून । नेत्रस्थासी सांगितले ॥६६४॥
येथ अध्यात्म शब्दाचा । शारीर हा अर्थ साचा ।
ज्यासी संबंध शरीराचा । अध्यात्म त्यासी म्हटलेसे ॥६६५॥
उपासनेस्तव लागती । आलंबने जी निश्चिती ।
त्याप्रीत्यर्थ घेता येती । शरीरातील काही स्थळे ॥६६६॥
भ्रूमध्य, कंठ, नाभि, हृदय । अवस्थाभेदे उपासनीय ।
तेथे ईश कल्पून आधेय । धारणा ध्यान साधावे ॥६६७॥
तसेच नेत्रस्थ पुरुषाचे । वर्णन येथे छांदोग्याचे ।
डोळ्यातल्या प्रतिबिंबाचे । प्रतीक घेतले वाटे हे ॥६६८॥★
छांदोग्य म्हणे नेत्राठायी । जो हा पुरुष दिसोन येई ।
तोच दिसे सूर्यात पाही । तेच रूप नावहि ते ॥६६९॥
हाच ऋग्वेद, सामवेद । हाच उक्थ यजुर्वेद ।
हाच ब्रह्महि प्रसिद्ध । इच्छिले फल देई हा ॥६७०॥

या दोनहि उपासनात । पुरुषाचे जे वर्णन येत ।
ती न कोणी ऐश्वर्यप्राप्त । व्यक्ति अथवा जीवात्मा ॥६७१॥
ब्रह्म तेच कथिले आहे । उपासनेच्या साठी हे ।
ब्रह्माहून वेगळी नोहे । अभिप्रेत वस्तु इथे ॥६७२॥
जो नेत्री दिसून येतो । तो सूर्यातहि राहतो ।
वर्णनाचा या अर्थ जुळतो । एक ब्रह्म घेतल्याने ॥६७३॥
तेच ऋक् तेच साम । तेच यजु तेच ब्रह्म ।
याहि वर्णनांचे काम । जीवात्म्यासी साधते ना ॥६७४॥
पापातुनी सर्वथा वर । ब्रह्मचि राहे खरोखर ।
म्हणोनि करिता न ये विचार । ऐश्वर्यशाली व्यक्तीच। ॥६७५॥
अवयव रूप ना ब्रह्मासी । म्हणून म्हणता न ये त्यासी ।
सुवर्णकांति सुवर्णकेशी । कमललोचन इत्यादि ॥६७६॥
परी भक्तांच्या भावनेनुसार । रूप धरितसे ईश्वर ।
सामर्थ्य ज्याचे अपरंपार । अशक्य त्यासी काही नसे ॥६७७॥
भक्तवत्सल दयाघन । भक्त जसे धरी ध्यान ।
तसेच होई, अनमान । न करी कधी परमात्मा ॥६७८॥
अमर्याद मर्यादित । होऊन प्रगटे प्रतीकांत ।
भक्तांचा पुरविण्या हेत । केवळ वत्सल भावाने ॥६७९॥
पिता शहाणा पंडित । वक्ता असून विख्यात ।
बोल बोबडे बोलत । कौतुकाने लाडक्यासी ॥६८०॥

भेदव्यपदेशाच्चान्यः ।

[१]-१-२१(७)

सूर्याचा आत असणारा पुरुष जीवाहून वेगळा आहे.
कारण त्या दोघामध्ये भेद सांगितला आहे.

प्रत्यक्ष सूर्य या ठायी । वा डोळ्याची बाहुलीहि ।
उपास्य म्हणुनी घेता न येई । ते तो केवल आलंबन ॥६८१॥
म्हटले सूर्यामध्ये दिसतो । नाही कथिले सूर्य दिसतो ।
म्हणोनि ना घेता येतो । ''दिसतो'' शब्दे सूर्य येथे ॥६८२॥
तसेच सूर्याआत राही । तोही जीव नसे काही ।
अर्थ घेणे भाग होई । परमात्मा हा ये ठायी ॥६८३॥
हे जे दिसणे आहे येथे । चर्मचक्षूचे नसे की ते ।
या दिसण्यास्तव लागते । उज्ज्वल दृष्टि ध्यानाची ॥६८४॥
सूक्ष्मदर्शी आत्मज्ञानी । कुशाग्रबुद्धीच्या बळांनी ।
ध्यानबळे सूक्ष्मपणी । पाहती या तत्त्वासी ॥६८५॥
सूर्य येथे ना अभिप्रेत । म्हटले बृहदारण्यकात ।
की जो सूर्यामध्ये स्थित । तो वेगळा सूर्याहुनी ॥६८६॥★
सूर्य त्यासी जाणत नाही । सूर्य त्याचे शरीर पाही ।
जो नियंत्रण करीत राही । आत राहुनी सूर्याचे ॥६८७॥
तोच आत्मा अमृत । अरे तुझ्या अंतरात ।
या वर्णने स्पष्ट होत । ब्रह्म एक उपास्य हे ॥६८८॥
शतपथ ब्राह्मणाने । अशीच केली वर्णने ।
केवल सूर्याच्या स्थली त्याने । ' आत्मा ' शब्द योजिलासे ॥६८९॥
तेथे आत्म्याच्या अंतर्यामा । वसे म्हटले अमृतात्मा ।
त्यावरूनहि जीवात्मा । नेत्रस्थानी न घेता ये ॥६९०॥★

उपासनेचे आलंबन । उपास्य ब्रह्माहून भिन्न ।
त्यांचे मानणे एकपण । सोयीसाठी पूजनाच्या ॥६९१॥
पित्याचे चित्र मांडिले । त्यात पितृत्व नाही शिरले ।
हेच पाहिजे जाणिले । उपासकाने सर्वठायी ॥६९२॥

आकाशस्तल्लिङ्गात् ।

[१]-१-२२-(८)

आकाश शब्द ब्रह्मवाचक आहे. कारण त्याचे वर्णन
ब्रह्माला योग्य असलेल्या लक्षणांनी केले आहे.

शालावत्य नामे ब्राह्मण । राजा जैवलीस करी प्रश्न ।
की या लोकाची गति कोण । आकाश गति सांगे तो ।६९३।★
येथे 'आकाश' शब्दाने । ब्रह्म कथिले पूर्णपणे ।
कारण ब्रह्माचीच लक्षणे । पुढे येथे सांगितली ॥६९४॥
उत्पन्न होणे, लय पावणे । भूतांचे घडे आकाशाने ।
ऐसे म्हणता स्पष्टपणे । आकाश हेचि ब्रह्म कळे ॥६९५॥
आकाशा म्हटले परायण । आकाश मानिले जीवन ।
आनंद हे रूप पूर्ण । मानिलेसे आकाशाचे ॥६९६॥
या सर्वहि वर्णनास । जुळत नसे भूताकाश ।
म्हणोनि ब्रह्म याचि अर्थास । आकाश-शब्दे घेणे असे ॥६९७॥
वाटे उपासना करावी । तै छांदोग्य मार्ग दावी ।
कशाची कशी असावी । ते एकदा स्पष्टपणे ॥६९८॥★
सर्व विश्व जे दिसते हे । ते वस्तुतः ब्रह्म आहे ।
त्यातून जन्मले, त्यात राहे । शेवटी मिळे ब्रह्मामध्ये ॥६९९॥

म्हणून सर्व परिस्थितीत । पूर्णपणे राहून शांत ।
करावी की सदोदित । या ब्रह्माची उपासना ।।७००।।
यास्तव जगदुत्पत्ति स्थिति । लय जेथे वर्णिले जाती ।
ते ब्रह्म मानावे निश्चिती । शब्द असता कोणताहि ।।७०१।।
आत्म्यापासून जन्मास । आलेसे जे भूताकाश ।
ते सर्वांच्या निर्मितीस । कारण कधी होणे नसे ।।७०२।।

**अत एव प्राणः ।**

[१]-१-२३-(९)

म्हणूनच प्राण शब्दहि त्याच रीतीने ब्रह्मवाचक आहे.

छांदोग्यातील एक ऋषि । उषस्ति पुसे प्रस्तोत्यासी ।
प्रस्तावाची देवता तुजशी । कोणती ते ठावे का ।।७०३।।★
तो म्हणे ना कळे मजशी । तुम्हीच सांगा पुण्यराशी ।
उत्तर मिळे आदरेशी । प्राण देवता प्रस्तावा ।।७०४।।
याच प्राणापासुनी । जन्म घेतला भूतांनी ।
शेवटी जातील मिळोनि । प्राणामध्ये सर्वहि ती ।।७०५।।
येथील वर्णनावरून । ही जी कथिली देवता प्राण ।
ती ब्रह्माची असे खूण । येथ शंका नको मुळी ।।७०६।।
जरी प्राणवायूत कथिली । लय-उत्पत्ति-सुषुप्तिकाली ।
तरी इंद्रियापुरती भली । सर्व भूतांची नाही ती ।।७०७।।
झोपेतहि प्रत्यक्षात । इंद्रिये ना लय पावतात ।
ती केवळ राहती शांत । प्रेरणा त्यांची थांबल्याने ।।७०८।।

इंद्रियांचा वर्णिला लय । ती तो भाषा काव्यमय ।
येथे होऊन निर्भय । भूतस्थिति वर्णियेली ॥७०९॥
तेथे कथिली देवता प्राण । तो प्राणाचाहि असे प्राण ।
जो करीतसे धारण । सर्व भूतजाताप्रति ॥७१०॥
म्हणोनि सूत्रात मागिले । आकाशाचे जे मानिले ।
तेथ येथे घेतले । पाहिजे प्राण-शब्दाने ॥७११॥

ज्योतिश्चरणाभिधानात् ।

[१]-१-२४-(१०)

ज्योति शब्द ब्रह्मवाचक आहे; कारण पृथ्वीवर
व द्युलोकात त्याचे-चरण सांगितले आहेत.

पुरुषाच्या ठायी ज्योति । जी होते प्रकाशती ।
तीच स्वर्गाच्याहि वरती । दीप्तपणाने विराजते ॥७१२॥
विश्वाच्याहि सगळीकडे । त्याच ज्योतीचा प्रकाश पडे ।
तिच्या तेजे स्नान घडे । उत्तमोत्तम लोकासहि ॥७१३॥
छांदोग्यातील ही ज्योति । ब्रह्माचीच कथी महती ।
सूर्याची वा नसेच ती । कायिक भौतिक अग्नीची ॥७१४॥★
ठेवणे अवश्य लक्षात । एक नियम सदोदित ।
जे व्यापक ते मर्यादित । निज अंशे राहतेचि ॥७१५॥
परी स्वरूपे मर्यादित । अल्प प्रमाण जे मुळात ।
त्यास न व्यापक म्हणता येत । वाच्यार्थाने केव्हाहि ॥७१६॥
पंचभूतांची सर्वहि । एका शरीरी वसति राही ।
एक शरीर नसे काही । व्यापून पांची भूतांना ॥७१७॥

समुद्राचे थोडे पाणी । घेता येते ओंजळींनी ।
परी ओंजळभर जलानी । समुद्रासी न व्यापिता ये ॥७१८॥
येथ पुरुषातील ज्योति । म्हटले विश्वा व्यापिती ।
ती ब्रह्माची प्रत्यक्ष स्थिति । मग कल्पना करणे नको ॥७१९॥
या ब्रह्माचा एक चरण । असे सर्व भूता व्यापून ।
उरलेले अमृत तीन । वेढिताती दिव्य लोका ॥७२०॥
तीच ही ज्योत अलौकिक । हृदयी राहते निःशंक ।
नीवाराचे जसे शूक । तशी सूक्ष्म होऊनिया ॥७२१॥★
ज्योतीची ही ज्योत थोर । घेई हृदयाचा आधार ।
ज्ञानरूप जी अधंकार । अज्ञानाचा नष्ट करी ॥७२२॥★
साधारण ज्योतीठायी । हे सामर्थ्य वसे कायी ।
आपुल्या सूर्याचाहि नाही । लागायाचा पाड येथे ॥७२३॥
तेजस्वी या सूर्याहुनी । सहस्रावधि नभांगणी ।
तारे आहेत त्यांची कोणी । नोंद तरी घेतली का ? ॥७२४॥
सर्व विश्वे प्रकाशती । त्याच्या प्रकाशे निश्चिती ।
म्हणोनिया ब्रह्म ज्योति । म्हटले येथे वेदाने ॥७२५॥
वैश्वानर ज्योति आकाश । इत्यादि हे शब्द विशेष ।
अनुलक्षूनि ब्रह्मास । येती उपनिषदांमध्ये ॥७२६॥
इतर त्याचा अर्थ काही । होणे कधी शक्य नाही ।
अशी चर्चा आग्रही । ब्रह्मसूत्री केली असे ॥७२७॥
हिचे काय प्रयोजन । असा उठे मानसी प्रश्न ।
उपयोग साधनेलागून । विशेष तिचा दिसतो ना ॥७२८॥

परंतु ज्या साधकाने । उपनिषदे जिज्ञासेने ।
पाहिली, तो संशयाने । युक्त होणे शक्य आहे ।।७२९।।
उपासनेचे अधिष्ठान । वा जगताचे कारण ।
ब्रह्मावाचून काही भिन्न । उपनिषदा मान्य नाही ।।७३०।।
म्हणून सूर्य नेत्र प्राण । वर्णिले उपनिषदातून ।
या शंकेचे निरसन । उद्दिष्ट आहे चर्चेचे ।।७३१।।
उपनिषदाचे सुसंगत । तात्पर्य कथिणे हाच हेत ।
धरूनिया निजचित्तात । व्यासे रचिली ब्रह्मसूत्रे ।।७३२।।
तेणे उपनिषदांच्या ठायी । वर्णने जी येती काही ।
त्याची चर्चा अवश्य होई । ब्रह्म तात्पर्य कथावया ।।७३३।।

छन्दोभिधानान्नेति चेन्न तथा चेतोर्पण-
निगदात्तथा हि दर्शनम् ।

[१]-१-२५-(१०)

वृत्त सांगितले असल्यामुळे ब्रह्म सांगितले नाही असे नाही; कारण तशा रीतीने चित्त ब्रह्माचे ठिकाणी लावावे असे सांगितले आहे. इतर ठिकाणीहि असेच दिसून येते.

गायत्रीचे वर्णन । आले फार श्रुतीतून ।
परी त्या निमित्ते करून । ब्रह्म हेच प्रतिपादिले ।।७३४।।★
गायत्रीच आहे वाणी । गायत्री पृथ्वीच्या ठिकाणी ।
स्थावर जंगम भूतातुनी । गायत्रीच प्रगट होते ।।७३५।।
पुरुषांच्या अंतरी हृदय । तेहि गायत्रीच होय ।
गायत्री ब्रह्म अद्वितीय । वेद महिमा गात ज्याचा ।।७३६।।
यास्तव गायत्री प्रति । ब्रह्मच जाणावे निश्चिती ।
तिच्या द्वारे ब्रह्माप्रति । साधकासी जाता ये ।।७३७।।

समर्पित करूनि मना । त्याची करावी उपासना ।
या आदेशे महत्त्व ना । गायत्रीच्या छंदरूपा ॥७३८॥

भूतादिपादव्यपदेशोपपत्तेश्चैवम् ।

[१]-१-२६-(१०)

भूत इत्यादि गायत्रीचे पाय आहेत असे श्रुतीत सांगितले असल्यामुळे गायत्री छंदाने ब्रह्म हाच अर्थ योग्य ठरतो.

चतुष्पदा म्हटले गायत्रीते । एक पाद व्यापितो भूते ।
अमृतरूपी उरलेले ते । तिघे असती दिव्यलोकी ॥७३९॥
पादरूपे हे वर्णन । गायत्री छंदाचे नसून ।
ब्रह्मासीच उद्देशून । निश्चये ते केलेसे ॥७४०॥
गायत्री छंदी अक्षरे चोवीस । सहा प्रत्येक चरणास ।
व्यापिती सर्व भूतास । सहा अक्षरे हे न जुळे ॥७४१॥
एक अंशे सर्व भूता । व्यापिण्याची समर्थता ।
आहे ऐसे येत म्हणता । एका ब्रह्माच्याच ठायी ॥७४२॥
ब्रह्मास नसता हातपाय । चतुष्पाद म्हणता हे काय ।
असा न घ्यावा संशय । साधकाने स्थानी या ॥७४३॥
ब्रह्माची थोरवी विशेष । एका अंशे व्यापिते विश्वास ।
हे लक्षामध्ये यावयास । चतुष्पाद म्हटलेसे ॥७४४॥

उपदेशभेदान्नेति चैन्नोभयस्मिन्नप्यविरोधात् ।

[१]-१-२७-(१०)

ब्रह्माची महती सांगतांना एकदा द्युलोकात आणि एकदा द्युलोकाहून वर असे भिन्न रीतीने सांगितले असल्यामुळे दोन्ही ठिकाणचे तात्पर्य भिन्न वस्तूंच्या संदर्भात असले पाहिजे असे म्हणू नये; कारण विभक्तीप्रत्यय वेगळे असले तरी अर्थामध्ये विरोध येण्याचे कारण नाही.

गायत्रीच्या संबंधात । आलेल्या ब्रह्मवर्णनात ।
त्याचे असती द्युलोकात । अमृतपाद म्हटलेसे ।।७४५।।★
आणि वर्णन करिता ज्योति । ती द्युलोकाहून वरती ।
राहते ऐशी स्तुति । केली येथे ब्रह्माची ।।७४६।।★
एके ठिकाणी सप्तमी । एके ठिकाणी पंचमी ।
याचा उपयोग काय कामी । येईल एका ब्रह्माच्या ।।७४७।।
विभक्त्यांचा प्रयोग विविध । ब्रह्मातहि करील भेद ।
आणि तुम्ही करता वाद । ब्रह्म सर्वत्र एक हा ।।७४८।
हे म्हणणे योग्य नसे । आशयासी महत्त्व असे ।
हेतूहूनि ना राहतसे । मूल्य विभक्ति-प्रत्ययांना ।।७४९।।
घरटे बांधिले झाडावर । झाडात पक्षी करी घर ।
या दोन्हीत अंतर । अर्थदृष्ट्या काहीच ना ।।७५०।।
बापास मुलाचा लोभ फार । पित्याचे प्रेम पुत्रावर ।
निज सुताहून इतर । आवडे ना जनकासी ।।७५१।।
या तिन्ही वाक्यामधे । शब्द विभक्ति असती भेदे ।
परी उद्दिष्ट एक साधे । सर्व भाषाप्रयोगांनी ।।७५२।।
प्रसंगाने पालटे भाषा । अर्थ राही जसा तसा ।
वेगळी करता वेषभूषा । व्यक्ति निराळी होते ना।।७५३।।
विविधपणा हे काही । विरोधाचे स्वरूप नाही ।
तसेच येथे आहे पाही । विभक्तिभेदे ब्रह्म एक ।।७५४।।
वाक्यांच्या की रचनेवर । शब्दामुळे दिधल्या भर ।
व्यर्थ माजते मतांतर । म्हणोनि सावध असावे ।।७५५।।

उद्देश काय तो पहावा । विवेकाने अर्थ घ्यावा ।
आसनांच्या नावे मानवा । प्राणी अन्य म्हणू नये ।।७५६।।
कुक्कुटासन मयूरासन । गोमुखासन भुजंगासन ।
या स्थितीसी अनुसरून । तेच त्यासी न मानावे ।।७५७।।
शब्दांतरे वा विभक्ति भेदे । अर्थ भिन्न न मानणे बुधे ।
लक्ष असावे निरपवादे । आशय आणि हेतू वरी ।।७५८।।
म्हणून ज्योती शब्दाप्रमाणे । ब्रह्मपर छंदास मानणे ।
कारण ब्रह्मप्रतिपादनाविणे । तात्पर्य नाही वेदाते ।।७५९।।

प्राणस्तथानुगमात् ।

[१]-१-२८-(११)

प्राण शब्द ब्रह्मवाचक आहे; कारण संदर्भावरून
तसाच निश्चय करता येतो.

दिवोदासाचा नंदन । राजा नामे प्रतर्दन ।
युद्धी शौर्य गाजवून । देवेंद्रासी प्रसन्न करी ।।७६०।।★
इंद्र संतुष्ट जाहला । निज लोकी दे स्थान त्याला।
आणि म्हणतसे माग तुला । वर तुज जो इष्ट वाटे ।।७६१।।
प्रतर्दन म्हणे जोडून कर । मनुजा अत्यंत हितकर ।
जे असे ते सांग, वर । हाच द्यावा मजलागी ।।७६२।।
इंद्र म्हणतसे हिततम । मनुजा आहे ज्ञान मम ।
मज ओळखिता काही श्रम । होती न त्यासी केव्हाहि ।।७६३।।
मी तो प्राणस्वरूप आहे । प्रज्ञात्मा मज म्हणती पाहे ।
मानवाचे आयुष्य हे । अधीन आहे प्राणाच्या ।।७६४।।

आणि मग विस्ताराते । करून वर्णिले प्राणाते ।
ज्या बघताची वाटते । प्राण शरीरस्थ आहे हा ॥७६५॥
परी योग्य न हे वाटणे । सांगोपांग विचाराने ।
येथीलहि प्राण-शब्दाने । प्रतिपादिले ब्रह्म हेचि ॥७६६॥
एक एकामागे येणारी । वाक्ये घेतल्यास विचारी ।
होतसे तयांचे निर्धारी । पर्यवसान ब्रह्मामध्ये ॥७६७॥
आनंदरूप जरारहित । मृत्यु न स्पर्शे जयाप्रत ।
होतो सर्व पापमुक्त । मनुष्य त्याचे ज्ञान होता ॥७६८॥
हाच लोकांचा अधिपति । सर्वेश्वर त्यास म्हणती ।
हाच आत्मा हे निश्चिति । जाणून घ्यावे सर्वांनी ॥७६९॥
कर्म चांगले वाईट । ठरवी न या श्रेष्ठ कनिष्ठ ।
ही वचने लागती नीट । प्राणा ब्रह्म मानिल्याने ॥७७०॥

न वक्तुरात्मोपदेशादिति चेदध्यात्म-
सम्बन्धभूमाह्यस्मिन् ।

[१]-१-२९-(११)

वक्ता इन्द्र, प्राण हा शब्द स्वत:स उद्देशून वापरीत असल्यामुळे त्याचा अर्थ ब्रह्म घेता येत नाही असे म्हणू नये. कारण अध्यात्माच्या दृष्टीने साक्षात्कार झालेला वक्ता ब्रह्मवाचक शब्द स्वत:साठी वापरू शकतो आणि तेथे यादृष्टीने पुष्कळ वर्णन आलेले आहे.

प्राण शब्द ब्रह्मवाचक । घेता न येतसे नि:शंक ।
कारण इंद्र ही देवता एक । प्राण म्हणवी आपणासी ॥७७१॥
आत्मचरित्रहि इंद्राने । येथे सांगितले प्रौढीने ।
की मी आपल्या शौर्याने । मारिले पुष्कळ दैत्यांना ॥७७२॥

असा हा वक्ता स्वतःशी । प्राण म्हणतसे विशेषी ।
म्हणून ब्रह्म या अर्थासी । वाव येथे उरतो ना ॥७७३॥
ही शंका नसे उचित । कारण येथील अध्यात्मात ।
पुष्कळ गोष्टी केल्या ग्रथित । प्रत्यगात्म्यासी जुळती ज्या ॥७७४॥
प्रत्यगात्मा म्हणती त्याप्रति । ज्याची देहाच्या उलट स्थिति ।
तो जड भोगी दुःखाप्रति । हा तो सच्चित् सुखात्मक ॥७७५॥
परी त्याच देहाच्या ठिकाणी । यास घेता ये जाणुनी ।
त्यास जुळणारी या स्थानी । लक्षणे पुष्कळ असती की ॥७७६॥
मागच्या सूत्री ती कथिली । त्यावरोनि निश्चिती झाली ।
की प्राण शब्द याहि स्थळी । आहे वाचक ब्रह्माचा ॥७७७॥

शास्त्रदृष्ट्या तूपदेशो वामदेववत् ।

[१]-१-३०-(११)

शास्त्राच्या दृष्टीने वामदेवाप्रमाणेच इन्द्रहि साक्षात्कारी असल्याने तो तशी भाषा वापरू शकतो.

वामदेव ऋषीपरी । इंद्रहि आहे साक्षात्कारी ।
त्याने अनुभविलेसे अंतरी । मीच आहे परमात्मा ॥७७८॥
म्हणून कथितो हितसाधन । की मलाच घे जाणून ।
खरे ज्या झाले ब्रह्मज्ञान । तोच ब्रह्म म्हणे श्रुति ॥७७९॥★
जैसे ऋषी वामदेव । म्हणे मी मनु स्वयमेव ।
जाणून घ्या हे अभिनव । मीच होतो सूर्य झालो ॥७८०॥★
तैसेच इंद्रहि म्हणतसे । यात काही आश्चर्य नसे ।
अधिकार हा येतसे । ब्रह्मज्ञान झाल्यावरी ॥७८१॥

मिळविण्यासी ब्रह्मज्ञान । प्रवृत्त व्हावे म्हणून ।
इंद्र आपले मोठेपण । सांगतो, ना प्रौढीने ॥७८२॥
तत्त्वदृष्टीने इंद्र हाहि । ब्रह्माहून वेगळा नाही ।
इंद्र, वरुण यमादिहि । नावे एकाच तत्त्वाची ॥७८३॥★

जीवमुख्यप्राणलिङ्गान्नेति चेन्नोपासा-
त्रैविध्यादाश्रितत्वादिह तद्योगात् ।

[१]-१-३१-(११)

जीव आणि मुख्य प्राण यांची लक्षणे सांगितली असल्यामुळे ब्रह्मासंबंधीचे वर्णन तेथे सांगितले नाही असे म्हणू नये. कारण मग तीनहि उपासना स्वतंत्रपणे मानाव्या असा अर्थ होईल. पण तसे तर योग्य नाही. त्यातून ब्रह्मवाचक अर्थच इतरत्रहि प्राणादि शब्दातून स्वीकारला आहे असेच संबंधावरून दिसते.

जीव किंवा मुख्य प्राण । हे न ब्रह्माहून भिन्न ।
म्हणून ब्रह्माचे लक्षण । दोन्ही ठायी दृष्टी पडे ॥७८४॥
श्रुति करिते उपदेश । की ब्रह्म ते तू आहेस ।
आत्मज्ञानी घे अनुभवास । मीच ब्रह्म आहे या ॥७८५॥★
या अशा श्रुतीवरून । जीव म्हणजे ब्रह्माहून ।
कुणी आहे सर्वथा भिन्न । ऐसे कधी ठरते ना ॥७८६॥★
जीव वेगळा नसून अगदी । अज्ञान अहंकार बुद्धि ।
अशा ज्या असती उपाधि । त्याने ब्रह्म जीव भासे ॥७८७॥
मग तया ब्रह्माप्रति । कर्ता भोक्ता ऐसे म्हणती ।
तेणे वाटते काही श्रुति । वर्णन करिती जीवाचे ॥७८८॥★

उपाधीसी विसरावे । शुद्ध ब्रह्म ते ओळखावे ।
प्रत्यगात्म्याकडे लागावे । मन यास्तव सांगे श्रुति ॥७८९॥
की जाणू नये वाणीला । ओळखून घ्यावे वक्त्याला ।
परी ये ठायी जीवाला । वक्ता ऐसे मानू नये ॥७९०॥★
केनोपनिषद् की सांगते । जे वाचेने न बोलले जाते ।
परी ज्यायोगे वाचा बोलते । तेच ब्रह्म हे जाणावे ॥७९१॥★
म्हणजे ब्रह्म हाच आहे वक्ता । म्हणून त्या जाणा म्हणता ।
वेद कळे प्रतिपादिता । ब्रह्माचा, ना जीवाचा ॥७९२॥
देहामध्ये दोघे वसती । दोघे शरीरातून जाती ।
ही वचने ना भेद दाविती । प्रत्यगात्मा प्राणाचा ॥७९३॥
ज्ञान क्रिया दोन शक्ती । बुद्धि प्राण त्या आश्रय होती ।
याच दोन उपाधि असती । प्रत्यगात्म्याच्या शास्त्र म्हणे ॥७९४॥
या उपाधि आहेत भिन्न । ऐसे मानण्या विरोध न ।
परी न येते वेगळेपण । प्रत्यगात्म्यासी त्यायोगे ॥७९५॥
म्हणून म्हणणे उचित हे । की प्राण हा प्रत्यगात्मा आहे ।
यास्तव प्राण शब्दे नोहे । अर्थ वेगळा ब्रह्माहुनी ॥७९६॥
मनुष्याचे हिततम । एक हेच आहे ब्रह्म ।
वेगळा अर्थ करण्या श्रम । व्यर्थ न द्यावे बुद्धीसी ॥७९७॥
कौषीतकीचे प्रकरण । पाहिल्यासी शोधून ।
वाटते येथे कथिल्या तीन । उपासना साधकासी ॥७९८॥
पहिली जीवोपासना । प्राणोपासना दुसरी जाणा ।
योग्यता मिळविण्या आत्मज्ञाना । दे, ती तिसरी ब्रह्माची ॥७९९॥

ज्ञान मिळविण्याची पात्रता । अवश्य सत्यज्ञानाकरिता ।
दोषहीन व्हावया ज्ञाता । जीवोपासना कथिलीसे ॥८००॥
शरीर इंद्रिये कार्यक्षम । व्हावया जेवी व्यायाम ।
उपासनाहि त्याच्यासम । समर्थ करिते जीवासी ॥८०१॥
साधनाभ्यासा दीर्घकाल । निरामयपणे मिळेल ।
आयुष्य पुरेसे वाढेल । प्राणोपासना त्यासाठी ॥८०२॥
आणि जीवनाची कृतार्थता । पूर्णार्थाने साधण्याकरिता ।
वात्सल्याने श्रुतिमाता । सांगे ब्रह्मोपासना ही ॥८०३॥
या तीनहि उपासना । शेवटी होती अभिन्ना ।
कारण जीव वा प्राणांना । वेगळीक ना ब्रह्माहुनी ॥८०४॥
विषय इंद्रिये प्राण जीव । परस्परांचे होती ठाव ।
तत्त्वता ना उरतो भाव । एकावाचून एकासी ॥८०५॥
तंतूवाचून नाही पट । पटामधे तंतू स्पष्ट ।
दागिन्यासी बघता नीट । सोने दिसे ते ठायी ॥८०६॥
अवयवावाचून कधीहि । रूपाचे ते अस्तित्व नाही ।
आणि रूपावाचून काही । ओळखी ना अवयवाची ॥८०७॥
अशी कळता एकरूपता । तेथे प्रगटे ब्रह्मसत्ता ।
ब्रह्माविणे कधी वार्ता । अस्तित्वाची करिता न ये ॥८०८॥

॥ प्रथम किरण समाप्त ॥

ॐ श्रीः स्वस्ति

॥ श्रीशंकर ॥

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

## [ श्रीमद्‌ब्रह्मसूत्रटीका ]

ॐ श्रीः स्वस्ति

## प्रथमाध्याय

### किरण दुसरा

सर्वत्र प्रसिद्धोपदेशात् ।

[१]-२-१-(१)

निरनिराळे शब्द वापरले असले तरी वेदात सगळीकडे प्रसिद्ध असलेल्या एका ब्रह्माचाच उपासनेसाठी योग्य म्हणून उपदेश केला आहे.

शब्दरचना वेगळी होई । तरी तात्पर्य श्रुतीठायी ।
सर्वत्र एक दिसोन येई । ब्रह्माचीच प्रसिद्धि त्या ॥१॥

ज्या ब्रह्माचे वर्णन । करीतसे पहिला किरण ।
तेथ जगताचे कारण । म्हणोनि स्पष्ट केले ते ॥२॥

तशीच त्याची लक्षणे । सांगितली गौरवाने ।
नित्य सत्य सर्व जाणे । सर्व व्यापक सर्वशक्ति ॥३॥

अशा या ब्रह्मास सोडुनी । अन्य उपास्य कोण मानी ।
भिन्न शब्द प्रयोगांनी । फसून दुजे मानू नये ।।४।।
एखादा शब्द असा येतो । जो ब्रह्माहून अन्या जुळतो ।
तरी काय सोडावा तो । विचार तारतम्याचा ।।५।।
तांदळाच्या ढिगात । कण्या काही राहतात ।
म्हणोनि का म्हणता येत । की ही राशी कण्यांची ।।६।।
शास्त्रे सर्व उपासना । ब्रह्माच्याच कथिल्या जाणा ।
त्याच योगाने जीवांना । निज उद्धार साधिता ये ।।७।।
करितांना उपासना । शांत ठेवावे लागे मना ।
ते साधण्या प्रत्यन नाना । करावे लागती जीवासी ।।८।।
मनाचा साधण्या शम । इंद्रिया शिकविणे दम ।
त्याचेसाठी निर्मम । करावे लागे वृत्तीसी ।।९।।
चित्ती जडता ईशभक्ति । विषयी सुटते आसक्ती ।
विषयाची सरता ओढ ती । निर्ममता येते मना ।।१०।।
ईश्वराचे ऐकून गुण । भक्ति होतसे उत्पन्न ।
भक्तीठायी भाग दोन । आदर तेवी प्रेम असे ।।११।।
अलौकिक मोठेपणा । वाढवी आदर भावना ।
परी जवळिक वाटल्याविना । प्रेम उत्पन्न होते ना ।।१२।।
सर्वशक्ति करुणामय । सर्वकाम मनोमय ।
ऐसे गुण ऐकता होय । जवळिकेची निर्मिती ।।१३।।
माझ्यासाठी हा काही । करील असा विश्वास येई ।
यासाठी जोडला जाई । माझा संबंध त्याच्याशी ।।१४।।

म्हणोनिया भगवान वेद । सांगे ब्रह्माचे गुणभेद ।
सर्व जगाठायी प्रसिद्ध । ब्रह्म व्हावे या विचाराने ॥१५॥
पिता विद्वान पंडित । न्यायी सरळ कीर्तिमंत ।
परी ओढ वाटे लेकराप्रत । स्नेहशील असल्यास तो ॥१६॥
आता रचोनि तर्कट । स्नेहशील म्हणजे ओशट ।
हीच मानूनि खरी गोष्ट । साबण आणण्या जावे का ॥१७॥
शरीराचे अवयव । मन, बुद्धि, प्राण, भाव ।
त्यांच्या उपासना अभिनव । शास्त्र सांगे नानापरी ॥१८॥
येथ प्रधानता ध्यानासी । ते न साधते सर्वांसी ।
म्हणून उपासना भेदासी । कथिले भिन्न प्रकाराने ॥१९॥
चिंतन, यजन, पूजन । भजन, कीर्तन, नामस्मरण ।
वंदन, दास्य भावे करून । सेवा नानाप्रकारची ॥२०॥
परी या उपासनेप्रति । पुढे प्रत्यक्ष लागे मूर्ति ।
याचसाठी कथिली महती । संत, सद्गुरु, देवतांची ॥२१॥
परंतु ब्रह्माची भावना । तेथ कधी सोडिली ना ।
परब्रह्म म्हणुनी नमना । केले संत सद्गुरूसी ॥२२॥
नामे रूपे देवतांची । साधने पूजा प्रकारांची ।
पाहू जाता विविधतेची । परी अंतरी भाव एक ॥२३॥
गाणपत्य अथवा शैव । सूर्योपासक वा वैष्णव ।
देवीस मानिती सर्वस्व । असे भाविक वेगळाले ॥२४॥
परी प्रत्येक निजमती । आपुलाल्या देवतेप्रति ।
सर्वाहून श्रेष्ठ अति । मानीतसे शुद्ध-भावे ॥२५॥

आपुली देवता सर्वशक्ति । करी जगताची उत्पत्ति ।
स्थिति आणि लयाप्रति । तीच कारण मानीतसे ॥२६॥
तिलाच सर्व काही कळते । भक्तासाठी धावून येते ।
मनोरथांना पुरविते । दूर पळवी संकटांना ॥२७॥
प्रसन्न होतसे भक्तीने । जवळ घेई वात्सल्याने ।
अशी ही सर्व वर्णने । आशय बघता एकरूप ॥२८॥
म्हणून शुद्ध उपासनेसाठी । प्रकार तिचे असोत काही ।
ब्रह्माविण दुसरे नाही । हेच येते प्रत्ययासी ॥२९॥
कथिल्या लक्षणांचा विचार । सांगोपांग केल्यावर ।
कळे ब्रह्म हे त्याचे सार । ब्रह्म नाव असो नसो ॥३०॥

विवक्षितगुणोपपत्तेश्च ।

[१]-२-२-(१)

ग्राह्य असल्यामुळे सांगावयास योग्य अशा सर्व गुणांची उपपत्ति एका ब्रह्माच्याच ठिकाणी संभवत असल्यामुळे उपास्य म्हणून सांगितलेल्या सर्व ठिकाणी ब्रह्मच घेणे योग्य आहे.

''जे ग्राहय आहे'' या रीती । शब्द-बलाने सांगती ।
त्यास विवक्षित ऐसे म्हणती । लोकांमधे सामान्यतः ॥३१॥
चांगले हिताचे आवडीचे । जे जे काही उपयोगाचे ।
वा जे काही महत्त्वाचे । वाटते खऱ्या भावाने ॥३२॥
मग त्याची रूपाकृति । सुखाने असो कोणती ।
विविधताहि असो किती । गुणांची वा लक्षणांची ॥३३॥

प्रामाणिकता शुद्ध भाव । प्रेम निष्ठा अपूर्व ।
क्षुद्र स्वार्थी नसता वाव । सर्व लागते ब्रह्मपर ॥३४॥
परब्रह्म वा परमात्मा । भूतयोनि आकाशात्मा ।
पापापासून मुक्तात्मा । सत्यसंकल्प, सत्यकाम ॥३५॥
सर्वज्ञ, सर्वव्यापक । सर्वशक्ति, अलौकिक ।
निराकार, निष्कलंक । निर्गुण, निष्कल, निर्मम ॥३६॥
अणूहून असे लहान । हा थोर ब्रह्मांडाहून ।
सच्चिदानंद परिपूर्ण । भक्तवत्सल दयानिधि ॥३७॥
अवयव ना मुळी त्यासी । धरी सहस्र मस्तकासी ।
याते सर्वहि दिशांसी । हात, पाय, नेत्र, मुखे ॥३८॥
याला कान चोहोकडे । हा शोधून ना सांपडे ।
कल्पना शब्दांचे वावडे । आहे याच्या स्वरूपाते ॥३९॥
हा डोळ्यासी ना दिसतो । डोळा याच्यामुळे पाहतो ।
मनबुद्धीसी ना लागतो । पत्ता याच्या स्वरूपाचा ॥४०॥
सूक्ष्म बुद्धीसी हा दिसे । भक्तजनांचे याल पिसे ।
आपुला ज्यासी म्हणतसे । त्याच्यापुढे प्रगट होई ॥४१॥
याचे रूप मनोहर । कृपाळू याचे अंतर ।
दुर्जनांना ठेवी दूर । धरीत हृदयी संतांसी ॥४२॥
सुखकर्ता दुःखहर्ता । सर्व काही कर्ता, भोक्ता ।
चरणी शरण आल्या आर्ता । उपेक्षेने वागवी ना ॥४३॥
हा सर्वत्र सर्वठायी । सर्व भूतांच्या वसे हृदयी ।
मागूनिया आवडी खाई । प्रेमभातुके भक्तांची ॥४४॥

असून अरूप अनाम । याचे असे सहस्रनाम ।
भक्तजनांचे पुरवी काम । पूर्णकाम असे स्वये ।।४५।।
हा विश्वाचा नियंता । वेडा होतो भक्तांकरिता ।
निराकार हा तत्त्वता । प्रेमळासाठी रूपे धरी ।।४६।।
अजे दुजे यासी नाही । रागद्वेष नसे काही ।
तरी नाना अवतार घेई । संता, धर्मा, रक्षिण्यासी ।।४७।।
हा हरीतसे पातक । हा दुष्टांचा विनाशक ।
नीति नियमांचा संरक्षक । वेळोवेळी होत हाचि ।।४८।।
ऐशी ही विविध वर्णने । करिते शास्त्र आनंदाने ।
ती सर्व ब्रह्मकारणे । शोभती, ठरती, यथार्थ ।।४९।।
यात नाही विसंगति । वाव नाही विरोधाप्रति ।
विविधतेने विलसे शक्ति । सर्व समर्थ ब्रह्माची ।।५०।।
साक्षात्कारी संतजन । ऐसेच करिती वर्णन ।
जेणे होती पावन । जीव नाना योग्यतेचे ।।५१।।
तुम्ही जे जे काही बोला । ते ते शोभते विठ्ठलाला ।
ऐसे प्रेमभावे गर्जला । सद्गुरु श्रीतुकाराम ।।५२।।

अनुपपत्तेस्तु न शारीरः ।

[१]-२-३-(१)

परंतु तसे सर्वधर्म, शारीर असा जो जीवात्मा त्याचे ठिकाणी जुळत नसल्याने जीवास उपास्य म्हणू नये.

शरीराच्या आश्रयाने । ज्याचे असे राहणे ।
ज्यास त्याच उपाधीने । जीवात्मा ऐसे म्हणताती ।।५३।।

त्यास ब्रह्माचे सर्व गुण । मुळी न येती जुळून ।
म्हणून शास्त्रोक्त वर्णन । जीवात्म्यासी लागू नसे ।।५४।।
जरी म्हटले मनोमय । प्राण असे त्याचा काय ।
तरी तितुके ना पुरे होय । जीव असा अर्थ घ्यावा ।।५५।।
येथे कथिली उपासना । ती ब्रह्माविणे होई ना ।
मुमुक्षूचे असावे ना । उपास्य क्षुद्र केव्हाहि ।।५६।।
उपास्य क्षुद्र नसावे । क्षुद्र भावाने न भजावे ।
स्वार्थ सारे त्यजावे । तरी घडते उपासना ।।५७।।
उदात्त उन्नत हितकर । मंगल जे जे श्रेयस्कर ।
अशाच गोष्टीचा स्वीकार । केल्या साधे उपासना ।।५८।।
शरीर एक साधन । महत्त्व त्याचे न याहून ।
त्यासी साध्य म्हणून । मानू नये केव्हाहि ।।५९।।

कर्मकर्तृव्यपदेशाच्च ।

[१]-२-४-(१)

कर्म आणि कर्ता म्हणजेच उपास्य आणि उपासक
अशा रीतीचे वर्णन येत असल्याने जीवात्मा उपास्य
ठरत नाही; तो उपासक ठरेल.

राहूनिया सदाचरणी । उपासनेच्या बळांनी ।
सुटता या शरीरातुनी । ब्रह्मा प्राप्त होईन मी ।।६०।।★
या छांदोग्याच्या वचनात । जीव कर्ता निश्चित ।
स्वाभाविकपणे येत । कर्मत्व ते ब्रह्माकडे ।।६१।।

जीव उपासनेचा कर्ता । आहे हे स्पष्ट दिसता ।
त्यास बळे कशाकरिता । उपास्य ऐसे मानावे ॥६२॥

शब्दविशेषात् ।

[१]-२-५-(१)

शब्द वेगळे असल्यामुळेहि उपासक जीवात्मा आणि
उपास्य ब्रह्म असेच मानले पाहिजे.

श्रुतीत आली एक उपमा । ज्यावरून जीव परमात्मा ।
भिन्न हे कळे जोवर सीमा । असे साधक अवस्थेची ॥६३॥
व्रीहि, यव वा श्यामाक । आत वरी तुसाची झाक ।
तसा हिरण्मय पुरुष एक । अंतरात्म्यात राहतो ॥६४॥★
ज्यात राहतो जो रहातो । या दोहीत भेद असतो ।
यांचा उलगडा सहज होतो । सप्तमीच्या प्रयोगाने ॥६५॥
ज्यात रहातो तो जीव । जो राहतो तो शिव ।
शिव हे ब्रह्माचेच नाव । मांडूक्याने कथिलेले ॥६६॥★
म्हणोनि छांदोग्याची वचने । दृढ धरावी उपासकाने ।
जीव परमात्मा भेदाने । जव ना तो सिद्ध झाला ॥६७॥

स्मृतेश्च ।

[१]-२-६-(१)

मनुस्मृति, गीता यांच्यावरूनहि तसेच दिसून येते.

दिसून येते स्मृतीवरून । की जीव ईश्वर हे दोन ।
म्हणोनि छांदोग्याचे वचन । जीवपर लावू नये ॥६८॥★

न्यायाधीशासन्मुख । साक्षीस येता कुणी एक ।
सावध राहाण्या त्यासी भाक । देत असे मनुस्मृति ॥६९॥
भल्या माणसा ! तू आपणासी । एकटा आहे मानिसी ।
मी करीन त्या कृत्याशी । कोण आहे पाहणारा ॥७०॥★
माझे कृत्य खरे खोटे । चांगले वा ओखटे ।
गुप्त राहील हे जे वाटे । तो आहे तुझा भ्रम ॥७१॥
मौन धरून तुझ्या हृदयी । परमात्मा नित्य राही ।
पुण्य, पापे तुझी पाही । सर्वदा तो दक्षतेने ॥७२॥
जीवेश्वरांचा हा भेद । गीतेतहि आहे प्रसिद्ध ।
जीवा करून यंत्र-बद्ध । ईश मायेने फिरवी त्या ॥७३॥★
सर्व भूतांच्या हृदयात । ईश्वर हा वास करित ।
ऐसेहि कथिले तेथ । श्रीमद्भगवद्गीतेने ॥७४॥
ईश्वराने जीवाप्रति । आपुली मानिली प्रकृति ।
यावरून होते निश्चिति । जीव ईशाच्या भिन्नतेची ॥७५॥★
येथे शंका येते उरी । की अद्वैत मतांतरी ।
जीव ईश भेदावरी । ऐसा नसावा आग्रह ॥७६॥
छांदोग्याच्या वर्णनी । जीव घेता ब्रह्मस्थानी ।
अद्वैताची तरी हानी । काही नसे होणारी ॥७७॥★
मग हा वाद कशास्तव । ही शंका ना उचित लव ।
जीव मानणाऱ्याचा भाव । तरी कुठे अद्वैताचा ॥७८॥
तोहि ब्रह्म टाकून । जीवपर घ्यावे वचन ।
ऐसाच आग्रह धरून । बसलेला आहे ना ॥७९॥

मग अद्वैताची होते हानी । ऐशी का वदावी वाणी ।
पटवून देता आग्रहांनी । ब्रह्म घेणे योग्य आहे ॥८०॥
अद्वैताच्या मतांनी । जीव ब्रह्म एक दोन्ही ।
अनुभवले हे महात्म्यांनी । साक्षात्कार बळावरी ॥८१॥
परी ब्रह्मज्ञान जोवरी । झाले नाही सर्वतोपरी ।
जाणीव नित्य नांदते उरी । आपुल्या वेगळेपणाची ॥८२॥
मी ज्ञानी वा अज्ञानी । मी श्रेष्ठ वा कनिष्ठ कुणी ।
मी सुखांनी वा दुःखांनी । व्यापिलेला, जगत आहे ॥८३॥
मी आहे संकटात । माझे कोणी करावे हित ।
सत्ता, कीर्ति वैभवाप्रत । मेळवीन मी कर्तृत्वे ॥८४॥
हा शत्रू हा माझा मित्र । हा मुलगा, हे कलत्र ।
'हवे नको' चे सर्वत्र । भान जागृत असे ज्याचे ॥८५॥
याचा मजसी तिरस्कार । हे मजसी आवडे फार ।
हे तो जवळ, हे की दूर । याची उपेक्षा मज ठायी ॥८६॥
हे ऐसे भाव भिन्न । चंचल तेणे सदा मन ।
जोवरी ना समाधान । कोणत्याहि स्थितीमध्ये ॥८७॥
तोवरी जीव ब्रह्म वेगळे । मानून वागणे इष्ट भले ।
जोवरी ना नष्ट झाले । अहंपणाचे अज्ञान ॥८८॥
देहेंदिय मनबुद्धि । यांची लागता उपाधि ।
परमात्माहि वाटे बंदी । जीवपणाच्या भ्रांतीने ॥८९॥
हीच भ्रांति संसारी । दुःखाची निर्मिती करी ।
कर्ता भोक्ता ऐशापरी । अहंतेसी जन्म देई ॥९०॥

या भ्रमासी घालवावया । शास्त्रे कथिती उपाया ।
उपासना करावया । सांगती ती साधकासी ॥९१॥
परी या उपासनेठायी । उपास्य असावे श्रेष्ठ पाही ।
अन्यथा ना कधी होई । प्रगति ती साधकांची ॥९२॥
म्हणून तत्त्व सांगतांना । वा कथिता उपासना ।
निरनिराळ्या माध्यमांना । घेऊन ब्रह्म वानी श्रुति ॥९३॥
होण्यापूर्वी आत्मज्ञान । जीव ब्रह्म मानणे भिन्न ।
यात काही विरुद्ध न । थोडे इष्ट ठरते ते ॥९४॥
''तत्त्वमसि'' या बोधाने। 'अहं ब्रह्मास्मि' जाणिले जेणे।
''सर्वं खल्विदं'' ब्रह्मज्ञाने। साक्षात्कारी जाहला जो ॥९५॥★
त्याचे व्यवहार थांबती । बंध, मोक्ष ही फिटे भ्रांति ।
त्यासी वाद चर्चा ती । कोण जाई करावया ॥९६॥
जोवरी न तसे झाले । तोवरी साधकाने भले ।
हित साधावया आपुले । जाणून घ्यावे खरे काय ॥९७॥

अर्भकौकस्त्वात्तद्व्यपदेशाच्च नेति
चेन्न निचाय्यत्वादेवं व्योमवच्च ।

[१]-२-७-(१)

निवासाचे स्थान हृदयासारखे संकुचित सांगितले असल्याने त्यात राहणारा तो मर्यादित असा जीवात्माच घेतला पाहिजे; व्यापक असा परमात्मा घेता येणार नाही, असे म्हणू नये. कारण परमात्माच ध्येय आहे आणि ध्यानासाठी त्याचे स्थान लहान सांगितले आहे. आकाशाप्रमाणे हे समजावे.

आत्मा राहतो हृदयात । हा आधार मर्यादित ।
मग येथे ब्रह्माप्रत । का घ्यावे ते सर्वव्यापी ॥९८॥

जीव आहे लहान । व्रीहि किंवा यवाहून ।
तयाचे ते सूक्ष्मपण । अंकुशाच्या टोकापरी ॥९९॥
राहण्याची हृदयस्थान । जीवासीच दिसे शोभून ।
परमात्म्याचे मोठेपण । विश्वापेक्षा थोर असे ॥१००॥
परी ऐसे ना म्हणावे । भाव येथले जाणून घ्यावे ।
व्यापक व्यापकपणे असावे । सर्वत्र हेचि योग्य आहे ॥१०१॥
जे सर्वत्र आहे नांदत । तेच राहते हृदयात ।
ऐसे सांगता दोष त्यात । काही नाही, सोय होते ॥१०२॥
गावावरी सत्ता भली । असून म्हणे माझी खोली ।
ते कळता सोय झाली । त्या धन्यासी भेटण्याची ॥१०३॥
ज्याची सर्व पृथ्वीवरती । सत्ता, तया रामाप्रति ।
म्हणताचि अयोध्यापति । दोष जैसा लागतो ना ॥१०४॥
तैसेच या परमात्म्यासी । राहे म्हणता हृदयदेशी ।
तयाच्या व्यापकपणासी । बाध काही येतो ना ॥१०५॥
उलट ईश्वराचे दर्शन । होण्यासी मिळे साधन ।
हृदयकमलाचे आसन । देता ईशा बसावया ॥१०६॥
हृदयरूपी कमलावरी । ईशा स्थापून आदरी ।
एकाग्र होऊन अंतरी । ध्यान त्याचे केल्यासी ॥१०७॥
प्रसन्न होतो भगवान । भक्तास देई दर्शन ।
ईश्वराचे हृदयस्थान । यास्तव कथिले शास्त्राने ॥१०८॥
मनुष्याते राहण्यासी । अवकाश हवा निश्चयेसी ।
तो भरलासे आकाशी । परी न तेथे राहता ये ॥१०९॥

राहण्यासाठी घर । बांधावे लागे खरोखर ।
तैसे हृदयाचा आधार । ध्यानासाठी उपयोगी ॥११०॥

संभोगप्राप्तिरिति चेन्न वैशेष्यात् ।

[१]-२-८-(१)

निर्ममत्व हे परमात्म्याचे वैशिष्ठ्य असल्यामुळे हृदयात
राहूनहि जीवाप्रमाणे त्याला भोग भोगावे लागत नाहीत.

जीवात्मा हृदयात राहतो । सुखदुःखाचा भोग घेतो ।
कर्ता भोक्ता तोच असतो । त्याने केल्या कर्मांचा ॥१११॥
परमात्म्याची विशेषता । हीच आहे तत्त्वता ।
जीवाप्रमाणे तो न कर्ता । देहादींच्या कर्मांचा ॥११२॥
म्हणून राहून हृदयीहि । भोगाचा त्यासी संबंध नाही ।
ममत्वाविण कुणासहि । लेप न लागे भोगाचा ॥११३॥
एका घरात जे राहती । ते परस्पर दुःखे भोगिती ।
धर्मशाळेत असता वसति । स्वतंत्र आहे ज्याचा तो ॥११४॥
जीव देहामध्ये राही । आसक्ति असे त्याच्या ठायी ।
ईश व्यापक त्यास नाही । ममत्व ऐसे देहाचे ॥११५॥
या विषयामुळे त्याला । लागे न काही भोगायाला ।
श्रुतीनेहि आहे कथिला । विचार हाचि स्पष्टपणे ॥११६॥
संसाररूप एका वृक्षी । बसले असती दोन पक्षी ।
एक त्यातला फळे भक्षी । अन्य तेजस्वी खात नाही ॥११७॥
फळ खाणे हे आसक्तीचे । स्वरूप जीवरूपी पक्ष्याचे ।
न खाणे हे परमात्म्याचे । निर्ममतेचे लक्षण ॥११८॥

जीव-ईशाची एकता । मुळामध्ये सिद्ध असता ।
एक तेवढा होतो भोक्ता । भ्रमाने हे पटे कसे ?॥११९॥
याचे त्या उत्तर मिळेल । वेड्याकडे जो पाहील ।
त्याच्या वागण्याचा करील । नीटपणे विचार जो ॥१२०॥
काही एक भ्रम चित्ती । धरीतसे वेडी व्यक्ति ।
आणि तेवढ्या पुरतीच ती । विक्षिप्त वागे खुळेपणे ॥१२१॥
त्याचे इतर वागणे । असे सामान्याप्रमाणे ।
खाणे, पिणे वा झोपणे । सरळ साधे राहते की ॥१२२॥
एक बुद्धि, एक मन । वेड्याठायी असून ।
भिन्न होतसे वर्तन । एक साधे, एक खुळे ॥१२३॥
तैसेच जीवात्मा जोवरी । भ्रांतीने अहंता धरी ।
तोवर भोगी फळे सारी । ईश्वर त्यासी स्पर्शतो ना ॥१२४॥

अत्ता चराचरग्रहणात् ।

[१]-२-९-(२)

भक्षण करणारा म्हणून सांगितला तो परमेश्वरच आहे. कारण स्थावर आणि जंगम असे सर्व विश्व तो भक्षण करतो असे सांगितले आहे. हे सामर्थ्य अन्याचे संभवत नाही.

कठवल्ली भीतरी । नचिकेता यमा विचारी ।
चर्चाविषय असती भारी । आग्नि, जीव, परमात्मा ॥१२५॥
तेथे ऐसे केले विधान । की क्षत्रिय आणि ब्राह्मण ।
दोघे ज्याचे आहेत अन्न । तोंडी लावणे मृत्यू ज्या ॥१२६॥★
तो कोठे कसा राहतो । हे कोण जाणू शकतो ।
येथे जो हे अन्न खातो । तो जाणावा परमात्मा ॥१२७॥

येथे क्षत्रिय वा ब्राह्मण । हे केवळ उपलक्षण ।
ईश्वर अंती भक्षण । करी स्थावरजंगमाचे ॥१२८॥
प्रलयकालीची ही कृति । येणे कळे त्याची शक्ति ।
भीषण मृत्यू ज्याचे पुढती । चटणीपरी झालासे ॥१२९॥
असामान्य सामर्थ्य हे । ब्रह्माविणे अन्या नोहे ।
भक्षणकर्ता येथ आहे । निश्चयाने परमात्मा ॥१३०॥

**प्रकरणाच्च ।**

[१]-२-१०-(२)

प्रकरणांवरूनहि खाणारा हा ईश्वर हेच लक्षात येते.

चर्चेतले अग्नि जीव । यांचा न येथे संभव ।
सामर्थ्य त्यांचे नसे लव । मरण तोंडी लावण्याचे ॥१३१॥
त्यातून चालले प्रकरण । आत्म्यासीच उद्देशून ।
ज्याचे कथिले लक्षण । महान् व्यापक शब्दांनी ॥१३२॥★
या आत्म्यास जाणणे । दुष्कर फार वेद म्हणे ।
तो न लाभे प्रवचने । मेधा येथे हात टेकी ॥१३३॥
करून पुष्कळ श्रवणासी । मिळविता न ये आत्म्यासी ।
आत्मा आपुला म्हणे त्यासी । त्यासीच त्याचा लाभ होतो ।१३४★
आपुले स्वरूप ईश्वर । प्रगट करी भक्तासमोर ।
स्वये होऊन, ज्याचा पार । लागणे कठीण यत्नाने ॥१३५॥★
सर्व अंगाने आपुली । योग्यता ज्याने वाढविली ।
त्यासीच लाभे कधी काळी । संधी आत्मदर्शनाची ॥१३६॥

ज्याची बुद्धि ना स्थिरावली । चित्ता न शांती लाभली ।
आसक्ति वा विषयातली । जागृत ज्याची सर्वथैव ।।१३७।।★
निषिद्ध कर्मातून दूर । राहे न ज्याचे शरीर ।
त्यास कोठून लाभणार । योग्यता आत्मप्राप्तीची ।।१३८।।
शब्दज्ञान बळावरी । आत्मप्राप्ती न होणारी ।
साधक हवा निरहंकारी । शुद्धवर्तनी निष्काम ।।१३९।।
आत्मलाभाची या रीती । गायिलीसे थोर महती ।
याच्याचपुढे सांगे श्रुति । भक्षण स्थावरजंगमाचे ।।१४०।।
यावरून कळून येते । जो अन्न करी सर्वांते ।
निश्चयाने सामर्थ्य ते । आहे एका ईश्वराचे ।।१४१।।

गुहां प्रविष्टावात्मानौ हि तद्दर्शनात् ।

[१]-२-११-(३)

हृदयरूपी गुहेमध्ये निवास करीत असलेले ते दोघे म्हणजे जीव आणि ईश्वरच आहेत. कारण चेतनत्वामुळे तसे एकजातीय मानणे योग्य आहे.

सुकृतलोकी स्थान श्रेष्ठ । गुहा जी हृदयरूपे स्पष्ट ।
तेथे होऊन प्रविष्ट । पान करिती ऋताचे जे ।।१४२।।★
ते कोण आत्मे दोन । असा पुढे येता प्रश्न ।
त्याचे उत्तर हेच मान । जीवात्मा नि परमात्मा ।।१४३।।
येथे ऋत म्हणजे कर्मफळ । ते जीव भोगतो केवळ ।
साहचर्य ते निव्वळ । आहे तेथे ईशाचे ।।१४४।।
या साहचर्यावरून । ऋताचे तो करी पान ।
ऐशी समजूत करून । घेतली ती खरी नाही ।।१४५।।

हे वर्णन कठातले । नचिकेत्या जे यमे कथिले ।
ज्या निमित्ते बोधियेले । स्वरूप जीव ब्रह्माचे ॥१४६॥★
देहधारी माणसाविण । ही जिज्ञासा करी कोण ।
नरदेहाचे मोठेपण । दाविले सुकृत शब्दाने ॥१४७॥
दोघांची त्या रूपे कथिली । जैशी ऊन आणि सावली ।
ही उपमा असे दिधली । ब्रह्मज्ञानी पुरुषांनी ॥१४८॥
तैसेच ज्यांनी तीन वेळ । चयन करुनिया अनल ।
पाच प्रकारे उज्ज्वल । अग्निहोत्रे सांभाळिली ॥१४९॥
तेहि तपस्वी गृहस्थजन । यांना म्हणती सावली-ऊन ।
परी ऋताचे करिती पान । ही तो सामान्य लोकोक्ति ॥१५०॥
ज्यांनी आधी ऐकिले । नंतर समजून घेतले ।
मग ते पुरे आणिले । आचरणात निष्ठेने ॥१५१॥
ऐशी चयने असती तीन । ती ज्यांनी साधिली पूर्ण ।
काय करावे वर्णन । मग त्यांच्या थोरवीचे ॥१५२॥
असे तपस्वी ब्रह्मवेत्ते । यांची ग्राह्य असती मते ।
म्हणून न घ्यावे शंकेते । निश्चये हे जीव ईश ॥१५३॥

विशेषणाच्च ।

[१]-२-१२-(३)

त्यांना दिलेल्या विशेषणांवरूनहि ते जीव नि परमात्मा आहेत, हे लक्षात येते.

गुहेमध्ये प्रवेशलेले । ईश-जीव दोन भले ।
हे कळोनि ये चांगले । विशेषणांनी त्यांना दिल्या ॥१५४॥

त्याचे सांगता स्वरूप । म्हटले छाया आतप ।
छाया हा केवळ आरोप । ती न वस्तू उन्हापरी ॥१५५॥
ऊन जेव्हा सरळ पडते । तेव्हा सावली कधी न दिसते ।
काही तरी मधे येते । तेव्हा भास सावलीचा ॥१५६॥
तेवी ईश प्रकाशतो । अहंकार मधे येतो ।
तेणे वेगळा भासतो । ईशापेक्षा जीवात्मा ॥१५७॥
कठांत वा इतरत्रहि । विशेषणा उणीव नाही ।
ज्याच्यामुळे कळून येई । स्वरूप जीव ब्रह्माचे ॥१५८॥★
जीवास म्हटले असे रथी । देह हा रथ निश्चिति ।
जेथे जाणे त्या स्थलाप्रति । पद म्हटले विष्णूचे ॥१५९॥★
जो जुन्यामध्ये जुना । प्रसिद्ध त्याचा गुप्तपणा ।
गुहेत जवळ असता कुणा । पाहणे त्या कठीण झाले ॥१६०॥★
परी शरीरा योगसाधनी । लावून त्याच्या बळांनी ।
धीर पुरुष जाणुनी । घेती तया ईश्वरासी ॥१६१॥
आणि त्याच्या बळावर । होती हर्ष-शोकातून पार ।
उघडपणे येथे विचार । कथिला जीव ब्रह्माचा ॥१६२॥
गूढ दुर्दर्श पुराण । हे ब्रह्माचे विशेषण ।
साधक जीवा लागून । धीर असे म्हटले इथे ॥१६३॥

अन्तर उपपत्तेः ।

[१]-२-१३-(४)

नेत्राच्या आत असणारा जो पुरुष म्हणून सांगितला आहे.
तो परमात्माच आहे, कारण पुढे सांगितलेले धर्म,
परमात्म्यालाच जुळणारे आहेत.

डोळ्यात राहतो तो पुरुष । तो ब्रह्म एक निर्विशेष ।
तर्का देऊन अवकाश । इतर काही मानू नये ।।१६४।।★
ते न प्रतिबिंब, ना तो जीव । नेत्रदेवता, ना सूर्यदेव ।
तसे मानण्या नाही वाव । छांदोग्याच्या मंत्रामधे ।।१६५।।
तेथील वर्णनाची उपपत्ति । सांगे एक ब्रह्माप्रति ।
तेच एक सर्व जगती । अमृत वा निर्भय असे ।।१६६।।
प्रकाशतो पूर्णपणी । म्हणून म्हटले भामनी ।
कर्मफल दे या कारणी । वामनी त्यासी संबोधिले ।।१६७।।
म्हटलेसे संयद्वाम । ते तो ब्रह्माचेच नाम ।
फळे जी देतसे कर्म । त्यातील श्रेष्ठ मिळती या ।।१६८।।
माधुर्याचा जो निधि । सौंदर्याचा असे उदधि ।
मागण्यायोग्य निरवधि । संयद्वाम आहे हा ।।१६९।।
अमृत, भामनी, वामनी । संयद्वामादि विशेषणी ।
एका परब्रह्माहुनी । अन्य काही घेता नये ।।१७०।।

स्थानादिव्यपदेशाच्च ।

[१]-२-१४-(४)

नेत्र इत्यादि स्थाने ध्यानासाठी सांगितली जातात.

परमेश्वराच्या व्यापकतेशी । नेत्र हे स्थल अल्प ऐशी ।
शंका न धरावी चित्तासी । श्रुतीची ती रीत आहे ।।१७१।।
पृथ्वी, जल, तेज, अग्नि । इत्यादि विविधस्थानी ।
परमात्मा राहतो म्हणोनि । सांगितलेसे वेदाने ।।१७२।।★

हृदयादि अवयव । तेथे ब्रह्माचा कथिला ठाव ।
त्यात नेत्राचेहि घेतले नाव । स्थान म्हणून ब्रह्माचे ॥१७३॥
उपासनेच्या सोयीसाठी । वेद करी अशा गोष्टी ।
जैसी विष्णुमूर्ति गोमटी । भाविती शालिग्रामामधे ॥१७४॥
अव्यक्त, अचिंत्य असे ब्रह्म । श्रुति वर्णिते रूप नाम ।
साधकांचे साधते काम । सगुण ब्रह्म बोधाने ॥१७५॥
उल्लेखिले विशिष्ट स्थान । हे न तत्त्वा सोडून ।
स्वच्छ सुंदर असे नयन । स्थल साजते ब्रह्मासी ॥१७६॥

सुखविशिष्टाभिधानादेव च ।

[१]-२-१५-(४)

सुखाने युक्त आहे असे सांगितले असल्यामुळे नेत्रस्थ पुरुष हा परमात्माच आहे.

ब्रह्म सुखाने असे युक्त । आनंद त्याचे रूप सत्य ।
जे सर्वथा असे अतीत । शोक मोह क्षुधादींच्या ॥१७७॥★
शरीराची वा मनाची । दुःखे न त्या स्पर्शावयाची ।
श्रुति पटवी ओळख त्याची । सांकेतिकशा शब्दाने ॥१७८॥
उपकोसला म्हणे अग्नि । 'कं' हेचि ब्रह्म जाणी ।
तसेच घ्यावे ओळखोनि । 'खं' हेचि ब्रह्म आहे ॥१७९॥★
'कं' शब्दाचा अर्थ सुख । 'खं' हे आकाशवाचक ।
दोन्ही मिळून अलौकिक । सुख-पूर्ण ब्रह्म दाविती ॥१८०॥
'कं खं' चा भाव सगळा । उपकोसला नसे कळला ।
तेव्हा अग्नि त्यास वदला । गुरु दावील मार्ग तुज ॥१८१॥

त्याने विचारिले गुरूशी । गुरु म्हणे सांगेन तुशी ।
जे कळता माणसाशी । संबंध नुरे पापाचा ॥१८२॥
जेवी पाण्यात राहून । कमळाचे न भिजे पान ।
नंतर गुरूने वर्णन । केले नेत्रस्थ पुरुषाचे ॥१८३॥★
वर्णनाची सलगता । नीटपणे लक्षात घेता ।
'कं खं' शब्दे सुखरूपता । वर्णिली ज्या ब्रह्माची ॥१८४॥
तेच ब्रह्म नेत्राते । पुरुष रूपाने नांदते ।
हे सहज लक्षात येते । विचाराने पाहिल्यासी ॥१८५॥

श्रुतोपनिषत् कगत्यभिधानाच्च ।

[१]-२-१६-(४)

ब्रह्मज्ञानी पुरुषाला प्राप्त होणारा, उपनिषदांनी सांगितलेला जो देवयानमार्ग, तोच नेत्रस्थ पुरुषास जाणणाऱ्यालाहि लाभतो; असे सांगितले असल्यामुळेहि नेत्रस्थ पुरुष परमात्माच होय.

ब्रह्मासंबंधीचे हे ज्ञान । त्याचे जया घडले श्रवण ।
अंती त्या निश्चये करून । सद्‌गतीची प्राप्ति होई ॥१८६॥
अग्निशुक्लादि नावाने । वर्णिले ज्या गीतेने ।
त्याच मार्गाकारणे । देवयान म्हणे श्रुति ॥१८७॥★
विद्या ब्रह्मचर्य तप । उपास्यावरी श्रद्धा अमूप ।
योग बळाने आत्मरूप । ध्याती चित्ती अहर्निशी ॥१८८॥
असे जे कोणी साधक । त्यांचा देह पडता भौतिक ।
उत्तरमार्गात पथिक । होऊन जाती ब्रह्माप्रति ॥१८९॥
तेथे एकदा पोचल्यावरी । परत न फिरती माघारी ।
जन्ममृत्यूची येरझारी । चुके त्यांची पूर्णपणे ॥१९०॥

नेत्रस्थ पुरुषा जो जाणतो । त्या हा मार्ग गवसतो ।
यावरूनहि लक्षात येतो । नेत्रस्थाचा अर्थ ब्रह्म ॥१९१॥

अनवस्थितेरसम्भवाच्च नेतरः ।

[१]-२-१७-(४)

नेत्रस्थ पुरुष हा परमात्म्याहून निराळा घेता येणार नाही. कारण तसा घेतल्यास तो क्षणिक असतो आणि तेथे सांगितलेले धर्महि त्याचे ठिकाणी संभवत नाहीत.

ब्रह्माहून कोणी इतर । प्रतिबिंबादि मानिले जर ।
ते सर्वहि क्षणभंगुर । आहेत हेहि जाणावे ॥१९२॥
अन्य कोणी आल्या जवळ । त्याचे प्रतिबिंब मानणे खूळ ।
आरशात पाहून केवळ । आपले आपणा दिसते जे ॥१९३॥
तेहि येथे घेता न येई । उपयोग त्याचा फार नाही ।
क्षणिक ते ना कदा होई । शाश्वतासी उपयोगी ॥१९४॥
जीव वा सूर्यदेवता । यासहि नाही शाश्वतता ।
जीवाची मरणशीलता । परिचयाची सर्वांच्या ॥१९५॥
जरा मरण या आपत्ति । जीवा सदा भेडसाविती ।
उपास्य मानिता तयाप्रति । शाश्वत लाभ होणे नसे ॥१९६॥
जरी जीवाच्या मानाने । सूर्य मिरवी श्रेष्ठपणे ।
तरी ब्रह्माच्या तुलनेने । योग्यता अत्यल्प सूर्याची ॥१९७॥
आजचे प्रगत विज्ञान । मोजून दावी सूर्यमरण ।
यास्तव तोहि असे गौण । उपासनेच्या दृष्टीने ॥१९८॥
श्रुतिवर्णित ब्रह्मगुण । या कुणा न येती जुळून ।
मागच्या काही सूत्रातून । दाविलेले आहेत ते ॥१९९॥

सांगोपांग करिता विचार । नेत्रस्थ पुरुष हा ईश्वर ।
ध्यानाभ्यास बळावर । दर्शन त्याचे घेता ये ॥२००॥
सांभाळून आश्रमधर्म । पालन करावे यमनियम ।
आहार-विहारी संयम । स्थिर ठेवावी मनबुद्धि ॥२०१॥
स्थल असावे पवित्र शांत । पूर्ण असावा एकान्त ।
आपुल्या अंतरंगात । उपास्य देवता आळवावी ॥२०२॥
सहजासन घालोनिया । आठवावे सद्गुरुराया ।
ज्ञान मुद्रा करोनिया । आरंभावे ध्यानासी ॥२०३॥
बाह्य प्रतीक, नाभी, हृदय । या क्रमे करावी सवय ।
परी ईश्वराविण आश्रय । अन्य नसावा ध्यानासी ॥२०४॥
गुरूपदिष्ट मार्गाने । नियमाने नि प्रयत्नाने ।
चढत्या वाढत्या क्रमाने । एकाग्रता वाढवावी ॥२०५॥
दोन्ही भुवया जेथे जुळती । तेथे आज्ञाचक्र वसति ।
संयम साधिल्या तयावरती । नेत्रस्थाचे रूप दिसे ॥२०६॥
हाच नेत्रातला पुरुष । जे ब्रह्म आहे सविशेष ।
उपनिषदांनी गायिले ज्यास । सुखासाठी साधकाच्या ॥२०७॥★

अन्तर्याम्यधिदैवादिषु तद्धर्मव्यपदेशात् ।

[१]-२-१८-(५)

अधिदैवताचे ठिकाणी अंतर्यामी म्हणून जो सांगितला आहे, तो परमात्माच आहे. कारण तेथे सांगितलेले धर्म, परमात्म्याचेच आहेत.

ब्रह्मवेत्ते याज्ञवल्क्य ऋषि । बोध करिती जिज्ञासूंशी ।
बृहदारण्यकाने ज्यासी । गायिलेसे विस्तारे ॥२०८॥★

जो या पृथ्वीच्यावरी । राहे पृथ्वीच्या अंतरी ।
जाणू ना शकते तरी । पृथ्वी ही जयालागी ॥२०९॥★
पृथ्वी याचा देह जाण । तिचे करी हा नियंत्रण ।
हा जो आत्मा अमृत पूर्ण । अंतर्यामी तोचि तुझा ॥२१०॥
कथनाची ही ऐशी परी । बृहदारण्यकाभीतरी ।
अवलंबिली आहे तरी । देवतादि वर्णितांना ॥२११॥
आप, दिव, वायु, अग्नि । तेज, तम, भूते, वाणी ।
प्राण, मनादींच्या ठिकाणी । अंतर्यामी वर्णिला जो ॥२१२॥
हा अंतर्यामी कोण । ऐसा उत्पन्न होतो प्रश्न ।
तरी गुणधर्मावरून । ब्रह्म तो हे कळून ये ॥२१३॥
वेदशास्त्रे वा पुराण । करी देवतांचे वर्णन ।
म्हणती ज्यांच्या कडून । घडती कार्ये महत्त्वाची ॥२१४॥
लोकांचे करणे रक्षण । पाडणे वेळी पर्जन्य ।
नाना वासना करणे पूर्ण । देणे विविध विद्या कला ॥२१५॥
सृष्टीतील कार्यापरी । व्यापार घडती ते शरीरी ।
विविध इंद्रियांच्या द्वारी । देवता असती त्यांच्याहि ॥२१६॥
हे जे सर्व आधिभौतिक । आधिदैवत वा आध्यात्मिक ।
त्या सर्वांचा आहे एक । नियंता तो परमात्मा ॥२१७॥
नावे, कार्ये, व्यक्ति भिन्न । तरी त्यांचे अपुरेपण ।
जे, तेहि अवलंबून । ब्रह्माच्याच सत्तेवरी ॥२१८॥
सर्वशक्ति सर्वोत्तम । एक हेचि परब्रह्म ।
अंतर्यामीचे सर्व धर्म । जुळती मात्र त्याठायी ॥२१९॥

कोणी असो सिद्ध योगी । काही शक्ति ज्याच्या अंगी ।
परी जगती तयालागी । सर्व सामर्थ्य येणे नसे ॥२२०॥
अंती सामर्थ्य योग्याचेहि । ब्रह्मबले प्रत्यया येई ।
देवतांचीहि नसे काही । स्थिति वेगळी याच्याविणे ॥२२१॥

न च स्मार्तमतद्धर्माभिलापात् ।

[१]-२-१९-(५)

अंतर्यामी शब्दाने सांख्यस्मृतीत सांगितलेली प्रकृति घेऊ नये, कारण तेथे सांगितलेले धर्म तिचे नाहीत.

अंतर्यामी शब्दानी । प्रकृति घ्यावी म्हणती कोणी ।
निजकल्पनेने सांख्यांनी । विचार ऐसा केला असे ॥२२२॥
प्रकृतीहि न येते दिसोन । ती सर्व विकारांचे कारण ।
म्हणून करिते नियमन । असे म्हणता येतसे ॥२२३॥
परी पाहता विचारे । हे सादृश्य नाही पुरे ।
आणिक पुष्कळ असती बारे । धर्म अंतर्यामीचे ॥२२४॥
जड आहे प्रकृति । पाहण्याची तिला न शक्ति ।
आणि अंतर्यामी प्रति । द्रष्टा ऐसे शास्त्र सांगे ॥२२५॥
अनेक प्रकाराने पूर्वी । कारणे दिली ती ध्यानी घ्यावी ।
कल्पना प्रकृतीची ना करावी । अंतर्यामी शब्दाने ॥२२६॥
अंतर्यामी म्हटले आत्मा । ती प्रकृती नव्हेच मा ।
असे असता रिकामा । पुन्हा संशय घेऊ नये ॥२२७॥

शारीरश्चोभयेऽपि हि भेदेनैनमधीयते ।

[१]-२-२०-(५)

शारीर असा जीवात्माहि अंतर्यामी शब्दाने घेता येत नाही, कारण दोन्ही शाखांच्या पाठांमध्ये त्याचा अंतर्यामीहून निराळेपणाने उल्लेख केला आहे.

शारीर जीवात्मा येथे । म्हणावे न अंतर्यामीते ।
दोन्ही संहितापाठ जे ते । भेद सांगती दोघांचा ॥२२८॥
शतपथाचे पाठ दोन । काण्व आणि माध्यंदिन ।
काण्व जीवात्म्या विज्ञान । म्हणती माध्यंदिन आत्मा ॥२२९॥★
परी दोन्ही पाठातुनी । वेगळा मानिला जीवाहुनी ।
अंतरात्मा पूर्णपणी । हे येते ध्यानामध्ये ॥२३०॥
अंतरात असुनी याते । जीव न समर्थ जाणण्याते ।
अंतर्यामी जीवाते । परी करी नियंत्रित ॥२३१॥★
हे असे वर्णन । दोन्ही पाठात समान ।
त्यावरोनि ये कळोन । जीव अंतर्यामी नसे ॥२३२॥
आता व्यवहारी पाहता । जीवात्माहि द्रष्टा श्रोता ।
आणि वेद झाला सांगता । द्रष्टा न अंतर्यामीविणे ॥२३३॥
अशा स्थितीत द्रष्टे दोन । शरीरी आले कोठून ।
हे पाहता शोधून । विचारे कळे या रीती ॥२३४॥
जीव अंतर्यामी यामधी । अविद्या कल्पित उपाधि ।
निर्माण करी भेदबुद्धि । वस्तुतः ते दोन्ही एक ॥२३५॥
परी न झाले ब्रह्मज्ञान । फिटले न सारे अज्ञान ।
उपाधीचे अधिष्ठान । अहंता घेते जोवरी ॥२३६॥
तोवरी सर्व व्यवहार । द्वैतभावेच होणार ।
त्यातून साधका नेण्या पार । श्रुति यत्न करीत हा ॥२३७॥
दुःखादि अनुभव संसारी । उपाधि असते जोवरी ।
मानावे विधि-निषेध तोवरी । साधकासी वेद सांगे ॥२३८॥

सर्वव्यापक ब्रह्माविण । अंतर्यामी नसे भिन्न ।
अंतर्यामी विशेषण । उपाधीने प्राप्त होते ॥२३९॥
उपाधीने कल्पित । नसून भासते जे द्वैत ।
तेथे मात्र संभवतात । व्यवहार सारे संसारी ॥२४०॥
मग एक एकासी पाहती । एक एकाशी बोलती ।
ऐकती वा विचार करती । जाणती वा एकमेका ॥२४१॥
हुंगणे, शिवणे, खाणे, पिणे । व्यापार सारे द्वैताने ।
कामक्रोधादि विकाराने । ठाणे दिले द्वैता घरी ॥२४२॥★
परी सद्‌गुरुकृपेने । दाखविलेल्या मार्गाने ।
कुणी चालता प्रयत्नाने । भाग्य तयाचे उदया ये ॥२४३॥
मग तयास सर्वाठायी । आत्म्यावाचून नुरे काही।
असे दिसे भासे तेहि । सर्व आत्माच आहे त्या ॥२४४॥
आता अशा या स्थितीत । काही करणे नाही उरत ।
भोगणे, पाहणे संपत । जाणणे जाई विलयाला ॥२४५॥
जयाच्यामुळे जाणणे । जाणवते जाणणेपणे ।
आता तयासी कशाने । तरी कोणी जाणावे ॥२४६॥★
श्रुतीतील हे वर्णन । स्पष्ट करी अवस्था दोन ।
एक उपाधीसी मानून । निरुपाधिक शुद्ध दुजी ॥२४७॥

अदृश्यत्वादिगुणको धर्मोक्तेः ।

[१]-२-२१-(६)

भूतयोनि म्हणून सांगितलेला तो परमात्माच आहे. अदृश्यत्वादि गुण सांगितले असले तरी, इतर सांगितलेले धर्म परमात्म्याचेच आहेत.

विद्येचे ते भेद दोन । परा अपरा म्हणून ।
हे जाणत्याचे वचन । मुंडकाने कथिलेसे ॥२४८॥★
अपरा विद्येच्या भीतरी । चारी वेद शास्त्रे सारी ।
शिल्पे कलादि त्याचपरी । समाविष्ट असती की ॥२४९॥
आणि श्रेष्ठ विद्या जी परा । ती दाखवून दे अक्षरा ।
ज्याच्यायोगे अंतरा । तृप्तता शांति लाभते ॥२५०॥
श्रुति ठेवून प्रेमादर । वर्णितसे हे अक्षर ।
ज्याचा करावया विचार । तीक्ष्ण सूक्ष्म बुद्धि हवी ॥२५१॥
हे अक्षर वेद म्हणे । अदृश्य आहे पूर्णपणे ।
इंद्रियांनी घेता येणे । शक्य व्हावे असे न हे ॥२५२॥
जात, गोत यासी नाही । रंग, रूप नसे काही ।
अवयव नसे कोणताहि । नाक, डोळे, हात, पाय ॥२५३॥
नित्य तत्त्व हे एक मात्र । भरून आहे सर्वत्र ।
हेचि अत्यंत पवित्र । सूक्ष्माहून सूक्ष्म अति ॥२५४॥
हे विश्वासी व्यापक । पालटते ना क्षण एक ।
याचे स्वरूप अलौकिक । उणावते ना अल्पहि जे ॥२५५॥
सर्व भूतांची हेच योनि । भूते जन्मती यातुनी ।
वा तत्त्वासी विवेकानी । धीर पाहती सर्वत्र ॥२५६॥
कोळी निर्माण करी तंतू । पृथ्वी वनस्पतींना, हेतु ।
विश्व-निर्मितीची ही मातु । अक्षरातून घडे तेवी ॥२५७॥
मनुष्याच्या शरीरी । रोमकेश जैशापरी ।
तैसे विश्व नानाप्रकारी । अक्षरातून जन्मा ये ॥२५८॥

हे तपाने पुष्ट होते । त्यातून अव्याकृत जन्मते ।
अन्न असे म्हटले ज्याते । ते प्राणासी उपजवी ॥२५९॥
मग मन, सत्यलोक । तो कर्मा उपजवी अनेक ।
कर्म अमृताचे जनक । कर्मफल म्हणती जया ॥२६०॥
हा सर्वज्ञ सर्व जाणे । याचे तप ज्ञानरूपाने ।
नामरूपाचे उगवणे । अक्षरातुनी होते या ॥२६१॥
ऐसे अक्षराचे वर्णन । श्रवणे देई समाधान ।
तरी देतसे आव्हान । विचक्षणांच्या बुद्धीसी ॥२६२॥
अक्षराच्या या वर्णनी । एक लक्षण भूतयोनि ।
तेथे शंका उपजे मनी । अक्षर म्हणजे काय येथे ॥२६३॥
लक्षणे बरीच इथली ती । प्रकृतीशी दिसती जुळती ।
म्हणून सांख्य वर्णित प्रकृति । तीच घ्यावी अक्षराने ॥२६४॥
गीतेत पुरुषाहुनी श्रेष्ठ, । अक्षर मानिले कनिष्ठ ।
म्हणून येथे 'ब्रह्म' निष्ठ- । अर्थ नसावा अक्षराचा ॥२६५॥
पुढती या मुंडकातहि । अशा तत्त्वांचे वर्णन येई ।
ज्यास म्हटले ते ठायी । परात्पर अक्षराहुनी ॥२६६॥★
म्हणून येथे अक्षर । प्रकृति घ्यावी खरोखर ।
अनेका गुणांचा आधार । जुळे प्रकृतिरूपासी ॥२६७॥
अदृश्य सूक्ष्म भूतयोनि । प्रकृति कळे या लक्षणी ।
पुढे दिलेल्या उपमांनी । प्रकृति घेणे योग्य वाटे ॥२६८॥
परंतु हे वाटणे । ग्राह्य नसे विचाराने ।
कारण पराविद्येने । अक्षर येथे वर्णिलेसे ॥२६९॥

जरी अक्षराहुनि पर । कुठे वर्णिले तत्त्व थोर ।
तरी दोन्ही खरोखर । स्वरूपे असती ब्रह्माची ॥२७०॥
सविशेष ते अक्षर । निर्विशेष ते ब्रह्म पर ।
यास्तव तेथींचा आधार । नसे प्रकृति मानावया ॥२७१॥
प्रकृतीचे व्हावया ज्ञान । अपरा विद्या हे साधन ।
जिची पुढील मंत्रातून । उपेक्षा केली मुंडकाने ॥२७२॥
परेची गायिली महती । कारण तिने होते प्राप्ति ।
अशा तत्त्वांची की ज्यापुढती । श्रेष्ठ काही उरते ना ॥२७३॥
ज्या एकाचे होता ज्ञान । सर्व काही ये कळून।
त्याचे होते आकलन । साधका परा विद्येने ॥२७४॥★
विषय परा विद्येचा । अक्षराच्या वर्णनाचा ।
यास्तव येथे प्रकृतीचा । संबंध काही उरतो ना ॥२७५॥
प्रकृति आणि तिचे कार्य । अपरा विद्येचा असे विषय ।
येथे आहे वर्णनीय । भूतयोनि परमात्मा ॥२७६॥

विशेषणभेदव्यपदेशाभ्यां च नेतरौ ।

[१]-२-२२-(६)

भूतयोनि म्हणजे परमात्म्याहून निराळे असे जे जीव आणि प्रकृति, ते येथे घेऊ नयेत. कारण दिलेल्या विशेषणांवरून ते घेता येणार नाहीत.

परब्रह्म जे भूतयोनि । ते वेगळे जीवाहुनी ।
हे कळते विशेषणी । त्यास दिधल्या मुंडकाने ॥२७७॥★
अग्नि जैसा भडकल्यावरती । त्याच्यापासून ठिणग्या उडती ।
तैसे भाव नानाकृति । जन्म घेती अक्षरातुनी ॥२७८॥★

दिव्य हा स्वयंप्रकाशी । अमूर्त ना आकार ज्यासी ।
हा शरीररूपी गावासी । पुरुषरूपे वास करी ॥२७९॥
हा न कधी जन्मा येतो । आत बाहेर व्यापितो ।
प्राणाविणे जिवंत असतो । करी चिंतन मनाविणे ॥२८०॥★
निष्कलंक हा शुद्ध धवल । क्षराक्षराच्या पलीकडील ।
प्राण, मन, इंद्रिये सकल । याच्यापासून जाहली ॥२८१॥
याच्यापासून जन्मा आले । तेज, वायु, आकाश सगळे ।
जिने भूता धारण केले । पृथ्वी ती, तेवी जल ॥२८२॥
हे जे आहे वर्णन । ते न जुळे घेता अन्य ।
यास्तव भूतयोनि म्हणून । ईश्वर हाच स्वीकारणे ॥२८३॥

रूपोपन्यासाच्च ।

[१]-२-२३-(६)

स्वरूपासंबंधी केलेल्या रूपकावरूनहि भूतयोनि
शब्दाने परमात्माच घेतला पाहिजे.

अग्नि असे याचे शिर । नेत्र चंद्रमा-भास्कर ।
वाणी वेदांचा विस्तार । कान असती दिशा याचे ॥२८४॥★
वायु प्राणाच्या ठिकाणी । सर्व विश्व हृदयस्थानी ।
याच्या पायापासुनी । जन्म झाला पृथ्वीचा ॥२८५॥
सर्वभूतांच्या अंतरी । अंतरात्मा हा वास करी ।
मुंडकाने ऐशापरी । रूप याचे सांगितले ॥२८६॥★
या रूपकावरून । स्पष्ट येते कळून ।
की भूतयोनि म्हणून । परमात्माचि वर्णियेला ॥२८७॥

जीव उपाधीने व्याप्त । क्षुद्र तेवी मर्यादित ।
त्याच्या अवयवरूपकांत । वेद सूर्य शोभती ना ।।२८८।।
तैसीच जड प्रकृतिहि । येथे घेता येत नाही ।
अंतरात्मा म्हणून काही । तिचे वर्णन संभवेना ।।२८९।।
भूतांची करी उत्पत्ति । म्हणून भूतयोनि म्हणती ।
या शब्दामुळे भ्रांति । प्रकृतीची लव होते ।।२९०।।
तो भ्रम कराया दूर । व्यासांनी कथिला विचार ।
ज्याचा झालासे विस्तार । या तिन्ही सूत्रांमध्ये ।।२९१।।

वैश्वानरः साधारणशब्दविशेषात् ।

[१]-२-२४-(७)

वैश्वानर शब्दाने परमात्माच घेतला पाहिजे. अग्नि हा साधारण अर्थ करता येणार नाही; कारण वैश्वानराच्या संबंधाने विशेष शब्दांचा उपयोग केला आहे.

प्राचीनशाल, इंद्रद्युम्न । सत्ययज्ञ, बुडिल, जन ।
ऐसे पांच सज्ज़न । एकदा एकत्र बैसले ।।२९२।।
सर्वहि होते विद्वान् । वेदांचे त्या पूर्ण ज्ञान ।
गृहस्थाश्रमी असून । आसक्त नव्हते संसारी ।।२९३।।★
म्हणून एकत्र आल्यावरती । ते आत्मचर्चा करिती ।
ब्रह्म ही वस्तु काय ती । आपुला आत्मा कोण आहे ।।२९४।।
बोलणे तयी बरेच केले । परी न समाधान लाभले ।
म्हणून ते जाती सगळे । उद्दालक ऋषीकडे ।।२९५।।
जिज्ञासा त्यांची बलवत्तर । मनी ठेवूनि आदर ।
ऋषीस केला नमस्कार । आणि प्रश्न विचारिला ।।२९६।।

उद्दालक म्हणे नम्रतेने । हे सर्व मी ना जाणे ।
अश्वपति कैकयाने । ज्ञान याचे मिळविलेसे ॥२९७॥
तो महिपति असोनि । आहे मोठा ब्रह्मज्ञानी ।
वैश्वानराचा नीटपणी । अभ्यास त्यांनी केलासे ॥२९८॥
आदर्श त्याची राजवट । राज्यात नुरले वाईट ।
चला त्याची घेऊ भेट । प्रश्न विचारू त्यासी हा ॥२९९॥★
सर्व राजाकडे आले । नृपे त्यांचे स्वागत केले ।
आणि म्हणाला बरे झाले । आपण आला माझ्या घरी ॥३००॥
मी यज्ञ करीतसे बरवा । तुम्ही त्यामधे भाग घ्यावा ।
आपुल्या सेवेचा लाभ द्यावा । दक्षणा माझी स्वीकारून ॥३०१॥
हासून म्हणती सज्जन । मनोरथ करणे परिपूर्ण ।
हेच रे द्रव्यदान । आमुची इच्छा पुरवावी ॥३०२॥
राजा म्हणे तथास्तु । पूर्ण करीन तुमचा हेतु ।
होऊनिया कृपावंतु । आज घ्यावी विश्रांति ॥३०३॥
बोलू उद्या सकाळी आपण । प्रभाती ते करिती प्रश्न ।
वैश्वानराचे आपुले ज्ञान । भूपते आम्हा सांगावे ॥३०४॥★
भूपतीने प्रत्येकाला । आदराने प्रश्न केला ।
की या संबंधी आपणाला । काय ठाऊके ते सांगा ॥३०५॥
तुम्ही आत्मा म्हणून कवणा । करिता त्याची उपासना ।
ते जाणून घेतल्याविना । काय सांगू पुढचे मी ॥३०६॥
तेव्हा त्यांनी विविधपरी । नावे कथिली उत्तरी ।
आत्मा म्हणून आजवरी । केली ज्यांची उपासना ॥३०७॥

कोणी म्हणे मी स्वर्गासी । आत्मा मानिले विशेषी ।
सूर्य वायु आकाशासी । कोणी कोणी भजत होते ॥३०८॥
कोणी जलाते वा पृथ्वीते । आत्मा असे मानिले होते ।
भूप हासून म्हणे त्याते । हे तो अवयव आत्म्याचे ॥३०९॥
या उपासनेचे काही । लाभ तुम्हा होतीलहि ।
परंतु हे पुरते नाही । त्याने हानी होऊ शके ॥३१०॥
तुम्ही माझ्याकडे आला । तेणे तो धोका टळला ।
ऐका सांगतो तुम्हाला । खरे स्वरूप आत्म्याचे ॥३११॥
वेगळेपणे जे भजती । ते थोडे सुख मिळविती ।
विपुल सुखे त्या लाभती । सत्य आत्मा उपासिता ॥३१२॥
हा जो आत्मा वैश्वानर । आहे समजा टीचभर ।
अभिविमान तो त्याचे शिर । स्वर्गलोक जो तेजस्वी ॥३१३॥
विश्वरूपी सूर्य डोळा । वाहता वायु प्राण झाला ।
व्यापकशा आकाशाला । मानणे त्याचा मध्यभाग ॥३१४॥
धन देणारे उदक बस्ति । पृथ्वी त्याचे पाय असती ।
यज्ञवेदी त्याची छाती । लोम समजा दर्भासी ॥३१५॥
गार्हपत्य नावे अग्नि । तो त्याच्या हृदयस्थानी ।
अन्वाहार्यपचन मनी । आहवनीय मुख आहे ॥३१६॥
ऐकून हे वर्णन । खरे होऊन ब्रह्मज्ञान ।
ऋषि पावले समाधान । कथा सांगे छांदोग्य ही ॥३१७॥
आता वैश्वानर या पदांनी । लोकात समजती अग्नि ।
जठराग्नि वा भूताग्नि । येथे घ्यावे काय सांगा ॥३१८॥

जीव किंवा परमेश्वर । मानावा हा वैश्वानर ।
कथानकाचा करता विचार । सर्व थोडे थोडे जुळे ॥३१९॥
असा थोडा वरवर । कधी न करावा विचार ।
उपनिषदे ही गूढ फार । ध्यानी धरावी सर्वांगे ॥३२०॥
आत्मा कोण, ब्रह्म कोण । अशा या चर्चेमधून ।
पुढचे सर्व विवेचन । निर्माण ते झाले असे ॥३२१॥
यास्तव वैश्वानरातून । ब्रह्म अर्थ निघे पूर्ण ।
सर्व तिथले प्रतिपादन । परमात्म्याच्या ठायी जुळे ॥३२२॥

स्मर्यमाणमनुमानं स्यादिति ।

[१]-२-२५-(७)

स्मृतीवरूनहि वैश्वानर म्हणजे परमात्माच आहे
हे अनुमान करता येते.

विराटरूपे परमात्म्याची । स्मृति करिते स्तुति साची ।
त्यासी येथीच्या वर्णनाची । संगति लागे पूर्णपणे ॥३२३॥
चरणमुखादींच्या स्थानी । तेथहि असे पृथ्वी अग्नि ।
अनुवादिली छांदोग्यवाणी । महाभारती भिन्न शब्दे ॥३२४॥★
आणि या स्तुतीच्या अंती । वंदिलेसे ईश्वराप्रती ।
तीहि लावण्या संगति । ज्ञापक येथे होत असे ॥३२५॥
असेच भव्य रूपक । करी उपनिषद् मुंडक ।
तसेच येथीलहि सूचक । परमात्म्याचे मानावे ॥३२६॥★

शब्दादिभ्योऽन्तः प्रतिष्ठानाच्च नेति चेन्न
तथादृष्ट्युपदेशादसम्भवात्पुरुषमपि चैनमधीयते ।

[१]-२-२६-(७)

वैश्वानर ह  शब्द अग्नि या वेगळ्या अर्थाचा आहे आणि तो पुरुषाच्य‌ आत राहतो असे सांगितले आहे. त्यावरून वैश्वानर म्हणजे परमात्मा नाही असे म्हणू नये. कारण वैश्वानर हा परमात्मा अशा रीतीने पाहावे असे सांगितले आहे. तसेच वैश्वानर म्हणजे परमात्मा मानले नाही तर रूपकाने केलेले वर्णन जुळणार नाही. तसेच वैश्वानर हा पुरुष आहे असेहि काही शाखांचे लोक म्हणतात.

वैश्वानर अथवा अग्नि । शब्द प्रसिद्ध भिन्नार्थांनी ।
तदनुरोधे जठराग्नि । येथे घेतला पाहिजे ॥३२७॥
वैश्वानरस्थानी श्रुति । सांगे द्यावी प्राणाहुति ।
जाठराग्नीसवे जुळती । तिन्ही अग्नि कथियेले ॥३२८॥
जरी एवढीच लक्षणे । कथिली असती श्रुतीने ।
तरी मान्य होते हे म्हणणे । की वैश्वानर जाठराग्नि ॥३२९॥
परी सूर्य नेत्र, स्वर्ग मस्तक । भव्योदात्त हे रूपक ।
ते दर्शविते व्यापक । जाठराग्नीस जुळे न ते ॥३३०॥
परब्रह्माची भावना जरी । केली जठरींच्या अग्नीवरी ।
ते मान्य करण्या तरी । अडचण ना कुणाचीहि ॥३३१॥
परी केवळ जाठराग्नि । उपास्य ना म्हणती कोणी ।
उपासनेस्तव या स्थानी । वैश्वानर हा कथियेला ॥३३२॥
स्पष्ट सांगती वाजसनेयी । वैश्वानर हा पुरुष पाही ।
पुरुषाकृति हा पुरुषात राही । हे जाणे तो सुखावतो ॥३३३॥★
'पुरुषात राही केवळ'। असता जठराग्नि जुळेल ।
परी पुरुषाकृति हे बोल । शोभती ना तयाठायी ॥३३४॥

यावरून वैश्वानर । हा तो असे परमेश्वर ।
त्याच भावाने निर्धार । त्याची करणे उपासना ॥३३५॥

अत एव न देवता भूतं च।

[१]-२-२७-(७)

म्हणूनच वैश्वानर म्हणजे भूताग्नीचा अभिमान बाळगणारी देवताहि नव्हे आणि भूताग्नीहि नव्हे.

याचकारणे तो काही । अग्नि पंचभूतांतील नाही ।
वा न त्या म्हणता येई । भूताग्नीची देवता हे ॥३३६॥
देवतांची ही सर्वशक्ति । ब्रह्माचीच असे अन्ती ।
स्वतंत्रता ना कोणती । ब्रह्माविणे या देवतांना ॥३३७॥
सोडोनिया फांद्या पाने । इष्ट मुळासी जाणणे ।
राजापुढे ना मान देणे । अधिकाऱ्यासी तयाच्या ॥३३८॥

साक्षादप्यविरोधं जैमिनिः।

[१]-२-२८-(७)

साक्षात् परमेश्वरच येथे उपास्य म्हणून सांगितला आहे. कारण वैश्वानर शब्दाचा अर्थच परमेश्वर आहे असे मानले म्हणजे काही विरोध नाही असे जैमिनी म्हणतात.

म्हणतसे ऋषि जैमिनि । चर्चा का ही आडवळणी ।
रूपकाच्या आश्रयांनी । अर्थ करिता कशासाठी ? ॥३३९॥
प्रतीकाची कल्पना । उगीच ती करावी ना ।
उपाधीच्या आलंबना । नको येथे घ्यावयासी ॥३४०॥
येथला शब्द वैश्वानर । त्याचा अर्थ परमेश्वर ।
साक्षात् आहे त्या आधार । पुरुष आत्मा शब्दांचा ॥३४१॥

वैश्वानर पदाची व्युत्पत्ति । परमात्मापर निश्चिति ।
व्युत्पत्तीने अर्थ होती । जो सर्वांचा जीव असे ॥३४२॥★
सर्व विकारांचा कर्ता । विश्व ज्याची प्रजा तत्त्वता ।
विश्वासी हा असे नेता । कर्मफले दे सर्वांसी ॥३४३॥
यातील भाव कोणताहि । घेता अर्थ ईश्वर होई ।
आवश्यकता येथे नाही । रूपकाने मानण्याची ॥३४४॥

अभिव्यक्तेरित्याश्मरथ्यः ।

[१]-२-२९-(७)

ध्यानासाठी परमेश्वराची अभिव्यक्ति प्रादेशाएवढी आहे असे म्हटले आहे, असे आश्मरथ्य ऋषी म्हणतात.

शब्द जो का वैश्वानर । त्याचा अर्थ परमेश्वर ।
घेतां तयाचा आकार । टीचभरी, हा जुळतो कां ॥३४५॥
आणि वैश्वानराप्रति । प्रादेश मात्र म्हणे श्रुति ।
याची लाविती संगति । आश्मरथ्य महामुनि ॥३४६॥★
ते म्हणती जरी ईश्वर । व्यापक, परिमाणांच्या पर ।
कृपा करण्या भक्तांवर । प्रादेशमात्री व्यक्त होतो ॥३४७॥
हृदयामध्ये त्याची मूर्ति । दर्शन देते भक्ताप्रति ।
असल्यावरी उत्कट भक्ति । शुद्ध, सात्त्विक, निष्ठेची ॥३४८॥

अनुस्मृतेर्बादरिः ।

[१]-२-३०-(७)

ज्या हृदयात ध्यान करावयाचे ते टीचभर असल्याने ज्याचे ध्यान करावयाचे तो परमेश्वरहि प्रादेशाएवढा आहे असे म्हटले आहे; असे बादरी ऋषि म्हणतात.

मुनि बादरि ऐसे मानी । अनुस्मरणी म्हणजे ध्यानी ।
आणूनिया योगी जनी । पाहिलेसे ईशाला ॥३४९॥
हृदयामध्ये करिती ध्यान । ध्याया ईशाचे दर्शन ।
त्या हृदयाचे आकारमान । टिचीएवढे सामान्यतः ॥३५०॥
हे ध्यानाचे झाले माप । त्याने मोजिती विश्वरूप ।
म्हणून जाहलासे आरोप । प्रादेशाचा ईशावरी ॥३५१॥
गहू मापून आणिले । शेरभर तया म्हटले ।
खंडोगणती जरी उरले । गहू असती इतरत्र ॥३५२॥
तैसा व्यापक ईश्वर । पाहिला ध्यानबळावर ।
मग तयाशी टीचभर । म्हटलेसे कौतुकाने ॥३५३॥

सम्पत्तेरिति जैमिनिस्तथाहि दर्शयति।

[१]-२-३१-(७)

प्रादेशमात्र स्थानावर परमेश्वराची भावना केली जाते व श्रुतींनी इतरत्रहि तसे वर्णन केले आहे. म्हणून त्याला प्रादेशमात्र म्हटले आहे, असे आचार्य जैमिनि म्हणतात.

रूपक वैश्वानरावरती । करी राजा अश्वपति ।
त्यासी दिसते संगति । शतपथात ऐशापरी ॥३५४॥★
जणू काय हा ईश्वर । आकाराने टीचभर ।
ऐसे मानून पूर्वी अमर । पूर्ण ज्ञाने पोचले त्या ॥३५५॥
प्रादेशमात्र असे त्यासी । का म्हटले ते तुम्हासी ।
समजावून सांगण्यासी । स्थाने त्याची दाखवितो ॥३५६॥
दावून निज मस्तक । गुरु म्हणे हा स्वर्गलोक ।
नेत्र माझे बोधक । असती सतेज सूर्याचे ॥३५७॥

दाखवून नासिका । म्हणे येथे वायु निका ।
आकाशासी ओळखा । तुम्ही मुखाच्या पोकळीत ॥३५८॥
मुखरस ते होय पाणी । हनुवटी पृथ्वीच्या ठिकाणी ।
ऐसा वैश्वानर पूर्णपणी । प्रादेशमात्री समावला ॥३५९॥
हनुवटीच्या पासून शिर । प्रमाण अवघे टीचभर ।
नेत्र-नासिका मुखविवर । त्याच्यामध्ये सामावले ॥३६०॥
म्हणून म्हणती जैमिनि । वैश्वानर हा कैवल्यदानी ।
आपुल्या सर्व ऐश्वर्यांनी । प्रादेशमात्री समावला ॥३६१॥
वेदाच्या सर्व शाखातुनी । अल्पशा शब्दान्तरानी ।
साधकांनी ध्याया ध्यानी । हीच विद्या उपदेशिली ॥३६२॥

आमनन्ति चैनमस्मिन्।

[१]-२-३२-(७)

आणि हा परमेश्वर मस्तक आणि हनुवटी यांच्यामधील जागेत राहतो असे श्रुतिवचन आहे.

मस्तकाचा हा प्रदेश । तो परमात्म्याचा अधिवास ।
इतरत्रहि मानिती विशेष । उपयोगी जो ध्यानास्तव ॥३६३॥
दोन तालूंच्या मध्यंतरी । परमात्मा हा वास करी ।
तैत्तिरीयाभीतरी । वर्णन हे आले असे ॥३६४॥★
हिरण्मय आणि अमृत । या शब्दे तो कथिला तेथ ।
उपासनेच्या प्रीत्यर्थ । सद्गुरूने साधकासी ॥३६५॥
नासिका आणि भ्रुकुटी । स्थान असे जीवासाठी ।
या जीवात्म्यांच्या पोटी । नांदतो तो परमात्मा ॥३६६॥

ऐसे आले वर्णन । जाबालोपनिषदामधून ।
एवंच प्रादेशमात्र स्थान । मान्य आहे सर्वत्र ॥३६७॥★
कुणी हृदय कुणी मस्तक । भ्रुकुटीमध्यासी कित्येक ।
परमात्मा सर्व व्यापक । त्याचे सदन मानिती ॥३६८॥
साधकाच्या सोयीसाठी । स्थाने कथिली गोमटी ।
कारण ध्यान हेच शेवटी । साधन ईशा बघण्याचे ॥३६९॥
ध्यानास्तव चित्ताते । एकाग्रता यावी लागते ।
पाहिजे एकाग्रतेते । लक्ष्य सान मर्यादित ॥३७०॥
तेहि हवे समुचित । जेथे शक्तीचा वास होत ।
क्षमता असे जयाप्रत । जीवनाच्या धारणेची ॥३७१॥
योग्य प्रकारे साधना ध्यान । निज इच्छेसी अनुसरून ।
परमात्मा देतसे दर्शन । तेथे साधक सुखावतो ॥३७२॥
उत्कट होता एकाग्रता । ध्यानी लाभे एकरूपता ।
ध्येय, ध्यान आणि ध्याता । एकरूप होऊ लागती ॥३७३॥
अंतरी स्थिरावोनि शम । वृत्ति जाहल्या निर्मम ।
मीच आहे ते ब्रह्म । ऐशी धारणा साकारते ॥३७४॥
मी ब्रह्म हे पटल्यावरी । ब्रह्म कळे सर्वांतरी ।
'अहं ब्रह्मास्मि' ही पायरी । 'सर्वं खल्विदं' ब्रह्मासी ॥३७५॥
क्रम हा ध्यानमार्गातला । पटविण्यासी साधकाला ।
येथे वैश्वानर आत्म्याला । अभिविमान म्हटलेसे ॥३७६॥
प्रादेशमात्र सांगून । लगेच म्हटले अभिविमान ।
या अभिविमान शब्दातून । गूढ भाव व्यक्त होती ॥३७७॥

प्रादेशमात्री जो दिसे । त्यासी जाणावे मीच ऐसे ।
ऐसे श्रुति सुचवितसे । अभिविमान शब्दाने ॥३७८॥★
सर्वव्यापी सर्वगत । जो असे परिमाणरहित ।
त्या जाणावे हेहि कळत । अभिविमान शब्दाने ॥३७९॥
सर्व विश्व केले निर्माण । ज्याने तो हा अभिविमान ।
आणि हे असे विशेषण । वैश्वानरासी लावियेले ॥३८०॥
वैश्वानर हा, यावरून । ध्यानी येते, ब्रह्म पूर्ण ।
एक ब्रह्म प्रतिपादन । तात्पर्य आहे वेदांचे ॥३८१॥

॥ द्वितीय किरण समाप्त ॥

श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी
अध्याय पहिला
किरण दुसरा
समाप्त

ॐ श्रीः स्वस्ति

-- श्रीशंकर --

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

## [ श्रीमद्ब्रह्मसूत्रटीका ]

ॐ श्री: स्वस्ति

## प्रथमाध्याय

### किरण तिसरा

द्युभ्वाद्यायतनं स्वशब्दात्।

[१]-३-१-(१)

स्वर्ग आणि पृथ्वी इत्यादींचा आधार म्हणून ज्याचे वर्णन केले आहे ते तत्त्व ब्रह्मच होय. कारण स्व म्हणजे आत्मा शब्द त्याच्या संबंधात आला आहे.

ब्रह्माचे करून वर्णन । त्याचे कसे मिळविणे ज्ञान ।
हे सांगता शिष्यालागून । मुंडक म्हणे ऐशापरी ॥१॥★
ते अत्यंत दीप्तियुक्त । अणुहून सूक्ष्म खचित ।
तरीहि राहते त्याच्यात । प्राण्यांसह विश्व सारे ॥२॥
हेच ते आहे अक्षर । ब्रह्म हेचि खरोखर ।
सत्य नसे याहून इतर । हेचि प्राण, वाणी, मन ॥३॥

अमृत जया म्हणती जाणा । तेहि हेचि सज्जना ।
करोनि नीट साधना । वेध याचा घेई तू ॥४॥
उपाय या साधनेसी । सांगतो मी एक तुजशी ।
धनुष्य करूनि ' ॐ 'कारासी । बाण चित्तास मानावे ॥५॥
अभ्यासाने निरंतर । उपासनेच्या सहाणेवर ।
तीक्ष्ण करावा चित्तशर । सावधपणे वेध घ्यावा ॥६॥
बाण लक्ष्यात रुतुनी राही । तसे तन्मय अक्षराठायी ।
होऊन जावे आपणहि । ध्यानाभ्यास-बळावरी ॥७॥
ते हे ब्रह्म अक्षर । तेच असे सर्वाधार ।
जैसा फुलांचा संभार । सूत्रामधे ओविलासे ॥८॥
तसेच पहा याचे ठायी । द्युलोक आणि पृथ्वीहि ।
ओविलेली सदा राही । अंतरिक्ष, प्राण, मन ॥९॥
याच एक्या आत्म्याप्रति । जाणून घ्यावे निश्चिति ।
उगीच अन्य चर्चेप्रति । करावे ना, वेळ वाया ॥१०॥
करून घ्याया मोक्ष प्राप्तु । हाच त्याचा होत सेतु ।
उद्धार व्हावा असल्या हेतु । लाभ याचा करुनि घे ॥११॥
या मुंडकाच्या वर्णनी । सेतु शब्द ग्रथित जाणी ।
म्हणून शंका घेती कोणी । वर्णन आहे कुणाचे हे ॥१२॥★
सांख्यांची जी प्रकृति । येथे काय मानावी ती ।
पृथ्वी इत्यादि तत्त्वे ती । तिच्यात असती गोविलेली ॥१३॥
त्यातहि सेतु शब्दाने । योग्य नाही ब्रह्म घेणे ।
ब्रह्म राही अनंततेने । सेतु वस्तु मर्यादित ॥१४॥

परि ऐसा संशय । घेणे अगदी व्यर्थ होय ।
स्वभावा नाही उपाय । तेणे शंका येती अशा ।।१५।।
या प्रकरणाच्या मागे पुढे । ब्रह्म वर्णन असे उघडे ।
दुर्लक्ष करूनिया तिकडे । प्रश्न कैसा पडतो हा ।।१६।।
सत्य आणि अमृत । एक म्हणती ब्रह्माप्रत ।
प्रकृतीच्या संबंधात । हे शब्द ना येती कधी ।।१७।।
प्रकृतीच्या दर्शना । करणे नको उपासना ।
जडपणे ती सर्वांना । सहज आहे कळणारी ।।१८।।
कारण की अनुमाने । शक्य तिजसी जाणणे ।
परी होत ना वेदाविणे । शब्दज्ञानहि ब्रह्माचे ।।१९।।
तन्मय व्हावे प्रकृतीसी । ऐसे आपल्या शिष्यासी ।
कोण सद्गुरु उपदेशी । शिष्याचे हित चिंतणारा ।।२०।।
'ॐ'काराचे साधन । काय प्रकृति कारण ।
स्पष्ट सारे हे असून । प्रकृति घ्यावे वाटे कशी ।।२१।।
याच एक्या आत्म्यासी । जाणून घ्यावे निश्चयेसी ।
इतर सर्वहि विषयासी । द्यावे दूर झुगारुनी ।।२२।।
उपयोग आत्मा शब्दाचा । येथे प्रत्यक्ष असे साचा ।
एक त्या शब्दे विविधतेचा । संभव सारा नाकारिला ।।२३।।
जाणून घ्यावा तोच एक । ऐसे चकारपूर्वक ।
म्हटले जे होत बोधक । निरासाचे इतरांच्या ।।२४।।
आत्म्याचे करावे ध्यान । तोच 'ॐ'कार मानून ।
ऐसेहि स्पष्ट वचन । या मंत्राच्या पुढे असे ।।२५।।

म्हणून कोणत्याहि अंशी । येथील वचने प्रकृतीसी ।
लागती ना ती विशेषी । बोध करिती ब्रह्माचा ॥२६॥
द्युलोकादि पदार्थांना । तेच आधार असे जाणा ।
त्याचीच कथिली उपासना । इतर सारे नाकारुनी ॥२७॥
ब्रह्म विश्वासी आधार । आहे ऐसे म्हटल्यावर ।
चित्रविचित्राचा प्रकार । त्याचे ठायी मानू नये ॥२८॥
पदार्थ या विश्वाठायी । एकरूप ना कोणताहि ।
वृक्ष एक म्हणता येथहि । दिसती फांद्या, पाने, फुले ॥२९॥
एक पाहता साखर । जड, पांढरी आणि मधुर ।
एकचि असते भांगार । पिवळे, चिवट, तेजस्वी ॥३०॥
त्यापरीची विविधता । आत्म्याठायी ना तत्त्वता ।
भासते जी विचित्रता । सर्वहि ती औपाधिक ॥३१॥
विविधतेचे वर्णन । वेदाचे ना प्रयोजन ।
वैचित्र्याचे ज्या आकर्षण । त्यास वेदे निखंदिले ॥३२॥★
जे जे येथे तेच तिथे । जे जे तिथे तेच येथे ।
भेद ना मानावा सर्वार्थे । ब्रह्मात नि विश्वात ॥३३॥
म्हणोनिया जो या ठायी । नाना रीति भेद पाही ।
तो मग यात्रा करीत राही । मृत्यूपासून मृत्यूकडे ॥३४॥★
वेद म्हणे हे सर्व ब्रह्म । त्याचे ऐसे असे वर्म ।
की विविधता दिसते हा भ्रम । जाणून घ्यावे सुज्ञांनी ॥३५॥
आजचे विज्ञानहि प्रगत । सांगते असाच सिद्धांत ।
विद्युत्कणांनी ओतप्रोत । वस्तु भरल्या जगतातल्या ॥३६॥

आत बाहेर त्याच्याविणे । वस्तु नाही वस्तुपणे ।
शेवटी सारे प्रकाशणे । आहे विद्युत्कणांचे की ।।३७।।
मात्र विद्युत्कणांठायी । विविधतेचे नाव नाही ।
पदार्थांचे कोणतेहि । गुण तयांसी शिवती ना ।।३८।।
त्याची केव्हाहि राहती । जैसी असे तैसी गति ।
उपमेने या कळेल स्थिति । विश्वाची नि ब्रह्माची ।।३९।।
ब्रह्माची अद्वितीयता । नित्यता वा एकरसता
श्रुतींनी गायिली तत्त्वता । भेद सारा व्यवहारी ।।४०।।
तात्पर्य सेतु म्हणण्याचे । साधन तरून जाण्याचे ।
मानू नये की ब्रह्माचे । स्वरूप त्याने मर्यादित ।।४१।।
ब्रह्माचे होतसे ज्ञान । मोक्षप्राप्तीचे साधन ।
लाभ हा ध्यानी घेऊन । अमृतसेतु म्हटले त्या ।।४२।।
म्हणता पुरुषसिंह कुणासी । जाणावे त्याच्या विक्रमासी ।
आयाळ वा शेपूट त्यासी । आहे का ते शोधू नये ।।४३।।

मुक्तोपसृप्यव्यपदेशात् ।

[१]-३-२-(१)

स्वर्गादींचा आधार ब्रह्मच होय. कारण मुक्तांना प्राप्त
होण्यास योग्य म्हणून त्याचे वर्णन केले आहे.

स्वर्गादींचे आश्रयस्थान । जो का आत्मा त्याचे ज्ञान ।
होत आहे सेतु जाण । मोक्षाकडे नेणारा ।।४४।।
ऐसे हे जे वर्णिले । ते ब्रह्म घेता यथार्थ झाले ।
ब्रह्मज्ञान हेच कथिले । मोक्षसाधन सर्वत्र ।।४५।।

ममता देहादींच्या ठायी । तीच दुःखा कारण होई ।
रागद्वेषादींना देई । हीच आश्रय अज्ञाने ॥४६॥
यातून सुटून जाण्याची । इच्छा असतेच सुज्ञांची ।
ओढ तयांना त्या स्थितीची । जेथे तृप्ति-समाधान ॥४७॥
जेथ आनंद भरलेला । परिपूर्णतेच्या शिगे गेला ।
जेथ आपण आपणाला । जाणे पूर्ण समाधाने ॥४८॥
ही जी ऐसी काही स्थिति । अपवर्ग, मोक्ष, मुक्ति म्हणती ।
तिचा लाभ होण्याप्रति । ब्रह्मज्ञान कथिलेसे ॥४९॥
ब्रह्माची पटण्या ओळख । वेद यत्न करी अनेक ।
शब्द-प्रयोग अलौकिक । केले असती त्यासाठी ॥५०॥
ते स्वर्ग पृथ्वीचा आधार । इत्यादि वर्णनप्रकार ।
वेदे केले वारंवार । महती सांगण्या ब्रह्माची ॥५१॥
यास्तव याचा अन्य काही । अर्थ कधी होणे नाही ।
पुढील एका मंत्राठायी । फल कथिले या ज्ञानाचे ॥५२॥
रूपे अवर आणि पर । नांदतो हा परमेश्वर ।
जे प्रगटते निरंतर । कार्यकारणभावाने ॥५३॥★
कार्य म्हणता विश्वासी । ब्रह्म असे कारण त्यासी ।
अवर मानिती कार्यासी । कारणरूप ब्रह्म पर ॥५४॥
ऐशा परावर आत्म्याचे । दर्शन जया होत साचे ।
बंध तयाच्या हृदयाचे । सर्वहि जाती सुटोनी ॥५५॥
बुद्धि, मन आणि शरीर । यांच्या ममत्वाचे दोर ।
जाणिवेच्या सभोवार । घट्ट असती बांधलेले ॥५६॥

सुखी, दुःखी, कर्ता, भोक्ता । त्याचमुळे वाटते चित्ता ।
ही जीवाची बद्धता । त्यातून सुटका होत त्याची ॥५७॥
त्याची कर्में संचित । पार नाहीशी होतात ।
सत्यज्ञानाच्या प्रकाशात । संशय सारे मावळती ॥५८॥
नामरूपांच्या पाशातुनी । मुक्त होतो ब्रह्मज्ञानी ।
जातसे एकरूप होऊनी । दिव्य परात्पर ब्रह्मामधे ॥५९॥
जे भेद सत्य मानिती । ते मृत्युपाशात गुंतती ।
मनाने जाणावी निश्चिति । एकरूपता ब्रह्माची ॥६०॥
ब्रह्म एक अप्रमेय । निर्विकार अद्वितीय ।
ज्याच्यापुढे तुच्छ होय । आकाशाची निर्लेपता ॥६१॥
तेच एक नीटपणे । जाणून घ्यावे विद्वानाने ।
त्याच्याठायी दृढपणे । स्थिर ठेवावे बुद्धीसी ॥६२॥
धीराने एवढेच करावे । शब्दच्छल न वाढवावे ।
ग्रंथ पाहून नवे नवे । व्यर्थ वाणी शिणवू नये ॥६३॥
स्वर्गादि ज्याचे आधेय । ते ब्रह्म हेच निरुपमेय ।
तत् साक्षात्कार हा उपाय । आहे मोक्ष प्राप्तीचा ॥६४॥

नानुमानमतच्छब्दात्।

[१]-३-३-(१)

सांख्यांनी अनुमानाने सिद्ध केलेली प्रकृति स्वर्गादींचा आधार नव्हे. कारण तिचा वाचक असा शब्द तेथे नाही.

सांख्यांनी जी अनुमानाने । मानिली कारणरूपाने ।
ती प्रकृती येथे घेणे । योग्य नसे सर्वथैव ॥६५॥

कारण प्रकृती वाचक । होईल ऐसा शब्द एक ।
वापरीत नाही मुंडक- । श्रुति येथे कोठेहि ॥६६॥
प्रकृती मानण्या न आधार । तेथे वायूचा काय पार ।
अन्य कोणताहि विचार । येथे नाही ब्रह्माविणे ॥६७॥

प्राणभृच्च।

[१]-३-४-(१)

प्राण धारण करणारा जीवात्माहि स्वर्गादींचा आधार नाही.

जीव धारण करी प्राण । त्यास म्हणता ये चेतन ।
परी त्याचे सारे ज्ञान । संकोचले उपाधीने ॥६८॥
म्हणोनि जीवा कधीहि । सर्वज्ञ असे न म्हणता येई ।
यास्तव शब्द येथे नाही । जीवात्म्याचा बोधक जो ॥६९॥
शरीराच्या उपाधीमुळे । रूप ज्याचे सीमित झाले ।
त्यात कैसे गोविलेले । राहतील स्वर्गादिक ॥७०॥

भेदव्यपदेशात्।

[१]-३-५-(१)

भेद दाखविला आहे; म्हणूनहि जीवात्मा घेता येत नाही.

जाणावे त्या आत्म्याला । म्हणता आत्मा ज्ञेय झाला ।
स्वभावेच येथ उरला । ज्ञाता आता जीवात्मा ॥७१॥
मोक्षाची इच्छा शोभते । जीवासी ना परमात्म्याते ।
या भेदाचे ज्ञान होते । आत्मा शब्दे श्रुतीतल्या ॥७२॥★
म्हणून आधार स्वर्गादीते । मानावे ना जीवात्म्याते ।
लक्षणा ते पुरे शोभते । परमात्माचि मानिल्याने ॥७३॥

प्रकरणात्।

[१]-३-६-(१)

प्रकरणावरूनहि तेच मानावे लागते.

त्यातून हे प्रकरण । परमात्म्यासी उद्देशून ।
चाललेसे, कारण । प्रश्न आधी तसा असे ॥७४॥

शिष्य विचारी सद्गुरूसी । भगवन्! तेच सांगा मसी ।
की जाणता ज्या एकासी । जाणिले जाते सर्व काही ॥७५॥★

या प्रश्नाच्या उत्तरी । महर्षी जे बोलणे करी ।
ते असे सर्वतोपरी । उद्देशुनी ब्रह्मासी ॥७६॥

परमात्म्यासी ओळखता । सर्व येते जाणता ।
कारण तोचि तत्त्वता । विविधरूपे नटलासे ॥७७॥

मूळ सूत्र येता हाती । विस्ताराची नसे भीति ।
ग्रंथ सारे वाचता येती । ओळख होता अक्षराची ॥७८॥

येथील प्रकरण पाहता । जीवात्मा तो न ये घेता ।
एका ब्रह्माचीच सत्ता । येथे आहे वर्णिलेली ॥७९॥

स्थित्यदनाभ्यां च ।

[१]-३-७-(१)

स्वर्गादींच्या आधाराला अनुलक्षूनच पुढे दोन पक्ष्यांचे रूपक केले आहे. त्यात उल्लेखिलेल्या स्थिति आणि भक्षण या दोन कारणावरूनहि जीव स्वर्गादींचा आधार होऊ शकणार नाही.

स्थिति आणि भक्षण । ऐसे कथिले लक्षण ।
मुंडकाच्या मंत्रांतून । दोन पक्ष्यांच्या रूपकाने ॥८०॥

संसाररूपी एक वृक्षी । जीव, ईश हे दोन पक्षी ।
ईश केवळ असे साक्षी । जीव भोगी फलाप्रती ॥८१॥

स्थिति ईशाची निरामय । आनंदरूप निर्भय ।
त्यासी न बाधती अपाय । संसारीचे कोणतेहि ॥८२॥

वस्तुतः एका वृक्षावरी । एकत्र असती निरंतरी ।
सखे असून परस्परी । भिन्न अवस्था दोघांची ॥८३॥
कारण त्यातला जो जीव । तो आपणासी स्वयमेव ।
भोक्ता मानी, धरी हाव । विषय सारे भोगण्याची ॥८४॥
निमग्न होता भोगांतरी । स्वतंत्रता जाते दुरी ।
मोह पडतो नानापरी । विवेक जातो विलयाला ॥८५॥
मग तयासी अपार । शोक होतो अनिवार ।
हीन, दीन तो पामर । सदैव राही अस्वस्थ ॥८६॥
काही भाग्य उदया आले । सद्गुरूची कृपा मिळे ।
यमनियमादि असे घडले । साधन काही निष्ठेने ॥८७॥
मग स्वतःपेक्षा निराळा । लक्षणे अगदी वेगळा ।
अशा ईशाचा तयाला । प्रत्यय येई भक्तीने ॥८८॥
ईशाचे होता दर्शन । तो कसा आहे कोण ।
सर्व तयाचे महिमान । निदिध्यासे कळोनि ये ॥८९॥
ईश्वराचे अलौकिक । रूप कळता निःशंक ।
पार नष्ट होतो शोक । साधकांच्या चित्तातला ॥९०॥
ब्रह्मदर्शने ब्रह्मज्ञानी । विद्वान् तो होतो कुणी ।
पुण्यपापांपासुनी । मुक्त होता निरंजन ॥९१॥
समता अत्यंत ब्रह्मासी । मेळवितो पुण्यराशी ।
तयाच्या आत्मानंदासी । पारावार नुरे आता ॥९२॥★
साक्षित्वाने ईश स्थिति । उज्ज्वल असे राहती ।
भोगामुळे जीवाप्रति । शोक येतो वाट्यासी ॥९३॥

त्या शोकातून मुक्तता । ये ब्रह्मज्ञाने मेळविता ।
ऐसे वर्णन पहाता । जीव कळे वेगळा हे ॥९४॥
म्हणून विश्वासी आधार । जीव ना होऊ शकणार ।
उत्कट साधनेनंतर । ऐक्य त्याचे ब्रह्मासी ॥९५॥

भूमा संप्रसादादध्युपदेशात्।

[१]-३-८-(२)

भूमा या शब्दाने परमात्माच घेतला पाहिजे. कारण चांगल्या प्रसन्नतेनंतर म्हणजे सुखानंतर भूमा शब्द सांगितला आहे.

छांदोग्यात असे वर्णन । की नारदे शास्त्राध्ययन ।
विपुलतेने करून । शान्ती त्यासी लाधली ना ॥९६॥★
म्हणून नारद शेवटी । आले सनत्कुमारांचे भेटी ।
आणि म्हणे सांगा तुटी । शास्त्राभ्यासी काय माझ्या ॥९७॥
शास्त्रे शिकलो पुष्कळ । तरी न त्याचे लाभले फळ ।
मज ती वाटती पोकळ । आत्मज्ञानाविण सारी ॥९८॥
आपणा सारिखे थोर ऋषि । त्यांच्या ऐकिले उपदेशी ।
की जो जाणतो आत्म्यासी । तोच तरे शोकांतुनी ॥९९॥
मी शास्त्रगिरि ओलांडिला । परी न माझा शोक गेला ।
कृपा करुनि आपण मला । तारावे या शोकातुनी ॥१००॥
तेव्हा ऋषीनी विचारिले । तू काय अभ्यासिले ।
नारदाने निवेदिले । ऋग्वेदादि विद्यासी ॥१०१॥
तेव्हा म्हणती सनत्कुमार । तुझा हा विद्यासंभार ।
केवळ ‘नाम’ खरोखर । त्याची केली उपासना ॥१०२॥★

नारद विचारी नम्रतेनी । काय अधिक नामाहुनी ।
ऋषि क्रमा अवलंबुनी । श्रेष्ठाहुनी श्रेष्ठ सांगे ॥१०३॥
नामापेक्षा वाणी, मन । पुढे संकल्प, चित्त, ध्यान ।
मग, विज्ञान, बल, अन्न । जल, तेज, व्योम तेवी ॥१०४॥
आकाशाहून श्रेष्ठ स्मृति । स्मृतीहून आशा पुढती ।
आशेपेक्षा प्राणाप्रति । श्रेष्ठ ऐसे जाणावे ॥१०५॥
या प्राणासी जो जाणतो । अतिवादी म्हणावा तो ।
परी जो सत्या ओळखतो । तो त्याहून अतिवादी ॥१०६॥★
उचंबळून तेव्हा हृदय । नारद विचारी धरून पाय ।
महाराज हे सत्य काय । कृपेने ते बोधावे ॥१०७॥
या सत्याची मला प्राप्ति । होईल हो कोण्या रीती ।
जिज्ञासा ही फार चित्ती । दयाळा ती पुरवावी ॥१०८॥
तेव्हा सत्याची साधने । ऋषीनी कथिली क्रमाने ।
कोणत्याहि साधकाने । योग्य लक्षात घ्याया जी ॥१०९॥
आधी विज्ञान, मग मनन । श्रद्धा, निष्ठा आचरण ।
प्रयत्नाने साधिल्या पूर्ण । सुख लाभते सत्याचे ॥११०॥
येथे भूमा तेच सुख । भूमा विपुलतेचे प्रतीक ।
विपुलताचि सुखदायक । अल्प सुखद होते ना ॥१११॥★
येथे भूमा म्हणजे कोण । ऐसा उभा होतो प्रश्न ।
काय प्राणा लागून । भूमा येथे म्हणता ये ॥११२॥
श्रेष्ठतेचा सांगता क्रम । प्राण कथिला अंतिम ।
त्याच्या नंतरी अन्य नाम । घेतले नाही कशाचेहि ॥११३॥

प्राणाची गायिली महती । पुढे तेथे विशेषरीती ।
त्यावरूति वाटे चित्ती । प्राण हाच भूमा असे ॥११४॥
परी हे न खरे पुरते । प्राणानंतरी सत्याते ।
न विचारिता नारदे ते । ऋषीनी कथिले प्रेमाने ॥११५॥
सत्याची साधने कथिली । सुखाची महती गायिली ।
आणि अन्ती निवेदिली । व्याख्या भूमा शब्दाची ॥११६॥
म्हणोनि भूमा शब्दे येथे । गृहीत न धरावे प्राणाते ।
संदर्भाने स्पष्ट कळते । भूमा म्हणजे परमात्मा ॥११७॥
प्रकरण संपेपर्यंत । भूम्याचीच कथिली मात ।
शेवटी प्रश्न उपस्थित । भूम्या विषयी झालासे ॥११८॥
नारद नम्रतेने पुसे । प्रसन्न उत्कंठ मानसे ।
भगवन्! हा कोठे वसे । भूमा तेवढे सांगा जी ॥११९॥
ऋषि उत्तर सांगतात । की हा वसे निज महिम्यात ।
राहे आपुल्या ऐश्वर्यात । परि निश्चय नाही तो ॥१२०॥
ब्रह्माविषयी काहीही । निश्चितपणे ना बोलता येई ।
स्वभावेच जे पार राही । मनबुद्धीच्या वाणीच्या ॥१२१॥
परंतु साधकाच्या हिताते । काही सांगावेच लागते ।
सांगू जाता त्या स्थलाते । गुंतून राही मनबुद्धि ॥१२२॥
म्हणून ब्रह्मस्वरूपा जाणुन । काही करता वर्णन ।
साधका करण्या सावधान । लगेच म्हणती ऐसे ना ॥१२३॥
परी तेणे संशय मनी । केव्हा न धरणे साधकानी ।
शब्द मर्यादा अंतिम स्थानी । 'नेति नेति' हेचि उरे ॥१२४॥

असो प्राण जरी भूमा असता । तरी त्याचे स्थल सांगता ।
प्राणाचाच उल्लेख येता । स्थान म्हणोनि भूम्याचे ॥१२५॥
विपुलता म्हणजे भूमा । वैपुल्या ना शोभते सीमा ।
म्हणोनि एकच परमात्मा । अर्थ तेथे घेता ये ॥१२६॥

धर्मोपपत्तेश्च ।

[१]-३-९-(२)

भूम्याचे सांगितलेले धर्म परमात्म्याशी जुळतात, म्हणून
भूमा म्हणजे परमात्माच होय.

श्रुतीमधे परमात्म्याचे । धर्म जे कथिले वाचे ।
त्यासी जुळतात भूम्याचे । कथिलेले धर्म येथे ॥१२७॥★
तोच भूमा म्हणता येते । जो दुसरे न पाही कशाते ।
ठाऊकहि नसे त्याते । अन्य ऐकणे जाणणे वा ॥१२८॥
जे दुसरे पाहती । ऐकती वा जाणती ।
अल्प जाणावे त्याप्रति । अल्प तेचि मर्त्य असे ॥१२९॥
भूमा हे अमृत । तेथे संभवते ना द्वैत ।
खरोखरीच्या विपुलतेत । अन्य राहू शकते ना ॥१३०॥
गायी, घोडे, दास, दासी । हिरे, माणके, मंदिरासी ।
बायको, मुलाबाळांसी । ऐश्वर्य मानिती सत्तेमधे ॥१३१॥
परि हे मुळीच नाही खरे । परतंत्र हे असे सारे ।
ऐश्वर्य नांदते खरेखुरे । एक भूम्याच्याच ठायी ॥१३२॥
भूमा खाली, भूमा वर । दिशेसी दक्षिण उत्तर ।
मागे पुढती सभोवार । भूमाच व्यापी सगळीकडे ॥१३३॥★

भूम्याची ही सारी महती । शोभतसे ईश्वराप्रति ।
म्हणोनि मानावे निश्चिति । भूमा म्हणजे परमात्मा ॥१३४॥
आपुल्या महिम्यात राहणे । सर्वांसी व्यापून असणे ।
सत्य अमृतादि लक्षणे । कथिली येथे भूम्याची ॥१३५॥
म्हणोनि जो कथिला भूमा । तोच आहे परमात्मा ।
याच्या उपासनेने महिमा । साधकाहि तोच लाभे ॥१३६॥
जैसे भूमा तैसा आत्मा । साधक गाठी तीच सीमा ।
म्हणे मी झालो सर्वात्मा । सगळीकडे भरलेला ॥१३७॥
परमेश्वराच्या प्राप्तीविना । अनुभव ऐसा येतो ना ।
यास्तव निश्चयाने माना । भूमा हाचि परमात्मा ॥१३८॥

अक्षरमम्बरान्तधृतेः ।

[१]-३-१०-(३)

अक्षर म्हणजे परमात्माच आहे; कारण ते आकाशापर्यंतच्या सर्वांना धारण करते असे सांगितले आहे.

जनकाघरी यज्ञासाठी । ऋषि मंडळी मोठमोठी ।
जमली होती त्यांच्या गोष्टी । चालल्या ब्रह्मज्ञानाच्या ॥१३९॥
श्री याज्ञवल्क्य महर्षि । होते तया मंडळीसी ।
कोणी नामे गार्गी ऐसी । ब्रह्मवादिनी स्त्री होती ॥१४०॥
याज्ञवल्क्या म्हणाली ती । दोन प्रश्न तुम्हाप्रती ।
विचारते मी, जणु हाती । घेऊन आले तीक्ष्ण बाण ॥१४१॥★
माझ्या प्रश्नांचे उत्तर । योग्य तुम्ही दिले जर ।
वादामध्ये कुणी इतर । जिंकू शकेना आपणासी ॥१४२॥

शांतपणे म्हणती ऋषि । विचार आपल्या प्रश्नासी ।
प्रभावित होऊन मानसी । गार्गी त्यांना पुसे मग ॥१४३॥
स्वर्ग पृथ्वीच्या खाली वरी । किंवा त्यांच्या मध्यंतरी ।
जे नांदे सर्वतोपरी । भूत, भविष्य, वर्तमानी ॥१४४॥★
ते आहे ओतप्रोत । महर्षे सांगा कशात ।
ऋषि म्हणाले आकाशात । सर्व गोविले आहे ते ॥१४५॥
ऐकून ते उत्तर । गार्गीने केला नमस्कार ।
म्हणाली आपण खरे थोर । आता मसी सांगा पुन्हा ॥१४६॥
विशाल विश्व हे सर्वहि । ज्याच्यामधे भरले राही ।
आकाश ते कोणाठायी । ओतप्रोत असे वदा ॥१४७॥
तेव्हा याज्ञवल्क्य म्हणाले । ते अक्षर जाण बाळे ।
ज्यात आहे गोविलेले । आकाशासह सर्व काही ॥१४८॥★
ब्रह्मवेत्ते या जाणती । अद्भुत आहे याची स्थिति ।
कोणत्याहि शब्दाप्रति । येत नसे ते वर्णाविया ॥१४९॥
स्थूल नसे, ते सूक्ष्म नाही । ऱ्हस्व, दीर्घ काही नाही ।
असोनिया सर्व ठायी । आंत, बाहेर म्हणता न ये ॥१५०॥
सर्वव्यापी आकाशासी । हेच साठवी आपणासी ।
किती करावे वर्णनासी । शब्दातीत खरेच हे ॥१५१॥
येथील हे जे अक्षर । तो परमात्मा निर्विकार ।
अकारादि वर्णनिकर । ऐसे यास मानू नये ॥१५२॥
जे विनाश पावत नाही । वा जे सर्वा व्यापून राही ।
तयाप्रति शास्त्रात पाही । अक्षर ऐसे म्हणताती ॥१५३॥

सर्व व्यापक अंबर । त्यासहि देणे आधार ।
ऐसे सामर्थ्य अपार । ईशाठायीच संभवते ॥१५४॥

**सा च प्रशासनात्।**

[१]-३-११-(३)

अक्षराच्या आज्ञेने सूर्य, चंद्र आपली कामे करतात असे सांगितले असल्याने, अक्षर म्हणजे परमात्माच होय.

याच अक्षराची महती । पुढे वाखाणिते श्रुति ।
की याच्या आज्ञेत राहती । सूर्य, चंद्र, स्वर्ग, पृथ्वी ॥१५५॥★
सर्वभक्षक काळावरी । याची आज्ञा चाले पुरी ।
याची आज्ञा म्हणून तरी । प्रशंसा होते सद्गुणांची ॥१५६॥
ऐसा विलक्षण हा प्रभाव । नांदे ईशाठायी सदैव ।
येथे घ्यावया नको नाव । अचेतनशा प्रकृतीचे ॥१५७॥

**अन्यभावव्यावृत्तेश्च।**

[१]-३-१२-(३)

पुढील वर्णनावरून ब्रह्माहून निराळे काही घेणे शक्य होत नसल्याने, अक्षर म्हणजे परमात्माच होय.

परमात्म्याहून निराळी । अक्षर वस्तु नाही मुळी ।
कारण त्याची लक्षणे सगळी । श्रुति सांगे ब्रह्मापरी ॥१५८॥
श्रुति म्हणे हे अक्षर । पाहू न शके कोणी इतर ।
परी हे मात्र सर्व दूर । असे सर्वां पाहणारे ॥१५९॥★
यास न जाणू शके कोणी । हे जाणते सर्वांलागुनी ।
ब्रह्मचि हे या लक्षणी । प्रकृति, जीव, घेता न ये ॥१६०॥
सूक्ष्मपणाने प्रकृति । जरी कोणा दिसेना ती ।
जरी जाणण्याची शक्ति । नाही तिला जडत्वाने ॥१६१॥

जीव देहाचा अभिमानी । म्हणून युक्त अवयवांनी ।
यास्तव अक्षर शब्दांनी । जीव अर्थ घेता नये ॥१६२॥
अक्षरा ना अवयव । उपाधि न तेथे लव ।
अरस, असंग, सर्वथैव । अक्षर आहे श्रुति म्हणे ॥१६३॥★
याचा करता विचार । ब्रह्म म्हणजेच अक्षर ।
ब्रह्माविण वस्तु इतर । अक्षर शब्दे घेऊ नये ॥१६४॥

ईक्षतिकर्मव्यपदेशात्सः ।

[१]-३-१३-(४)

पाहण्याचे कर्म या रूपाने निर्देश केला असल्यामुळे, तो परमपुरुष परमात्माच होय.

श्री पिप्पलाद आचार्याला । सत्यकामे प्रश्न केला ।
जो नित्य ध्यातसे 'ॐ'काराला । लोक कोणता मिळे तया ।१६५।★
तेव्हा सांगती गुरुवर । जयास म्हणती 'ॐ'कार ।
तेच पर आणि अपर । या स्वरूपाचे ब्रह्म आहे ॥१६६॥
यातील ज्याचे आलंबन । करून साधक साधी ध्यान ।
ते ते ब्रह्म त्या लागून । प्राप्त होतसे निष्ठेने ॥१६७॥
एक मात्रा 'ॐ'काराची । ध्यानदेवता जयाची ।
त्यासी मनुष्यलोकाची । प्राप्ती होई पुन्हा पुन्हा ॥१६८॥
मनुष्यलोकी तपाने । ब्रह्मचर्याने, श्रद्धेने ।
तो आपली जीवने । ऐश्वर्याने उपभोगितो ॥१६९॥
दोन मात्राच्या ध्यानबळे । सोमलोकी स्थान मिळे ।
ऐश्वर्य भोगुनी तेथले । पुनः येतो जन्मासी ॥१७०॥

त्रिमात्रा युक्त 'ॐ'कार । त्याचा घेऊन आधार ।
जो करी निरंतर । ध्यान परमपुरुषाचे ॥१७१॥
त्या ध्यानाने तयासी । स्थान मिळे सूर्यलोकासी ।
त्याची पातके सुटती, जैसी । कात टाकावी सापाने ॥१७२॥
येथून हा परत न येतो । पुढे ब्रह्मलोकी जातो ।
नंतरी तो पहातो । परात्पर या पुरुषासी ॥१७३॥
आता या उपासकाकडून । जो पाहिला जातो तो कोण ।
ऐसा निर्माण होतो प्रश्न । चिकित्सकांच्या चित्तासी ॥१७४॥
परी आशय वर्णनाचा । नीट लक्षात घ्यावयाचा ।
असे ठरविल्या, शंकेचा । उद्भव होण्या वाव नाही ॥१७५॥
विशेषण जे परात्पर । ते नीट पाहिल्यानंतर ।
परब्रह्मावाचून इतर । कोणी मानणे शक्य नाही ॥१७६॥
पुन्हा येणे जन्माप्रति । ऐसी नाही येथे स्थिति ।
जशी वर्णन केली ती । पहिल्या दोन्ही ध्यानामध्ये ॥१७७॥
नसणे पुनरावर्तन । हे तो मोक्षाचे लक्षण ।
ब्रह्मदर्शनावाचून । मोक्षप्राप्ति शक्य नाही ॥१७८॥
यास्तव साधक ज्या पाहतो । परमात्माच जाणावा तो ।
हाच एक विषय होतो । श्रेष्ठ प्रतीच्या ध्यानाचा ॥१७९॥

दहर उत्तरेभ्यः ।

[१]-३-१४-(५)

नंतर केलेल्या वर्णनावरून दहराकाश म्हणजे परमात्माच होय.

ब्रह्म सर्वव्यापक । अद्वितीय असे एक ।
ज्यासी न होतो संपर्क । दिशाकालादि भेदांचा ॥१८०॥

ज्यास नाही नामरूप । गुणांचा न लागे लेप ।
ज्यास मोजाया नसे माप । वाणीचे वा मनाचेहि ॥१८१॥
अशा ब्रह्माचा साक्षात्कार । जीवा होणे दुर्घट फार ।
तो झाल्यावाचून पार । जाता न येई शोकाच्या ॥१८२॥
म्हणून नाना प्रकाराने । साधने कथिली वेदाने ।
ज्यांचा उपयोग केल्याने । जीव कुणीहि उद्धरेल ॥१८३॥
दहराकाशा विषयीचे । प्रकरण याच प्रकारचे ।
उपासकाच्या साधनेचे ।ध्येय उत्तम ठरेल जे ॥१८४॥★
ब्रह्मपूर हे शरीर । त्यात कोमल कमलाकार ।
नाभीपासून वितीवर । हृदयस्थान आहे जे ॥१८५॥
या हृदयाच्या अंतरी । सूक्ष्मपणाने वास करी ।
आकाश एक, ज्या शास्त्रे सारी । दहर म्हणोनि संबोधिती ॥१८६॥
बाहेर आकाश हे जे दिसे । तयाचे जे महत्त्व असे ।
तीच महती विलासे । या दहराची पूर्णतेने ॥१८७॥
द्यावा, पृथ्वी, सूर्य, शशि । राहती या दहराकाशी ।
अग्नि, वायु, नक्षत्रांसी । स्थान आहे याच्यामध्ये ॥१८८॥
आहे, नाही सर्व काही । समावले याच्या ठायी ।
असामान्य महत्ता ही । जाणून घ्यावी साधकांनी ॥१८९॥
दहराकाश शरीरी । हृदयामधे राहते जरी ।
तरी न होतो तिळभरी । देहभावांचा स्पर्श त्यासी ॥१९०॥
शरीरा ये वृद्धपण । याचे अखंड यौवन ।
शरीर मृत होऊन । अमृत सत्य राहते हे ॥१९१॥

सत्यसंकल्प हा, या ठायी । काम योग्यरीति राही ।
पातकांचा कोणत्याहि । अल्प स्पर्श यासी नसे ।।१९२।।
हे आहे अजरामर । आत्मा हाचि खरोखर ।
शोक क्षुधादि विकार । सत्यकामा नसती या ।।१९३।।
ऐसे हे दहराकाश । योग्य जाणून घ्यावयास ।
हे जो जाणून घेतो त्यास । सर्व लाभे स्वतंत्रता ।।१९४।।
आता हे दहराकाश । म्हटले आहे कोणास ।
जीवात्माचि येथे विशेष - । रीत्या वाटे वर्णिलासे ।।१९५।।
ब्रह्मपूर म्हणजे शरीर । ते जीवाचे असे घर ।
जणू तयाचे शयनागार । दहर आहे हृदयीचे ।।१९६।।
शरीर हे होऊन मृत । जीव राही अमृत ।
म्हणोनि पुन्हा आश्रयाप्रत । जाई भिन्न शरीराच्या ।।१९७।।
परी जीव येथे घेणे । योग्य नाही विचाराने ।
'जाणून घ्यावे' याकारणे । दहराकाश वर्णिलेसे ।।१९८।।
जाणून घ्यावया उचित । जीवात्मा हा कधी न होत ।
प्रत्यक्षाने आहे प्राप्त । ज्ञान त्याचे मानवासी ।।१९९।।
परमात्मा हा उपाधीने । भासतसे जीवपणे ।
यास्तव काही लक्षणे । सारखी दिसती ते ठायी ।।२००।।
परी पापापासून दूर । त्यास न शोकादि विकार ।
या वर्णनी परमेश्वर । हाच येई मानावया ।।२०१।।
दहराची या सूक्ष्मता । आहे केवळ प्रतीकभूता ।
म्हणून वर्णिली महत्ता । बाह्याकाशापरी त्याची ।।२०२।।

यास्तव या दहराकाश । शब्दे वर्णिला परेश ।
जीव कल्पनेने लेश । प्रगतीचा लाभेल ना ॥२०३॥

गतिशब्दाभ्यां तथा हि दृष्टं लिङ्गं च।

[१]-३-१५-(५)

दहराकाश जाणल्याने जी गति मिळते असे सांगितले आहे तिच्यावरून नि लक्षणावरून दहराकाश म्हणजे ब्रह्मच मानले पाहिजे.

दहराकाश जाणल्याने । ब्रह्मलोका घडे जाणे ।
ऐशा गतीच्या वर्णने । दहर म्हणजे परमात्मा ॥२०४॥
ब्रह्म हाच लोक येथे । प्रत्यही ये जाता तेथे ।
झोपेत लोकी बोलले जाते । समाधी याची लागली हे ॥२०५॥
नित्य मिळूनहि ब्रह्मासी । त्याचे ज्ञान न जीवासी ।
यास्तव प्रयत्न विशेषी । साधकाते करणे पडे ॥२०६॥
दहराकाशा जाणावे । श्रुतीने हे कथिले बरवे ।
यावरोनि समजून घ्यावे । उद्दिष्ट जे की शब्दाचे ॥२०७॥
दहराकाशा उद्देशून । हाच आत्मा म्हटले जाण ।
सत्यसंकल्प विशेषण । दहराकाशा दिले असे ॥२०८॥
शब्दप्रयोग हे पाहता । ब्रह्म हेच येते घेता ।
दहराकाशी तत्त्वता । अन्य अर्थ संभवेना ॥२०९॥

धृतेश्च महिम्नोऽस्यास्मिन्नुपलब्धेः।

[१]-३-१६-(५)

धारण करण्याचे सामर्थ्य सांगितल्याने दहर म्हणजे परमात्माच होय. कारण तसे सामर्थ्य परमात्म्याचे ठिकाणी इतरत्र उल्लेखिले आहे.

आत्मा जो दहराकाश । सेतूहि म्हटले त्यास ।
जो लोकांच्या जीवनास । धारण करी प्रभावाने ॥२१०॥★
धारणाची अशी शक्ति । ब्रह्माठायीच निश्चिती ।
म्हणून येथे दहराप्रति । मानावे की परमात्मा ॥२११॥
तैसेच पृथ्वी तारांगण । यांचे दहरामधे स्थान ।
या वर्णने ये कळून । महिमा दहराकाशाचा ॥२१२॥
असा महिमा श्रुतिठायी । ब्रह्माचाच वर्णिला पाही ।
म्हणून दहराते येथहि । परब्रह्मचि समजावे ॥२१३॥

प्रसिद्धेश्च।

[१]-३-१७-(५)

आकाश शब्द परमेश्वर या अर्थाने प्रसिद्ध आहे. म्हणूनहि दहर म्हणजे परमात्माच होय.

श्रुति आकाश-शब्दे पाही । ब्रह्म सांगे ठायी ठायी ।
आकाश सर्वा आधार देई । आकाश कारण भूतांचे ॥२१४॥★
आकाश असे आनंदरूप । तेच व्यक्तवी नामरूप ।
ऐसे प्रसिद्ध निर्लेप । आकाश ब्रह्म अर्थाने ॥२१५॥
जीव अर्थ कोठेहि । आकाशाचा दिसत नाही ।
म्हणून दहराकाशहि । घ्यावे ब्रह्म अर्थाने ॥२१६॥

इतरपरामर्शात्स इति चेन्नासम्भवात्।

[१]-३-१८-(५)

इतरांचा म्हणजे जीवाचाहि परामर्श केला आहे म्हणून जीव म्हणजे दहर म्हणू नये. कारण तसे असणे संभवत नाही.

आकाशाचा अर्थ काही । ब्रह्म, हा लोकात नाही ।
श्रुति-वचनाने तरीहि । ब्रह्म त्याचा अर्थ होतो ॥२१७॥★

तसेच संदर्भाने येथे । दहर मानणे जीवाते ।
कारण त्याच्या अवस्थेते । येथेच आहे वर्णिलेले ।।२१८।।
झोपणे, शरीर सोडणे । ही जीवाची लक्षणे ।
कथिली असती छांदोग्याने । तीहि घ्यावी विचारी ।।२१९।।
त्याचाहि करून विचार । जीव म्हणजे नाही दहर ।
उपाधीने बांधल्यावर । जीवा येते मर्यादा ।।२२०।।
या संकुचिताची तुलना । आकाशासी करिता ये ना ।
म्हणून दहर शब्दे पुनः । कथितो घ्यावा परमात्मा ।।२२१।।
अवस्था कथिली जीवाची । भिन्न कारणे असती त्याची ।
चर्चा तया कारणांची । पुढे येईल सूत्रातुनी ।।२२२।।

उत्तराच्चेदाविर्भूतस्वरूपस्तु ।

[१]-३-१९-(५)

पुढील वाक्यावरून दहराच्या वर्णनात जीव विवक्षित आहे असे म्हणू नये. कारण तेथील जीव हा सामान्य जीवात्मा नसून ज्याचे स्व-रूप प्रगट झालेले आहे असा ब्रह्मज्ञानी जीव तेथे अभिप्रेत आहे. म्हणून दहर शब्दाने परमात्माच घेतला पाहिजे.

दहर प्रकरणानंतरी । श्रीमद्छांदोग्यामाझारी ।
एक कथा असे खरी । बोधप्रद जी साधकासी ।।२२३।।★
एकदा प्रजापति समोर । जमले देव आणि असुर ।
म्हणती उपाय सत्वर । सांगा इच्छापूर्तीचा ।।२२४।।
प्रजापति गंभीरपणे । तेव्हा देवासुरा म्हणे ।
प्रिय शिष्यांनो जाणून घेणे । तुम्ही स्वरूप आत्म्याचे ।।२२५।।

ज्या आत्म्यासी पातक । स्पर्श करू न शके एक ।
ज्यास जरा ना, नसे शोक । निर्विकारी सर्वथा जो ॥२२६॥
मृत्यु ज्यापुढे बापुडा । क्षुधा, तृषेची ज्या न पीडा ।
त्याचा महिमा केवढा । ते न येई सांगावया ॥२२७॥
सत्य-संकल्प सत्य-काम । तो हा आत्मा आत्माराम ।
पूर्ण होती त्याचे काम । जाणतो जो यालागी ॥२२८॥
शोधून त्यासी जाणावे । सर्व लोका मिळवावे ।
उपदेशासी आचरावे । शास्त्र आणि सद्गुरूच्या ॥२२९॥
प्रजापतीचे ऐकून वचन । निर्माण झाले आकर्षण ।
म्हणती कामना परिपूर्ण । आत्मज्ञाने सर्व होती ॥२३०॥
सर्व लोकांची होते प्राप्ति । मग का घ्यावी माघार ती ।
प्रसन्न करूनि प्रजापति । आत्मज्ञाना मिळवूया ॥२३१॥
असुर राजा विरोचन । देवेंद्र तो पाकशासन ।
निघाले देऊन आश्वासन । आपुलाल्या समाजासी ॥२३२॥
मीच आधी मिळवीन यश । ऐशा परस्परी विशेष ।
चित्ती धरून ईर्षेस । आले प्रजापतीकडे ॥२३३॥
समिधा घेऊन करी । सेवा करिती परोपरी ।
तीस वर्षे झाली तरी । गुरूने ना जवळ केले ॥२३४॥
बत्तीस वर्षानंतरी । प्रजापति त्या विचारी ।
काय इच्छा धरून उरी । माझ्याकडे आला तुम्ही ॥२३५॥
ते म्हणती आत्मज्ञान । आम्हास द्यावे संपूर्ण ।
जे एक आहे साधन । सर्व इच्छापूर्तीचे ॥२३६॥

ज्या ज्ञानाच्या बळाने । सर्व लोकांकारणे ।
साधते अंकित करून घेणे । ऐसे आपण म्हणाला ॥२३७॥
तो आत्मा कसा काय । दर्शन त्याचे कुठे होय ।
ते सांगा, आपुले पाय । धरले आम्ही त्याचसाठी ॥२३८॥
तेव्हा म्हणे प्रजापति । डोळ्यामध्ये तुम्हाप्रति ।
जी दिसते पुरुषाकृति । आत्मा त्यासी जाणावे ॥२३९॥
तोच अभय, अमृत । ब्रह्म त्यासीच म्हणतात ।
हे ऐकून चित्तात । चकित झाले ते दोघे ॥२४०॥
म्हणती पाण्यात वा आरशात । जो आम्हासी दिसून येत ।
तोच पुरुष अभिप्रेत । आपणासी आहे का ॥२४१॥
होकार भरून प्रजापति । म्हणे आणा त्वरित गति ।
एका मोठ्या परळाप्रती । पाणी भरून त्यामधे ॥२४२॥
त्यात वाकून पहावे । काय दिसते ते सांगावे ।
न्यून दिसता विचारावे । त्या आत्म्यात काही मला ॥२४३॥
दोघे परळात पहाती । नखशिखान्त आपणाप्रति ।
जे दिसले ते सांगती । प्रजापतीसी कौतुकाने ॥२४४॥
प्रजापति म्हणे हासुनी । जा, या पीतांबर नेसुनी ।
नानाप्रकारे भूषणांनी । नटवूनिया आपणासी ॥२४५॥
आधीच जीवा याची हौस । त्यात गुरूचा उपदेश ।
आले दक्षतेने विशेष । थाटमाट करून ते ॥२४६॥
प्रजापति म्हणे तयी । आता पहा परळाठायी ।
आत्मा दिसतो तुम्हास कायी । रूप त्याचे वदा कसे ॥२४७॥

कौतुके दोघे म्हणाले । आम्ही जैसे नटलेले ।
आहोत, रूप तेच भले । आम्हा दिसते आत्म्याचे ॥२४८॥
प्रजापति म्हणे आत्मा हाचि । अमृत, निर्भय, स्थिति ज्याची ।
ब्रह्म म्हणतो तेहि हेचि । नीटपणे समजले ना ॥२४९॥
चित्ती पावून समाधान । प्रजापतीसी वंदन ।
आदराने करून । परत निघाले दोघेहि ॥२५०॥
परत गेले ते पाहुनी । प्रजापति हो खिन्न मनी ।
म्हणे कसे हे ! यालागुनी । खोल जावे वाटते ना॥२५१॥
बोधासाठी मी यांना । बाह्यांगाच्या दिले ज्ञाना ।
न कळते या खुळ्यांना । तेच पूर्ण वाटले का ॥२५२॥
हेच मानून तत्त्वज्ञान । जरी जगतील जीवन ।
तरी अपयशाविण । काय येईल वाट्यासी ॥२५३॥
विरोचनाचे पूर्ण झाले । समाधान या गोष्टीमुळे ।
कारण ते जुळून गेले । त्याच्या मूळच्या वृत्तीसी ॥२५४॥
तो चित्ती सुखावला । वदे आपुल्या समाजाला ।
म्हणे आहे मला झाला । लाभ आत्मज्ञानाचा ॥२५५॥
आपुले जे असे शरीर । तोच आत्मा खरोखर ।
त्याच्या थाटमाटावर । भर देणे हीच पूजा ॥२५६॥
दोन्ही लोक आपणाप्रती । त्यामुळेच प्राप्त होती ।
सोपी तरी श्रेष्ठ किती । आत्म्याची ही विद्या असे ॥२५७॥
अद्याप हा वैरोचनीय । चालू असे संप्रदाय ।
शरीर सुख हाचि उपाय । वाटे ज्यांना प्रगतीचा ॥२५८॥

कोणत्याहि मार्गाने । इंद्रियांना सुख देणे ।
हेच ज्याचे झाले जिणे । भले बुरे हा प्रश्न नाही ॥२५९॥
उपभोगाची साधने । वाढवावी प्रयत्नाने ।
आणि त्याच ऐश्वर्याने । प्रगत झालो मानावे ॥२६०॥
संयम, तप, सत्य, दान । यास येथे नसे मान ।
कारण त्याचे तत्त्वज्ञान । 'काही न देहा पलीकडे' ॥२६१॥
परी इंद्र होता विचारी । वाटले त्याच्या अंतरी ।
की मी परळाभीतरी । शरीर माझे पाहिले ॥२६२॥
त्यास आत्मा म्हणू काय । तरी त्याचे तुटता पाय ।
आत्मा असून निर्भय । पांगळेपणा येईल त्या ॥२६३॥
या विचारे अस्वस्थ झाला । घरी न जाता परत आला ।
तेव्हा प्रजापति म्हणाला । का रे इंद्रा, काय झाले ॥२६४॥
विरोचनाच्या संगती । परतलासी शांत चित्ती ।
पुन्हा आलास मागुती । काय इच्छा धरूनिया ॥२६५॥
इंद्र म्हणे आपण । जे आम्हा दिले ज्ञान ।
ते न आत्म्याचे म्हणून । परत आलो ये ठायी ॥२६६॥
जरी केले अलंकृत । तरी शरीर नाशवंत ।
तेचि दिसले जलात । आत्मा त्यासी मानू कसे ॥२६७॥
अमृत अभय म्हणून । कथिलेत आत्मलक्षण ।
ते न दिसणारे शोभून । कधीहि या शरीरासी ॥२६८॥
सत्य आत्म्याचे ते ज्ञान । द्यावे मजसी आपण ।
त्याच्याविणे समाधान । होणार नाही चित्ताते ॥२६९॥

पुन्हा राहून गुरुघरी । बत्तीस वर्षे सेवा करी ।
पहा उत्कट कितीतरी । जिज्ञासा ही इंद्राची ।।२७०।।
कष्ट त्यासी वाटले थोडे । आत्मज्ञान लाभापुढे ।
दीर्घकालाचे साकडे । यत्न करिता वाटले ना ।।२७१।।
खरेखुरे आत्मज्ञान । ही न गोष्ट साधारण ।
हलके फुलके साधन । आत्मलाभा शक्य नाही ।।२७२।।
प्रजापतीने नंतरी । कथिले इंद्रास ऐशापरी ।
की जो स्वप्नाभीतरी । ऐश्वर्य सारे उपभोगितो ।।२७३।।
तोच आत्मा हे जाणावे । इंद्रे ते मानिले बरवें ।
गुरु वचनी आदरभावे । श्रद्धा होती इंद्राची ।।२७४।।
परी बुद्धि इंद्राची । सखोल, कुशाग्र होती साची ।
त्यासी स्वप्नींच्या पुरुषाची । आत्मस्थिति पटली ना ।।२७५।।
तो म्हणे शरीराची । व्यंगे नसती स्वप्नात साची ।
सुखे भोगी समृद्धीची । कधी कधी स्वप्नामध्ये ।।२७६।।
परी दुःखे स्वप्नातहि । भीतिदायक असती पाही ।
तेव्हा शोकग्रस्त होई । त्यासी आत्मा मानू कसे ।।२७७।।
मग न करिता कंटाळा । पुन्हा गुरुकडे आला ।
बत्तीस वर्षे राहिला । सेवा करीत गुरुगृही ।।२७८।।
तेव्हा म्हणे प्रजापति । गाढ झोपेत वरी शांति ।
दिसे कळेना ज्याप्रति । तोच आत्मा समजावा ।।२७९।।
हाच अभय अमृत । ब्रह्म यासी म्हणतात ।
इंद्राने ते विचारात । घेतलेसे निष्ठेने ।।२८०।।

परी करितांना चिंतन । त्यासी आले कळून ।
मी आहे हेही भान । नसते या झोपल्यासी ॥२८१॥
हा काहीच ना जाणतो । या स्थितीचा नाश होतो ।
असे असता मानावा तो । ज्ञानी आत्मा कसे याते ॥२८२॥
पुन्हा येऊन गुरुघरी । पाच वर्षे तप करी ।
या निष्ठेने त्याचेवरी । प्रसन्न झाले सद्गुरु ॥२८३॥
इंद्रा नैष्ठिक तपाचरणे । जिंकिले तू मजकारणे ।
ये बैस पूर्णपणे । आत्मज्ञान कथितो तुला ॥२८४॥
शरीर हेच साधन । जीवाचे प्रगतिकारण ।
म्हणून त्याचे संगोपन । योग्य रीती करणे हवे ॥२८५॥
या कारणे मी प्रथमता । देहाची कळण्या उपयुक्तता ।
उपदेश ऐसा केला होता । की शरीर हेचि आत्मा ॥२८६॥
परी ते एक साधन । तेथे न व्हावे रममाण ।
विचारवंत तुझे मन । उमगले हे तुजलागी ॥२८७॥
शरीर म्हणजे मी नाही । हे स्वप्नात कळते पाही ।
शरीर राहे ठायीच्या ठायी । त्रिखंडामध्ये भ्रमतो हा ॥२८८॥
इंद्रियांच्या वाचुनीहि । विषयाचा हा भोग घेई ।
म्हणून स्वप्नपुरुषा पाही । आत्मा ऐसे कथिले तुला ॥२८९॥
परी स्वप्नातहि आसक्ति । देहापरी विषयावरती ।
राहते म्हणून त्यासी होती । प्रियाप्रियाची सुखदुःखे ॥२९०॥
ते तुजसी नेमके कळे । मजला तू विचारिले ।
त्यावरी मी सांगितले । सुषुप्तिपुरुष हा आत्मा ॥२९१॥

कारण गाढ झोपेठायी । संवेदना कुठली नाही ।
जाणीव नसे कोणतीहि । इंद्रिय, मन वा बुद्धीची ॥२९२॥
मीपणहि मावळते । तरी सुख अनुभवा येते ।
जागृतीत स्मरण होते । भोगलेल्या सुखाचे या ॥२९३॥
परि येथील अज्ञान । हेहि एक आवरण ।
त्याचे झाल्या निरसन । शुद्ध आत्मा प्रगट होतो ॥२९४॥
या आत्म्याचे होता ज्ञान । नाहीसे होते अज्ञान ।
'मी' चे नुरे वेगळेपण । अहंकार लया जाई ॥२९५॥
मीपणा नुरल्यावरी । माझे उरते काय तरी ।
प्रियाप्रिय जाते दुरी । शरीरभावा ठाव नुरे ॥२९६॥
वायु, वीज वा जलधर । यास नसते शरीर ।
कार्य त्यांचे संपल्यावर । विरून जाती आकाशी ॥२९७॥
तैसेच आता शरीरहि । असून नसल्यापरी होई ।
कारण मुळी उरला नाही । अभिमान त्यासी देहाचा ॥२९८॥
देहाचा अभिमान सुटणे । हेचि शरीरा सोडणे ।
आता त्यासी कोण म्हणे । जीवपणे उरला हा ॥२९९॥
तो उत्तम पुरुष जाहला । क्षराक्षराच्या पार गेला ।
प्राप्त झाला निजरूपाला । परंज्योतिस्वरूप जे ॥३००॥
या सर्व वर्णनाठायी । जीवात्म्याचा भास होई ।
तोच सरळ मानता येई । गाढ झोपेपर्यंत ॥३०१॥
यास्तव या जीवात्म्यास । मानावे की दहराकाश ।
उठे सोडून शरीरास । तोहि आहे जीवात्मा ॥३०२॥

उत्तम पुरुष परंज्योति । स्वरूपाची झाली प्राप्ति ।
ही वर्णने लागती । जीवात्म्यासी म्हणता ये ॥३०३॥
म्हणोनि दहराकाशाने । योग्य जीवात्माच घेणे ।
परी पूर्ण विवेकाने । म्हणणे हे टिकेल ना ॥३०४॥
जीव शरीरा सोडितो । निजस्वरूपा प्राप्त होतो ।
तेव्हाच की म्हटला जातो । उत्तम पुरुष परंज्योति ॥३०५॥
हे शरीराचे सोडणे । म्हणजे ना लौकिकी मरणे ।
देहाभिमानरहित होणे । ऐसा अर्थ त्याचा असे ॥३०६॥
ना तरी शरीराचा त्याग । करणे सर्वा पडते भाग ।
परी उत्तम पुरुषत्वाचा योग । वाट्यास ये ना कुणाच्याहि ॥३०७॥
मृत्यूतून मृत्यूकडे । जाणे येणे सदा घडे ।
कोणासहि ना सापडे । मार्ग परंज्योतीचा ॥३०८॥
स्वस्वरूपाची होणे प्राप्ति । म्हणजे काय आहे स्थिति ।
हेहि पूर्ण विचारांती । जाणून घेतले पाहिजे ॥३०९॥
पहा निवडून आल्यावरी । मंत्रीपदा अनधिकारी ।
मिळवी, तैशी नाही खरी । स्थिति येथल्या प्राप्तीची ॥३१०॥
स्वस्वरूपासी प्राप्त होणे । म्हणजे न दुसरे मिळविणे ।
आपण आपणा जाणणे । अर्थ हा या प्राप्तीचा ॥३११॥
स्फटिक पडले कोळशात । दिसे काळे कुळकुळीत ।
शुभ्रता त्या होते प्राप्त । वरी काढून धुतल्याने ॥३१२॥
वेड कुणासी लागले । आपण कोण ते विसरले ।
भलते भलते करी चाळे । शिणे, शिणवी अन्यासहि ॥३१३॥

वैद्य भेटे, उपचार केले । औषधहि लागू पडले ।
लागलेले वेड गेले । तैशी आहे स्थिति येथ ॥३१४॥
जीव हा मुळात काही । ब्रह्माहून वेगळा नाही ।
उपाधीने त्याच्या ठायी । भेदभाव आला असे ॥३१५॥
बुद्धिमंत वेडा झाला । स्फटिक कोळशात पडला ।
तैशीच स्थिति जीवाला । उपाधीने प्राप्त होते ॥३१६॥
सद्गुरूने कृपा केली । उपासना योग्य घडली ।
तेणे जीवदशा गेली । प्राप्त झाली मूळस्थिति ॥३१७॥
वेगळा आहे मी कुणी । ऐसे मानी देहाभिमानी ।
त्याच्याचसाठी घेउनी । विधि निषेध येते श्रुति ॥३१८॥
विधि निषेधाचे जे प्रकार । वेडावरचे ते उपचार ।
त्याने वेड गेल्या पार । स्वरूपस्थिति प्रकाशते ॥३१९॥
स्वरूप होणे आविर्भूत । हीच मुक्ति, तोच मुक्त ।
ब्रह्मज्ञान झाले प्राप्त । याच वेळी म्हणता ये ॥३२०॥
उत्तमपुरुष परंज्योति । हाच आता निश्चिति ।
मी जीव ऐशी भ्रांति । निःशेष आता झालीसे ॥३२१॥
ज्यास मानीत होतो जीव । तो ब्रह्म मी सर्वथैव ।
यापरी दृढ अनुभव । साक्षात्कारे लाभला ज्या ॥३२२॥
ऐशा या ब्रह्मवेत्त्यास । मानीत असल्या दहराकाश ।
कारण नुरते कुणास । अमान्य ते करण्याचे ॥३२३॥
परी याचा लाभ काही । साधकां विशेष होणे नाही ।
ब्रह्मज्ञानी सत्पुरुषही । प्रत्यक्षात दहरी नसे ॥३२४॥

ब्रह्मज्ञ आदर्शभूत होतो । मार्गदर्शक होऊ शकतो ।
शंका कुशंका दूर करतो । स्वये अनुभवी असल्याने ॥३२५॥
थोर तयाची योग्यता । येथे शंका नको चित्ता ।
साधकाते पार नेता । होतसे जो भवातुनी ॥३२६॥
जे जया जवळी नाही । तो कसे ते कुणा देई ।
अशी अपूर्ण स्थिती काही । नसते ज्ञानी पुरुषाची ॥३२७॥
ब्रह्मवेत्ता ब्रह्मज्ञानी । वेगळा ना ब्रह्माहुनी ।
एक ब्रह्म प्रतिपादनी । तात्पर्य आहे वेदांचे ॥३२८॥
एवंच मुक्तापेक्षाहि । दहर शब्दाने ये ठायी ।
परमात्मा घेणे योग्य होई । घेता विचारी उद्दिष्टा ॥३२९॥

अन्यार्थश्च परामर्शः ।

[१]-३-२०-(५)

जीवाचा जो परामर्श घेतला आहे त्याचा उद्देश अन्याचा म्हणजे ईश्वराचा बोध करून देणे हा आहे.

जीव नसून दहराकाश । दहराकाश प्रकरणास ।
सविस्तरपणे वर्णनास । केले असे जीवाच्या ॥३३०॥
त्याचे ऐसे कारण । की जीवाच्या स्थितीवरून ।
करिता यावे प्रतिपादन । परमात्म्याच्या स्वरूपाचे ॥३३१॥
वैद्यकशास्त्री रोगाचे । वर्णन असे विस्ताराचे ।
परि प्रयोजन तयाचे । आरोग्यप्राप्ति हे आहे ॥३३२॥
मोठा घालून मांडव । गोळा करिती सर्व गाव ।
परी विवाहविधीचा भाव । वधूवरांच्या मीलनाचा ॥३३३॥

रांगोळ्यांचा केला थाट । बसावयासी मांडिला पाट ।
चांदीचेहि ठेविले ताट । तरी महत्त्व अन्नाचे ॥३३४॥
चटणी, भाज्या, कोशिंबीर । पक्काने वाढिली रुचकर ।
आग्रह केला वारंवार । तुष्टि पुष्टि लाभावया ॥३३५॥
त्यापरीच येथे श्रुति । जीवाची वर्णिते स्थिति ।
ज्यातून विचारे सहजगति । ब्रह्मभाव प्राप्त होतो ॥३३६॥
कारण ते ते लक्षण । निर्मिते की आकर्षण ।
प्रेरणा, करण्या प्रयत्न । लाभतसे साधकाते ॥३३७॥

अल्पश्रुतेरिति चेत्तदुक्तम् ।

[१]-३-२१-(५)

दहराकाशाचे अल्पत्व श्रुतींनी सांगितले असल्यामुळे त्याचा अर्थ परमात्मा करू नये, या शंकेचे उत्तर पूर्वी दिलेले आहे.

आधी देही हृदय लहान । सान दहराकाश त्याहून ।
परमात्म्याचे मोठेपण । विश्वापेक्षा मोठे असे ॥३३८॥
मग दहराकाशाभीतरी । सामावेल तो कैशापरी ।
या शंकेच्या उत्तरी । पूर्वी आहे सांगितले ॥३३९॥
की ध्यानास्तव आलंबन । लागते रमणीय लहान ।
याच भावे अल्पस्थान । परमात्म्याचे कथिले हे ॥३४०॥
जे सर्वा व्यापून राही । वसे ते अल्पस्थानातहि ।
आकाशासी वर्ज्य नाही । स्थान जेवी बोळक्याचे ॥३४१॥

अनुकृतेस्तस्य च ।

[१]-३-२२-(६)

"त्याचे अनुकरण करतात" असे वर्णन असल्याने सर्वांना प्रकाशित करणारा जो, तो परमात्माच होय.

ब्रह्माचे करिता वर्णन । मुंडक म्हणे गौरवून ।
ज्याच्या पुढती सामर्थ्य न । प्रकाशण्याचे सूर्यासहि ।।३४२।।★
ते न सामर्थ्य चंद्रासी । नाही नाही तारकासी ।
तळपणे नाही विजेसी । मग अग्नीची काय कथा ।।३४३।।
आधी तेच प्रकाशिते । मागून या तेज लाभते ।
याच्या तेजानेच होते । सर्व विश्व प्रकाशित ।।३४४।।
ब्रह्म हीच स्वयंज्योती । स्वयंप्रकाश निश्चिती ।
अवलंबून त्याच्यावरती । अस्तित्व साऱ्या विश्वाचे ।।३४५।।
सूर्य-चंद्राचा प्रकाश । ब्रह्मामुळे लाभला त्यास ।
म्हणून म्हटले ब्रह्मास । ज्योतीची ही ज्योति असे ।।३४६।।
येथील हे वर्णन । आहे ब्रह्मास उद्देशून ।
स्वयंप्रकाश अन्य कोण । आहे एक त्याच्याविणे ।।३४७।।

अपि च स्मर्यते।

[१]-३-२३-(६)

स्मृतीहि असेच सांगते.

गीताहि ऐसेच म्हणे । सूर्य-चंद्रांचे प्रकाशणे ।
घडून येते पूर्णपणे । ईश्वराच्या तेजाने ।।३४८।।

शब्दादेव प्रमितः।

[१]-३-२४-(७)

श्रुतीमध्ये अंगठ्याएवढां या मापाने सांगितलेला
पुरुष परमात्माच आहे.

अंगठ्याएवढा पुरुष । हृदयामध्ये करी वास ।
झालेल्या वा होणाऱ्यास । तो नियंत्रित करीतसे ।।३४९।।

धूमरहित ज्योतीपरी । तेज याचे असे भारी ।
शाश्वत असे हा निर्धारी । जैसा आज तैसा उद्या ॥३५०॥
हे कठाचे निवेदन । ब्रह्माचेच आहे जाण ।
अंगुष्ठाचे कथिले प्रमाण । म्हणून जीव मानू नये ॥३५१॥★
नियमन भूतभविष्याचे । काम हे ना जीवाचे ।
तैसे रूप तयाचे । शाश्वतहि ना म्हणता ये ॥३५२॥
श्रुतीच्या शब्दावरून । हेच येतसे कळून ।
मागीलहि प्रकरण । अनुकूल याच अर्थाला ॥३५३॥

हृद्यपेक्षया तु मनुष्याधिकारत्वात् ।

[१]-३-२५-(७)

वेदान्तशास्त्राचा अधिकार मनुष्यास असल्याने त्याच्या हृदयात राहतो, या स्थितीस अनुसरून परमात्म्याला अंगठ्याएवढा म्हटले आहे.

अंगठ्या एवढा म्हणून । जे सांगितले प्रमाण ।
ते तो गृहीत धरून । मनुष्याच्या हृदयासी ॥३५४॥
पशुपक्षी जे इतर । त्यांच्या हृदयाचा आकार ।
मनुष्यांचा करिता विचार । लहान मोठा असू शके ॥३५५॥
परी सर्व मानवांचे । हृदय सारख्या आकाराचे ।
म्हणून येथे अंगठ्याचे । प्रमाण आहे उल्लेखिले ॥३५६॥
अधिकार ब्रह्मविद्येचा । आहे एक मनुष्याचा ।
म्हणून इतर पश्वादींचा । नको विचार करावया ॥३५७॥
सर्वव्यापी ईश्वर । तरी हृदय त्याचे मंदिर ।
या भावाने अंगठाभर । म्हटले आहे ईशासी ॥३५८॥

सूर्य चढला कासराभरी । खेड्यात म्हणती ज्यापरी ।
बोधासाठी, त्याचपरी । प्रमाण येथे उल्लेखिले ॥३५९॥

तदुपर्यपि बादरायणः सम्भवात्।

[१]-३-२६-(८)

मनुष्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या देवांनाहि ब्रह्मविद्येचा अधिकार आहे असे बादरायण मानतात.

देवहि मनुष्यापरी । ब्रह्मविद्येचे अधिकारी ।
ऐसा विचार निर्धारी । बादरायण महर्षींचा ॥३६०॥
माणसापेक्षा योग्यता ती । देवांची अधिक निश्चिति ।
अनुकूल आहे परिस्थिति । ब्रह्मज्ञाना त्यांचीहि ॥३६१॥

विरोधः कर्मणीति चेन्नानेकप्रतिपत्तेर्दर्शनात्।

[१]-३-२७-(८)

तसे मानले तर यज्ञकर्माचे ठिकाणी अडचण उत्पन्न होईल असे म्हणू नये; कारण देव अनेक रूपे धारण करू शकतात असे वर्णन शास्त्रांत आढळते.

व्हावयासी ब्रह्मज्ञान । भाग असे शास्त्राध्ययन ।
तदनुसार आचरण । करण्या शरीर लागते ॥३६२॥
देव मानिता शरीरधारी । अडचण ये यज्ञाभीतरी ।
कोठे कोठे जाईल तरी । हविर्भाग घ्यावया तो ॥३६३॥
ऐसी मनी न घ्यावी शंका । देवांची शक्ति अलौकिका ।
धरून रूपा अनेका । हवि सर्वत्र घेतील ते ॥३६४॥

शब्द इति चेन्नातः प्रभवात्प्रत्यक्षानुमानाभ्याम्।

[१]-३-२८-(८)

शब्दाचे ठिकाणी विरोध येतो असे म्हणू नये; कारण शब्दापासूनच देवादींची उत्पत्ति होते असे श्रुतिस्मृतीवरून दिसते.

देवता मानिता शरीरी । अनित्य ठरतील निर्धारी ।
त्या योगाने वेदावरी । अनित्यतेचा दोष येतो ॥३६५॥
परी हे म्हणणे न उचित । वेदांचे सामर्थ्य अद्भुत ।
देवता निर्माण होतात । मंत्रशक्तीने वेदाच्या ॥३६६॥
देवता मंत्रशक्तीने । निर्माण होती म्हटल्याने ।
शब्दा न मानावी कारणे । उपादान की जगताची ॥३६७॥
कुंभ घडता कुलालासी । चाक थापटणे ही जैसी ।
निमित्त होती शब्द तैसी । साधनेहि विधात्याची ॥३६८॥
स्पंद हे रूप ज्याचे । अशा वैदिक शब्दांचे ।
निर्मितीसी जगताचे । सहाय्य होते ब्रह्मदेवा ॥३६९॥
करून शब्दांचे चिंतन । विधाता एकाग्र होऊन ।
तदनुसारे निर्माण । करी भूता देवतांना ॥३७०॥
श्रुतिस्मृतीभीतरी । वर्णने ही आली सारी ।
तेणे देव मानिता शरीरी । अडचण काही उरते ना ॥३७१॥★

अत एव च नित्यत्वम्।

[१]-३-२९-(८)

म्हणूनच वेदाला नित्यत्व आहे.

देव जरी अनित्य असला । तरी शाश्वती त्याच्या पदाला ।
इंद्र कल्पांती निमाला । तरी केवळ व्यक्तिरूपे ॥३७२॥
राजा व्यक्ति येई जाई । राजेपण तसेच राही ।
तीच अवस्था येथेहि । इंद्रादि देवतांची ॥३७३॥
वेदांमधील देवता । व्यक्तिस्वरूप ना तत्त्वता ।
त्यांची वर्णिली महत्ता । पद ते शाश्वत म्हणोनि ॥३७४॥

म्हणून नित्यत्व वेदाचे । बाधित ना व्हावयाचे ।
अपरंपार महत्त्व त्याचे । टिकून राहे सर्वदा ॥३७५॥

समाननामरूपत्वाच्च वृत्तावप्यविरोधो
दर्शनात्स्मृतेश्च ।

[१]-३-३०-(८)

सारखीच नावरूपे असल्यामुळे पुन: पुन: उत्पत्ति मानली तरी काही विरोध येत नाही; कारण श्रुतिस्मृतीवरून असेच दिसते.

महाप्रलयाच्या समयी । जरी सर्व लया जाई ।
तरी पुन्हा प्रगट होई । यथापूर्व विश्व सारे ॥३७६॥
सूर्य-चंद्रादि देवता । तशाच निर्मी विधाता ।
नामरूपात भिन्नता । येत नाही त्यांच्या कधी ॥३७७॥
ऐसे श्रुतिस्मृतींनी । वर्णिलेसे आवर्जुनी ।
म्हणून व्यक्ति पालटोनि । अडचण ये ना यज्ञामधे ॥३७८॥

मध्वादिष्वसम्भवादनधिकारं जैमिनिः ।

[१]-३-३१-(८)

मधुविद्यादींचा अधिकार देवादींचे ठिकाणी संभवत नसल्यामुळे त्यांना ब्रह्मविद्येचाहि अधिकार नाही असे जैमिनि म्हणतात.

मत जैमिनि मुनींचे । आहे भिन्न स्वरूपाचे ।
ते म्हणती ब्रह्मज्ञानाचे । देव नसती अधिकारी ॥३७९॥
ब्रह्मप्राप्तीचे साधन । मधुविद्या कथिली जाण ।
जिचे आहे वर्णन । छांदोग्यांत स्पष्टपणे ॥३८०॥★
तेथे असे म्हटलेसे । की सूर्य देवांचा मधु असे ।
आता सूर्यानेच कैसे । विद्येसी या आचरावे ॥३८१॥

म्हणून देवांना मुळीहि । ब्रह्मविद्येचा अधिकार नाही ।
आवश्यकता त्यांचे ठायी । देवत्वाने तिची नसे ।।३८२।।

ज्योतिषि भावाच्च।

[१]-३-३२-(८)

ज्योति या अर्थी आदित्य इत्यादि देवतांचे वर्णन असल्याने देवांना तो अधिकार नाही.

तेजोगोल नभातले । सूर्यादि हे देव सगळे ।
त्यांना मुळी नसे उरले । ब्रह्मविद्येचे प्रयोजन ।।३८३।।
नाही मन, बुद्धि, शरीर । नाही इच्छा वा विचार ।
कोठून असे अधिकार । ब्रह्मविद्येचा मग त्यांना ।।३८४।।
पुराणातल्या ऐशा कथा । या तो केवळ रंजकगाथा ।
त्यावरी विश्वासून सर्वथा । शरीर देवा मानू नये ।।३८५।।
ऐसेहि एक मत । काही लोक मानितात ।
हे वाटते असावेत । जैमिनीचे अनुयायी ।।३८६।।

भावं तु बादरायणोऽस्ति हि।

[१]-३-३३-(८)

परंतु देवांना ब्रह्मविद्येचा अधिकार आहे असे बादरायण म्हणतात.

परी हे काहींचे मत । महर्षि व्यासा न संमत ।
म्हणती देवा निश्चित । अधिकार ब्रह्मविद्येचा ।।३८७।।
जैमिनीच्या मतापरी । कर्म मार्गाचे अधिकारी ।
देव नसोत, आहे तरी । ब्रह्मविद्येची योग्यता त्या ।।३८८।।
पक्षुपक्ष्याहून मानव । श्रेष्ठ मानिती सदैव ।
तैसे सामर्थ्याने देव । श्रेष्ठ असती नराहुनी ।।३८९।।

जीवा क्रमाने मिळे मुक्ति । ऐसी शास्त्रे बोलती ।
त्याची होतसे उन्नति । कर्मानुसारे त्याचिया ॥३९०॥
उन्नतीचा हा जो क्रम । त्याला कारण इच्छाकर्म ।
मार्ग-भेदे अन्ती ब्रह्म । प्राप्त होते जीवांना ॥३९१॥
ज्ञान, कर्म, योग, भक्ति । ऐसे विविध मार्ग होती ।
समन्वयाने त्यातून अन्ती । मोक्ष लाभे जीवासी ॥३९२॥
ज्यांना आवडे उन्नत होणे । व्रत यज्ञादि मार्गाने ।
श्रेष्ठ प्रतीचा क्रमाने । देह त्यांना लाभतो ॥३९३॥
मनुष्य देह सुटल्यावर । लाभे गंधर्वाचे शरीर ।
पितर होताती नंतर । पुढे देवयोनि मिळे ॥३९४॥
ऐसे देव झाल्यावरी । इच्छा त्यांची असेल जरी ।
तरी तयांना अधिकारी । ब्रह्मविद्येचे होता ये ॥३९५॥
देव ऐसे ब्रह्मज्ञानी । वर्णिले उपनिषदांतुनी ।
कुमार नचिकेतालागुनी । आत्मज्ञान यमे दिले ॥३९६॥
शंभर वर्षे श्रमून । इंद्रे मिळविले ब्रह्मज्ञान ।
त्याच्यापासून प्रतर्दन । आत्मज्ञान मिळवी ते ॥३९७॥
वरुणाने निजपुत्राला । ब्रह्मविद्येचा उपदेश केला ।
ब्रह्मविद्या जी उमा तिला । भेटले अग्नि आणि वायु ॥३९८॥
यावरून स्पष्ट होते । अधिकार आहे देवाते ।
देवा धारण करता येते । शरीर त्यांच्या इच्छेने ॥३९९॥
प्राप्त झाल्या मंत्रशक्ति । देवहि प्रत्यक्ष होती ।
योगी योगबळावरती । संबंध जोडिती देवासी ॥४००॥

शरीर मन बुद्धीचे । सामर्थ्य अधिक जयांचे ।
नराहुनी, त्या देवांचे । अधिकार का नाकारणे ॥४०१॥
आता मात्र एक होई । प्रमाणात ज्या मनुजाठायी ।
मोक्ष इच्छा उत्पन्न होई । तसे देवांचे होईल ना ॥४०२॥
देव असती ऐश्वर्यशाली । आपत्ति ना विशेष कुठली ।
उणीव काही नसे उरली । सुखोपभोगामधे त्यांना ॥४०३॥
सुखासुखी कुणाळाहि । मोक्ष इच्छा होत नाही ।
त्रिविध तापे गांजल्या पाही । त्यातून सुटावे मग वाटे ॥४०४॥
इच्छा जरी नसे मनी । तरी न होई आत्मज्ञानी ।
म्हणून वर्णिले संतांनी । महत्त्व मृत्युलोकाचे ॥४०५॥

शुगस्य तदनादरश्रवणात्तदाद्रवणात्सूच्यते हि।

[१]-३-३४-(९)

शूद्रत्व हे जातिवाचक नसून आपला अनादर झाल्यामुळे जो शोक उत्पन्न होतो त्या वृत्तीस उद्देशून आहे असे सुचविले जाते.

अधिकार मनुष्यमात्रासी । मिळविण्या ब्रह्म-विद्येसी ।
उच्च नीच या भावनेसी । थारा नसे ये ठायी ॥४०६॥
करिता वेदांचे अध्ययन । सोपे मिळविणे ब्रह्मज्ञान ।
परी वेदाच्याच मंत्रातून । मिळते ते असे नाही ॥४०७॥
अमृतासम संतवचन । मिळवून दे ब्रह्मज्ञान ।
महाभारतासम सोपान । दुजा न तत्त्वज्ञानासी ॥४०८॥
सूत्रमय वेदाहुनी । भारत भागवतातूनि ।
विस्ताराने स्पष्टपणी । ज्ञान कथिले ब्रह्माचे ॥४०९॥

त्याचे करून अध्ययन । वर्तन तसे सुधारून ।
कोणीहि जावे उद्धरून । आडकाठी नाही कुणा ॥४१०॥
आचार्य पूज्यपाद शंकर । ब्रह्मज्ञ म्हणुनी स्वीकार ।
धर्मव्याध आणि विदुर । यांचा करिती आवर्जुनी ॥४११॥
यास्तव वेदाचा अधिकारी । मनुष्य कुणी नसला जरी ।
ब्रह्मज्ञान अत्यादरी । प्रयत्ने त्या लाभू शके ॥४१२॥
येथे न जाति प्रमाण । सद्गुणासी आहे मान ।
शूद्र म्हणती त्याकारण । मत्सरी जो वृत्तीने ॥४१३॥
माझ्यापेक्षा चांगला । आहे म्हणता कुणाला ।
हा माझा अपमान झाला । ऐसे वाटे शूद्र तो ॥४१४॥
मग तो धुवून काढण्यासी । करी धावाधाव विशेषी ।
या वृत्तीच्या मानवासी । ब्रह्मज्ञान केवी मिळे ॥४१५॥

क्षत्रियत्वगतेश्चोत्तरत्र चैत्ररथे न लिङ्गात्।

[१]-३-३५-(९)

क्षत्रियत्व हे लक्षणांवर अवलंबून आहे. चांगल्या रथावर नाही.

माणूस येई ओळखून । त्याच्या संगतीवरून ।
गुणाप्रमाणे मित्रगण । बहुधा गोळा होतसे ॥४१६॥
असूनहि उत्तम जाति । माणसे गेली अधोगति ।
कान्होपात्रेस भगवत्प्राप्ति । झाली वेश्या असूनहि ॥४१७॥
जरी म्हणती कनिष्ठ जाती । गुणबळे लाभे उन्नती ।
म्हणून जातीची ना महती । ज्ञान लाभण्या ब्रह्माचे ॥४१८॥

सावंतेबुवा, गोरोबा । रोहिदास किंवा तुकोबा ।
अधिकार असे कुणासी बा ? । योग्यता यांची नाकारण्या ॥४१९॥
क्षत्रियांचे मोठेपण । त्याच्या शौर्यधैर्यावरून ।
विपुल सुंदर स्यंदन । हे ना चिन्ह क्षत्रियांचे ॥४२०॥

संस्कारपरामर्शात्तदभावाभिलापाच्च।

[१]-३-३६-(९)

ब्रह्मविद्येसाठी योग्य संस्कारांची आवश्यकता असल्याने
त्यांचा अभाव असतांना कुणासहि अधिकार नसतो.

संस्कार असल्या चांगले । ब्रह्मज्ञानाकडे वळे ।
त्याच्या अभावी मोकळे । रान राहे वागण्यासी ॥४२१॥
कुल, जाति, परिस्थिति । यांच्यापेक्षा महत्त्व अति ।
संस्कारासी, होण्या प्राप्ति । सद्गुणांची मानवाते ॥४२२॥
तेव्हाच घडती संस्कार । फलदायी मानवावर ।
जेव्हा तयाचे अंतर । उत्सुक असे उन्नतीसी ॥४२३॥
संस्कारी नसल्या मानव । यत्न वाया जाती सर्व ।
फलाचा दिसतो अभाव । किती बोध केला तरी ॥४२४॥

तदभावनिर्धारणे च प्रवृत्तेः।

[१]-३-३७-(९)

संस्कारांचा अभाव नाही हे निश्चित झाल्यानंतरच
ब्रह्मविद्येकडे प्रवृत्त व्हावे

उन्नति-प्रगति-विकास । साधण्याच्या उद्योगास ।
आवश्यक असती विशेष । असे सद्गुण संपादणे ॥४२५॥
विषयी नसावी आसक्ति । क्षुद्र नसावी मत्सरी वृत्ति ।
अश्रद्धा नि आळसाप्रति । थारा नसावा मनामध्ये ॥४२६॥

प्रयत्नासी ना कंटाळावे । मन मोकळे असावे ।
कधीहि ना निराश व्हावे । यश मिळाले नाही तरी ॥४२७॥
आपुला स्वार्थ साधण्यासी । पीडा न द्यावी इतरासी ।
सत्य बोलावे सद्गुरूसी । विनयी वर्तन ठेवावे ॥४२८॥
निजस्वभावी वर्तनात । गुण हे पुरे नांदतात ।
या निश्चये मग प्रवृत्त । व्हावे ब्रह्मज्ञानासी ॥४२९॥

श्रवणाध्ययनार्थप्रतिषेधात्स्मृतेश्च ।

[१]-३-३८-(९)

संस्काराचे योग्य अधिकार नसलेल्याला श्रवण आणि अध्ययन नाही असे स्मृतीनेहि सांगितले आहे.

हे कथिलेले सद्गुण । ठावे नसती ज्याकारण ।
त्याचे श्रवण अध्ययन । आहे नाही सारखेचि ॥४३०॥
म्हणून अशासी सांगणे । निषिद्ध मानिले शास्त्राने ।
परिणाम नाही धुराविणे । ओली लाकडे जाळण्याचा ॥४३१॥
आवर्जून सांगे गीता । ज्ञान न सांगणे अभक्ता ।
मत्सराने ज्याच्या चित्ता । पूर्ण आहे व्यापिलेले ॥४३२॥★

कम्पनात् ।

[१]-३-३९-(१०)

प्राणामुळे जग कंप पावते असे सांगितले आहे, म्हणून प्राण म्हणजे परमात्माच आहे.

जग हे निर्माण झालेले । प्राणामुळेच हाले चाले ।
जणू आहे उगारलेले । वज्र महाभीषण हे ॥४३३।
यासी जो जाणतो । तो अमृतत्वाते पावतो ।
कठाच्या या वर्णनी तो । प्राण म्हणजे काय आहे ॥४३४॥★

सर्व हालणे चालणे । हे न घडे ब्रह्माविणे ।
अमृतत्त्वाचे पावणे । लक्षण ब्रह्मज्ञानाचे ॥४३५॥
म्हणून या येथहि । ब्रह्म हाचि अर्थ पाही ।
भीषण वज्र म्हणणेहि । जुळे ब्रह्मवर्णनासी ॥४३६॥
वारा वाहे याच्या भये । सूर्य उगवतो याच्या भये ।
या वर्णने लक्षात ये । भीतिप्रदता ब्रह्माची ॥४३७॥

ज्योतिर्दर्शनात्।

[१]-३-४०-(११)

ज्योति म्हणजे परमात्माच आहे. कारण तसे दिसते.

जीव देहापासून सुटतो । स्वस्वरूपे संपन्न होतो ।
परंज्योतीठायी मिळतो । उत्तम पुरुष म्हणती तयी ॥४३८॥
छांदोग्यातील ही जी ज्योति । ब्रह्मापासून भिन्न ना ती ।
उत्तमपुरुषादि लक्षणे ती । जुळती ब्रह्म घेतल्याने ॥४३९॥★

आकाशोऽर्थान्तरत्वादिव्यपदेशात्।

[१]-३-४१-(१२)

आकाश म्हणजे ब्रह्मच आहे; कारण ते नामरूपाहून निराळी वस्तु आहे, असे सांगितले आहे.

आकाश असे याचे नाम । हे प्रकाशवी रूप नाम ।
नामरूपात जे विश्राम । करी ते ब्रह्म, तो आत्मा ॥४४०॥
वस्तु प्रगटे भिन्नाकृति । आकाश कारण त्याप्रति ।
अवकाशाविण निश्चिती । कधी आकार पालटेना ॥४४१॥
आकार वेगळा असल्याविण । नाव वेगळे पडते न ।
दागिन्याकडे पाहून । लक्षात येते हे सारे ॥४४२॥

गोठ, बांगडी, पाटली । गोफ, चंद्रहार, साखळी ।
आकार, नामे, वेगळाली । सर्वत्र सोने तेच असे ॥४४३॥
आकाशाचे आकाशपण । ब्रह्मावरी अवलंबून ।
म्हणून येथहि ब्रह्म जाण । घ्यावे आकाश शब्दाने ॥४४४॥
नामरूपात राहणे । नामरूपा प्रकाशिणे ।
सर्व असती लक्षणे । ब्रह्म या मूळतत्त्वाची ॥४४५॥

सुषुप्त्युत्क्रान्त्योर्भेदेन।

[१]-३-४२-(१३)

निद्रा आणि मृत्यु यात वर्णिलेल्या जीवाहून परमात्मा वेगळा असल्याने, एकूण वर्णनाचे तात्पर्य ब्रह्मस्वरूप सांगण्याचेच आहे.

गाढ झोप आणि मरण । यांच्या वर्णनामधून ।
जीवात्म्याचे अधिष्ठान । कथिले त्या त्या दशेमधे ॥४४६॥
परी वर्णनाचे प्रयोजन । ईशाचेच प्रतिपादन ।
पुढचे प्राज्ञ हे अभिधान । ईश अर्थ स्पष्ट करी ॥४४७॥★

पत्यादिशब्देभ्यः।

[१]-३-४३-(१३)

पति इत्यादि शब्दांवरूनहि परमात्म्याचे स्वरूप सांगण्याचाच उद्देश आहे.

ईश्वरांचा महेश्वर । देवांचे जे दैवत पर ।
या सर्वहि विश्वावर । सत्ता त्याची अबाधित ॥४४८॥
ज्याच्या इतका कुणीहि । स्तवन करण्या योग्य नाही ।
हाच पालनकर्त्यांचेहि । पालन परितो पूर्णपणे ॥४४९॥

हा पराहूनहि पर । स्वयंप्रकाशी सुंदर ।
होवो आम्हास साक्षात्कार । याच्या दिव्य ज्ञानाचा ॥४५०॥★
पति महेश परात्पर । ऐसे म्हणे श्वेताश्वतर ।
यावरून कळते सार । निवेदनाचे वेदाच्या ॥४५१॥
एका ब्रह्माविणे काही । तात्पर्य वेदा अन्य नाही ।
ब्रह्मच वर्णिले ठायी ठायी । वेगवेगळ्या प्रकाराने ॥४५२॥

॥ तृतीय किरण समाप्त ॥

ॐ श्रीः स्वस्ति

श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

**अध्याय पहिला**

**किरण तिसरा**

समाप्त

श्रीशंकर

# श्रीब्रह्मसूत्रार्थदर्शिनी

## [ श्रीमद्‌ब्रह्मसूत्रटीका ]

ॐ श्री: स्वस्ति

## प्रथमाध्याय

### किरण चवथा

आनुमानिकमप्येकेषामिति चेन्न
शरीररूपकविन्यस्तगृहीतेर्दर्शयति च।

[१]-४-१(१)

अनुमानाने सिद्ध होणारी अशी जी सांख्यांची प्रकृति, तिला सुद्धा काही वेदमंत्रांमध्ये प्रकृतीचा वाचक असलेल्या अव्यक्त शब्दाच्या उपयोगामुळे आधार आहे असे मानू नये. कारण तेथे रूपकामध्ये आलेले जे शरीर तेच अव्यक्त शब्दाने घेतलेले आहे.

ब्रह्म जगाचे कारण। याचे केले प्रतिपादन।
नानाप्रकारे सूत्रातून। यापूर्वी वर्णिलेल्या ॥१॥
नाही कारण प्रकृति। वेदप्रामाण्य ना तिजप्रति।
हेहि लावून संगति। शब्दार्थांची कथिलेसे ॥२॥

तरी काही करिती यत्न । प्रकृति मानण्याकारण ।
प्रमाण ओढून ताणून । दाखविताती वेदांचे ॥३॥
काठकोपनिषदामधले । मंत्र काही घेतले ।
महत्, अव्यक्त, पुरुष भले । शब्द तीन क्रमे जेथे ॥४॥★
आणि काढिला सिद्धांत । पहा येथे उपनिषदात ।
मांडिलेसे सांख्य मत । त्याच क्रमाने तैसेचि ॥५॥
सांख्यांनीहि आपुला । हाच क्रम ठेविला ।
महद् अव्यक्त पुरुषाला । क्रमाने पर मानिती ते ॥६॥
सांख्यहि प्रकृतिप्रति । अव्यक्त ऐसे बोलती ।
वेदाने ना मानिली ती । ऐसे आता म्हणू नये ॥७॥
परंतु ही मांडणी । उगीच केली हट्टांनी ।
अव्यक्त शब्द मंत्रातुनी । तेथे आला भिन्नार्थे ॥८॥
तो अव्यक्त शब्द देख । आहे शरीराचा वाचक ।
सर्व प्रकारचा विवेक । नीट केल्या कळेल हे ॥९॥
प्रकरण अतिसुंदर । तत्त्वज्ञानाचे जणु सार ।
साध्याचा कथिला विचार । साधनांसह जे ठायी ॥१०॥
नचिकेत्याने यमाला । आत्म्यासंबंधी प्रश्न केला ।
अन्य कुठल्या प्रलोभनाला । बळी पडला नाही तो ॥११॥
तेव्हा प्रसन्न होऊन । यम सांगे तत्त्वज्ञान ।
सहज होण्या आकलन । आश्रय केला रूपकाचा ॥१२॥
यम म्हणे हा जीव रथी । रथ मानी शरीराप्रति ।
बुद्धि येथे सारथी । लगाम समजे मनासी ॥१३॥

इंद्रिये ही येथ घोडे । विषयाचे जे पंचकडे ।
तोच चारा आवडे । चरावया या अश्वांना ॥१४॥
इंद्रिये आणि मनाने तो । आत्मा जेव्हा युक्त होतो ।
तेव्हा भोक्ता मानिला जातो । विवेकी जनांकडोनि ॥१५॥
बुद्धि न ज्याची विवेक करी । मन अशान्त असे भारी ।
तेव्हा नाठाळ घोड्यापरी । खड्ड्यात घालिती इंद्रिये ॥१६॥
उलट बुद्धि विवेकशाली । मने चंचलता सोडिली ।
तदा इंद्रिये योग्य स्थली । नेती स्वाधीन अश्वापरी ॥१७॥
विचार नाही बुद्धीसी । अस्वास्थ्य नांदे मानसी ।
अशुद्धता वर्तनासी । जोडोनिया राहिलेली ॥१८॥
ऐसे असल्या जीवन । श्रेष्ठ पद मिळे कोठून ।
संसारात गुरफटून । राहावे लागे तयासी ॥१९॥
परी बुद्धि असल्या विचारी । शांती मनाभीतरी ।
तो त्या चढतो पदावरी । पुनरावर्तन जेथे ना ॥२०॥
बुद्धीचा सारथी नीट । मनाचा लगाम बळकट ।
असल्या सहज संपे वाट । पोचतो पदी विष्णूच्या ॥२१॥
इंद्रिये, विषय क्रमे मन । बुद्धि पर मनाहून ।
आत्मा जो नामे महान् । परतर तो बुद्धीहुनी ॥२२॥
अव्यक्त महताहुनी पर । अव्यक्ताहूनहि ईश्वर ।
त्याच्यापुढे न कोणी इतर । ती काष्ठा, ती परा गती ॥२३॥
गुप्तरूपे हा सर्वात । राहे तरी न कळो येत ।
तीक्ष्ण बुद्धीने पाहतात । यासी साधक सूक्ष्मदर्शी ॥२४॥

आता येथे अव्यक्त । म्हणजे प्रकृति नसे सत्य ।
मागील रथाच्या रूपकात । जे आले ते सर्व इथे ॥२५॥
रथ म्हणून शरीराचा । तेथे उल्लेख केला साचा ।
येथे त्या शरीराचा । अव्यक्त आहे प्रतिनिधी ॥२६॥
मात्र अव्यक्त शब्दाने । स्थूल शरीरासी न घेणे ।
येथे लिंगदेहाकारणे । अव्यक्ताने ओळखावे ॥२७॥
कोणी हिरण्यगर्भाप्रति । अव्यक्त शब्दे स्वीकारिती ।
काही अंशाने ही रीति । योग्य ऐसे मानिता ये ॥२८॥
परी हिरण्यगर्भावरी । साधका सत्ता नसे खरी ।
त्यास परमात्म्याभीतरी । लीन कराया येते ना ॥२९॥
म्हणून लिंगदेह स्वीकारिता । रूपकास येते पूर्तता ।
उगाच येथे सांख्यमता । आधार आहे म्हणू नये ॥३०॥
महान्हि येथे काही । सांख्यकथित महत् नाही ।
रथी म्हटले जया पाही । तो हा येथे जीवात्मा ॥३१॥
पुढे कठोपनिषदाने । कथिली आहेत साधने ।
कोणकोणत्या उपायाने । परमपदासी पोचावे ॥३२॥★
वाणी आवरावी मनाने । मन नियंत्रावे बुद्धीने ।
येथ वाणीच्या उपलक्षणे । सर्व इंद्रिये समजावी ॥३३॥
जीवात्म्याच्या बळावरी । बुद्धि स्वाधीन ठेवणे पुरी ।
जीवात्माहि नंतरी । शांत आत्म्यात मिसळावा ॥३४॥
या सर्व वर्णनाठायी । प्रकृतीसी स्थान नाही ।
विचारे ना प्राप्त होई । वेदप्रामाण्य प्रकृतीते ॥३५॥

येथे एक सहज शंका । येणे आहे शक्य लोका ।
इंद्रिया पर ऐसे का । म्हटले येथे विषयासी ॥३६॥
येथे विषय म्हणजे काही । स्थूल बाह्य वस्तु नाही ।
व्यवहारात जिचा होई । वापर भोग्य म्हणूनिया ॥३७॥
इंद्रिये विषय सेविती । ती न त्यांची स्थूलाकृति ।
स्पर्श रूपादि राहती । आधाराने वस्तूंच्या ॥३८॥
स्पर्शरूपादि हे भाव । त्यांची इंद्रियांना हाव ।
इंद्रियांपेक्षा सर्वथैव । सूक्ष्मपणे राहती ते ॥३९॥
विषयांना याच अर्थी । पर म्हटले शास्त्रग्रंथी ।
मानवाची प्रेरणा स्वार्थी । जन्मा येई यांच्यामुळे ॥४०॥

सूक्ष्मं तु तदर्हत्वात्।

[१]-४-२-(१)

अव्यक्त शब्दाने तेथे सूक्ष्म शरीर घेणेच विवक्षित आहे;
कारण तेच घेणे योग्य आहे.

पाहता न ये ज्याप्रति । अव्यक्त त्यासी म्हणताती ।
शरीर दिसते नेत्राप्रति । त्यास अव्यक्त म्हणावे का ॥४१॥
येथे अव्यक्त शब्दाने । स्थूल देह नाही घेणे ।
सूक्ष्म शरीराकारणे । अव्यक्त म्हटले ये ठायी ॥४२॥
निर्मितिपूर्वी सृष्टी सारी । अव्यक्त होती सर्वतोपरी ।
भेद न कोणत्या प्रकारी । नाम, रूप काही नसे ॥४३॥
ही बीजावस्था सृष्टीची । अव्यक्त म्हणती तिलाचि ।
परंतु ही सांख्यांची । प्रकृति नाही निश्चयाने ॥४४॥

तदधीनत्वादर्थवत्।

[१]-४-३-(१)

अव्यक्त शब्दाने जगताची पूर्वस्थिति मानली तरी ती प्रकृतिप्रमाणे स्वतंत्र नसून परमेश्वराच्या आधीन आहे व तसे मानणे उपयोगाचे आहे.

सांख्यहि निज प्रकृति । सृष्टीचे बीज मानिती ।
परंतु या त्यांच्या मती । स्वातंत्र्य आहे प्रकृतीचे ॥४५॥
पुरुषाच्या भोगासाठी । प्रकृतीच्या खटपटी ।
रीत परी ही उफराटी । कर्कशेसम एखाद्या ॥४६॥
कोणतेहि नियंत्रण । प्रकृतीसी नसे जाण ।
तिचे सारे वर्तन । होते तिच्या लहरीने ॥४७॥
ऐशी स्वतंत्र प्रकृति । मान्य नाही वेदाप्रति ।
म्हणून जगाची पूर्वस्थिति । प्रकृति नाही सांख्यांची ॥४८॥
अव्यक्त असे म्हटले ज्याते । पूर्ण आधीन ईशाच्या ते ।
त्याच्याविणे ना सिद्ध होते । जगत्-कर्तृत्व ईशाचे ॥४९॥
सृष्टीची मानिता निर्मिति । ईशाठायी बीजशक्ति ।
मानण्याविण नाही गति । तिलाच म्हणती अव्यक्त ॥५०॥
कुठे अविद्या, कोठे माया । अक्षर म्हटले अव्यक्ता या ।
कुठे साधका उपदेशाया । आकाशहि या म्हटलेसे ॥५१॥
महेश्वरासी मायावी । प्रकृति हीच जाणावी ।
काही नसून भासवी । हीच सर्व आहे असे ॥५२॥★
आपुले न जाणता रूप । हिच्यामुळे घे जीव झोप ।
न लागावा ज्याचा लेप । त्यास माझे माझे म्हणे ॥५३॥
उपाधीचे अधिष्ठान । संसाराचे कारण ।
व्यवहाराचे प्रयोजन । अव्यक्ताच्यामुळे असे ॥५४॥

अव्यक्त अशा मायेमुळे । लिंगदेहा अस्तित्व आले ।
अव्यक्त म्हणणे त्या शोभले । कारण काया विकार तो ॥५५॥
आदराया काही मते । सांख्यापरी प्रकृतीते ।
अव्यक्त शब्दे घेता येते । मात्र सावधता हवी ॥५६॥
येथिच्या प्रकृति कारणे । कोणत्याहि स्वरूपाने ।
स्वातंत्र्य ना, आधीनतेने । राहते ती ईशाच्या ॥५७॥
मायेस म्हटले अव्यक्त । ते असे अगदी उचित ।
कारण तिचे निश्चित । रूप ये ना सांगावया ॥५८॥
ब्रह्माहून ती आहे भिन्न । असे न करावे वर्णन ।
शक्ति ज्याची त्याच्याहून । वेगळी ना म्हणणे कधी ॥५९॥
ती ना ब्रह्मावेगळी । असेहि न म्हणवे मुळी ।
कांति जाणवे निराळी । उजळलेल्या सुवर्णाची ॥६०॥
वेगळे ना काढता येते । एकरूप ना वाटते ।
ऐसे अद्भुत काहीसे ते । रूप अव्यक्ताचे या ॥६१॥
अव्यक्त शब्दाचा विचार । करिता अर्थाचे प्रकार ।
विद्वानांच्या मतानुसार । होती वेगवेगळाले ॥६२॥
कोणी परा प्रकृति । अव्यक्त शब्दे स्वीकारिती ।
कोणी मानिती तयाप्रती । माया शुद्ध सत्त्वात्मक ॥६३॥
हिरण्यगर्भ वा विराट ऐसे । कोणी तया मानीतसे ।
अप्रकटपणे वा असतसे । सृष्टीचे जे पूर्व रूप ॥६४॥
वट वृक्षाचे बीज जेवी । सूक्ष्मपणा लोकी मिरवी ।
सृष्टी वट रूप जाणावी । अव्यक्त होते बीज तिचे ॥६५॥

संदर्भात या कठाचे । रूपक विचारी घेता साचे ।
कल्लोळ हृदयी शंकांचे । नानापरी उठताती ॥६६॥
रूपक वरी वरी पाहता । स्थूल शरीर म्हटले रथा ।
रथीचा अर्थ कोणता । जीवात्मा की परमात्मा ॥६७॥
कारण येथे मुळात । रथी म्हटले आत्म्याप्रत ।
रूपक स्पष्टीकरणात । रथ म्हटले सूक्ष्मदेहा ॥६८॥
केवळ निखळ अद्वैत । पारमार्थिक सत्य होत ।
अनुभवासि येते द्वैत । आधार तेचि साधनेसी ॥६९॥
म्हणून नाना शंकांचे । वादळ उठतसे साचे ।
अंतःकरण ते जिज्ञासूचे । व्याकुळ करी नाना परी ॥७०॥
म्हणोनि अर्थ लावताना । केवळ शब्दा अनुसरताना ।
जाणवतो विसंगतपणा । ठायी ठायी वर्णनात ॥७१॥
प्रत्येकाचे विश्लेषण । करणे असे फार कठिण ।
मात्र शब्दांचे अरण्य । प्रक्रियांचे रूप होते ॥७२॥
त्यातून काढणे सरळ वाट । हे तो दुर्धर संकट ।
साधकाने तो बोभाट । टाळावा की यथाशक्ति ॥७३॥
साधनेच्या आरंभात । स्थूल शरीर हाचि रथ ।
रथी मानणे जीवाप्रत । बुद्धी सारथी जाणावी ॥७४॥
जशी साधना प्रगत होते । परमसत्य जवळी येते ।
तसे तसे शब्दांचे ते । अर्थ सूक्ष्म घेणे पडे ॥७५॥
गीतेमध्ये जीवाची । दोन रूपे कथिली साची ।
एक अवस्था तयाची । परा प्रकृति रूपाने ॥७६॥

दुसऱ्या स्थितीत अंशभूत । असे म्हटले जीवाप्रत ।
तोच घ्यावा आता अर्थ । रथ, रथी या शब्दाने ।।७७।।
एकूण पाहता प्रकरण । समन्वयासी अनुसरून ।
असाच अर्थ करणे पूर्ण । जिज्ञासूच्या उपयोगी ।।७८।।

ज्ञेयत्वावचनाच्च।

[१]-४-४-(१)

अव्यक्त म्हणजे प्रकृति नव्हे, कारण ती ज्ञेय अशा रूपाने तेथे सांगितलेली नाही.

जाणून घ्यावे ऐशा रीति । ब्रह्माचीच आहे महति ।
येथे ज्ञेय म्हटले ज्याप्रति । तो अव्यक्तापलीकडे ।।७९।।
श्रीविष्णूचे पद परम । म्हणजे एक आहे ब्रह्म ।
हाच असे पुरुषोत्तम । पराहून परता जो ।।८०।।★
प्रकृतीचे ज्ञेय म्हणून । येथे कुठेच नाही कथन ।
अव्यक्त त्यात समावून । आहे, म्हटले 'ज्ञेय' ज्याते ।।८१।।

वदतीति चेन्न प्राज्ञो हि प्रकरणात्।

[१]-४-५-(१)

प्रकृति ज्ञेय आहे असे श्रुति सांगते असे म्हणू नये; कारण प्रकरणावरून प्राज्ञ-आत्मा हाच तेथे ज्ञेय म्हणून सांगितला आहे, असे लक्षात येते.

शब्द, स्पर्श, रूप, रहित । गंध वा रस नसे ज्यात ।
अव्यय, अनादि, अनंत । महताच्या जे पलीकडे ।।८२।।
असे जे ध्रुव, नित्य, स्थिर । निश्चये त्या जाणल्यावर ।
पूर्णपणाने सुटतो नर । जबड्यामधुनी मृत्यूच्या ।।८३।।

या कठाच्या वर्णनी । म्हटले पर महताहुनी ।
अशब्द, अस्पर्श पदांनी । प्रकृति घ्यावी सांख्यांची ॥८४॥★
म्हणजे ती ज्ञेय आहे । सिद्ध होईल सहजी हे ।
परी काही अर्थ नोहे । सांख्यवाद्यांच्या वचनी या ॥८५॥
ज्याचा अर्थ प्रकृतीपर । करिती हे आग्रही नर ।
त्याच वचनी कथिली थोर । महती तेथल्या ज्ञानाची ॥८६॥
ज्या ज्ञानाच्या बळे प्राणी । सुटतो मृत्युमुखातुनी ।
हे फल ना कथिले कोणी । प्रकृतीच्या ज्ञानाचे ॥८७॥
एक ब्रह्माचेच ज्ञान । सोडवी मृत्यूच्या दाढेतून ।
एखाद्याच शब्दे म्हणून । प्रकृती येथे मानू नये ॥८८॥

त्रयाणामेव चैवमुपन्यासः प्रश्नश्च ।

[१]-४-६-(१)

तिघांच्याविषयीच प्रश्न आहे व उत्तरेहि त्या तिघांना धरूनच दिली आहेत.

नचिकेत्याने यमासी । विचारिले तीन प्रश्नांसी ।
म्हणून उत्तरे ही तिघांसी । धरून दिधली ये ठायी ॥८९॥
अग्नीविषयी पहिला प्रश्न । जीवाविषयी दुसरा जाण ।
परमात्म्यासी उद्देशून । प्रश्न तिसरा केला असे ॥९०॥
तिन्ही प्रश्ना अनुसरून । यमे केले विवेचन ।
यात कोठे नाही स्थान । प्रकृती विषयी शंकेचे ॥९१॥
जे प्रश्नी ना विचारिले । ते उत्तरी कोठून आले ।
कसे म्हणावे सांगितले । अव्यक्त शब्दे प्रकृतीसी ॥९२॥

महद्वच्च ।

[१]-४-७-(१)

महत् शब्दाप्रमाणे अव्यक्त शब्दहि प्रकृतीचा वाचक नव्हे.

श्रुतीने जो महत् कथिला । तो सांख्यापेक्षा निराळा ।
नामसादृश्ये दोघाला । एक ऐसे मानू नये ॥९३॥★
महतासवे श्रुतीतुनी । आत्मा शब्द ये जोडुनी ।
पुरुष शब्दाचा काही स्थानी । योग आहे महतासह ॥९४॥
शोकातुनी पार होणे । मृत्युपाशातून सुटणे ।
अशापरीची प्रयोजने । कथिली महत्-ज्ञानाची ॥९५॥
महत् अव्यक्त म्हणोनि । घ्यावे न सांख्यांच्या अर्थांनी ।
त्या दोन्ही शब्दावरोनी । आत्मा हाचि जाणावा ॥९६॥

चमसवदविशेषात्।

[१]-४-८-(२)

अजा म्हणजे प्रकृति नव्हे. कारण तसे वैशिष्ट्य सांगितलेले नाही. चमसाप्रमाणेच हे समजावे.

सांख्यवादी पुन्हा म्हणे । श्वेताश्वतर उपनिषदाने ।
प्रकृति वर्णिल्या कारणाने । वेद प्रामाण्य आहे तिला ॥९७॥
वर्णन श्वेताश्वराचे । आहे काव्यमय भाषेचे ।
एक अजा आहे तिचे । रंग शुक्ल, रक्त, कृष्ण ॥९८॥★
आपुल्यासारखी संतति । विपुलपणे प्रसवते ती ।
एक अज भोगिता तिजप्रति । आसक्त होऊन राहतो ॥९९॥
अज दुसरा निर्ममपणी । देतो तिजसी टाकुनी ।
पुष्कळ भोग भोगुनी । वीट आल्यावरी जसा ॥१००॥
या वर्णनी अजा ती । आहे सांख्यांची प्रकृति ।
त्रिगुणांचे प्रतीक होती । रंग तिचे वर्णिलेले ॥१०१॥

अजा म्हणजे जन्मरहित । लक्षण हे प्रकृतीप्रत ।
पूर्णपणाने लागू होत । सांख्यांचिया विचाराने ॥१०२॥
यास्तव सांख्यांची प्रकृति । वेदा प्रमाण निश्चिति ।
परि नसे ही योग्य रीती । ऐसा अर्थ काढण्याची ॥१०३॥
हे एक आहे रूपक । येथील अजा शब्द देख ।
होऊ शकतो बोधक । कोणाहि अन्य वस्तूंचा ॥१०४॥
चमसाच्या उपमेपरी । स्थिति येथली आहे खरी ।
अर्थ करा ना कसा तरी । स्पष्ट उल्लेख नसतांना ॥१०५॥
यज्ञातील एका पात्रास । नाव हे आहे चमस ।
ते घेतलेसे रूपकास । बृहदारण्यकाभीतरी ॥१०६॥★
खाली तोंड, बूड वरी । ऐशा चमसामाझारी ।
भरून ठेविले निर्धारी । विश्वरूपी ऐसे यश ॥१०७॥
आता अशा या चमसाने । काय कळावे स्पष्टपणे ।
तैसेच येथल्या वर्णने । अजा शब्दाचे होत आहे ॥१०८॥
येथे चमसानंतर । स्पष्टपणे कथिले शिर ।
म्हणून उलगडा सत्वर । झालासे त्या रूपकाचा ॥१०९॥
तैसे अजा शब्दाने । येथे काय जाणून घेणे ।
ते पुढील सूत्राने । स्पष्ट आहे केलेले ॥११०॥

ज्योतिरूपक्रमा तु तथा ह्यधीयत एके।

[१]-४-९-(२)

परंतु अजा म्हणजे तेज इत्यादि त्रिवृत्कृत महाभूते होत.
काही तसेच म्हणतात.

छांदोग्य उपनिषदाभीतरी । वर्णिले आहे ऐशापरी ।
सद्रूप ब्रह्माच्या अंतरी । बहु होण्याची होत इच्छा ॥१११॥★
मग त्याच्यापासून । तेज, जल आणि अन्न ।
हे निर्माण झाले तीन । सर्व भूतांचे बीज जे ॥११२॥
मग या तीन देवताठायी । आत्मा प्रवेश करता होई ।
व्यक्त झाली त्यातून पाही । नामरूपे विश्वातली ॥११३॥
रूप अग्नीचे ते रक्त । वर्ण जलाचा तो श्वेत ।
कृष्णवर्णी अन्न असत । प्रतिनिधि जे पृथ्वीचे ॥११४॥
याच तिघांपासुनी । भूतमात्रांच्या चारी योनि ।
निर्माण झाल्या हे श्रुतींनी । कथिले आहे विस्तारे ॥११५॥
अजा शब्दाने घ्यावी येथे । त्रिवृत्कृत ती तीन भूते ।
कथिलेले त्यांचे वर्ण ते । तंतोतंत जुळती इथे ॥११६॥
पुष्कळ प्रजेची निर्मिती । कथिली असे तेथहि ती ।
चारी योनींची उत्पत्ति । उल्लेखिली स्पष्टपणे ॥११७॥
उघड असता हा आधार । नको कल्पनेचा स्वीकार ।
वेदवचनी नाही थार । सांख्य प्रकृति मानावया ॥११८॥
येथ जी कथिली प्रकृति । मायापर्याय म्हणून ती ।
जी माया आहे शक्ति । महेश्वराची मायावी ॥११९॥
येथे नाही अभिप्रेत । सांख्यांची प्रकृति निश्चित ।
तिची असे वेगळी जात । ती न शक्ति कुणाचीहि ॥१२०॥
यास्तव नामसादृश्याने । अर्थ ना करणे भ्रमाने ।
चुन्यास अमृत ना लेखणे । सुधा शब्द पाहोनिया ॥१२१॥

अंक शब्दाचे अर्थ दोन । एक मांडी, दुसरा चिन्ह ।
परी शशांक शब्दावरून । मांडी सशाची म्हणू नये ।।१२२।।
विनोद करण्या घटकाभरी । कोट्या कामी येती जरी ।
तत्त्वज्ञान कथिता तरी । शब्दसादृश्ये भुलावे ना ।।१२३।।
श्वेताश्वतरानेच पुढे । वर्णन केले अगदी उघडे ।
योनी योनीत रोकडे । अधिष्ठान या ईशाचे ।।१२४।।★
सर्व काही लया जाई । शेवटी या ईशाठायी ।
या देवासी जाणता होई । लाभ अत्यंत शांतीचा ।।१२५।।
या श्रुतिवचनावरून । पूर्ण येतसे कळून ।
की सर्वहि प्रकरण । आहे ब्रह्माविषयीचे ।।१२६।।
यास्तव अजेच्या वर्णनी । तेजादि भूते घ्यावी तिन्ही ।
छांदोग्य वचनावरूनी । संगती ही नीट लागे ।।१२७।।

कल्पनोपदेशाच्च मध्वादिवदविरोधः ।

[१]-४-१०-(२)

मधु इत्यादीच्या रूपकाप्रमाणेच येथेहि रूपक आहे म्हणून विरोध येत नाही.

अजा शब्दाचा अर्थ शेळी । धात्वर्थाने न जन्मलेली ।
येथ दोन्ही अर्थी मुळी । अजा शब्द आला नसे ।।१२८।।
जगामध्ये दिसते, शेळी । तांबूस, पांढरी नि काळी ।
म्हणून येथे घेतली । कौतुकाने रूपकासी ।।१२९।।
आणि तिच्याशी रममाण होणे । अथवा तिला टाकून जाणे ।
ही असती उदाहरणे । बंध-मोक्ष कल्पनेची ।।१३०।।

त्यावरून जीव-भेद । मुळीच ना होतो सिद्ध ।
व्यवहारातले प्रसिद्ध । ज्ञानी अज्ञानी असती हे ॥१३१॥
अशी रूपके श्रुतीठायी । वारंवार येती पाही ।
सूर्य हा मध नसे काही । तरी म्हटले मधु तया ॥१३२॥
धेनु शब्दे म्हटली वाणी । स्वर्गासी कल्पिले अग्नि ।
तैसे तेजादि लागुनि । अजा येथे म्हटलेसे ॥१३३॥

**न संख्योपसंग्रहादपि नानाभावादतिरेकाच्च।**

[१]-४-११-(३)

संख्येने सांख्यतत्त्वाचा संग्रह केला जातो असे म्हणता येत नाही, कारण ती तत्त्वे सांख्यांपेक्षा भिन्न आहेत व अधिकहि आहेत.

बृहदारण्यामधून । आले असे एक वचन ।
आकाश पंच पंचजन । ज्यात असती प्रतिष्ठित ॥१३४॥★
त्यास मी अमर, जाणता । मानितो आत्मा तत्त्वता ।
मृत्यूची न चाले सत्ता । असे जे ब्रह्म तेचि हा ॥१३५॥
येथील पंच पंचजन । पंचवीस अर्थी घेऊन ।
धरूनिया मताभिमान । म्हणती कथिली सांख्यतत्त्वे ॥१३६॥
वेद प्रामाण्य दावावया । प्रयत्न हा करिती वाया ।
पंचवीस अर्थ करावया । वाव नाही या स्थानी ॥१३७॥
चार महिने चातुर्मास । पूजा सात सप्तर्षीस ।
तीन पायी तिपाईस । ऐसे बोलती लोकामध्ये ॥१३८॥
घेऊन संख्येचा आधार । करिती न येथे गुणाकार ।
तसाच आहे हा प्रकार । पंच पंचजनांचाहि ॥१३९॥

वादासाठी तैसेहि । जरी मानिले याठायी ।
पंचवीस संख्या घेता पाही । पंच पंचजनांमुळे ॥१४०॥
तत्त्वांची संख्या सत्तावीस । होईल की या स्थलास ।
आत्मा आणि आकाश । मिळवावे लागल्यामुळे ॥१४१॥
सांख्यमताचा संख्येशी । विरोध असे हा विशेषी ।
तेणे पंच पंचजनांशी । सांख्य संख्या मानू नये ॥१४२॥

प्राणादयो वाक्यशेषात्।

[१]-४-१२-(३)

प्राणादि हे पंचजन होत व हे वाक्याच्या पुढील संदर्भावरून लक्षात येते.

या मंत्राच्या नंतरी । लगेच आल्या वाक्यांतरी ।
प्राणादींच्या प्रकारी । पांच तत्त्वे कथिली जी ॥१४३॥★
तीच मानावी या स्थली । या पंचशब्दाने भली ।
प्राणासकट जी निवेदिली । चक्षु, श्रोत्र, अन्न, मन ॥१४४॥
काही लोकांच्या मताने । पंच जन या शब्दाने ।
देव, पितर, गंवर्ध घेणे । मानव आणि राक्षस ॥१४५॥
काही विद्वानांच्या मती । पंचजन या पांच जाति ।
ब्राह्मणादि चार घेती । निषाद पाचवा जाणावा ॥१४६॥
अर्थ यातील कोणताहि । पंचजनाचा घेता येई ।
परी त्याचा संबंध नाही । सांख्ये कथिल्या तत्त्वाशी ॥१४७॥

ज्योतिषैकेषामसत्यन्ने।

[१]-४-१३-(३)

एका पाठामध्ये अन्न सांगितले नसले तरी ज्योति सांगितली आहे. त्यामुळे पाच संख्या पुरी होते.

माध्यंदिन शाखेच्या मती । पंचजन घेता येती ।
कारण प्राणाच्या संगति । अन्न शब्द आहे तिथे ॥१४८॥
परी कण्वशाखेभीतरी । अन्न शब्द न पाठांतरी ।
ते पाच संख्या करण्या पुरी । मागचा घेती ज्योति शब्द ॥१४९॥★
पाठ भेदाने यापरी । भिन्नता मंत्राभीतरी ।
राहू शकते नानापरी । त्यामुळे ना विरोध ये ॥१५०॥
ऐशा रीतीने प्रकृतीसी । वेदप्रामाण्य ना निश्चयेसी ।
एक ब्रह्माविण कुणासी । स्वतंत्र सत्ता नाही लव ॥१५१॥
तेच जगाचे कारण । तेच सर्व अधिष्ठान ।
अंतर्बाह्य व्यापून । तेच आहे विश्वासी ॥१५२॥

कारणत्वेन चाकाशादिषु यथाव्यपदिष्टोक्तेः ।

[१]-४-१४-[४]

ब्रह्म हेच आकाशादींचे कारण आहे; कारण तसेच
त्याचे वर्णन श्रुतीतून आले आहे.

ब्रह्म जगाचे कारण । ऐसे म्हणता आवर्जून ।
परंतु वेदांमधून । भिन्न कारणे दिसताती ॥१५३॥
आत्म्यापासून आकाश झाले । प्रथम ऐसे कधी म्हटले ।
कधी आहे वर्णन केले । तेज झाले आरंभी ॥१५४॥
आरंभी निर्मिला प्राण । श्रद्धा जन्मली प्राणातून ।
पुढे श्रद्धेपासून । आकाश, वायु, अग्नि, जल ॥१५५॥
कोठे म्हटले हे सगळे । लोक एकदाचि निर्मिले ।
ऐसे वेगवेगळे । वर्णन विश्व निर्मिल्याचे ॥१५६॥

ब्रह्म म्हणता चेतन । सर्वज्ञहि परिपूर्ण ।
मग आलीसे कोठून । अव्यवस्था ही ऐशी ॥१५७॥
काही वेदमंत्रांवरून । ऐसेहि ये दिसून ।
की विश्व हे निर्माण । आपोआप झाले असे ॥१५८॥
आणि क्वचित् काही स्थली । असतापासून सृष्टी झाली ।
असे म्हटले तेव्हा मुळी । ब्रह्म कारण मानता का ॥१५९॥
दिसोनि येते विसंगति । विकल्प नाना संभवती ।
ऐसे स्पष्ट असता, श्रुति । प्रमाण केवी मानावी ॥१६०॥
सिद्ध वस्तुच्या संबंधाने । चालले असता बोलणे ।
ऐसी नाना कारणे । सर्वज्ञ वेद सांगे कशी ॥१६१॥
या विश्वाच्या निर्मितीचा । एकचि क्रम असावयाचा ।
बोध परंतु तयाचा । वेदांवरूनी होत नाही ॥१६२॥
म्हणोनि वेदास सोडुनी । स्मृति, न्याय प्रमाणांनी ।
प्रकृतीसम अन्य कुणी । कारणे का न मानावी ॥१६३॥★
परी हे म्हणणे अनुचित । येथे न घेतले लक्षात ।
की वेदांच्या प्रतिपादनात । मुख्य उद्देश काय आहे ॥१६४॥
वेदा सृष्टीची निर्मिती । कशी झाली कोण्यारीती ।
ही गोष्ट काही नव्हती । सांगावयाची मुख्यतः ॥१६५॥
वेदांचे ते प्रयोजन । सांगणे जगाचे कारण ।
निमित्त आणि उपादान । ब्रह्म एक हे सर्वस्वी ॥१६६॥
या आद्य कारणाच्या विषयी । दिसोनिया येत नाही ।
मतभेद तो वेदांठायी । कुठेच अंशमात्राने ॥१६७॥

सृष्टीचे जे वर्णन । ते ब्रह्म जाणण्याचे साधन ।
ऐसे आरुणी करी कथन । श्वेतकेतु पुत्रासी ॥१६८॥
शरीराचे मूळ अन्न । त्यावरून घेता जाणून ।
की अन्नाचे मूळ कारण । जल ऐसे कळून ये ॥१६९॥
तेच जलाचे मूळ असे । त्याचे मूळ शोधिता दिसे ।
की तेज जन्मा आलेसे । एक सत् या मुळातुनी ॥१७०॥
हे सत् मूळ साचे । या सर्वहि प्रजांचे ।
तैसेच साऱ्या विश्वाचे । अधिष्ठान तेच आहे ॥१७१॥
सत् या मूलकारणासी । शोधू जाता निश्चयेसी ।
अंती कळो येई तुजशी । 'तूहि तेच आहेस' हे ॥१७२॥★
मुळात जे गौण पाही । ज्यास महत्त्व फार नाही ।
साधन म्हणून ज्याचा काही । लाभ होतो बोधास्तव ॥१७३॥
त्याच्याविषयी सांगतांना । असे होती प्रकार नाना ।
जिज्ञासूंच्या अवस्थांना । अनुलक्षून आहे हे ॥१७४॥
नद्या डोंगरातून येती । पावसामुळे जन्मती ।
नद्यांची होते उत्पत्ति । मेघांपासून पृथ्वीवरी ॥१७५॥
सागर हे मूळकारण । सर्व नद्यांचे असे जाण ।
म्हणून सागरा येऊन । अंती मिळावे लागते त्या ॥१७६॥
अशी वर्णने विविधरीती । नद्यांविषयी केली जाती ।
परी त्यात न विसंगति । विरोध वा काही नसे ॥१७७॥
दुग्धप्राप्तीचे साधन । गाय, पेंड, गवळण ।
प्रसंगाने वर्णन । होते त्यातील एकाचे ॥१७८॥

स्थूल दृश्य जे जे काही । त्या वर्णिता असेच होई ।
कार्यकारण भेद राही । नानाप्रकारे त्यामध्ये ॥१७९॥
म्हणून सृष्टीचे वर्णन । दिसे वेगळे श्रुतीतून ।
विसंगतीचे अनुमान । त्याच्यावरून करू नये ॥१८०॥
जीवनाची सार्थकता । लाभे ब्रह्मज्ञान होता ।
म्हणोनिया श्रुतिमाता । नानापरीने शिकवी ते ॥१८१॥

समाकर्षात्।

[१]-४-१५-[४]

पुढील वर्णनात ब्रह्माचाच संबंध असल्यामुळे मागील वर्णनात आलेल्या असत् शब्दाने ब्रह्मच घेतले पाहिजे.

असत् जगताचे कारण । हे जे आहे श्रुतिवचन ।
त्या असताचा अर्थ शून्य । मुळीच नाही ते ठायी ॥१८२॥★
शून्य अर्थाने ब्रह्मास । असद्रूप मानी, त्यास - ।
भोगावा लागतो विनाश । असा धोका सांगे श्रुति ॥१८३॥
यावरून कळो येत । शून्य अर्थाने असत् ।
मुळीच नाही संमत । वेदांमध्ये कोठेहि ॥१८४॥
शून्य अथवा अभाव । हा न ब्रह्माचा स्वभाव ।
शुद्ध अस्तित्वाचेच नाव । ब्रह्म आहे समजावे ॥१८५॥
म्हणून असतापासून । हे झालेसे निर्माण ।
ऐसे म्हणता समजून । अर्थ घेणे असताचा ॥१८६॥
हुतुतूच्या खेळता खेळा । म्हणतताती हा गडी मेला ।
खरेच ते मानून त्याला । नेती काय स्मशानात ॥१८७॥

अर्थ करितांना शब्दांचे । भान असावे संदर्भाचे ।
ना तरी खुळेपणाचे । प्रदर्शन होईल ते ॥१८८॥
या सृष्टीची निर्मिति । होण्यापूर्वीची जी स्थिति ।
नाम, रूप, गुणाकृति । व्यक्त नव्हते काहीहि ॥१८९॥
त्या स्थितीसी उद्देशून । तिचे स्वरूप येण्या कळून ।
असत् ऐसे अभिधान । उपयोगिले वेदाने ॥१९०॥
अभावातून भावाची । निर्मिती ना व्हावयाची ।
वंध्यापुत्रांच्या मुलांची । लग्ने कधी लागती ना ॥१९१॥
'अभाव' असत् शब्दातुनी । अर्थ काढावा ना कुणी ।
म्हणून लगेच त्या स्थानी । आत्मा सुकृत म्हटले त्या ॥१९२॥
उपनिषदातून सर्वठायी । ब्रह्माचेच वर्णन येई ।
जगत्कारण म्हणून, नाही । अभाव अर्थ असताचा ॥१९३॥
जगत् आपोआप झाले । असे श्रुतीने नाही म्हटले ।
सरळ वाक्याचे त्या केले । विपर्यास नास्तिकांनी ॥१९४॥
विश्व आधी अव्यक्त होते । नामरूपे प्रगटले ते ।
बृहदारण्यक उपनिषदाते । वाक्य आहे ऐसे हे ॥१९५॥★
नदीतीरी गाव वसले । ऐसे जाते बोलले ।
म्हणून का ते उगवले । आपोआप काठावरी ॥१९६॥
विश्वाचीहि तीच स्थिति । कर्ता आहेच त्याप्रति ।
त्याची गायिलीसे महति । पुढच्याच वाक्यातुनी ॥१९७॥
नखाच्या टोकापर्यंत । शिरोनि तो आहे येथ ।
आपोआप झाले जगत् । म्हणता कोण शिरतो हा ॥१९८॥

आपोआप जगाठायी । होणे काही शक्य नाही ।
जे जे काही निर्माण होई । तेथे प्रेरणा ब्रह्माची ॥१९९॥
जाणीवयुक्त चेतन । आहे सर्वांचे कारण ।
सर्वहि यंत्राचे संचलन । कर्तृत्व जेवी माणसाचे ॥२००॥

जगद्वाचित्वात्।

[१]-४-१६-[५]

कर्म म्हणजे जग. त्याचा कर्ता ब्रह्मच होय.

कौषीतकी असे कथन । की एक गार्ग्य कुलोत्पन्न ।
बालाकि नामे ब्राह्मण । होता फार अहंकारी ॥२०१॥★
हिंडोनिया देशोदेशी । सांगे ब्रह्मज्ञानासी ।
कीर्ति आणि धनराशी । मिळविण्याच्या उद्देशे ॥२०२॥
तो एकदा फिरत फिरत । आलासे काशी देशात ।
जेथे राज्य होता करीत । अजातशत्रु नामे नृप ॥२०३॥
ज्ञानी, धार्मिक होता राजा । सुखी होती त्याची प्रजा ।
पाहून ज्याच्या ब्रह्मतेजा । लज्जित व्हावे ऋषींनीहि ॥२०४॥
त्याच्याकडे येऊन । म्हणे हा गर्विष्ठ ब्राह्मण ।
राजा व्हावे सावधान । सांगतो मी ब्रह्म तुला ॥२०५॥
नृपे देऊन दक्षणा । आदरिले, त्या ब्राह्मणा ।
धरोनिया नम्रपणा । म्हणे आता सांगावे ॥२०६॥
मग तया ब्राह्मणाने । नवे सांगतो या मदाने ।
उपासनेची अधिष्ठाने । कथिली चंद्रसूर्यादि ॥२०७॥

पंचभूते सांगितली । इंद्रियेहि देहातली ।
परंतु त्या सर्वांमधली । उणीव दाविली राजाने ।।२०८।।
अन्ती ब्राह्मण ओशाळला । राजाप्रति शरण गेला ।
आणि म्हणे तुम्हीच मला । आता ब्रह्म सांगावे ।।२०९।।
मग राजा म्हणे त्यासी । जे तू माते कथिलेसी ।
त्या देवतांदिकासी । कोणी निर्माण केले असे ।।२१०।।
भूते, इंद्रिये, देवता । हे कर्म कुणाचे तत्त्वता ।
याचा कोण असे कर्ता । हेच घ्यावे जाणुनी ।।२११।।
सर्व जगत् हे येथे कर्म । कर्ता त्याचा असे ब्रह्म ।
वरील संवादाचे मर्म । हेच आहे निश्चयाने ।।२१२।।

जीवमुख्यप्राणलिङ्गान्नेति।
चेत्तद्व्याख्यातम्।

[१]-४-१७-[५]

जीव आणि मुख्य प्राण यांची लक्षणे सांगितली आहेत, म्हणून येथे परमात्मा घेता येत नाही; असे म्हणू नये, कारण त्याचे स्पष्टीकरण केले आहे.

संवादाच्या ओघात जरी । विस्ताराने नानापरी ।
जीव प्राणा वर्णिले तरी । कर्ते ते ना जगताचे ।।२१३।।
जीव असो वा असो प्राण । व्योम सूर्य वा हुताशन ।
ब्रह्म हेच अधिष्ठान । आहे तया सर्वांचे ।।२१४।।
संवादाचा उपसंहार । त्याचा केल्यासी विचार ।
कळून येते खरोखर । कर्म जगत् ब्रह्म कर्ता ।।२१५।।

अन्यार्थं तु जैमिनिः प्रश्नव्याख्याना-
भ्यामपि चैवमेके।

[१]-४-१८-[५]

परंतु येथे जीवाचाच उल्लेख निराळ्या उद्देशाने केला आहे असे प्रश्नोत्तराच्या संदर्भावरून जैमिनि म्हणतात; आणि काही पाठात जीवाचा उल्लेखहि आहे.

बालाकि आणि भूपति । हे जी प्रश्नोत्तरे करिती ।
त्यात वर्णिले जीवाप्रति । ऐसे जरी मान्य केले ॥२१६॥
तरी म्हणती जैमिनि । श्रोता व्हावा ब्रह्मज्ञानी ।
याच एका उद्देशानी । जीव वर्णिला आहे तिथे ॥२१७॥
स्नेहभावाने भूपाले । बालाकिचे हात धरले ।
आणि तयाप्रति नेले । एका निद्रिस्त व्यक्तीकडे ॥२१८॥
बालाकिसी दाखविले । पहा याचा प्राण चाले ।
संथ श्वासोच्छ्वासामुळे । लक्षामध्ये येते हे ॥२१९॥
मग प्राणांची नावे सारी । घेऊन भूप त्या हाक मारी ।
झोपलेला पुरुष तरी । जागृत काही झाला ना ॥२२०॥
तेव्हा तयास काठीने । डिवचलेसे भूपतीने ।
तो पुरुष त्यायोगाने । जागा होऊन बोलला ॥२२१॥★
तेव्हा म्हणाला भूपति । प्राण याचा जागेवरती ।
असता सांग निश्चिति । जीव गेला होता कुठे ॥२२२॥
हा जेव्हा जागा झाला । तेव्हा तो कोठून आला ।
ऐसी चालना विचाराला । भूपे दिली बालाकिच्या ॥२२३॥

ब्रह्माचे व्हावया ज्ञान । चर्चेचे या प्रयोजन ।
जीव येथे होतो लीन । तोचि आत्मा, ब्रह्म तेचि ॥२२४॥
वाजसनी शाखेचे लोक । करिती जीवाचा उल्लेख ।
विज्ञानमय पुरुष एक । ऐसे शब्द वापरोनि ॥२२५॥★
एकूण या चर्चेठायी । मुख्य विषय प्राण नाही ।
उद्देश आहे येथीलहि । ब्रह्मज्ञाना विषयींचा ॥२२६॥

वाक्यान्वयात् ।

[१]-४-१९-(६)

प्रकरणावरून "आत्म्याचे श्रवण करावे" इत्यादि वाक्यात परमात्माच सांगितला आहे.

श्रीयाज्ञवल्क्य महर्षि । तपोनिधि ज्ञानराशी ।
त्यांनी ठरविले मनासी । घर सोडून जावयाचे ॥२२७॥★
त्यासी भार्या होत्या दोन । मैत्रेयी, कात्यायनी म्हणून ।
त्यांची वाटणी करून । देण्याचे त्यांनी योजिले ॥२२८॥
जवळ जी होती संपत्ति । दोन भागात केली ती ।
आणि म्हणाले या रीती । मैत्रेयीसी बोलावुनी ॥२२९॥
मी जातो घर सोडुनी । तू आणि कात्यायनी ।
यांची करितो वाटणी । अर्धे धन देतो तुला ॥२३०॥
मैत्रेयी होती विचारी । बोलली ती परमादरी ।
आपणासारखा अधिकारी । पति असता काय उणे ॥२३१॥
परी एक विचारिते । क्षमा करावी दासीते ।
जरी झाले प्राप्त माते । धन साऱ्या पृथ्वीतले ॥२३२॥

तरी मी त्याने अमृत । होईन का वदा नाथ ।
याज्ञवल्क्य सांगतात । सर्वथैव अशक्य ते ॥२३३॥
संपत्तीच्या बळावरी । भोग साधने मिळती जरी ।
आशाहि नको अंतरी । धने अमृत होण्याची ॥२३४॥
तेव्हा म्हणाली मैत्रेयी । धन घेऊन करू कायी ।
ज्ञानधन जे आपणाठायी । त्याचा लाभ द्यावा मला ॥२३५॥
ज्याने मी होईल अमृत । असे ज्ञान द्या मजप्रत ।
ज्ञानी आपण भगवंत । कृपा करा माझेवरी ॥२३६॥
तेव्हा याज्ञवल्क्य महर्षि । प्रसन्न झाले मानसी ।
प्रिये, तू आज आम्हासी । प्रिय झालीस पूर्वीहुनी ॥२३७॥
जेणे होईल समाधान । असे कथितो तुजसी ज्ञान ।
परी न सोडावे ऐकून । निदिध्यास करी त्याचा ॥२३८॥
मैत्रेयी जाण निश्चिति । पतीसाठी नावडे पति ।
पतीच्या विषयी प्रिती । वाटे आत्मसुखास्तव ॥२३९॥
बायको वा मुले बाळे । संपत्ति वा गोत सगळे ।
हे जे सारे प्रिय वाटले । तेहि आत्मसुखास्तव ॥२४०॥
आत्मसुखावाचुन काही । प्रिय असे जगती नाही ।
आपण आपण म्हणतो पाही । मैत्रेयी जो आत्मा असे ॥२४१॥
आत्म्याचे हे दर्शन । त्याचे कथितो साधन ।
श्रवण मनन निदिध्यासन । यांनी आत्मा जाणावा ॥२४२॥
हा एक जाणल्या पाही । जाणले जाते सर्वहि ।
याच्याविण उरले नाही । वेगळे काही जगामधे ॥२४३॥

पतिपत्नीचे हे भाषण । भावमधुर अर्थ पूर्ण ।
मैत्रेयीब्राह्मण म्हणून । प्रसिद्ध आहे शास्त्रामधे ।।२४४।।
हा संवाद घेता विचारी । येथे आत्मा कोण तरी ।
प्रश्न ऐसा अंतरी । सहज उत्पन्न होतो की ।।२४५।।
येथे ज्याच्या सुखासाठी । प्रिय वाटती साऱ्या गोष्टी ।
तो आत्मा ना परमेष्ठी । जीवात्माच असावा तो ।।२४६।।
परमात्म्या ना सुखदुःख । प्रिय न त्यासी कोणी एक ।
म्हणून आत्मा हा लौकिक । वाटे असावा जीवात्मा ।।२४७।।
पाहणे आणि ऐकणे । हे साधते इंद्रियाने ।
आणि इंद्रियाकारणे । परमात्मा हा विषय नाही ।।२४८।।
म्हणोनि वर्णन येथले । परमात्म्यासी केवी जुळे ।
दिसे शोभून सगळे । जीवात्म्यासी मानिल्याने ।।२४९।।
परंतु या संशयात । अर्थ नाही यत्किंचित ।
सर्व वाक्ये विचारात । घेता अर्थ स्पष्ट होतो ।।२५०।।
होईन मी अमृत । कशाने ते सांगा त्वरित ।
ऐसा येथे उपक्रमात । मैत्रेयीने प्रश्न केला ।।२५१।।
जीवात्म्याचे ज्ञान कायी । अमृतत्वा मिळवून देई ।
सर्व का जाणले जाई । जीवात्म्यासी जाणल्याने ।।२५२।।
आत्म्याच्या वर्णिता महतीस । ऋग्वेदादि विद्या विशेष ।
असती याचे श्वासोच्छ्वास । म्हटले, ते न जीवा जुळे ।।२५३।।★
म्हणोनि आत्मा ये ठायी । जीवात्मा हा होत नाही ।
जरी प्रियादि शब्द काही । थोडे जुळती जीवासी ।।२५४।।

प्रतिज्ञासिद्धेर्लिङ्गमाश्मरथ्यः।

[१]-४-२०-(६)

पाहण्याचा विषय म्हणून जीवात्मा सांगितला आहे, ही गोष्ट प्रतिज्ञासिद्धीचे लक्षण आहे, असे आश्मरथ्य म्हणतात.

ज्या एकाचे होता ज्ञान। सर्वहि येते कळून।
वा जे हे येते दिसून। सर्व आत्मा आहे तो ॥२५५॥
अशी प्रतिज्ञा ये ठायी। याज्ञवल्क्य करिता होई।
तिच्या सिद्धीसाठी पाही। उपक्रम हा जीवाचा ॥२५६॥
परमात्मा जीवाहून। सर्वथैव मानिल्या भिन्न।
एकाचे जाहल्या ज्ञान। होणार नाही दुसऱ्याचे ॥२५७॥
आणि मग प्रतिज्ञेसी। बाध येई निश्चयेसी।
म्हणून प्रतिज्ञा सिद्धीसी। वर्णन आले या रीती ॥२५८॥
जीव परमात्मा ना भिन्न। या अभिप्राया धरून।
श्रुति करी हे वर्णन। उपक्रमाने जीवाच्या ॥२५९॥
स्थूलातून सूक्ष्माकडे। जाणे सदा सोपे पडे।
ऐसे मत रोकडे। आश्मरथ्य आचार्यांचे ॥२६०॥

उत्क्रमिष्यत एवं भावादित्यौडुलोमिः।

[१]-४-२१-(६)

प्रगतीच्या टप्प्यावर पुढे जीव परमात्माच होतो म्हणून अभिन्न या रूपाने आरंभी तो सांगितला आहे; असे औडुलोमि म्हणतात.

औडुलोमि आचार्य म्हणती। जीव ब्रह्माची एकता ती।
झाल्यानंतरी मोक्षप्राप्ति। आहे सिद्ध व्हावयाची ॥२६१॥